
महाराष्ट्राचे शिल्पकार

# महाभागवत ह. भ. प.
# (वै.) धुंडामहाराज देगलूरकर

लेखक

डॉ. अरुण प्रभुणे



महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

महाराष्ट्राचे शिल्पकार

# महाभागवत

# ह. भ. प. (वै.) धुंडा महाराज देगलूरकर व्यक्ती व कार्य

• लेखक •

डॉ. अरूण प्रभुणे (पुणे)

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

वाय २०१-१

▸▸ **पुस्तकाचे नाव : महाराष्ट्राचे शिल्पकार महाभागवत**
**ह. भ. प. (वै.) धुंडा महाराज देगलूरकर**

▸▸ **लेखक :** डॉ. अरूण प्रभुणे (पुणे)

▸▸ **प्रथमावृत्ती २०१४**

▸▸ **प्रकाशक :** सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
रवींद्र नाट्यमंदिर इमारत, दुसरा मजला,
पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार,
सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई--४०० ०२५.

▸▸ © **प्रकाशकाधीन**

▸▸ **मुद्रण :** व्यवस्थापक,
शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार,
ताराबाई पार्क, कोल्हापूर--४१६ ००३.

▸▸ **किंमत : रुपये ७८/-**

**या पुस्तकात व्यक्त केलेली मते स्वतः लेखकाची असून, या मतांशी साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र शासन सहमत असेलच असे नाही.**

## अर्पण पत्रिका

ह. भ. प. (वै.) धुंडा महाराज देगलूरकर यांच्या
चरित्राचा आणि साहित्याचा अभ्यास करण्यासाठी
प्रोत्साहित करणारे
कै. (डॉ.) हे. वि. इनामदार (सर)
आणि
'ह. भ. प. (वै.) धुंडा महाराज देगलूरकर-
एक ग्रंथकाराभ्यास'—
या विद्यापीठीय प्रबंधासाठी मार्गदर्शन करणाऱ्या
प्रा. डॉ. मृणालिनी शहा या दोन्ही गुरूवर्यांना ही
साहित्यकृती सादर
सर्मपित !

—डॉ. अरूण प्रभुणे (पुणे)

# निवेदन

वारकरी संप्रदायाचे ह. भ. प. पूजनीय धुंडा महाराज देगलूरकर हे प्रवचनकार, कीर्तनकार आणि ग्रंथलेखक या भूमिकेतून महाराष्ट्राला परिचित आहेत. महाराजांचा जन्म निजाम संस्थानामध्ये झाला. शंभर वर्षांपूर्वीच्या काळामध्ये निजामशाहीत हिंदू धर्माचे तत्त्वज्ञान वारकरी संप्रदायाच्या माध्यमातून प्रस्तूत करणे हे मोठेच अवघड कार्य होते. देगलूरकरांच्या परंपरानिष्ठ वारकरी संप्रदायामध्ये पूजनीय धुंडा महाराजांचा जन्म झाला होता. जणूकाही योगीराजांचे घराणे असावे अशा पध्दतीच्या त्या घराण्यात परमेश्वराची उपासना व वारकरी संप्रदायाचा प्रसार हे कार्य निष्ठापूर्वक चालू होते. खुद्द धुंडा महाराज हे संत साहित्याचे अभ्यासक आणि श्री ज्ञानेश्वरांचे उपासक. तुकाराम गाथा, एकनाथी भागवत यांचा सखोल अभ्यास त्यांनी केला होता. पंढरपूर येथे चातुर्मासाच्या काळात महाराज अनेक आध्यात्मिक ग्रंथांवर भाष्य करीत व ते श्रोत्यांना सोप्या भाषेत समजावून सांगत. पूजनीय धुंडा महाराज देगलूरकर यांना ८८ वर्षांचे प्रदीर्घ आयुष्य लाभले. हा सर्व काळ त्यांनी ईश्वराची साधना आणि वारकरी संप्रदायाचा प्रसार यामध्ये व्यतीत केला. महाराष्ट्राच्या संत परंपरेमध्ये त्यांचे योगदान अतिशय महत्त्वाचे आहे. नव्या पिढीला महाराजांच्या या अलौकिक चरित्राचा परिचय होऊन त्यातून सद्‌धर्माची प्रेरणा मिळावी या हेतूने त्यांचे चरित्र डॉ. अरूण प्रभुणे या व्यासंगी लेखकानी लिहून मंडळाला सहाय्य केले याबद्दल त्यांना धन्यवाद देऊन हा ग्रंथ वाचकांना सादर करतो.

(मधु मंगेश कर्णिक)
अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

स्थळ : मुंबई
दिनांक : ऑगस्ट, २०१३

## ।। आशीर्वाद ।।

।। श्रीगुरु प्रसन्न ।।

**महाराष्ट्राचे शिल्पकार महाभागवत**

## ह. भ. प. (वै) धुंडामहाराज देगलूरकर

या नावानें माननीय अरूण यज्ञेश्वर प्रभुणे यांनी हे श्री. ब्र. भू. धुंडामहाराजांचे चरित्र लिहिले आहे. हे कार्य अतिशय चांगले आहे. संतचरित्र लेखनाने मुक्त महात्म्याच्या वर्णनानें अतिशय मोठा लाभ होतो. याविषयीं श्री ज्ञानेश्वर महाराज सांगतात—

*जे मुक्तातें निर्धारितां । लाभे आपलीच मुक्तता ।*
*जैसी दीपें दिसे पाहतां । आपली वस्तु ।। ज्ञा. १८/३९७ ।।*

याचा भावार्थ असा कीं, मुक्ताचा विचार केला असतां, आपली अनादि सिध्द असलेली 'मक्तता' आपल्यास प्राप्त होते. ज्याप्रमाणें दिव्या साह्यानें पाहिलें असतां, आपलीच अंधारात असलेली वस्तु आपल्यालाच प्राप्त होते.

या ओवींत सांगितल्याप्रमाणें ब्रह्मलीन श्री धुंडामहाराजांच्या अर्थात् एका 'मुक्ता' च्या चरित्रानें, मुक्त पुरुषाच्या चरित्र लेखनाने आणि त्या चरित्र वाचनानें आपली'च' मुक्तता लाभते. म्हणून या चरित्र लेखकास व भाविक, जिज्ञासु वाचकास त्यांची'च' अनादि सिध्द 'मुक्तता' लाभावी म्हणजे यथावत् अभिव्यक्त व्हावी !!

हा आशीर्वाद !!!

भवदीय
—**किसनमहाराज साखरे**

दि. २८-९-२०१३
'साधकाश्रम'
आळंदी देवाची
भाद्रपद वद्य नवमी
शके १९३५

## ह. भ. प. (वै.) धुंडा महाराज देगलूरकर :
## व्यक्ती व कार्य

॥१॥

# प्रास्ताविक

**प्रास्ताविक--**

कोणाही संताचे जीवन, त्यांचे कार्य आणि त्यांनी प्रबोधनात्मक स्वरुपात निर्माण केलेले वाङ्मय या सर्वांवर तत्कालीन (विशेषत: सामाजिक, राजकीय, धार्मिक तथा सांस्कृतिक) परिस्थितीचा परिणाम अपरिहार्य ठरतो. परिस्थितीला अनुलक्षून संतांच्या कार्याची दिशा निश्चित झालेली दिसते. म्हणूनच कोणाही संताचे चरित्र लेखन करताना लेखनकर्त्यास वरील सर्व गोष्टींची जाणीव-ज्ञान करुन घेणे अपरिहार्य ठरते. मराठी साहित्यात संत साहित्याचा समावेश वारकरी संप्रदायाच्या संतांपासून अधिक प्रमाणात झाला. (अपवाद-महानुभाव संप्रदायाचे साहित्य). त्यांची विचारसरणी, तत्त्वप्रणाली ही मात्र परंपरागत चालत आलेल्या वैदिक हिंदुधर्माशी सुसंगत अशीच राहिली होती तरी त्यात आधुनिक विचारसरणीचे पुरोगामित्व दिसून येते. धर्म-पंथ प्रचार, संरक्षण आणि प्रबोधन हे जरी संत कार्याचे प्रधान हेतू असले तरी त्यावर समग्र परंपरेचा व सुधारलेल्या विचारसरणीचा प्रभाव असतो. हे स्पष्ट होते.

अभ्यासक विद्वानांनी मध्ययुगीन संत व अर्वाचीन संत असा संतांमध्ये कालिकदृष्ट्या भेद केलेला असला, तरी दोहोंच्या कार्याची दिशा जशी एकच दिसते, तसेच जीवनविषयक तत्त्वज्ञानातही एकवाक्यता/विचारसरणीतील सारखेपणा आढळतो. भारतीय धर्म आणि संस्कृती प्रणालीमधील अद्वैत विचार हाच त्यातून प्रामुख्याने आणि प्रकर्षाने प्रकट झालेला दिसतो. ज्ञान, कर्म, भक्ती, योग अशा मोक्ष साधनांच्या विवेचनात फरक करणारे अनेक संप्रदाय किंवा पंथ मध्ययुगीन काळापासून (खरे तर काहींच्या मते प्राचीन काळापासून) आजपावेतो निर्माण झालेले आहेत. त्यांचे सिद्धांत आणि साधना यादृष्टीने अभ्यासले असता सर्वांची भारतीय साक्षात्कार दृष्टी मात्र एकविश्व स्वरुपाची आहे हे जाणवते. भारतीय धर्मपंथाची ही शिकवण समाजात सतत जागृत ठेवण्याचे, पाझरत ठेवण्याचे व नीतिधर्मावर अधिष्ठित समाज घडविण्याचे कार्य प्राचीन काळातील ऋषीमुनी, मध्ययुगीन काळातील आचार्य, संत आणि आधुनिक काळातील संत महात्मे, विचारवंत, अभ्यासक, समीक्षक आणि पंथाचे प्रवक्ते यांनीही अविरतपणे केले

आहे व आजही करीत आहेत. अलीकडच्या काळातील वारकरी संप्रदायात असे कार्य अव्याहतपणे करणाऱ्यात एक धुरंधर, अध्वर्यू, विचारवंत, पंथ प्रचारक, प्रसारक व प्रवक्ते आणि अधिकारी व्यक्ती म्हणून ह. भ. प. (वै.) धुंडा महाराज देगलूरकर यांचे स्थान नक्कीच अग्रणी स्वरुपाचे आहे. संस्कृत विद्येचे पारंगत, प्राचीन-अर्वाचीन धर्म- ग्रंथांचे अभ्यासक, विचारी तत्त्वज्ञ, मीमांसक, पंडित, निपुण कीर्तनकार, साक्षेपी प्रवचनकार, निष्ठावंत समाजसेवक आणि विशेषत: संत साहित्याचे गाढे अभ्यासक, अशा विविध पैलूंनी युक्त असणारे (वै.) धुंडा महाराजांचे व्यक्तिमत्त्व संपूर्ण महाराष्ट्राला ज्ञात आहे. ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, एकनाथी भागवत, तुकारामांची गाथा इतकेच नव्हेतर, वारकरी संप्रदायातील सकल संतांच्या साहित्याचा समग्र अभ्यास असणाऱ्या, त्यांच्या वाङ्मयाचे, ग्रंथांचे निरुपण करणाऱ्या मोजक्याच अभ्यासकांत ह. भ. प. (वै.) धुंडा महाराज देगलूरकरांचे नाव अग्रक्रमाने पुढे येते. त्यांचे पूर्ण नाव श्री. धुंडिराज रामचंद्र सिद्धरस. या कुटुंबाला देगलूर परिसरातील एक जहागीर मिळालेली होती. तिच्या देखभालीसाठी श्री. धुंडा महाराजांचे पूर्वज देगलूरला स्थायिक झाले होते. त्यावरुन त्यांचे आडनाव 'देगलूरकर' झाले आणि तेच सर्व परिचित झाले. समाजात आणि संप्रदायात त्यांचा उल्लेख धुंडा महाराज असा जरी केला जात होता, तरी कौटुंबिक जीवनात मात्र ते 'नाना' या उपनावाने संबोधले जायचे. प्रस्तुत ग्रंथात चरित्र लेखकाने त्यांच्या पूर्ण नावाचा उल्लेख न करता, केवळ 'महाराज' असा आदरार्थी स्वरुपात केला आहे.

माध्यमिक शिक्षणासाठी मी पुण्यात आलो, तेव्हा माझे वास्तव्य पुण्यातील श्री. हरिकीर्तनोत्तेजक संस्थेच्या वतीने चालविल्या जाणाऱ्या व्यास गुरुकुल (नारदमंदिर) येथे होते. येथील सात वर्षांच्या वास्तव्यात शालेय शिक्षणाबरोबरच धर्म-संस्कृतीचे पाठही मिळाले. मुख्य म्हणजे कीर्तनही शिकलो. याच काळात पुण्यातील आणि पुण्याबाहेरील अनेक मान्यवर कीर्तनकारांशी संबंध आला, परिचयही झाला. याच काळात ह. भ. प. श्री. धुंडा महाराज यांच्याशी थोडा परिचय झाला होता. त्यांची पुण्यातील नारदमंदिर, निवडुंग्या विठ्ठल मंदिर येथील काही कीर्तने ऐकण्याची संधीही मिळाली होती. या सर्वांमुळे कीर्तन परंपरा, कीर्तनसंस्था, अनेक कीर्तनकार आणि कीर्तनाचे तंत्र-मंत्र या संदर्भात माझ्या मनातील आदर वृद्धिंगत होत गेला.

वै. धुंडा महाराजांच्या महानिर्वाणाला आज दोन दशकांच्याहीपेक्षा अधिक काळ लोटलेला असला तरीदेखील ते आपल्या जीवनकार्यातून आणि ग्रंथलेखनाद्वारे मृत्युंजय ठरले आहेत. श्री. धुंडा महाराजांसारख्या थोर व्यक्तीच्या, महाभागवताच्या प्रबोधन कार्याचे महत्त्व स्थळकाळाच्या मर्यादा ओलांडून टाकणारे आहे. ते एखाद्या दीपस्तंभासारखे चिरकाल मार्गदर्शक आहेत. त्यांची दृष्टी एक सांस्कृतिक पाथेय होय. समाजातील सत्पुरुषाचे कार्य हे वसंतऋतूप्रमाणे समाजात मांगल्य, शांती, समृद्धी, आनंद यांचा वर्षाव करणारे असते, जे स्वत: दुस्तर भवसागर पार करुन जातात, शिवाय इतरांचाही उद्धार करतात.

**"शान्तो महन्तो निवसन्ति सन्तो । वसन्तवत् लोकहितं चरन्तः ।**
**तीर्णाः स्वयं भीमभवार्णवं जनान् । अहेतुमन्यानपि तारयन्तः ।"**

**– इति शंकराचार्य**

"मुख्यत्वें ग्रंथींचे राखावे प्रेम । प्रतिपादावे परब्रह्म ।" ही संतश्रेष्ठींची शिकवण शिरोधार्थ मानून महाराजांनी आपले सारे जीवन वेदशास्त्रादी ग्रंथांसह संत वाङ्मयासवे व्यतीत केले. आपल्या वाणी-लेखणीने साऱ्या महाराष्ट्राचे जनजागरण केले. हा चरित्रग्रंथ म्हणजे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा वेध घेत, त्यांच्या साहित्यकृतींना हलकासा, हळुवार स्पर्श करीत, त्यांचा जीवनपट उलगडण्याचा प्रयत्न आहे. 'माझे श्वासोच्छ्वास ही नवे । नित्य प्रबंध होआवे ।'–श्री ज्ञानदेवांच्या या उक्तीप्रमाणे महाराजांनीही आपला प्रत्येक क्षण वाणी-लेखणीबद्ध केला होता. अशा महनीय व्यक्तीच्या कार्याची बैठक लाभणारा समाज अर्थातच निरोगी आणि संस्कारी असणार. The history of a country is the history of its Greatmen.–हे या सर्वांचे मर्म होय.

**थोर महात्म्ये होऊन गेले । चरित्र त्यांचे पहा जरा ।**
**आपण त्यांच्या समान व्हावे । हाच सापडे बोध खरा ।।**

**– डॉ. अरुण प्रभुणे**

ह. भ. प. (वै.) धुंडा महाराज देगलूरकर :
व्यक्ती व कार्य

॥ २ ॥

# लौकिक जीवन

१. कुलं पवित्रं जननी कृतार्थ

२. एक दुर्लक्षित परंपरा

३. श्रेष्ठ कुलपरंपरेचे वारसदार

४. सरंजामशाहीतील हैद्राबाद संस्थान

५. महाराजांचे लौकिक जीवन--

# १. कुलं पवित्रं जननी कृतार्थ

ह. भ. प. (वै.) श्री. धुंडा महाराज देगलूरकर हे मराठी जनतेला वारकरी संप्रदायाचे अध्वर्यू प्रवक्ते, बिनीचे प्रवचनकार, प्रभावी कीर्तनकार आणि अभ्यासू व व्यासंगी ग्रंथ लेखक अशा विविध माध्यमातून परिचित होते व आजही ज्ञात आहेत. मराठी संतसाहित्याला अधिष्ठानभूत असलेल्या भक्तिवेदान्तपर ग्रंथसंपदेचे ते सिद्धहस्त, अभ्यासू आणि व्यासंगी लेखकही होते. वेद, पुराणे-उपनिषदे, मीमांसा आणि तत्त्वज्ञानपर ग्रंथांचा त्यांचा अभ्यास कमालीचा होता. आपल्या आयुष्यातील सुमारे सात दशके ते कुलक्रमागत आणि संप्रदायप्राप्त ज्ञानाची स्वत:त भर घालत राहिले, आणि आपल्या समृद्ध खजिन्यातून ते ज्ञान मेघवृष्टीने मराठी माणसाला सतत देतही राहिले होते. त्यांच्या ज्ञानसमृद्ध आणि भावमधुर रसाळ कीर्तन-प्रवचनांनी मराठी माणूस भारावून जात असे. त्यांच्या कीर्तनाची माधुरी इतकी विलक्षण होती की, तिचा आस्वाद घेण्यासाठी सहस्त्रावधी श्रोत्यांच्या काना-मनांना जिव्हा फुटत. आधुनिक महाराष्ट्रात एवढी असाधारण लोकप्रियता लाभलेले, भागवतधर्म प्रचारकात, एक ह. भ. प (प्राचार्य) शं. वा तथा मामासाहेब उर्फ सोनोपंत दांडेकर एक प्रभावी व्यक्तिमत्त्व होते. विशेषत: आधुनिक विद्यांच्या प्रभावाने दिपलेल्या शिक्षित समाजातही मराठी संतांच्या तेजाळ चरित्र-चारित्र्याचा आणि ब्रह्मरसाळ वाणीचा संस्कार घडविण्याचे व्यापक कार्य करणारांत प्रा. मामासाहेब दांडेकर आणि श्री. धुंडा महाराज देगलूरकर ही नावे अग्रक्रमाने येतात.

श्री. धुंडा महाराज हे असे भाग्यवंत पुरुष होते, ज्यांना पवित्र कुलाचा, पवित्र भूमीचा आणि पावन गुरुपरंपरेचा वारसा जन्मत:च लाभलेला होता. पुण्यतिर्था गोदावरीने भिजवलेली भक्तिरंजीत भूमी, श्री. गुंडा महाराजांसारख्या भक्तोतमाचे कूळ आणि गोदावरीच्या उगमापाशीच-त्र्यंबकमठिकेतून वाहत राहिलेल्या नाथ-संप्रदायाची परंपरा-असा अभूतपूर्व त्रिवेणीसंगम महाराजांच्या पाठीशी व पुण्याईने लाभलेला होता. त्यांचे नाव धुंडा (धुंडिराज) होते, तरी त्यांची वृत्ती-प्रवृत्ती मात्र 'परीसा'ची होती. ज्याला स्पर्श होईल त्याचे जीवनाचे सोने होई. त्यांच्या बुद्धि-वैभवाने, संत साहित्यावरील अधिकारवाणीने सारा महाराष्ट्र दुमदुमला गेला होता.

वारकरी संप्रदायात चैतन्य आणण्यात महाराजांचा मोठा सहभाग होता. अशा या आधुनिक संताच्या जीवनाचा घेतलेला हा मागोवा.

## २. एक दुर्लक्षित परंपरा

संतश्रेष्ठ श्री ज्ञानदेवांपासून निर्माण झालेल्या 'भागवत परंपरां' पैकी एक जी श्री ज्ञानदेव, श्री सोपानदेव, श्री विसोबा, श्री नामदेव महाराज या क्रमाने पुढे विकसित होत गेली. तर दुसरी 'योगपरंपरा' या नावाने ओळखली जाणारी परंपरा. श्री ज्ञानदेव, श्री सत्यमळनाथ, श्री गैबीनाथ, श्री उद्‌बोधनाथ, श्री केसरीनाथ, श्री शिवदीननाथ या क्रमाने पुढे प्रवाही होत गेली. या परंपरांचा अभ्यास संत साहित्याचे व मराठी वाङ्‌मयाचे अभ्यासकांनी केला, त्यावर भरपूर लेखनही केले. परंतु या परंपरांच्या मालिकेत तिसऱ्या परंपरेचा विसर संत व मराठी साहित्याचे अभ्यासक यांना झालेला दिसतो. ही परंपरा श्री ज्ञानदेव, श्री देवनाथ, श्री चुडामणी, श्री गुंडानाथ (प्रथम) अशी मानली जाते. प्रथम गुरुपरंपरेतून आलेली आणि पुढे गुरू आणि वंशपरंपरेने विकसित होत गेलेली.

## ३. श्रेष्ठ कुलपरंपरेचे वारसदार

श्री ज्ञानदेवांच्या नंतर बऱ्याच कालावधीने 'देवनाथ' नावाचे एक साधुपुरुष होऊन गेले. त्यांनी ज्ञानेश्वर महाराजांच्या दर्शनेच्छेने आळंदीत ज्ञानेश्वरीची अनेक पारायणे करुनही त्यांना ज्ञानदेवांनी दर्शन दिले नव्हते. श्री ज्ञानदेवांच्या भेटीस आपण अपात्र असून, ती भेट घडवून आणण्यास अपात्र असणारी जीभ शरीरात ठेवून तरी काय उपयोग ? असा विचार करुन एका तीक्ष्ण हत्याराने ती कापून टाकली होती. हा त्यांचा आत्यंतिक भाविक श्रद्धाभाव पाहून श्री ज्ञानदेव प्रकट झाले आणि आपल्या योग सामर्थ्याने देवनाथांची जिव्हा पूर्ववत केली. त्यांच्या मस्तकावर करकमल ठेवला व शांभव असे अद्वयानंदाचे निवृत्तिनाथापासून प्राप्त झालेले वैभव देवनाथांना देऊन त्यांना (देवनाथांना) महेशाच्या तुलनेत उतरविले होते. या देवनाथांनी देगलूर येथील 'श्री चूडामणी' नामक एका सत्पात्री साधकाला हे अद्वयानंदाचे वैभव देऊन ऋषीऋणातून मुक्त होण्याचे ठरविले. श्री ज्ञानदेवांपासून प्राप्त झालेला बोध

त्यांनी श्री चूडामणी यांना देऊन कृतार्थ केले. हेच श्री चुडामणी महाराज श्री गुंडा महाराज (प्रथम) यांचे सद्‌गुरू होत. यांच्यापासून श्री गुंडा महाराजांना बोध प्राप्त झाला होता.

'सिद्धरस'–हे देगलूरकर घराण्याचे मूळ कुलनाम. या घराण्यास प्राप्त झालेल्या जहागिरीची देखभाल करण्याच्या हेतूने देगलूर (जि. नांदेड, मराठवाडा) येथे स्थायिक झालेले सिद्धरस पुढे देगलूरकर याच नावाने प्रसिद्ध झाले. अत्यंत धर्मनिष्ठ, आचार-विचार संपन्न आणि परोपकारी घराण्यात सतत महाभारत, भागवत, ज्ञानेश्वरी, तुकाराम गाथा इ. धर्मग्रंथांचे वाचन, भजन, कीर्तन आणि पंढरीची वारी या सर्व गोष्टी कुलाचाराप्रमाणे केल्या जात होत्या. परंपरेतील सर्वच व्यक्ती नीतिसंपन्न, शुद्ध सात्त्विक, आचारवंत, अतिथींबद्दल अगत्यशील, गरिबांप्रती कणव असणाऱ्या आणि मुख्य म्हणजे समाजाचा पारमार्थिक विकास व्हावा ही समाजनिष्ठा बाळगून त्या दृष्टीने प्रयत्नशील होत्या व समाजही देगलूरकर घराण्याचा नित्य आदर करीत होता, आजही करीत आहे.

**'कुलं पवित्रं जननी कृतार्थ । वसुंधरा पुण्यवती च तेन ।'** *किंवा*

**'पवित्र ते कुळ, पावन तो देश । जेथ हरीचे दास, जन्मघेती ।'**

या उक्तींची प्रचिती या कुळातील श्री गुंडा महाराज (प्रथम) यांच्यापासून पुढे सर्वच व्यक्तींनी आपली पारमार्थिक उंची वाढविली, त्याचबरोबर समाजाच्या उद्धाराचीही काळजी घेतली. हे घराणे धर्महिताबरोबर समाजहितालाही महत्त्व देत आलेले दिसते. या सर्व गोष्टींचा पाया घातला तो या घराण्याचे आदिपुरुष श्री गुंडा महाराज सिद्धरस (तथा देगलूरकर-पहिले) यांनी.

### (अ) श्री गुंडानाथ महाराज (आद्यपुरुष)

या घराण्याचे आदिपुरुष श्री गुंडा महाराज हे संत चूडामणी महाराज यांचे अनुग्रहीत व शिष्यही होते. हरिकृपा साक्षात्कारी, अनुभवसंपन्न, तत्त्वज्ञ, तत्त्वदर्शी आणि भजनानंदी संत असणाऱ्या श्री गुंडा महाराजांनी देगलूरजवळ रामपूर नामक ठिकाणी बारा वर्षे तीव्र तप केले होते. त्यानंतरही श्री विठ्ठल दर्शन न झाल्याने अस्वस्थ झालेल्या श्री गुंडा महाराजांनी हातात वीणा व चिपळ्या घेऊन भजनास प्रारंभ केला होता. आता श्री विठ्ठलाचे दर्शन झाल्याशिवाय वीणा खाली ठेवायचीच

नाही असा पण करुन ते भजनात रंगून गेले होते. चोवीस तास केवळ 'विठ्ठल-विठ्ठल' हाच नाद होता. या भजनाने श्री गुंडा महाराजांना श्री विठ्ठलाने दर्शन दिल्याचा उल्लेख त्यांच्या चरित्रात सापडतो. आपले आध्यात्मिक गुरू श्री चूडामणी महाराज यांच्याकडे वास्तव्यास असताना श्री गुंडा महाराजांनी वेद, शास्त्रे आणि संगीत याही विषयांचा अभ्यास केला होता. श्री गुंडा महाराज म्हणजे ज्ञानोत्तर जीवनात इतरांसाठी आदर्शाचा धडा होत. त्यांनी सुमारे सातशे अभंगांची रचना केली.

### (ब) श्री श्रीहरी महाराज

या परंपरेतील दुसरे पुरुष श्री श्रीहरी महाराज. त्यांच्या पूर्वी त्यांचे ज्येष्ठ बंधु श्री नारायणबुवा हे श्री गुंडा महाराजांचा वारसा घेऊन आले होते. हे दोघेही श्री गुंडा महाराजांचे पुतणे. यातील श्री नारायण बुवांचे निधन अल्पावधीत झाल्याने पारमार्थिक परंपरेचा वारसा श्री श्रीहरी महाराज यांच्याकडे आला होता. त्यांनी देगलूर येथे श्री गुंडा महाराजांच्या वास्तव्याठायी भव्य मंदिर उभे केले. श्री गुंडा महाराजांपासून सुरु झालेल्या चक्री भजनाचा प्रसार करीत अनेकांना भक्तिप्रवण केले. त्यांची नामसाधना आदर्श होती. महाराष्ट्राबरोबर आंध्रप्रदेशातही भक्तिमार्गाचा प्रचार केला, उद्‌बोधन केले. यांना दीर्घायुष्य लाभले होते.

### (क) श्री गुंडा महाराज (दुसरे)

श्री श्रीहरी महाराजांनंतर ही परंपरा त्यांचे सुपुत्र श्री गुंडा महाराज (दुसरे) यांचेकडे आली. श्री गुंडा महाराज (दुसरे) यांनी नाथ परंपरेचा उपदेश आपल्या पित्याकडूनच घेतला होता. लौकिक जीवनाकडे (व्यवहाराकडे) पूर्ण दुर्लक्ष करुन यांनी जीवनभर भक्तिप्रेमानंदाचाच आस्वाद घेतला होता. परंपरेने चालत आलेल्या चक्रिभजनात दंग असणाऱ्या श्री गुंडा महाराज (दुसरे) यांच्या भजनाचे वैशिष्ट्य म्हणजे ते एकटेच दिमडी, झांज, चिपळ्या, वीणा वाजवित असत. तासन्‌-तास लयबद्ध भजनात रंगून जाणाऱ्या या महाराजांना वाचासिद्धी प्राप्त झाली होती असेही म्हणत. श्री. गुंडा महाराज (दुसरे) यांना चार सुपुत्र होते. त्यांच्या पश्चात या परंपरेची धुरा त्यांचेच सुपुत्र श्री नारायण महाराज यांचेकडे आली होती.

### (ड) श्री नारायण महाराज

श्री श्रीहरी महाराजांनी स्वत:च श्री नारायण महाराजांचे हस्ते देगलूर येथील मंदिराची पायाभरणी केली होती. श्री नारायण महाराजांना सारे शिक्षण (आध्यात्मिक आणि व्यावहारिक) आजोबा श्री श्रीहरी महाराजांकडूनच मिळाले होते. नाथ परंपरेतून प्राप्त झालेला दिव्य मंत्र, राजाचे संस्थानाचा आदेश, जहागिरी संदर्भातील माहिती, कायदेशीर नियम यांचा त्यात समावेश होता. यांचे निष्ठासामर्थ्य दिव्य होते.

### (इ) श्री रामचंद्र महाराज

श्री नारायण महाराजांचे बंधू श्री रामचंद्र महाराज, यांच्याकडे प्रामुख्याने संस्थानाचा कारभार, शेतीची-जहागिरीची व्यवस्था यांची जबाबदारी होती. श्री रामचंद्र महाराज जरी लौकिक व्यवहार पाहत होते, तरी त्यांचे अंतरंग मात्र पारमार्थाकडेच झुकलेले असायचे. लौकिक व्यवहाराच्या व्यापातूनही परमार्थ साधना आणि भागवताराधना यात थोडेही अंतर कधी पडू दिले नाही. यातच त्यांच्या पारमार्थिक अधिकाराचे रहस्य आहे. श्री रामचंद्र महाराज संगीताचेही व्यासंगी होते. 'सतार' या वाद्याचे छंदी होते, ते वाद्य त्यांना अत्यंत प्रिय होते.

### (फ) श्री महिपती महाराज

श्री महिपती महाराज हे रामचंद्र महाराजांचे कनिष्ठ बंधू. (यांची अधिक माहिती पुढे विस्तृत स्वरूपात आलेली आहे.)

### (ह) श्री गुंडा महाराज (तिसरे)

श्री नारायण महाराज यांचे ज्येष्ठ सुपुत्र श्री गुंडा महाराज (तृतीय) हेही श्री विठ्ठलाचे परम भगवत् भक्त आणि निष्ठावंत उपासक होते. यांचाही विद्याव्यासंग दांडगा होता. पंडितप्राण श्री भगवानशास्त्री धारूरकर यांचेकडे त्यांनी वेदांताचा सखोल अभ्यास केला होता. शिवाय सांप्रदायिक संतवाङ्मयाचाही त्यांचा दांडगा व्यासंग होता. 'एखाद्या प्राध्यापकाच्या विषयावरील अभ्यासपूर्ण आणि मनोरंजक व्याख्यानासारखी त्यांची प्रवचन शैली होती.'–असे मत या क्षेत्रातील अभ्यासू,

व्यासंगी, प्राचार्य मामासाहेब दांडेकरांनी व्यक्त केले होते. संस्थानचे परंपरागत नियम, धार्मिक आचारांचे पालन याकडे विशेष लक्ष देणारे श्री गुंडा महाराज (तृतीय) श्री पांडुरंग मंदिरात चक्रि भजनाचा कार्यक्रम मोठ्या निष्ठेने, आत्यंतिक प्रेमाने आणि भक्तिभावाने सादर करीत असत. नित्यनैमित्तिक धार्मिक व्रते आणि भजन यात त्यांनी कधी खंड पडू दिला नव्हता. श्री गुंडा महाराज (तृतीय) यांचेप्रमाणे श्री मार्तंड महाराज आणि श्री काशिनाथ महाराज हे धुंडा महाराजांचे चुलत बंधू होत. या सर्व भावंडांनी आपल्या कुलपरंपरा, सांप्रदायिकता सांभाळल्या होत्या.

श्री पांडुरंगाची उपासना, संतांचे पूजन, वेदवाङ्मयाचा अभ्यास, संत वाङ्मयाचे नित्य वाचन-पठण, प्रसंगपरत्वे कीर्तने, प्रवचने, चक्री भजने या साऱ्या गोष्टी बरोबर समाजाला भक्तिप्रवण करणे, एक सात्विक विचाराचा समाज घडविणे, संत वाङ्मय व तत्त्वज्ञानाच्या माध्यमातून समाजातील एकता,समभाव, परस्परप्रेम यांची शिकवण देणे यासारखी प्रबोधनात्मक कार्ये करणे आणि समाजोपयोगी कार्यात सक्रिय सहभागी होणे, या सर्व गोष्टी देगलूरकर घराण्यातील सर्व महापुरुषांनी केल्या. या गोष्टीची एक पुण्यप्रद परंपराच निर्माण केलेली होती. ह.भ.प. धुंडा महाराज हे या परंपरेचे पाईक होत.

## ४. सरंजामशाहीतील हैद्राबाद संस्थान

१५ ऑगस्ट, १९४७ रोजी भारताला राजकीय स्वातंत्र्य मिळाले. इंग्रजांची सत्ता आणि इंग्रजी गुलामगिरी यातून भारतदेशवासीय मुक्त झाले. भारताला स्वातंत्र्य देतांना इंग्रजांनी आपल्या इंग्रजी नीतीचा अवलंब करीत, मुळात अखंड असणाऱ्या भारताचे विभाजन केले. त्यातून जगाच्या नकाशावर 'पाकिस्तान' या नव्या देशाची नोंद केली. पाकिस्तानचा (पूर्व आणि पश्चिम पाकिस्तान) वगळता भारताचा उर्वरित सर्व प्रदेश भारतीयांच्या ताब्यात आला. या सर्व भागाला राजकीय स्वातंत्र्य जरी मिळाले होते, तरी ते पूर्ण सत्य होते हे म्हणणे धाडसाचे होईल. कारण भारताच्या (आणि पाकिस्तानच्या) स्वातंत्र्याच्यावेळी अखंड भारतात लहानमोठी मिळून सुमारे सातशे संस्थाने अस्तित्वात होती, जी इंग्रजी राजवटीत आपल्या मर्जीप्रमाणे

राज्ये करीत होती. या संस्थानांच्या संदर्भात धोरणात्मक निर्णय घेतांना इंग्रजांनी पुन्हा एकदा आपल्या 'फोडा-तोडा' या प्रवृत्तीचे दर्शन घडविले. इंग्रजांच्या निर्णयानुसार ही सारी (सुमारे सातशे) संस्थाने स्वातंत्र्यानंतर त्यांच्या मर्जीनुसार पाकिस्तान वा भारत या देशात विलीन होऊ शकणार होती, अथवा स्वतंत्रही राहू शकणार होती. या संदर्भातील निर्णय घेण्याचे पूर्ण स्वातंत्र्य इंग्रजांनी संस्थानिकांना दिले होते. इंग्रजांच्या या धोरणात्मक निर्णयाचा विचार सर्वच संस्थानिकांनी अत्यंत गांभीर्याने केला. यातील बहुसंख्य संस्थानिकांनी भविष्यकालीन परिस्थितीचा अंदाज घेत विलीनीकरणाकडे आपला कौल दिला. खरेतर संस्थानिकांना इंग्रज राजवटीत सुरक्षितता वाटत असावी. वास्तविक इंग्रजी सत्ता ही एकाधिकार सत्तेसारखी होती. तरीही स्वातंत्र्यानंतर या देशात येऊ पाहणाऱ्या 'लोकशाही राजवटी' पेक्षा इंग्रजी सत्तेबद्दल संस्थानिकांच्या मनात एक सुरक्षितपणाबद्दलचा विश्वास वाटत असावा. लोकशाही राजवटीत आपले अस्तित्व आणि स्वातंत्र्य अबाधित राखणे अवघड जाईल हे जाणून बहुसंख्य संस्थानिकांनी भारतीय लोकशाही राज्यात विलीन होण्याचा निर्णय घेतला, नव्हे अल्पावधीत ती विलीनही झाली. मात्र काही मोजक्या संस्थानिकानी आपले अस्तित्व, स्वातंत्र्य स्वतंत्र ठेवण्याचा निर्णय घेतला, अशा संस्थानिकांची संख्या हाताच्या बोटावर मोजण्याइतकीच जरी होती, तरी पण ती भारताच्या स्वातंत्र्याला बाधा आणणारी होती. यातील एक महत्त्वाचे संस्थान म्हणजे हैद्राबाद संस्थान ! या तटस्थ राहू पाहणाऱ्या संस्थानिकांशी वाटाघाटी, चर्चा करुन, समजूतीचा-सामंजस्याचा प्रस्ताव ठेवूनही ही संस्थाने विलीनीकरणास तयार झाली नाही. उलट यातील काहींनी फर्माने काढून आपल्या स्वतंत्र अस्तित्वाचा पुनरुच्चारही केला होता. अशा प्रकारची जाणीव करुन देणारे एक संस्थान म्हणजे हैद्राबादचे निजामसंस्थान !

हैद्राबादच्या संस्थानिकांनी विलीनीकरणाचा निर्णय घ्यावा अशी या संस्थानात वास्तव्य करुन राहणाऱ्या सामान्य जनतेची इच्छा होती. तथापि, हैद्राबादच्या तत्कालीन निजामाने दिनांक २६ जून, १९४७ आणि २७ ऑगस्ट, १९४७ रोजी दोन स्वतंत्र फर्माने काढून या संस्थानातील सामान्य जनतेवरील आपली जरब

अधिक घट्ट करण्याचा प्रयत्नही केला होता. एका फर्मानाद्वारे असे जाहीर केले गेले की, '१५ ऑगस्ट, १९४७ पासून हैद्राबाद हे स्वतंत्र व सार्वभौम राष्ट्र झाले आहे.' निजामाच्या या स्वातंत्र्यतावादी व तटस्थतावादी भूमिकेने भारताच्या एकात्मतेला तडा जाणार होता. शिवाय हैद्राबाद संस्थानाच्या भूप्रदेशात राहणाऱ्या पण भारतीय स्वातंत्र्याचा आनंद उपभोगू इच्छिणाऱ्या सामान्य जनतेची मानसिक कुचंबणाही होणार होती. परंतु निजामाने यापैकी कोणत्याही गोष्टीची पर्वा न करता स्वतंत्रच राहण्याचा निर्णय घेतला होता. अशा या निजामाविरुद्ध उभे राहणे आणि भारतीय लोकशाहीवादी राज्यात सामील होण्यासाठी लढा देणे हे तेथील सामान्यांच्या मनात येणे स्वाभाविकच होते. तसा त्यांनी पुढे लढा दिलादेखील. पण या लढ्याची कारणे सामाजिक, धार्मिक आणि शैक्षणिक व्यवस्थेतही होती. म्हणूनच सुमारे सव्वा दोनशे वर्षांची परंपरा असणाऱ्या, मुरलेल्या, स्थिरावलेल्या या राजवटीला सुरुंग लावण्यासारखे होते.

## हैद्राबाद संस्थानची स्थापना–

मीर कमरुद्दीन हा उत्तरेतील मोंगल सत्तेचा दक्षिणेकडील एक सुभेदार. तो सन १७१९ ला दक्षिणेत प्रथम आला. उत्तरेकडील राज्य खिळखिळे होत असल्याचे लक्षात येताच मीर कमरुद्दीनने स्वत:ची सत्ता स्थापना केली. याला मोगलांचा सम्राट महमदशहा याने आसिफजाह असा किताब दिला होता. म्हणून हैदराबादची निजामी राजवट आसिफजाही राजवट म्हणून ओळखली जाऊ लागली होती. मीर कमरुद्दीन हा हैद्राबाद संस्थानाचा संस्थापक किंवा पहिला निजाम. सन १७२४ ते १९४८ या सुमारे सव्वादोनशे वर्षांच्या कालावधीत एकूण सात निजामांनी राज्य केले. (परिशिष्ट ५ पहा).

सन १९४१ च्या जनगणनेनुसार हैद्राबाद संस्थानात ८१.४% हिंदू तर १२.८ % इस्लाम धर्मीय लोक होते. तर १९४१ च्याच एका अहवालानुसार सरकारी नोकरीतील हेच प्रमाण उलटे होते. सरकारी नोकऱ्यात मुस्लिमांची संख्या १,१२,७३७ तर हिंदूंची संख्या केवळ २३३६८ एवढी होती. सरकारी नोकरीतील हिंदूंचे प्रमाण फक्त २०% इतके होते. यातही खेड्यापाड्यातील पाटील, कुलकर्णी, पटवारी, जागले यांचाच भरणा अधिक होता. वरिष्ठ अधिकाराची जागा हिंदूंना अभावानेच मिळत होती.

निजाम उर्फ आसिफजाह यांची सत्ता ज्या भू-प्रदेशावर होती त्यात एकूण सोळा जिल्ह्यांचा समावेश होता. आजच्या भाषावार प्रांत रचनेनुसार तेलंगणातील आठ जिल्हे, महाराष्ट्रातील पाच (आताचे सात) जिल्हे आणि कर्नाटकातील तीन जिल्ह्यांचा प्रदेश सामावलेला होता. महाराष्ट्राचे तत्कालीन बीड, नांदेड, परभणी, औरंगाबाद आणि उस्मानाबाद या जिल्ह्यांच्या प्रदेशावर निजामाची सत्ता होती. या संस्थानचे भौगोलिक क्षेत्रफळ ८२३१३ चौरस मैल एवढे होते.

## महाराजांचा जन्म–

महाराजांचा जन्म हा निजाम संस्थानातला, सन १९०४ (अक्षय्य तृतीया). महाराजांच्या कळतेपणी संस्थानच्या गादीवर निजाम मीर उस्मान अली हा होता. याच्याच कालावधीत (सन १९११ ते १९४८) निजामाची सत्ता संपुष्टात आली. पण तीही सहजासहजी नाही. निजामसत्तेशी विलीनीकरण करण्यासंदर्भातील वाटाघाटी फिसकटल्यानंतर, प्रथम सामान्य जनतेनेच त्याविरुद्ध उठाव करण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरू केले. यात हिंदू धर्मीयांचा मोठा सहभाग होता. कारण निजामशाहीत खऱ्या अर्थाने हिंदूच जास्त भरडले जात होते.

## विसाव्या शतकातील हैद्राबाद संस्थानातील सामाजिक स्थिती–

सन १९११ ला सत्तेवर येताच निजाम मीर उस्मान अली याने संस्थानातील नागरिकांच्या प्राथमिक हक्कांवर जुलमी बंधने घालण्यास सुरुवात केली. सामान्य जनतेला जितके म्हणून आणि जितक्या पद्धतीने दाबता येईल, तितके दाबण्याचा, दडपण्याचा सपाटा सुरु केला. मग त्यातून सामान्य रयतेचे धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक तथा शैक्षणिक असे कोणतेही क्षेत्र उरले नव्हते, जिथे निजामाची जुलमी सत्ता पोहोचली नव्हती. प्रारंभी या निजामाने एका फतव्याद्वारे सार्वजनिक सभा, सम्मेलने, बैठका, मिरवणुका इ. वर निर्बंध आणले. या किंवा अशा अन्यायाविरुद्ध जनतेने आवाज उठवू नये,  संस्थानची वरील क्षेत्राबाबतची माहिती संस्थानाबाहेर जाऊ नये यासाठी निजाम सतर्क असे. आपल्या निर्णयाबद्दल निजाम जरी ठाम होता,

तरी त्याच्या परिणामाबद्दल मात्र तो सदैव साशंकच असायचा. यासाठी निजामने केसरी, मराठा (इंग्रजी), ज्ञानप्रकाश इ. लोकप्रिय मराठी नियतकालिकांना संस्थानच्या प्रदेशात बंदी घातलेली होती.

संस्थानात धार्मिक स्वातंत्र्याबद्दल तर आनंदच होता. हिंदू धर्मियांचे मनोधैर्य कसे खच्ची करता येईल याचा निजाम सतत विचार करीत असावा. कारण त्याने या संदर्भात हिंदूधर्मीयांवर जी बंधने आणली ती पाहता, निजामची अस्वस्थता लक्षात येण्यासारखी होती. यात संस्थानात नव्या मंदिरांच्या उभारणीस परवानगी दिली जात नव्हती आणि जुन्या मंदिरांच्या दुरुस्तीवरही बंदी आणली होती. हिंदूंचे दसरा, दिवाळी हे सण जर मोहरमच्या काळात येत असतील तर हे सण कोणत्याही प्रकारची वाद्ये न वाजवता साजरे करण्याचे बंधन हिंदूंवर लादले होते. विशेष म्हणजे ज्या संस्थानात ८१.४% लोक हिंदूधर्मीय होते व केवळ १२.८% लोक इस्लामधर्मीय होते, अशा प्रदेशातील लोकांवर ही बंधने लादली होती. धर्मशुद्धी कार्यासाठी निजामसंस्थानच्या अर्थसंकल्पात वीस लक्ष रुपयांची तरतूद केलेली असायची. हे धर्मांतर एकतर्फीच (हिंदूंना इस्लामी करणे एवढेच) असायचे. अशी ही तथाकथित धर्मशुद्धी म्हणजे धर्मांतरच होते.

संस्थानमधील शिक्षण व्यवस्थेबाबत तर सारा उजेडच होता. संस्थानमध्ये काही खाजगी तर काही शासकीय शाळा कार्यरत होत्या. या व्यवस्थेला छेद देत निजाम मीर उस्मान अली याने मुस्लिम धार्जिण्या भूमिकेशी सुसंगत असणारे शैक्षणिक धोरण अवलंबले. हे धोरणच निजामी राजवटीचे मर्मस्थान होते. निजाम ज्या दिशेने वाटचाल करीत होता, त्यात संस्थानातील शिक्षणविषयाचे धोरण एक महत्त्वाचे हत्यार होते. या धोरणानुसार संस्थानात इयत्ता तिसरीपासूनच उर्दू माध्यमातून शिक्षण देण्याची व्यवस्था करण्यात आली होती. सर्व खाजगी शाळांना सरकारी परवाना सक्तीचा केला. परिणामी अनेक खेड्यापाड्यातील शाळा बंद पडू लागल्या. ज्या शाळांनी परवाना घेतला, त्यांचेवर उर्दू माध्यमातून शिकविण्याची सक्ती केली गेली. उर्दू विषयाच्या अध्यापनासाठी ज्यांची मातृभाषा उर्दू आहे असाच शिक्षक नेमण्याची

सक्ती सर्व शाळांवर केल्याने, उर्दूचे ज्ञान असणाऱ्या हिंदू शिक्षकाला अध्यापन क्षेत्रापासून वंचित राहण्याची वेळ आली होती. विशेष म्हणजे संस्थानात अन्य माध्यमातून शिकवण्यासही परवानगी दिली जात नव्हती. शाळातील पाठ्यक्रमाची रचनाही धर्मांधतेला खतपाणी घालणारी अशीच होती. शाळातील वातावरण विद्यार्थ्यांच्या मनावर निजामी सत्तेची थोरवी बिंबवणारे आणि मनात गुलामीची भावना निर्माण करणारेच तयार केले जात होते. अगदी सकाळी शाळा सुरु होताच ताबद खालीक आलम ही निजामाची स्तुती करणारी प्रार्थना विद्यार्थ्यांना म्हणावी लागे, संस्थानातील मुस्लिमेतरांना मिळणारी वागणूक पक्षपाती, तुच्छ आणि चीड आणणारी मिळत होती. आणि यात सर्वात मोठी झळ विद्यार्थीवर्गाला बसत होती. या व्यवस्थेबद्दल मुस्लिमेतर विद्यार्थ्यांचे पालक वरिष्ठ अधिकाऱ्यांना भेटून तक्रारी करीत, आपल्या करुण कहाण्याही सांगत असत. स्वत:ची भाषा, धर्म, सणोत्सव या साऱ्यांवर निजाम सरकारने घातलेल्या निर्बंधाबद्दल खेदही व्यक्त करीत होते. परंतु यापैकी कशाचाही परिणाम निजामशाहीवर होत नव्हता.

ब्रिटिशांच्या मुलखात निजामी संस्थानाच्या तुलनेत जास्त स्वातंत्र्य होते आणि त्याचे दु:ख निजामसंस्थानातील विशेषत: मुस्लिमेतरांना होत होते. जीवनाची सारी सूत्रे जातीय मुस्लीम मंडळाच्या हाती होती. परिणामी हिंदूकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन हा संशयी स्वरुपाचा असायचा. वरिष्ठ वर्गातील मुसलमानांना सर्व प्रकारच्या सवलती मिळत होत्या आणि आपला सहधर्मी आपला सूत्रचालक, रक्षक आहे व आपण राज्यकर्त्यांच्या जातीचे आहोत ही भावना गरीब मुस्लिमांना जगण्यासाठी पुरेशी पडत होती. हा गरीब मुस्लिमवर्ग प्रसंगी चिरगुट किंवा चिंध्या गुंडाळून राहत होता, तरी आपल्याच जातीचा एक वर्ग ऐश्वर्यसंपन्न आहे या गोष्टीविषयी त्यांना अभिमान असायचा, आनंदही मानायचा. एका आसुरी सुखात मग्न असणाऱ्या मुस्लिमांना आपल्या गरिबीची वा दारिद्र्याची कधी खंत वाटत नव्हती. एखादे शेंबडे मुस्लीम पोरही हिंदूंना वेडावून दाखवण्याचे धाडस करी, हिंदू स्त्रियांचा उपमर्दही करु शकत असे.

दरम्यान भारतातील राजकीय परिस्थितीत वेगाने स्थित्यंतरे होत होती. दिनांक २ ऑगस्ट, १९३५ ला ब्रिटिश सरकारने नवा हिंदुस्थान सरकार कायदा मंजूर केला होता. या कायद्यान्वये भारतातील सर्वच प्रांतांना प्रमाणित प्रांतिक स्वायत्तता लाभणार होती. सुमारे तीन कोटी लोकांना मतदानाचा हक्क प्राप्त होणार होता. यावेळी संस्थानांना संघराज्यात सामील होण्याचे बंधन घातले गेले नव्हते. ते ऐच्छिक होते. हैद्राबाद संस्थानाजवळच्या मुंबई, मध्यप्रांत (प्रदेश), मद्रास आदी प्रांतांमधून निवडणुकांचे वातावरण तापू लागल्याने, एकूणच वातावरणात चैतन्य निर्माण होऊ लागले होते. या घडामोडीत हैद्राबादचे संस्थानिक निजाम हे एकीकडे परिस्थितीकडे लक्ष ठेवून होते, तर प्रांतिक निवडणुकांपासून अलिप्त राहणे पसंद करीत होते. याचे मुख्य कारण म्हणजे या हिंदूंचे प्रमाण सुमारे ८०%, तर इस्लामी लोकांचे प्रमाण सुमारे १२% इतके होते. या संस्थानचे संस्थानिक 'निजाम' हे जरी मुस्लीम होते तरीही येथील एकूण मुस्लीम समाज हा अल्पसंख्य होता. याचाच अर्थ या संस्थानात (प्रांतात) निवडणुका घेतल्या असत्या तर मुस्लीम प्रतिनिधी निवडून येणे ही गोष्ट दुरपास्त होती. परिणामी या संस्थानात असलेली राजकीय सत्ता मुस्लिमांच्या हातून गेली असती आणि ही गोष्ट निजामास पटणारी नव्हती. म्हणून संस्थानातील मुस्लीम लोक बहुमताच्या राज्यास विरोध करीत होते. तर दुसरीकडे धर्मांतराची चळवळ अधिक गतिमान करून संस्थानातील मुस्लिमांचे प्रमाण वाढविण्याचा आटोकाट प्रयत्न मुस्लीम नेते करीत होते.

१५ ऑगस्ट, १९४७ ला भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही हैद्राबाद संस्थानच्या निजामानी भारतीय संघ राज्यात सामील होण्यास नकार देत आपल्या राजवटीचे फासे अधिक घट्ट करण्यास प्रारंभ केला होता. या धुमश्चक्रीत हैद्राबाद संस्थानातील हिंदू लोकांची स्थिती हलाखीची बनत होती. अखेरीस, संस्थानातील बहुसंख्येने असणाऱ्या मुस्लिमेतर जनतेचे जीवित आणि वित्त सुरक्षित राहिलेले नाही ही गोष्ट लक्षात येताच, भारत सरकारसमोर 'जैसे थे' या कराराचा आधार घेऊन हैद्राबादेवर लष्करी कारवाई करण्याशिवाय अन्य कोणत्याही मार्ग उरलेला नव्हता. हा प्रश्न संयुक्त राष्ट्र संघाकडे (UNO) नेऊन त्याला आंतरराष्ट्रीय स्वरुप देण्याचा प्रयत्न

निजामाकडून केला गेलाही. निजामाच्या या कृतीमुळे दिनांक ९ सप्टेंबर, १९४८ रोजी हैद्राबादेवर पोलिसी कारवाई करण्याचा निर्णय दिल्लीत घेण्यात आला होता. भारत सरकारच्या या आदेशानुसार दिनांक १३ सप्टेंबर, १९४८ रोजी भारतीय लष्कराने कारवाईस प्रारंभ केला. अर्थात या गोष्टीस निजामाकडून कडाडून विरोधही झाला. पण अनेक प्रयत्न करुनही जेव्हा आपला निभाव लागत नाही याची जाणीव निजामांना झाली, त्याच वेळी त्यांनी शरणागतीचा निर्णय घेतला, तशी शरणागतीही निजामांनी दिनांक १७ सप्टेंबर, १९४८ रोजी जाहीर केली. निजामराजे संस्थानिकाच्या पदावरुन पायउतार झाले आणि दिनांक १९ सप्टेंबर, १९४८ रोजी मेजर जनरल जयंतीलाल चौधरी यांनी लष्करी प्रशासक म्हणून हैद्राबाद संस्थानची सारी सूत्रे आपल्या हाती घेतली. या घटनेने सुमारे सव्वादोनशे वर्षांची हैद्राबाद संस्थानावरील निजामांची राजवट संपुष्टात आली, हैद्राबाद भारतीय संघराज्यात सामील होण्यास मुक्त झाले होते.

या निजामशाहीतील अखेरचा निजाम संस्थानिक होता मीर उस्मान अली. सन १९११ ते १९४८ अशी सुमारे ३७ वर्षे सत्तेवर असणाऱ्या या निजामाच्या कारकिर्दीतच विशेषत: हिंदूंचे सांस्कृतिक, सामाजिक आणि शैक्षणिक जीवन धोक्यात आले होते. नेमक्या याच काळात धुंडा महाराजांच्या जीवनाची जडणघडण होत होती. त्यांचे देगलूर हे गाव (जि. नांदेड) हे हैद्राबाद संस्थानत होते, परिणामी वरील सर्व परिस्थितीचे परिणाम देगलूरवरही होणे अपरिहार्य होते, नव्हे, तसे घडलेही होते.

## ५. महाराजांचे लौकिक जीवन

मानवी जीवनात संतबोध श्रवण, संतसमागम, संतसंगती आणि संतानुग्रह यांना फार महत्त्व आहे. या आचरणाशिवाय मानवी जीवन कृतार्थ, चिरकृतार्थ होत नाही असे आचार्य, महात्मे व संतजन सर्वांनीच प्रतिपादिले आहे.

**'क्षणमपि सज्जन संगतिरेका । भवतिभवार्णवतरणे नौका ।'**

**-इति आद्यशंकराचार्य**

'नारदभक्तिसूत्र' या ग्रंथात म. नारदांनी सत्संगाची आवश्यकता 'सत्संगी दुर्लभ अगम्योऽ मोघश्च' या सूत्राद्वारे स्पष्ट केली आहे. तर ज्ञाननिधीची प्राप्ती संतांच्या संगतीशिवाय होणार नाही, हा विचार श्री ज्ञानदेवांनी मांडताना म्हटले की,--

**ते ज्ञान पैं गा बरवे । जरी मनीं आथी आणावे ।**
**तरी संता या भजावे । सर्वस्वेसी ।।** — **ज्ञानेश्वर**

श्री तुकाराम महाराजांनी संतांचा 'कैवल्यानिधानी' असा गौरवपूर्व उल्लेख केला आहे, ते म्हणतात--

**'तुम्ही साधुसंत कैवल्य सागर । मोक्षाचे आगर तुम्हा घरी'** — **तुकाराम**

थोडक्यात, मानवी जीवन ज्ञानसंपन्नतेशिवाय प्रसन्न, संपन्न, कृतार्थ आणि शांती देणारे होणार नाही आणि हे सर्व केवळ संतसमागम किंवा संतसंगतीने प्राप्त होते. हे सर्व विवरण्याचे कारण म्हणजे गेल्या शतकात महाराष्ट्राच्या भूमीवर ज्या मोजक्या संतपर व्यक्तींचा अवतार झाला, त्यातील एक अग्रगण्य नाव आहे ह. भ. प. धुंडा महाराज देगलूरकर.

महाराजांनी विशेषत: उत्तरकालखंडात आपल्या अमोघ, असामान्य, अतुलनीय आणि श्रवणीय वाणीने मराठी जनांना संतविचारांचे वेड लावून, त्यांच्या हृदयी संतशब्दांचा झणत्कार उठवून, महाराष्ट्रीयांना अंतर्मुख केले होते. आयुष्यातील सहा-सात दशकांच्या कालावधीत त्यांनी समाजप्रबोधनाचा, संतविचारांच्या प्रसाराचा, भागवत धर्माच्या प्रचाराचा आपल्या प्रवचने, कीर्तने, व्याख्याने आदींच्या साहाय्याने ज्ञानयज्ञ अखंडितपणे प्रवाही केला होता. सत्यवादाचे तप आचरुन महाराष्ट्रातील बहुजन समाज परमार्थाभिमुख आणि सदाचाराभिमुख करण्याचे कार्य केले. मराठवाड्याने महाराष्ट्रालाच नव्हेतर आता जागतिक पातळीवरही म्हणता येईल, अशा संतांची वाण कधीच पडू दिली नाही. त्या सुजलाम् भूमीने सामान्य जनांच्या सत्फलाय परमार्थासाठी अनेक संतांना माणसांच्या अंगणी-प्रांगणी सोडले. त्या संतमंडळीतील एक नाव आहे ह. भ. प. (वै.) धुंडा महाराज देगलूरकर !

देशस्थ ऋग्वेदी आणि शांडिल्य गोत्री देगलूरकरांचे मूळ आडनाव सिद्धरस ! घराण्यास प्राप्त झालेल्या जहागिरीच्या देखभालीसाठी मौजे देगलूर (जि. नांदेड) येथे स्थायिक झालेल्या या घराण्याला 'सिद्धरस' च्या ऐवजी 'देगलूरकर' या नावानेच ओळखू लागले. श्री गुंडा महाराज (पहिले) यांच्यापासून पुढील प्रत्येक पिढीतील बहुतेक व्यक्तींनी घराण्याची आणि (स्वत:चीही) उंची वाढवत नेली. त्याचबरोबर समाजोद्धाराचेही कार्य केले.

**महाराजांचा जन्म व बालपण–**

महाराजांच्या जन्मकाळी आणि नंतरही देगलूरकरांचे देगलूर येथील घर म्हणजे मठही होता आणि जहागिरीच्या देखभालीचे मुख्यालयही होते. या घरात श्री विठ्ठल-रुक्मिणीचे मंदिर, आद्य (मूळ) पुरुष श्री गुंडानाथ महाराजांची समाधी शिवाय सुमारे १७५-१८० वर्षांपासून चालत आलेले आचारधर्म, परंपरा आणि देवतांचे जन्मोत्सव या सर्वांमुळे त्या वास्तूस प्राप्त झालेले मंदिराचे स्वरुप. यावरुन ती वास्तू मठाप्रमाणे पवित्र-पावन बनलेली. तर जहागिरीच्या देखभाली संदर्भात सतत होत असलेला अनेक मान्यवरांचा राबता. यामुळे त्या वास्तूस प्राप्त झालेले जहागिरीच्या मुख्यालयाचे स्वरुप. खरेतर याच वास्तूने अनेक सत्पुरुषांचा जन्म पाहिला होता, अन त्या प्रत्येकाच्या पाठिशी खंबीर आधारासारखीही उभी राहिलेली होती. या वास्तूला आणखी एका महान संतपुरुषाच्या जन्माचा सोहळा पाहण्याचे भाग्य १५ मे, १९०४ रोजी मिळाले होते. श्री. रामचंद्रपंत आणि सौ. मनुबाई या देगलूरकर दांपत्यापोटी महाराजांचा जन्म झाल्याचा तो सुदिन होता अक्षय तृतीयेचा. गेल्या अनेक जन्मात केलेल्या पुण्याचे फळ म्हणून महाराजांना भागवतोत्तम संत श्री गुंडानाथ महाराज (१) यांच्या पवित्र कुळांत जन्म लाभला.

**'शुचीतां श्रीमतां गेहे, योग भ्रष्टोऽभि जायते।'**

(अर्थ-योगाचा अभ्यास अपुरा राहिलेले पुण्यात्मे हे पवित्र व श्रीमान कुळात जन्मास येतात.) याप्रमाणे महाराजांचा जन्म पवित्र कुळात तर झालाच, शिवाय 'हरिदासाचिये घरी' देखील झाला. जणू त्यांच्या माता-पित्याचीही तपश्र्चर्या महाराजांच्या जन्माने सिद्धीस गेली होती.

देगलूरकरांचे घराणे म्हणजे प्रत्यक्ष परमेश्वरालाच अवतार घ्यावयास लावणारे घराणे होय. आपल्या नामस्मरणाच्या अनुष्ठानांनी श्री गुंडानाथ महाराजांनी श्री विठ्ठलास प्राप्त करुन घेतले होते. त्यानंतरच्या काळातही अनेक महात्मे जन्मास आले.

**'जे विवेक ग्रामीचे मुळीं । बैसलें आहाति नित्य फळीं ।**
**तया योगियांच्या कुळीं । जन्म पावे ।'**

अशा कुळात महाराजांचा जन्म झाला, ज्या घराण्याला मुळातच अपार विद्वत्ता प्राप्त झालेल्या, अगाध-गाढे अभ्यासक असलेल्या आणि मुख्य म्हणजे समाजोद्धाराची तळमळ असलेल्यांची परंपरा होती. सारे वारसदार नामसाधनेचे आदर्श, सदाचारी, भक्तिप्रवण व भक्ति-प्रेमानंदाचे आस्वादक होते. साहजिक महाराजांच्या लहानपणी मठातील हे वातावरण व पार्श्वभूमी त्यांच्यावर संस्कार करीत राहिली होती. मठात चालणाऱ्या कार्यक्रमात महाराजांना विशेष रस वाटे.

**'ते हे गोष्टी रम्य । अमृतधारा धर्म्य । करिती प्रतिति गम्य ।**
**आइकोनि जे ।। तैसेचि श्रद्धेचेनि आदरें । जयांच्या ठायीं विस्तरें ।**
**जीवीं जया थारे । जे अनुष्टिनी ।'**

(इत्यर्थ- जी गोष्ट मनाला आवडते, भावते तिथे जीव गुंतला जातो.) महाराजांच्या घरी नित्य चालणाऱ्या धार्मिक, पारंपरिक कार्यक्रमात महाराज सहभागी होत असत. खरेतर त्यांची वृत्ती अमृताच्या धारेप्रमाणे मधुर व धर्माला अनुकूल अशीच होती. 'ज्याच्या ठिकाणी श्रध्देचा आदर असतो, तिथे भक्तियोग विस्तार पावतो', या विधानाचा प्रत्यय महाराजांच्या कुमारवयातच आला. असे असले तरी या घरात पारंपरिकता आणि आधुनिक शिक्षणाने निर्माण केलेला सुधारणावाद, अशा परस्परभिन्न प्रवृत्तीच्या प्रवाहात महाराजांच्या शिक्षणाची नाव काही काळ हेलकावे खात राहिली. अखेरीस तिला मार्ग मिळाला. महाराजांचे पितृछत्र त्यांच्या लहानपणीच हरपलेले होते. परिणामी त्यांच्या शिक्षणाची आणि एकूणच सर्व संगोपनाची जबाबदारी महाराजांचे चुलते ह.भ.प. श्री महिपती महाराज यांचेवर आली होती आणि त्यांनीही ती तितक्याच कर्तव्यबुद्धीने स्वीकारली होती. महाराजांचे प्राथमिक शिक्षण देगलूर (जि. नांदेड) येथे सुरु झाले होते. देगलूर जरी तालुक्याचे ठिकाण असले तरी जिल्ह्याच्या तुलनेत अविकसित ठिकाण.

'आपल्या मुलाने इंग्रजी शिक्षण घेऊन डॉक्टर, वकील अथवा सरकारी नोकरीतील वरिष्ठ अधिकारी बनावे'- ही महाराजांच्या मातोश्रींची इच्छा होती. पण तशी देगलूर येथे सुविधा नव्हती, शिवाय देगलूर निजाम संस्थानातील. त्यामुळे अन्य सर्व नियमांप्रमाणे देगलूरमध्येही शिक्षणासंदर्भात निजाम संस्थानचे नियम होते.

**विद्योपासना–**

महाराजांच्या शैक्षणिक आयुष्याच्या कालावधीत हैद्राबाद संस्थानात मीर उस्मान अली हा निजाम होता. सन १९११ ला गादीवर आलेला हा संस्थानिक फार धूर्त, महत्त्वाकांक्षी, सत्ता आणि संपत्ती यांचा प्रचंड लोभी होता. भारतातील एकूण ६९९ संस्थानांपैकी सर्वात सामर्थ्यवान संस्थानाचे आपण अधिपती आहोत याची त्याला सदैव जाणीव होती. सत्तेवर आल्यापासूनच आपले स्वतंत्र राज्य असले पाहिजे ही त्याची महत्त्वाकांक्षा होती. आपल्या या महत्त्वाकांक्षेच्या पूर्ततेसाठी मीर उस्मान अली या निजामाने संस्थानामधील मुस्लिमांच्या अंध धर्मवेडेपणाचा पुरेपूर फायदा घेतला होता. 'संस्थानातला प्रत्येक मुस्लीम हा राज्यकर्ता आहे, तर मुस्लिमेतर प्रत्येकजण संस्थानचा शासित व गुलाम आहे', ही भावना प्रत्येक मुस्लिमाच्या मनात भरविण्यात त्याने यश मिळविले होते.

निजाम हा संस्थानचा राजाही होता, तसाच तो मोठा जहागिरदारही होता. सर्व सरंजामी व्यवस्थेप्रमाणे निजामाच्याही जहागिरी होत्या. संस्थानात देशमुखी, देशपांडे, गिरी आदी वतने चालू होती आणि हे सारे लाभदायक निजामाशी एकनिष्ठ होते. हे सारे वतनदार निजाम राजवटीचे आधार होते.

निजाम मीर उस्मान अलीच्या कालावधीत (सन १९११ च्या पुढे, जो महाराजांच्या शालेय शिक्षणाचा कालावधी होता). शिक्षण विषयक धोरण मुस्लिमेतरांना (त्यातही हिंदू-मराठी विद्यार्थ्यांना) फारच त्रासाचे व अडचणीचे होते. या धोरणाने मराठी विद्यार्थ्यांना उर्दू भाषा सक्तीने शिकावी लागत होती, तर शिक्षणव्यवस्थेत मातृभाषेला (मराठीला) स्थान नव्हते. नव्याने निर्माण होऊ पाहणाऱ्या शाळांवर बंदी, तर अस्तित्वात असलेल्या शाळांवर संस्थानची करडी नजर. प्रत्येक शाळेत उर्दू शिक्षक नेमण्याची

केली गेलेली सक्ती, यामुळे मराठी भाषिक विद्यार्थ्यांना मराठी भाषेच्या अध्ययनापासून वंचित राहावे लागत होते.

या शैक्षणिक पार्श्वभूमीवर महाराजांच्या प्राथमिक शिक्षणाचा श्रीगणेशा झाला होता. देगलूरच्या शाळेत महाराजांनी प्राथमिक शिक्षणाचे धडे गिरवताना, तत्कालीन शैक्षणिक धोरणानुसार महाराजांनी इंग्रजीबरोबरच उर्दू, तेलगू व कानडी भाषांचा अभ्यास करुन त्या अवगत करून घेतल्या होत्या. देगलूर येथील या प्राथमिक शिक्षणाच्या कालावधीत त्यांना उर्दू भाषेचे जाणकार, संतवाङ्माचे व्यासंगी आणि सदाचारसंपन्न असे श्री. रघुनाथराव कोरडे (शाळाशिक्षक) यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले होते. अर्थात् त्यांनीही महाराजांमधील आकलनशक्ती, बुद्धीची कुशाग्रता, श्रमशील अभ्यासपद्धती जोखली होती. परंतु पुढे श्री. कोरडे यांची बदली औरंगाबाद येथे झाली. महाराजांच्या मातोश्रींनीही महाराजांना प्रशालेय शिक्षणासाठी श्री महिपती महाराजांसमवेत औरंगाबादला पाठविले होते. या औरंगाबादेतील चार वर्षांच्या वास्तव्यात महाराजांनी इंग्रजी, कानडी, उर्दू या भाषांचे बरेच ज्ञान करून घेतले होते, बरीच प्रगती केली होती. देगलूरच्या प्राथमिक शिक्षणाच्या कालावधीत महाराजांच्या संस्कृतच्या शिक्षणालाही प्रारंभ झाला होता. आपले सातवीपर्यंतचे (आजची मॅट्रीक/११ वी) शिक्षण पूर्ण करेपर्यंत महाराज तसे बहुभाषिक झाले होते. पुढे काशीयात्रेनिमित्त बाहेर पडलेल्या महाराजांनी पुन्हा आपले वास्तव्य पंढरपुरात राखणे पसंत केले.

### जीवनाला कलाटणी–

श्री महिपती महाराजांना संतसेवा फार प्रिय होती. कदाचित पूर्वपरंपरेचा वारसा त्यांच्यात भिनला असावा. (तुका म्हणे संतसेवा । माझ्या पूर्वजांचा ठेवा।') यानुसार, पंढरपुरातील देगलूरकरांच्या मठात गुणी, विद्वत्जन, व्यासंगी व्यक्तींचा सत्कार करण्यात श्री महिपती महाराजांना आनंद वाटत असे. असेच एकदा चातुर्मासादरम्यान श्री महिपती महाराजांनी स्वानंद सुखनिवासी श्री जोग महाराजांना मठात आमंत्रित केले होते. चर्चेदरम्यान त्या ठिकाणी उपस्थित असलेल्या महाराजांविषयी श्री जोग महाराजांनी चौकशी केली. यात मातोश्रींच्या आग्रहाखातर

इंग्रजी शिक्षण घेऊन वकील वा डॉक्टर या विषयाचे अध्ययन करण्याचा मानस असल्याचे सांगितले गेले. श्री जोग महाराज महाराजांकडे मोर्चा वळवित म्हणाले, 'वकील, डॉक्टर कशासाठी व्हायचे ? तू संतकुळात जन्मला आहेस. संस्कृत शीक. तुमच्या घरी ज्ञानदेवीची उपासना आहे. चांगली ज्ञानेश्वरी सांग. तुझ्या मातोश्रीला निक्षून सांग की, मला वकील वा डॉक्टर व्हावयाचे नाही.'

मुळात श्री महिपती महाराजांचीही तशीच इच्छा होती, त्यास श्री जोग महाराजांच्या उपदेशाने बळकटी आली. मात्र याचवेळी एक दुर्दैवी घटना घडली, चातुर्मासाच्या समाप्तीनंतर देगलूरकर मंडळी देगलूरला परततांना बार्शी येथील मुक्कामात महाराजांच्या मातोश्रींचे (मनुबाईंचे) जुलाब-वांत्याच्या कारणाने अकाली निधन झाले. महाराजांचे मातृछत्रही हरपले गेले. आता महाराजांना (आणि कनिष्ठ बंधू श्री बंडामहाराज) केवळ श्री महिपती महाराजांचाच आधार होता. कारण मातोश्रींच्या निधन समयी महाराजांचे वय होते केवळ १३-१४ वर्षांचे ! श्री महिपती महाराजांनी या भावंडांना जवळ केले आणि पित्याची माया देऊ केली.

महाराजांच्या पुढील शिक्षणाचा प्रश्न पुन्हा निर्माण झाला असता, पुन्हा एकदा श्री महिपती महाराजांना म्हणाले, 'मला वाटते, तू इंग्रजी शिक्षणाऐवजी संस्कृतचा अभ्यास करावा. संत वाङ्मयाचे अध्ययन करावे आणि उत्तम कीर्तनकार होऊन आपली परंपरा सांभाळावी. संतवाणीची आणि माणसांची भेट घडवून आणणे हा धर्म आहे, तो तू आचरावास आणि जनसामान्यांना सद्पथ दाखवावा.'

श्री महिपती महाराजांच्या सूचनेने महाराजही भारावून गेले आणि सहजतेने उद्गारले, 'आता मला आपणच मायबापाचे ठायी आहात, तुमची आज्ञा मला प्राणाहून प्रिय आहे. आपण माझे सदैव सुभाग्याचेच चिंतणारे आहात.'

**"गीता निष्कपट माय । चुकोनि तान्हे हिंडे जे वाय ।**
**-ते मायपूता भेटी होय । हा धर्म तुमचा ।।"**

'श्री ज्ञानराजांची ही धर्मगाथा तुझ्या पोटी आहे, ती उदित कर.' श्री महिपती महाराजांनी महाराजांना आशीर्वाद दिला.

## श्री महिपती महाराज : जणू धर्मपिता–

श्री गुंडा महाराज देगलूरकर हे महाराजांचे प्रपिता. त्यांना तीन अपत्ये. श्री नारायण महाराज, रामचंद्र महाराज आणि महिपती महाराज. पैकी श्री रामचंद्र महाराज हे महाराजांचे पिता, अन्य दोघे चुलते. महाराजांच्या वडिलांचे (श्री रामचंद्र महाराजांचे) अकाली निधन झाल्याने, चार वर्षांच्या महाराजांची आणि (दोन वर्षांच्या बंडा महाराजांची) संगोपनाची जबाबदारी श्री महिपती महाराजांकडे आली, अन् महिपती महाराज हे या दोन मुलांचे केवळ चुलते न राहता पालकपिताही बनले होते. श्री महिपती महाराज हे रंगाने गोरेपान, काहीसे ठेंगणे तरीपण आकर्षक व्यक्तिमत्त्वाचे. दातृत्व आणि संतसेवा हे त्यांचे अंगभूत गुण. विठ्ठल मंदिरातील चक्री भजनात रंगणारे महिपती महाराज अद्वैत तत्त्वज्ञानावर आपली अपार श्रद्धा आणि निष्ठा ठेवून होते. सत्शील, सदाचारी, निरहंकारी आणि प्रचंड उदारवृत्ती या गुणांनी समृद्ध असणारे आदर्श व्यक्तिमत्त्व महाराजांना त्यांच्या पूर्वपुण्याईने लाभले होते. एक परिपूर्ण पालक-पिता म्हणून आपल्याकडे वेदवाङ्मयातही पित्यासंबंधी आदरभाव व्यक्त करणारी अनेक वचने आहे. 'त्वं हि नः पिताऽसि। पिता तो बोधि ।'-इथे तर साक्षात् परमेश्वरालाच पिता म्हटले आहे. परमेश्वरासमान पिता मानण्याची आपली संस्कृती. महाराजांच्या पूर्वपुण्याईने श्री महिपती महाराजांसारख्या पालकपिता त्यांना लाभलेला होता. मनुष्याचे वैशिष्ट्य पैतृक संस्कारात आहे. मातेकडून येणारी अंगभूत व शारीरिक गुणांची परंपरा सर्वच सजीव प्राण्यात असते, मात्र पैतृक गुणांची परंपरा येतेच असे नाही. मानव त्याला अपवाद म्हणता येईल. वात्सल्य, प्रेम, आदरभाव, भक्ती, दातृत्व यासारखे मातेकडून येणारे गुण आणि त्याला पैतृक संस्कारातून मिळणारी धैर्य, गांभीर्य, विवेक, बुद्धिचातुर्य आणि कर्मयोग यासारख्या गुणांची मिळणारी साथ यामुळे तर मानवी जीवन सुसंपन्न होते. अशा पवित्र गुणांच्या प्रवाहावर मानवी संस्कृती बसलेली आहे. भाव आणि शास्त्र, हृदय आणि बुद्धी, ज्ञान आणि कर्म ह्याचा संपूर्ण उपयोग करुन मानवी संस्कृती उत्तरोत्तर दैवी संस्कृतीकडे जावी हाच तर पैतृक संस्काराचा आदर्श व

हेतू होय. असा आदर्श ज्यांच्या ठिकाणी मुरलेला असेल, त्याच्याच ठिकाणी खऱ्या अर्थाने पितृत्व आहे असे म्हणता येते.

**'स पिता पितरस्तासां केवलं जन्म हेतवः।'**

म्हणजेच जन्महेतू पिता हा पिता नव्हे तर, ईश्वराकडून आलेला परमशुद्ध निर्विकार, निर्मळ, अनासक्त, तटस्थ आणि अतिशय तैलबुद्धीच्या बालकाचा गुरुतुल्य होणे हीच खरी पितृत्वाची फार मोठी कसोटी असते. मानवाचा विकास, दैवी संपत्तीचा आदर्श आणि बालकाचे गुरुत्व या तीन गोष्टींवर पितृत्वाची कसोटी असते. या कसोटीत श्री महिपती महाराज पूर्णपणे उतरलेले होते.

श्री महिपती महाराज स्वतः शास्त्रसंपन्न होते. त्यांची औपनिषादिक अद्वैत तत्त्वज्ञानावर नितांत श्रद्धा होती किंबहुना त्यांनी अध्ययन करताना प्रथम तत्त्वज्ञानाचेच अध्ययन/आकलन केले होते आणि नंतर विवेकाने आकलन केलेल्या ज्ञानाचे पृथ:करण करुन औपनिषदिक अद्वैत तत्त्वज्ञानातच श्रत् म्हणजे सत् आहे आणि तत् व्यतिरिक्त ज्ञाने तिथे अज्ञान असा मनोनिश्चय करुन त्या श्रत्‌ला धारण करण्याच्या मनोशक्तीने ते संपन्न केले होते.

श्री महिपती महाराजांनी आपल्या अंगभूत गुणांनी महाराजांचे समोर एक मोठा आदर्श उभा केला होता. श्री महिपती महाराजांचे सत्यप्रेम, दिनचर्येतील नियमितपणा, साधनेतील सातत्य, ज्ञानमयता, शांती, मितभाषीपणा, परमेश्वर भक्तितील निष्ठा, तीव्र बुद्धिमत्ता आदी गुणांचा एकत्रित संगम म्हणजे श्री महिपती महाराजांचे व्यक्तिमत्त्व होते. इतके असामान्य गुण असूनही पुन्हा 'मी एक सामान्य माणूस होय'-असे म्हणत आपल्यातील विनयशीलता दर्शवित. खरेतर ज्ञान आणि अहंकार हे एकत्र गुण्यागोविंदाने नांदत नाहीत असे म्हणतात.

**'अहंभाव ज्या मानसींचा विरेना । तया ज्ञान हे अन्नपोटीं जिरेना ।'**

महाराजांनी संस्कृत भाषेचा आणि संतवाङ्मयाचा अभ्यास करुन आपल्या कुळाची विठ्ठलभक्तीची परंपरा पुढे वृद्धिंगत करावी. या विचाराशी सहमत असणाऱ्या श्री महिपती महाराजांनी महाराजांच्या सर्व प्रकारच्या शिक्षणाची उत्तम व्यवस्था केली होती. कीर्तनाला अपेक्षित व आवश्यक असणाऱ्या संगीताच्या ज्ञानासाठी

श्री विनायक बुवा गवई (संतश्री भटजी बापू-हैद्राबाद यांचे शिष्य) यांना पाचारण केले होते, तर संस्कृत भाषा, व्याकरण, काव्य इ. च्या अध्यापनासाठी मान. हरिपूरकरशास्त्री यांना खास बोलावून त्यांचेवर जबाबदारी सोपविली होती. वेदांताच्या अध्यापनासाठी वे. शा. सं. पंडितप्राण श्री. भगवानशास्त्री धारूरकर यांना नियुक्त केले होते, अशा सर्वच विषयांसाठी मातब्बर आणि दिग्गजांचे मार्गदर्शन महाराजांना उपलब्ध झाले होते. यांचेकडून गीताभाष्य, तर्कसंग्रह, दीपिका, वेदान्त परिभाषा, पंचदशी, ब्रह्मसूत्र भाष्य इ. ग्रंथांचे सखोल ज्ञान प्राप्त झाले होते. शिवाय महाराजांच्या अध्ययन प्रक्रियेत श्री. दामोदरशास्त्री यांनाही सामील करुन घेतले होते. या व्यतिरिक्त व्यवहाराचा भाग म्हणून महाराजांसाठी इंग्रजी व उर्दू भाषेच्या अभ्यासासाठी खाजगी शिकवण्याही सुरु केल्या होत्याच. याच काळात अग्रहारचे वकील श्री. मल्हारराव यांची कन्या कृष्णाबाई यांचेशी महाराजांचा विवाह संपन्न करुन देऊन श्री महिपती महाराजांनी आपल्यावरील एक जबाबदारी पूर्ण केली होती.

आता वेदादी वाङ्मयाचे अध्ययन, संस्कृतचा भाषिक अभ्यास आणि संतवाङ्मयाचे अवलोकन हाच महाराजांच्या जीवनाचा ध्यास बनला गेला होता. वयाच्या केवळ सोळाव्या वर्षी महाराजांचा सिद्धांत कौमुदी, पंचकाव्ये यासारख्या काही महत्त्वपूर्ण ग्रंथांचा अभ्यासही झाला होता. महाराजांच्या वयाच्या केवळ सतराव्या वर्षी श्री महिपती महाराजांनी आषाढ शुद्ध एकादशीच्या मुहूर्तावर महाराजांना कीर्तनासाठी उभे करून, महाराष्ट्राला एका नव्या कीर्तनकाराची ओळख करुन दिली. यामुळे देगलूरकरांच्या कुलपरंपरेतील कीर्तनाची परंपरा पुढे अखंडितपणे प्रवाही बनली. अशा तऱ्हेने महाराजांची कीर्तनसेवा सुरु झाली आणि पुढे ती सुमारे साडेसहा दशके अखंडीतपणे चालूच राहिली होती. दरम्यानच्या काळात श्री महिपती महाराजांना पायाचा त्रास होऊ लागल्याने देगलूर-पंढरपूर वारीचीही जबाबदारी त्यांनी महाराजांचेवर सोपविली. महाराजांनीही ती आनंदाने स्वीकारली. पुढे श्री महिपती महाराजांचे आजारपण वाढतच गेले आणि अखेरीस शके १८५६ (इ. स. १९३४) च्या सुरुवातीसच श्री महिपती महाराजांनी आपला नश्वरदेह श्री विठ्ठलचरणी

समर्पित केला. या घटनेने महाराज खऱ्या अर्थाने अनाथ, पोरके झाले होते. आपल्या जनक पित्याच्या (श्री. रामचंद्र महाराजांच्या) निधन समयी महाराज केवळ चारच वर्षांचे होते. त्यामुळे पोरकेपण वा अनाथावस्था म्हणजे काय हे त्यांना कळलेही नव्हते. किंबहुना तशी जाणीवही श्री महिपती महाराजांनी कधी करुन दिली नव्हती. मात्र आता, श्री महिपती महाराजांच्या निधनाने महाराजांना एकटेपण वाटू लागले होते. आधाराचा मोठा वटवृक्ष उन्मळून पडल्याची भावना त्यांच्या मनात झाली होती. पोरकेपणाचे चटके जाणवू लागले होते.

**'सुखीं संतोषा न यावे, दु:खीं विषादा न भजावें ।**
**लाभालाभ न धरावें, मनामाजीं ।'**

या चित्तवृत्तीला महाराज जाऊन पोहचले होते.

**ज्ञानोपासना–**

**ज्यतिषजाति पदार्थानान्तर: कोऽपि हेतु: ।**
**न खलु बहिरूपाधीन्प्रतिय: संश्रयंते ।।**

एखाद्या गोष्टीची आवड असणे वा एखाद्या गोष्टीविषयी मनात तिरस्कार तथा औदासिन्य निर्माण होणे या गोष्टी माणसाच्या अंतरवृत्तीवर अवलंबून असतात. म्हणजेच, एखाद्या आध्यात्मिक विषयाची आवड असणाऱ्या मुलास शालेय शिक्षणासाठी इंग्रजी विद्यालयात पाठविले तरी त्या मुलाची आत्मिक अभ्यासाची ओढ थोडीच थांबत असते ? त्याच्या मनाची/वृत्तीची ओढ ही त्याला आवडत्या विषयाकडेच खेचत राहते. 'तत्र स्थितो यत्नोभ्यास:।' या संस्कृत वचनानुसार 'वृत्तीची, आत्म्याच्या ठिकाणची तल्लीनता करण्याचा अभ्यास हाच खरा अभ्यास' असे म्हणता येईल, आणि त्याला अनुकूल अशा तऱ्हेचे पोषक वातावरण हे त्या अध्यापनाचे विद्यालय. अशी परिस्थिती ज्या अभ्यासकाला प्राप्त होते तो भाग्यवंत. परंतु ज्या अभ्यासूंना असे पोषक वातावरणाचे विद्यालय उपलब्ध होत नाही, उलट प्रतिकूल परिस्थितीच निर्माण झालेली असते, अशावेळी हे अभ्यासू प्रतिकूल परिस्थितीला सामोरे जातांना मनात 'आपले प्रतिकार सामर्थ्य वाढविण्याचा हाच योग्य काळ' असे समजतात. तर अशा व्यक्तींच्या जीवनात (क्वचित) अनुकूल

स्थिती निर्माण झाली तर हेच अभ्यासू 'आपले ग्रहण सामर्थ्य तपासून पाहण्याची व वाढविण्याची' ही योग्य संधी आहे असे मानून आनंदी होतात. थोडक्यात, परिस्थिती कोणतीही असो (अनुकूल वा प्रतिकूल), खरा अभ्यासक आपली ज्ञानोपासना खंडित न करता, प्राप्त परिस्थितीला सामोरे जाण्याची मानसिकता ठेवतोच. महाराजांच्या सुदैवाने त्यांना प्रतिकूल परिस्थितीतही अनुकूल परिस्थिती प्राप्त झाली होती. मुळात तीव्र बुद्धिमत्ता आणि प्रभावी आकलनशक्ती लाभलेल्या महाराजांनी कठोर परिश्रम आणि गुरुनिष्ठा याद्वारे सर्व गुरुजनांकडून विद्या प्राप्त करुन घेतांना आपले मन, बुद्धी आणि विचार यांना संस्कारित करीत स्वत:च्या व्यक्तिमत्त्वाला विशिष्ट घाट प्राप्त करुन घेतला होता. त्यांच्या शैक्षणिक कालावधीत त्यांना साथ मिळाली ती सर्वश्री बंकटस्वामी, मारुतीबुवा गुरव, लक्ष्मणबुवा इगतपुरीकर यांसारख्या संतसाहित्याच्या गाढ्या विद्वानांची. परिणामी सोन्याला सुगंध प्राप्त व्हावा, त्याप्रमाणे महाराजांच्या व्यक्तिमत्त्वाला विद्वत्तेचा सुगंध आणि संगीताचे माधुर्य प्राप्त होत गेले होते. ज्ञानेश्वरीच्या मानससरोवरात वावरत असणारा हा राजहंस काही काळातच लीलया विहार करु लागला होता. वयाच्या अवघ्या विसाव्या वर्षी त्यांनी श्री ज्ञानेश्वरीवरील प्रवचनाद्वारे आपला वाग्यज्ञ सुरु केला आणि पुढे तो जीवनाच्या अखेरपर्यंत तेवत ठेवला होता.

महाराजांची अध्ययन साधना आयुष्यभर अखंडपणे चालू होती. त्यांत वेद-वाङ्मयाच्या अध्ययनाबरोबर संतवाङ्मयाच्या अभ्यासाचाही समावेश होता. खुद्द महाराजांमध्ये 'बहुत सुकृताची जोडी' असल्याने त्यांच्यात 'विठ्ठल आवडी' निर्माण होणे स्वाभाविक होते. अध्ययन क्षेत्रात त्यांची बुद्धिमत्ता लीलया विहार करीत होती. महर्षि व्यासांची पदे पाहता पाहता महाराजांनी महाभारत, रामायण, श्रीमत् भागवत तसेच पुराणे, ब्रह्मसूत्रे, गीता आदी ग्रंथांचाही अभ्यास केला होता. भाष्यकाराते वाट पुसता पुसता साऱ्या भाष्यांचे परिशीलन केले. 'कवितत्वी....रसिकत्व' चा आस्वाद घेण्यासाठी कालिदास, भवभूती आदींच्या अभिजात संस्कृत वाङ्मयाचा नित्य अभ्यास करुन त्यापैकी बरेचसे कंठस्थही केले होते.

संस्कृत व्याकरणकार पाणितीने आपल्या ग्रंथाच्या आरंभी दोन सूत्रे दिली आहेत. 'वृद्धिरादैच' आणि 'अदेङ् गुण: ।'-वृद्धी आणि विकास ही एकामागून एक

आलेली सूत्रे म्हणजे शिक्षणप्रक्रियेतील प्रथमसूत्रे मानली जातात. विकास आणि गुण किंवा गुणांचा विकास अथवा विकासाचा गुण कसेही म्हटले तरी या दोहोंची जोडी शिक्षण प्रक्रियेत अभेद्यच असते. अगदी व्यासांची इतिहासाची पाठशाळा, पाणिनीचे व्याकरणाचे अध्ययन, कपिलांचे सांख्यतत्त्वांचे विद्यापीठ, गौतमांचे न्यायविद्यालय, वाग्भटाचे वैद्यक, भास्कराचार्यांचे गणित, बादरायणांचा वेदांत असो किंवा शंकराचार्यांचे अद्वैत भाष्य असो, गुण हे सर्वत्र सारखेच. उपाधिभेदाने असे म्हणता येईल की, मोकळी फुले, फुलांचा गुच्छ, हार किंवा गजरा असे निरनिराळे प्रकार केले तरी फुलात काहीच फरक पडत नसतो. गुणी अभ्यासकाचे बाबतीत वरील विधान योग्य ठरावे. अशा अभ्यासकाच्या मनाची तीव्र ग्रहणशक्ती, त्या ग्रहणातला आल्हाद त्यातच जर सन्मित्र वा प्रियजनांचा सहवास लाभला तर अध्ययन प्रक्रिया अधिकच फोफावत जाते. याला जर उत्तम शिकवण आणि सद्‌गुरु सेवेची संधी मिळाली तर अशा अभ्यासकांचा उत्तरोत्तर अधिक विकास होत जातो हे सत्यच आहे ! श्री ज्ञानदेवांनी याचे सुरेख वर्णन करताना म्हटले आहे--

'ऋतु बरवा शारदु । शारदी पुढती चांदु । चंद्री जैसा संबंधु । पौर्णिमेचा'।।
कां बरवा आराम । आरामी प्रियसंगम । संयमी आगम । उपचाराचा' ।।
वाचे बरवे कवित्व । कवित्वी बरवे रसिकत्व । रसिकत्वी परतत्त्व। स्पर्शु जैसा'।।

महाराजांच्या प्रकृतीत असणाऱ्या अभ्यासू वृत्तीने त्यांचा बौद्धिक विकास सतत वृद्धिंगत होत राहिला होता.

महाराजांच्या वाङ्मय सेवेत संतसाहित्याच्या अध्ययनाला श्रेष्ठत्व, प्राध्यान्य होते. 'संत वाङ्मय श्री प्रभूची वाङ्मयीन मूर्तीच आहे' असे ते मानीत. अशा संतवाङ्मयाची त्यांनी जीवनभर उपासना केली. खरेतर या उपासनेचा प्रारंभ श्री ज्ञानेश्वरीच्या पारायणानेच झाला. देगलूरजवळ असलेल्या रामपूर या गावात एक जुनाट देवालय आहे. इथूनच त्यांच्या उपासनेला प्रारंभ झाला. या गावाचे, तेथील मंदिराचे व सभोवतालचे वैशिष्ट्य म्हणजे महाराजांच्या (म्हणजेच देगलूरकरांच्या)

मूळ पुरुषाच्या (ह.भ.प. श्री गुंडा महाराज पहिले) पदस्पर्शाने पुनीत झालेला आहे, असे मानले जाते. याच मंदिरात महाराजांनी श्री ज्ञानेश्वरीची एकशे आठ पारायणे केली. साहजिकच ती मुखोद्गत झाली होती. ज्ञानेश्वरी त्यांच्या जीवनाचा प्राण होता. महाराजांनी श्री ज्ञानेश्वरीच्या अभ्यासाप्रमाणेच तुकाराम गाथा, एकनाथी भागवत यांचाही अभ्यास करुन, वारकरी संप्रदायातील या प्रस्थान त्रयीवर प्रभुत्व मिळविले होते. यातील तुकोबांचे बरेचसे अभंग आणि नाथांच्या ओव्या मुखोद्गतही केल्या होत्या. महाराजांच्या अध्ययन प्रक्रियेत 'श्रवण' साधनेलाही प्राधान्य होते. चातुर्मासात ब्र. भू. श्री दादामहाराज साखरे हे आपल्या पंढरपूरच्या वास्तव्यात मुख्यत्वे ज्ञानेश्वरीवर प्रवचने करीत असत. त्याचबरोबर अमृतानुभव, भाषादी पाठही होत असत. महाराज या सर्व प्रसंगी आवर्जून उपस्थित राहत असत, आणि आपल्या अध्यनातील उणिवा भरुन काढीत असत.

महाराजांची अध्ययन प्रक्रिया अखंड चालू असायची. आयुष्याच्या उत्तरकाळातही अध्यापनाच्या निमित्ताने त्यांनी शांकरभाष्य, सिद्धांत बिंदु, योगवासिष्ठ, मधुसुदन सरस्वतीकृत भक्तिरसायन, नारद भक्तिसूत्र, शांडिल्य भक्तिसूत्र, संत निळोबांचे साहित्य, बाळक्रीडा इ. ग्रंथ तथा संत साहित्य अभ्यासले होते. प्रतिवर्षी चातुर्मासात पंढरपूर न सोडण्याचे त्यांचे व्रत होते. या काळात वरीलपैकी एखाद्या ग्रंथावर चार महिने, रोज सकाळी एक तासभर प्रवचनही करायचे. त्यासाठी त्याचे भल्या पहाटे अध्ययन, टिपणे काढणे सुरु व्हायचे. पंढरपुरातील चातुर्मास कालावधी म्हणजे मुमुक्षूंसाठी पर्वणी असते. या काळात पंढरपुरातील अनेक मंदिरे, मठ, धर्मशाळा यामधून अनेक मान्यवर साधू महंत, कीर्तन-प्रवचनकार, विद्धज्जन यांच्या प्रवचने, कीर्तने, व्याख्याने यांचा जणू महोत्सवच असतो. याकाळात पंढरपुरात आलेल्या विद्धानांशी चर्चा करुन महाराज आपल्या ज्ञानाला सतत उजाळा देत असत आणि या सर्वांचा एकत्रित परिणाम म्हणजे त्यांच्या हातून निर्माण होणारी साहित्यसंपदा. त्यांचा प्रत्येक ग्रंथ हा विस्तृत, सटीप, प्रचंड संदर्भासहित आणि मुख्य म्हणजे सामान्यांच्याही आकलन कक्षेतला असल्याने, अभ्यासक, साधक वा मुमुक्षू यापैकी कोणासही संदर्भग्रंथ शोधण्याची वा पाहण्याचीही गरज भासत नसे.

## संतांना अपेक्षित असणारे धर्मकीर्तन–

कीर्तने-प्रवचने ही परमार्थाची साध्ये नव्हेत, तर परमार्थातील अंतिम साध्याकडे (मोक्षाकडे) घेऊन जाणारी ती साधने होत. आत्मचिंतनाने (अंतर्मुख होऊन) स्वत:कडे पाहण्याचे, हरपलेले श्रेय शोधण्याचे किंवा लोकांवर सदाचारांचे संस्कार करण्याचे ते एक माध्यम आहे. कीर्तन हे नीतिमूल्यांचे प्रबोधन करण्याचे, ज्ञान व भक्ती जोपासण्याचे आणि हरिनाम महिमा वाढविण्याचे स्थान आहे, अशी महाराजांची ठाम धारणा होती. ते म्हणत, 'जे परतत्त्व स्पर्श करु शकते, ज्यात विशाल विश्वरुपाचे दर्शन असते, जिथे कर्म, ज्ञान व भक्ती यांचा संगम असतो ते कीर्तन (वा प्रवचन) होय.' महाराजांच्या कीर्तनात या सर्वांचा अनुभव यायचा. वास्तविक महाराज जरी वेदान्ती होते, तरी मुळात संतवाङ्याचे अभ्यासक होते. कीर्तन-प्रवचनकार आपल्या कीर्तन-प्रवचनातून नवीन काही सांगत नसतात, तर संत-वाङ्मय, वेद-उपनिषदे, शास्त्रे इ. मधील विचारच सांगत असतात. तरीही जे असे विचार महाराजांच्या मुखातून बाहेर पडत असत तेव्हा तर कट्टर वेदांती श्री शंकरानंद कमी पडताहेत की काय, अशी शंका यायची. तर त्याचवेळी महाराज जेंव्हा भक्तिप्रेमाचे महत्त्व स्पष्ट करीत त्यावेळी त्यांच्या मुखातून भक्तिरसच बाहेर येतो आहे असे वाटे. म्हणूनच त्यांचे कीर्तन कधी संपूच नये असे वाटे. महाराजांचे कीर्तन म्हणजे श्रोत्यांना 'सविकल्प समाधीचा अनुभव' भासत असे. त्यांचे कीर्तन जितके समाजजागृतीस, देशनिष्ठेस प्राधान्य देणारे असे तितकेच (वा किंचित थोडे अधिक) ते धर्मजागरण आणि परमेश्वर भक्तीच्या गायनाला महत्त्व देणारे असे. त्यांच्या कीर्तन-प्रवचनाच्या भूमिका व अविष्कारावरुन असे म्हणता येईल की, महाराज हे केवळ कीर्तनकार नव्हते, तर संतांना अपेक्षित असणारे ते एक धर्म-कीर्तनकार होते.

## देगलूर-पंढरपूर दिंडी (सन १९२१)

देगलूर-पंढरपूर वारी ही देगलूरकर घराण्याची परंपरा होती, तो धर्मही होता आणि मिजासही होती. परंपरेने या वारीचे नेतृत्व उत्तराधिकारी म्हणून आणि

घराण्याचा धर्म म्हणून ह.भ.प. महिपती महाराजांनी या वारीचे तीन तपे नेतृत्व केले, मात्र त्यानंतर त्यांची इच्छा असूनही वारीत सहभागीही होणे त्यांना अशक्य होऊ लागले होते. त्यांची वातप्रकृती होती, परिणामी पायी चालणे अवघड झाले होते. तरीही इच्छाशक्ती दांडगी. सन १९२१ (शके १८४३) च्या वारीच्या वेळी त्यांच्या इच्छाशक्तीबद्दल त्यांना स्वत:लाच शंका येऊ लागल्याने (वारी पूर्ण केली जाईल वा नाही) या वेळेच्या वारीस श्री महिपती महाराजांनी आपल्या समवेत महाराजांना घेतले होते. प्रथम काही प्रवास पायी झाला. परंतु पुढे पायी चालणे अगदीच अशक्य झाल्याने श्री महिपती महाराजांनी पायी वारीच्या नेतृत्वाची धुरा महाराजांकडे सोपविली. ती वीणा महाराजांनी अत्यंत आदराने, आनंदाने स्वीकारली. या वारीचे नेतृत्व महाराजांकडे सन १९२१ पासून आले. (ती उर्वरित वारी श्री महिपती महाराजांनी घोड्यावर बसून पूर्ण केली.)

महाराजांकडे या वारीचे नेतृत्व आले (सन १९२१) त्यावेळी दिंडीतील वारकऱ्यांची संख्या साधारण पाऊणशेच्या दरम्यान होती. मात्र महाराजांनी या दिंडीचे स्वरूप पालटावयास प्रारंभ केला. उत्तर काळात त्यात शृंगारलेला घोडा आणला, चोपदार-पताकावाले आणले. या दिंडीला अधिक ऐश्वर्यरूप देताना दिंडीत बँड-ताफेवालेदेखील समाविष्ट करुन घेतले आणि देगलूर-पंढरपूर ही देगलूरकरांची दिंडी देखणी व आकर्षक बनली. परिणामी या दिंडीत समाविष्ट, सहयोगी होणारांची संख्या वाढत गेली. महाराजांनी या दिंडीचे (देगलूर-पंढरपूर) सुमारे साडेतीन तपे नेतृत्व केले होते. या दिंडीतील वारकऱ्यांची प्रारंभीची ७०-८० ही संख्या वाढून ती पुढे २५००-३००० पर्यंत गेली. या सर्व अर्थाने दिंडी ही देगलूरकर घराण्याची मिजास बनली गेली होती. महाराजांनी या दिंडीचे केवळ बाह्यांगच बदलले असे नाही तर, अंतरंगातही बदल केले. दिंडीला अभ्यासाचे रूप दिले. भजनाबरोबर कीर्तने, प्रवचने सुरु केली. विशेषत: ज्ञानेश्वरी वाचन-अभ्यास-चिंतन सुरु केले. वारीत महाराज स्वत: कीर्तन-प्रवचने करीत होते. त्यांचे कीर्तन वा प्रवचन म्हणजे दिंडीतील वारकऱ्यांना ज्ञान-बोधामृताचे पंचपक्वान्नाचे भोजन असे.

वारीच्या निमित्ताने महाराजांनी ह.भ.प. विनायकबुवा साखरे, ब्यंकटस्वामी, लक्ष्मणबुवा इगतपुरीकर, मारुतीबुवा गुरव, केशवमहाराज देशमुख, मामासाहेब दांडेकर, रावसाहेब नेऊरगावकर इ. प्रख्यात, अभ्यासू, ज्ञानी अधिकारी मंडळींनाही आमंत्रित केले होते. याही मंडळींची वारीदरम्यान कीर्तने-प्रवचने होत होती. महाराजांची ही परंपरा (देगलूर-पंढरपूर) सन १९६३-६४ पर्यंत अखंड चालू होती. पुढे ह. भ. प. श्री मामासाहेब दांडेकर यांच्या सूचनेवरुन महाराजांनी देगलूरची दिंडी आळंदीस आणली व तेथून ते श्री ज्ञानदेवांच्या पालखीसमवेत जाऊ लागले. अशी वारी व तिचे नेतृत्व सुमारे दोन तपे महाराजांनी केले होते. पुढे प्रकृती अस्वास्थ्याने महाराजांनी ही धुरा आपले पुतणे ह.भ.प. श्री निवृत्तीनाथ महाराज यांचेकडे दिली. वय वर्षे १७ ते ८५ (सुमारे ६८ वर्षे) या अवधीत महाराजांनी एकूण दिंडीचे स्वरूप बदलून, नवनवे प्रयोग करीत मुमुक्षूंना ज्ञानामृत दानाचे कार्य केले. यात वारकऱ्यांच्या अंधश्रद्धेला डोळसपणा आणून देण्याचेही काम महाराजांनी केले होते.

**प्रवचन सेवेस प्रारंभ–**

वयाच्या केवळ सतराव्यावर्षी महाराजांनी आपल्या प्रवचन आणि (कीर्तन) सेवेस प्रारंभ केला होता. त्यांना प्रवचनकार आणि (कीर्तनकार) म्हणवून घडविण्यात स्वानंदयोगी ह.भ.प. श्री विष्णुबुवा जोग महाराज हे जरी कारणीभूत झालेले होते, तरीही त्यांच्यातील या परिवर्तनात त्यांच्या घराण्याची कुलपरंपरा आणि चुलते ह.भ.प. श्री महिपती महाराज यांचे प्रोत्साहन हेही घटक कारणीभूत होते. ह.भ.प. श्री गुंडानाथ महाराज (पहिले) यांनी घालून दिलेला परिपाठ नंतरच्या सर्वच पिढीत समर्थपणे चालत राहिला होता. शिवाय ह.भ.प. महिपती महाराजांसारखा आदर्श धर्मपिता, भारतीय तत्त्वज्ञानाच्या शास्त्रीय ग्रंथांचा व संत वाङ्मयाचा अभ्यास, तसेच ह.भ.प. बंकटस्वामी, मारुतीबुवा गुरव, लक्ष्मणबुवा इगतपुरीकर, आदी वारकरी संप्रदायातील अन्य श्रेष्ठ अभ्यासक यांच्याकडून झालेले संतवाङ्मयाच्या अभ्यासाचे संस्कार या सर्वांचा एकत्रित परिणाम महाराजांच्या जडणघडणीत झाला. पुढे त्यात भर

पडली ती पौर्वात्य आणि पाश्चिमात्य संस्कृतीचे, तत्त्वज्ञानाचे तौलनिक अभ्यासक प्राचार्य (ह.भ.प.) शं. वा. तथा मामासाहेब (सोनोपंत) दांडेकर यांच्या सहवासाची. परिणामी महाराजांच्या ज्ञानाच्या कक्षा विस्तीर्ण तर होत गेल्याच, शिवाय त्यास आधुनिकता, डोळसपणा, चिंतनशीलता व अभ्यासू वृत्ती यामुळे महाराजांचे व्यक्तिमत्त्व अधिकाधिक परिपक्व होत गेले. पुढे तर महाराज श्री ज्ञानेश्वरीच्या एकेका ओवीवर आठ-आठ दिवस प्रवचन करीत होते.

**'बिंब तरी बचकेचि एवढे। परी प्रकाशासी त्रैलोक्य थोकडे।'**

या ज्ञानदेवांच्या ओवीची प्रचिती श्रोत्यांना येऊ लागली होती. त्यांचे प्रवचन नित्य सतेज, ताजे आणि नवा अनुभव देणारे ठरायचे. त्यांनी त्यांच्या वाणीला पारोसेपणाचा स्पर्श कधी होऊ दिला नव्हता. (आणि ही गोष्ट पुढे वयाच्या पंचाऐंशी वर्षांपर्यंत चालू होती.) गौरवर्ण, पांढऱ्याशुभ्र वस्त्रांनी खुलून दिसणारे सौम्य-सात्त्विक व्यक्तिमत्त्व सज्जनांना समाधीच लावीत असे. प्रवचनादरम्यान दिले जाणारे दाखले, दृष्टांत आणि शब्दांची उकल करण्याची विशिष्ट पद्धती यांनी

**'येणे वचन तेजकारे । फिटले आतील बाहेरील अंधारे ।'**

अशी श्रोत्यांची स्थिती व्हायची, शंकेला कुठे थाराच नसायचा. आपल्या ओघवत्या व प्रासादिक वाणीने महाराज, श्रोत्यांना तीन-तीन तास खिळवून ठेवायचे. श्रोतृवर्गाला मंत्रमुग्ध करणारा आणि हसतखेळत भक्तिरसाचे अमृतपान करणारा हा वक्ता एकदा का प्रवचनासाठी व्यासपीठावर बसला की श्रोत्यांच्या हृदयावर अधिराज्यच गाजवित असे, आणि महाराजांच्या या अधिकाराने श्रोतेही आनंदून जात होते, कृतार्थतेची भावना त्यांचे ठायी जागृत व्हायची. उत्तमोत्तम प्रवचनाच्या आस्वादाचे समाधान श्रोत्यांच्या चेहऱ्यावरून ओसंडत असे.

प्रवचने करण्याचा व ऐकण्याचा योग अनेकांच्या जीवनी येऊन जातो. परंतु प्रत्येक प्रवचन प्रत्येक श्रोत्याला समाधान देऊन जाते असे नाही, 'जे प्रवचन

परतत्त्व-स्पर्श करु शकते, ज्या प्रवचनात विशाल-विराट विश्वेश्वराचे दर्शन आढळते, कर्म, भक्ती आणि ज्ञान यांचा ज्या प्रवचनात समसमा योग असतो, ते प्रवचन श्रेष्ठ, थोर, आदर्श वा परिणामसाधक असते. कोणी कर्मयोगी, कोणी ज्ञानयोगी, तर कोणी भक्तियोगी असे प्रवचनकार आढळतात. महाराजांचे प्रवचन म्हणजे या तीनही मार्गांचा त्रिवेणीसंगम असायचा. खरेतर योगाचे प्रवचन नसते, कारण 'योग' हा बोलण्याचा विषय नाही तर; अनुभवण्याचा विषय आहे. 'साधचि बोलाचे हे नव्हे शास्त्र।'-असे ज्ञानदेवांनीच म्हटले आहे. महाराजांच्या प्रवचनात योग असायचा पण तो कर्मज्ञान, भक्तीचा. भक्तियोगात सर्वच योगांचा समावेश असतो.

**'योगाचे अष्टांग नामेची साधती। नाम ते वेदांती मिश्रित की ।**

असे प्रज्ञाचक्षू श्री गुलाबराव महाराजांनी म्हटले आहे. महाराजांच्या रूपाने असा समर्थ प्रवचनकार महाराष्ट्राला मिळाला होता.

**'गौण करोनी चारी मुक्ती । जगीं श्रेष्ठ भगवत्‌भक्ती ।'**

हा संतांचा संदेश सातत्याने समाजाला, श्रोत्यांना देतांना सकाम भक्तीपेक्षा निष्काम भक्तीचे मर्म व माहात्म्य रिचवण्याचे कार्य महाराजांनी आयुष्यभर केले.

'श्री ज्ञानेश्वर आणि ज्ञानेश्वरी' हे महाराजांचे जिव्हाळ्याचे विषय असल्याने बऱ्याच वेळेस ते या विषयावरच प्रवचने करीत होते. सुमारे सात दशके त्यांनी श्रोत्यांना ज्ञानेश्वरी सांगितली. पण ती श्रोत्यांना कळावी म्हणून आणि स्वत:लाही कळावी म्हणून. महाराजांचे या विषयावरील प्रत्येक प्रवचन म्हणजे श्री ज्ञानदेव वा ज्ञानेश्वरी यांचे नित्यनूतन दर्शनच असायचे. ज्ञानेश्वरीच्या सखोल अभ्यासाने त्या ग्रंथाची सखोलता, गूढगम्यता, प्रमेये श्रोत्यांसमोर आकलनीय पातळीवर उतरत असत. 'ज्ञानेश्वरीच्या नित्य वाचनाने तिचे नित्य नवे दर्शन अनुभवास येत असल्याने,

ज्ञानेश्वरीच्या अभ्यासास किंवा प्रवचनास कधीच पूर्णता येत नाही.'-अशी कबुली महाराजांनी अनेकदा दिली होती.

**'तैसा वाग्विलास विस्तारूं। गीतार्थे विश्व भरूं ।**
**आनंदाचे आवारूं । मांडू जगा ।।'**

हे ध्येय डोळ्यासमोर ठेवून महाराजांनी आयुष्यभर विशेषत: ज्ञानेश्वरीवर प्रवचने केली.

प्रवचन आणि कीर्तन ही नीतिमूल्यांचे प्रबोधन करण्याचे, ज्ञान व भक्ती जोपासण्याचे आणि हरिनामाचा महिमा वाढविण्याचे स्थान असून त्याद्वारा मनुष्य देहांतर्गत असणारे षड्रिपूंचे दोष घालविता येतात. प्रवचनाचे  व (कीर्तनाचे) हे सामर्थ्य महाराजांनी ओळखलेले होते. महाराजांचे प्रवचन म्हणजे शब्दांचा फुलोरा वा पोपटपंची नसायचे, तर अभ्यास, चिंतन व अनुभूती यांच्या जोरावर प्राप्त झालेले ज्ञान देणारा तो ज्ञानयज्ञच असायचा.

**'ऐसे जागविले अवघे जन । होते संचित ते ही केले दान ।'**

ही दातृत्वता त्यांचेजवळ होती.

**श्री ज्ञानदेवांच्या हरिपाठावर विवरण–**

महाराजांचा श्री ज्ञानदेवांच्या हरिपाठावरील ग्रंथ प्रत्यक्षात जरी सन १९५५ साली प्रकाशित झालेला असला, तरी त्याच्या निर्मितीची प्रक्रिया त्यापूर्वी सुमारे तीस वर्षे सुरु झाली होती. सन १९३३ च्या सुमारास पंढरपुरातील चातुर्मासातील कीर्तनासाठी 'हरिपाठ' हा विषय निश्चित करुन, त्या संदर्भात वाचन, संदर्भग्रंथातील टिपणे इ. तयार करायला घेतली होती. पुढे त्या चातुर्मासात हरिपाठावर कीर्तनेही झाली, आणि त्यासाठी काढलेली टिपणे मात्र एका बासनात बंदिस्त झाली होती. कीर्तनात हरिपाठावरील विवरण/निरूपण ऐकणाऱ्या अनेक श्रोत्यांनी, अभ्यासक साधकांनी

या टिपणांवर आधारित ग्रंथलेखन करुन ते प्रकाशित करावे असे सुचविलेही होते. मात्र महाराजांनी त्यावेळी मनावर घेतले नव्हते. उलट 'कोण करतो एवढा उपद्व्याप ? शिवाय छापणे हे खर्चाचे व दगदगीचे काम. आपण अर्थहीन आहो. जेव्हा योग येईल तेव्हा येईल. अथवा येणारही नाही.' 'सिद्धसिद्धयो: समोभूत्व' अशी आमची वृत्ती आहे.' असे म्हणून त्यांनी ते कार्यही टाळले होते आणि विचारणा करणारांचेही समाधान केले होते. पण हा योग पुढे जुळून आला. त्याचे असे झाले.

औरंगाबादच्या न्यायालयातून सेशन जज्ज म्हणून श्री. बळवंतराव घाटे हे निवृत्त होवून औरंगाबादेत स्थायिक झाले होते. ते संत एकनाथ महाराजांचे परमभक्त असल्याने औरंगाबादेत संत एकनाथांच्या नावे एखादे स्मारक उभे करावे व नाथांच्या (आणि अन्य संतांच्याही) साहित्य प्रकाशनाचे व संशोधनाचे कार्य करावे या उद्देशाने कार्यरत झाले होते. त्यातूनच त्यांनी श्री एकनाथ संशोधन मंदिराची उभारणी केली होती. या दोन मजली इमारतीत धर्मविषयक, आध्यात्मिक ग्रंथांचा मोठा संग्रही केला होता. शिवाय अनेक मान्यवर अधिकाऱ्यांची व्याख्याने, प्रवचने, कीर्तने, आयोजित करुन संस्था नावारूपास आणलेली होती. महाराजांचा या संस्थेचे सल्लागार म्हणून जवळचा संबंध होता. श्री. घाटे यांना महाराजांनी हरिपाठावर कीर्तने करण्यासाठी म्हणून अनेक संदर्भासहित लेखन केल्याचे माहीत होते. म्हणून श्री. घाटे यांनी महाराजांना ग्रंथलेखन करण्याविषयी आग्रह केला. त्यानुसार महाराजांनी श्री ज्ञानदेवांच्या हरिपाठावरील सुमारे साडेसहाशे पानांचा ग्रंथ संपन्न केला. 'हरिपाठ विवरण अर्थात् भक्तिशास्त्र' या नावाचा हा ग्रंथ आळंदीमध्ये प्रकाशित केला गेला.

या ग्रंथाला प्रस्तावना आहे ती प्रा. ह. भ. प. सोनोपंत (मामासाहेब) दांडेकर यांची. त्यांनी प्रस्तावनेत म्हटले आहे की, 'माउलींच्या मनात आले म्हणून लिहावयास बसलो. येरव्ही या पुस्तकास प्रस्तावनेची गरजच नाही, विस्तृत प्रस्तावनेची तर नाहीच नाही. कारण श्री ज्ञानेश्वर माउलींच्या सत्तावीस अभंगांचे स्पष्टीकरण करण्यात श्री धुंडा महाराजांनी आठशेपेक्षा अधिक पाने खर्ची घातली आहेत,

व त्यात असा कोणचा बारीकसारीकसुद्धा विषय ठेवला नाही की, ज्याची भरपूर माहिती संबंधित उताऱ्यासह त्यांनी दिली नाही..... दिसायला विषय सोपा असला तरी माउलींनी त्यात गहन अशा विषयाची चर्चा केली आहे. ते पाहणारा पाहिजे ! श्री धुंडा महाराज यांनी विवरणात दाखविल्याप्रमाणे 'अद्वैत व भक्ती, समाधी, उन्मनी अवस्था, आत्मैकत्व, सगुण निर्गुण ध्यान इ. विषय मनात घेऊन माउलींनी या हरिपाठाची रचना केली आहे.' महाराजांच्या विस्तृत विवरणाने अभ्यासक, साधक यांना आकलनास सोपा झालेला हा ग्रंथ, मूळ हरिपाठाची योग्यता कळण्यासही खूप उपयुक्त झालेला आहे.

**अधिकस्य अधिकं फलम् ।–**

चातुर्मास म्हटला की, पंढरपुरातील अनेक मंदिरे, धर्मशाळा, मठ इ. तून चालणाऱ्या कथा-कीर्तने वा प्रवचने यांची भक्त, साधक, अभ्यासू यांना मोठी पर्वणीच असते. या कालावधीत महाराष्ट्रातील व महाराष्ट्राबाहेरीलही अनेक मुमुक्षू पंढरपुरात चार महिन्यांसाठी वास्तव्यास असतात. प्राचीन कालावधीपासून चालत आलेली ही परंपरा आजही पंढरपुरात चालूच आहे. या कालावधीत अनेक नामवंत कीर्तन-प्रवचनकार, संप्रदायांचे प्रवक्ते-विद्वान पंढरपुरात आपली सेवा सादर करण्यासाठी येतात. मुमुक्षूंनाही त्यांच्या ज्ञानाचा लाभ होत असतो. पंढरपुरातील चातुर्मास म्हणजे आध्यात्मिक अभ्यासकांसाठी पाणपोयीच असते. कोणीही यावे आणि आपल्या ज्ञानाची तहान भागवून जावे. महाराजांच्या देगलूरकरांच्या मठातही महाराजांच्या अगोदरपासून ज्ञानार्जनाची परंपरा चालू होती. महाराजांनी आपले चुलते व आध्यात्मिक गुरु वै. महिपती महाराजांकडून हा वसा घेतलेला होता. चातुर्मासात रोज सकाळी किमान एका तासाच्या प्रवचनात महाराज प्रतिवर्षी एखादा ग्रंथ सांगायचे. कधी कधी एखादा ग्रंथ एका वर्षात पूर्ण न झाल्यास, त्याची पूर्तता पुढील चातुर्मासात करायचे. मठात चालणाऱ्या या ज्ञानसत्राला अक्षरश: हजारोंची उपस्थिती असायची.

या ठिकाणी उद्‌धृत करीत आहे ती घटना १९४७ ची. भारताच्या स्वातंत्र्याच्या काठावरील कालावधीतील. चातुर्मास नजीक येवून ठेपल्याने, मठात येणाऱ्या (वास्तव्यास) वारकरी अभ्यासकांच्या निवासाची व भोजनाची जबाबदारी महाराज घेत. परंतु सन १९४७ च्या चातुर्मास काळात रेशनिंग सुरू झालेले. प्रत्येकाला ठराविक शिधा रेशनिंगवर मिळे. अशा परिस्थितीत वास्तव्यास येणाऱ्या लोकांचीही व्यवस्था कशी करायची ? त्यातूनही व्यवस्था झालीच तरी एका वेळेला पंचवीसपेक्षा अधिक लोकांना भोजन द्यावयाचे नाही, असाही दुसरा एक सरकारी नियम असल्याने, महाराजांच्यासमोर समस्यांचा राक्षसच उभा राहिला होता. महाराजांनी खूप विचार केला आणि एका वर्षापुरता मठातील चातुर्मासाचा कार्यक्रम न करण्याचा निर्णय घेतला होता. तथापि, गेल्या अनेक दशकाची परंपरा खंडित करणे महाराजांनाही संयुक्तिक वाटत नव्हते. एकाबाजूला आड व दुसरीकडे विहीर अशी महाराजांची अवस्था झाली होती. मार्ग निघत नव्हता व समस्याही संपुष्टात येत नव्हती. अखेरीस श्री पांडुरंगावर भिस्त ठेवून महाराजांनी चातुर्मास करण्याचा निर्णय घेतला. यात प्रवचने, कीर्तने, चक्रीभजने, पारायणे, जप इ. अनेक भक्तिमार्गाचा समावेश केला होता. विशेष म्हणजे उपस्थितांकडून चार महिन्यात बारा कोटींचा जप करून घेण्याचाही संकल्प सोडला होता. या सर्व कार्यक्रमासाठी सुमारे आठ ते दहा हजार रुपये खर्च होतील असा त्यांचा प्राथमिक अंदाज होता. मात्र कार्यक्रमांच्या रेलचेलीमुळे उपस्थित श्रोते-अभ्यासक-भक्त यांची संख्या वाढत गेली. खुल्या बाजारातून चढ्या किमतीने धान्य आणावे लागले. एका बाजूस कायद्याचे बंधन तर दुसरीकडे भाविकांचा ओघ. तारेवरची कसरत करीत महाराजांनी कार्यक्रमांची गर्दी उडवून दिली होती. पण ही गोष्ट काही विघ्नसंतोषींना न रुचल्याने त्यांनी कलेक्टरसाहेबांना तक्रार करून कळविले की, 'या मठात रोज किमान पाचशे लोकांचा शिधा शिजतो आहे', सहाजिकच चौकशी सुरु झाली. मात्र चौकशी अधिकारीही भाविक असल्याने त्यांनी तक्रारीकडे दुर्लक्ष केले. महाराजांनीही १५ ऑगस्ट, १९४७ रोजी (स्वातंत्र्यदिनी) मोठे अन्नदान करुन चातुर्मासाची समाप्ती व स्वातंत्र्याचा पहिला दिवस अनोख्या पद्धतीने साजरा केला.

**काशी यात्रा (१९४७)–**

उमरावतीहून हरिद्वारकडे प्रयाण करतेवेळी महाराज, त्यांचे कुटुंबीय व स्नेही मंडळी आणि श्री. सदाशिवराव देवरणकर यांचे कुटुंबीय मिळून एकूण चाळीसजण झाले होते. उमरावती, नागपूर, दिल्ली असा प्रवास करून ही सर्व मंडळी हरिद्वारात पोहोचली. तेथे मुक्कामाची व्यवस्था उत्तमच होती. ठरल्याप्रमाणे चि. जयेंद्रचा उपनयन संस्कार शास्त्रीबुवांच्या मार्गदर्शनाखाली यथासांग पूर्णत्वास गेला. नंतर मात्र महाराजांनी आपला मनोदय श्री देवरणकर यांच्याशी व्यक्त केला. 'अनायासे एथपर्यंत आलोच आहोत तर बद्रीनाथ-बद्रिकेदारलाही जावून येतो.' असे म्हणताच श्री. देवरणकर कुटुंबीयांनी महाराजांचा निरोप घेऊन परतीचा प्रवास सुरु केला. आता बद्रिकेदारला जायचे पण तेथील मंदिराचा दरवाजा उघडण्यास अद्याप काही दिवसांचा अवधी असल्याचे समजल्यावरुन महाराजांनी आपल्या कार्यक्रमात थोडा बदल केला. आणि काशी, गया, प्रयागला जाण्याचे निश्चित केले. त्याप्रमाणे ते प्रथम प्रयागतीर्थी आले. येथील साधुपुरुष श्री प्रभूदत्त ब्रह्मचारी (जे महाराजांचे परिचित गृहस्थ) यांचेकडे मुक्काम केला. तीन दिवसांच्या मुक्कामात सर्व तीर्थविधी व देवतांची दर्शने पूर्ण करुन महाराजांनी काशी (वाराणसीं) येथे स्थानिक क्षेत्रोपाध्याय वेदमूर्ती श्री काशीनाथ भट्ट-औंढेकर यांचेकडे मुक्काम केला. येथेही काशीविश्वेश्वराचे व अन्य देवतांचे दर्शन घेतली. मनास मोठे समाधान प्राप्त झाले होते. पुढचा मुक्काम गया येथे होता. तिकडे प्रयाण करण्यापूर्वी काशी येथील प्रसिद्ध पंडित वे. शा. सं. पद्मश्री राजेश्वरशास्त्री द्रविड यांच्या भेटीचा योग आल्याने काशीतील मुक्काम वाढला. या काळात अनेक शास्त्रीय विषयावर चर्चाही झाल्या. महाराजांचे एक प्रवचन (हिंदीतून) देखील झाले.

या मुक्कामादरम्यान घडलेली एक घटना. देवदर्शन मार्गावर एके ठिकाणी स्थानिक पंडितांची सभा भरलेली दिसली. महाराज क्षणभर थांबले. चर्चेच्या अनुरोधाने ती द्वैत-अद्वैतावर चर्चा होती. द्वैतवाद्यांनी अद्वैतवाद्यांवर आणि अद्वैतवाद्यांनी द्वैत-वाद्यांवर यथेच्छ झोड उठविली होती. प्रत्येकाने पांडित्यप्रकर्ष प्रकट करण्याची आपली हौस पुरी करायची असे जणू ठरविलेले होते. वाद मिटण्याची चिन्हे दिसेनात. यात हस्तक्षेप करावा असा विचार महाराजांच्या मनात येऊनही गेला. परंतु शब्दज्वलाच्या

महारण्यात आंधळ्या हत्तीप्रमाणे भ्रमण करणाऱ्या त्या पंडितांच्या अर्थशून्य घटपटाच्या वादविवादात आपण हस्तक्षेप करणे त्यांना योग्य वाटेना. वाद वाढतच राहिला. महाराजही आपले छान मनोरंजन करून घेत होते. अखेरीस एका क्षणी महाराजांना हस्तक्षेप करण्याची इच्छा अनावर झाल्याने, सन्माननीयांची संमती घेत आपले मत व्यक्त केले. महाराज म्हणाले, 'निदान अद्वैताचे तरी कोणाशीच भांडण नको. कारण अद्वैत म्हणजे मेळ' महाराजांच्या या केवळ दोन वाक्यांनी तेथील वातावरण बदलले गेले.

काशीनंतर महाराजांनी कुटुंबीयांसमवेत गयेस प्रयाण केले. तेथेही विष्णुपदी पिंडदानादी सर्व तीर्थविधी आटोपून पुढे अयोध्येस शरयू नदीत स्नान करून, श्रीरामाचे दर्शन घेऊन बद्रीनाथाकडे प्रयाण केले. मनाची इच्छा, भगवंताची कृपा आणि अनायासे चालून आलेली संधी या सर्वांचे सोने झाले होते.

**सत्त्वपरीक्षेचा कालावधी–**

भारताच्या स्वातंत्र्याच्यावेळी त्यावेळेच्या अखंड भारतात ६९९ खाजगी संस्थाने अस्तित्वात होती. स्वातंत्र्यानंतर या संस्थानांच्या विलीनीकरणाची लाट निर्माण झाली होती. या संस्थानांपैकी एक संस्थान-हैद्राबाद संस्थान हे मोठे सामर्थ्यवान संस्थान होते. येथील निजामाला आपल्या मोठेपणाची आणि सामर्थ्याची जाण असल्याने, निजामाने विलीनीकरणास विरोध करून आपले संस्थान एक स्वतंत्र राष्ट्र निर्माण करण्याचा निर्णय घेतला होता. या काळात (तसे तर सन १९११ पासून पुढे) हिंदू समाजावर निरनिराळ्या प्रकाराने अन्याय चालूच होता. त्यात भर पडली होती ती 'रझाकार' या मुस्लीम संघटनेची. या संघटनेसाठी हिंदू समाजाकडून पैसे वसूल करण्याचे जुलमी कार्य सुरु होतेच. यात विशेषत: हिंदू ब्राह्मण, कोमटी (व्यापारी), मारवाडी हा समाज नाहक भरडला जात होता. हा सारा वर्ग आपला जीव, अब्रू आणि संपत्ती वाचविण्याच्या दृष्टीने स्थलांतरित होऊ लागला होता. यात निजाम संस्थानातील तत्कालीन नांदेड, परभणी आणि उस्मानाबाद जिल्ह्यातील स्थलांतरितांची संख्या लक्षणीय होती. अनेकदा या

लोकांना लुबाडलेही जात होते. या (तथाकथित) निर्वासितांमध्ये पंढरपूरचा ओढा होता, साहजिकच एक मोठा गट पंढरपुरात आश्रयासाठी आलेला होता. यापैकी अनेकांना महाराज व त्यांचा मठ माहीत होता. ओळखीतून येणाऱ्या असंख्यांची व्यवस्था लावण्यासाठी महाराजांनीही पुढाकार घेतला होता. येणाऱ्या प्रत्येकाला किमान पहिले तीन दिवस मठातून अन्नपाणी दिले जाई. संस्थानातून आलेल्यांपैकी काहींच्या जवळ रोख रक्कम तसेच सोने-नाणेही होते. निर्वासित अवस्थेत या वस्तू सांभाळणे जोखमीचे वाटू लागल्याने बहुतेकांनी आपल्या गरजेपुरते पैसे स्वत:कडे ठेवून उर्वरित रक्कम व दागदागिने महाराजांकडे मोठ्या विश्वासाने सुपूर्द केले होते. ती वाढती रक्कम व वाढते सोने-नाणे स्वत:जवळही ठेवणे अयोग्य वाटल्याने महाराजांनी ती रक्कम आणि (सोने-चांदी) बँकेत स्वत:च्या (एकट्याच्याच) नावावर ठेवले होते. कारण एकच, म्हणजे इतक्या अनेकांच्या नावावर बँकेत पैसे ठेवण्यासाठी सर्वांना खाती उघडावी लागणार होती, आणि या सर्वांचे कायमचे वास्तव्य (पत्ता) हैद्राबाद संस्थानाचे. यातही ज्यांना जशी जेवढी रक्कम लागेल, तशी त्यांना उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था बँकेकडून करण्यात आली होती. आपला निजामी पैसा बाहेरच्या राज्यात जातो आहे हे लक्षात येताच निजामाने एक फतवा काढून सर्व बँकांना कळविले की, 'निजाम सरकारचे चलन ज्या लोकांनी बेकायदेशीररीत्या संस्थान कक्षेच्या बाहेर नेले आहे व बँकांमधून ठेवले आहे, ते त्यांना तूर्त परत करु नये.' या फतव्यामुळे ठेवीदार अस्वस्थ झाले. महाराजांपुढेही बाका प्रसंग उभा राहिला होता. ठेवीदारांना पैसे मिळावेत यासाठी महाराजांनी आपले घर व शेती तारण ठेवून बँकेकडून कर्ज काढण्याची तयारीही केली होती. अखेरीस कलेक्टरसाहेबांच्या मध्यस्थीने बँकेतील पैसे परत मिळू लागले. परंतु दरम्यानच्या काळात महाराजांनी गरजूंना दिलेल्या रकमेचा आकडा सुमारे पाच हजारांपर्यंत पोहोचला होता. ही रक्कम महाराजांनी व्याजाने आणली होती व त्यावरील व्याज महाराजांनी भरले. अखेरीस केंद्र सरकारच्या हस्तक्षेपाने हैद्राबाद संस्थान खालसा होऊन भारतात विलीन झाले आणि पंढरपुरास आश्रयासाठी आलेली मंडळी पुन्हा आपापल्या गावी गेली. मात्र या कालावधीत महाराजांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागला.

## काशी यात्रा (१९५४)–

महाराजांना काशी यात्रेचा (श्री विश्वेश्वराच्या दर्शनाचा) योग आला तो महाराजांचे परमस्नेही श्री. सदाशिवराव देवरणकर (रा. उमरावती) यांच्यामुळे. श्री. देवरणकर यांनी आपल्या मुलाचे (चि. जयेंद्र) उपनयन कार्य हरिद्वार या क्षेत्री करण्याचे ठरविले होते. या कार्यास महाराजांनी उपस्थित राहून बटूस शुभाशीर्वाद द्यावेत ही श्री. देवरणकर यांची इच्छा होती, तशी ती त्यांनी महाराजांकडे व्यक्तही केली होती. वास्तविक या कालावधीत महाराजांचे काही कार्यक्रम अगोदरच निश्चित झालेले होते, तथापि श्री. देवकरणकरांच्या अति आग्रही भूमिकेमुळे महाराजांना आपले सारे पूर्वनियोजित कार्यक्रम बदलून घ्यावे लागले. हरिद्वारक्षेत्री जायचेच आहे तर तेथील जवळपासच्या अन्य तीर्थस्थानी जाऊन देवतांचे दर्शन घ्यावे अशी इच्छा महाराजांचे मनात झाली. यात विशेषत: बद्रिकेश्वर, बद्रीनाथ, विश्वेश्वर येथे जावे असे त्यांच्या मनाने घेतले. मात्र उत्तरप्रांती जाण्यापूर्वी महाराजांनी आपल्या पूर्वनियोजित कार्यक्रमस्थळी पर्यायी व्यवस्थाही केली होती.

हरिद्वार, ऋषिकेश ही तीर्थस्थानेच अशी की, जी कोणासही भुलवून टाकतात. मग तो चैनी, सुखवादी पर्यटक असो वा अध्यात्मवादी परमार्थी असो. सामान्य माणूस जेव्हा हरिद्वार, ऋषिकेश वा त्यापूर्वी काशी-गया-प्रयाग या यात्रेचा विचार करतो तेव्हा आता उत्तरोत्तर उच्च स्थान गाठावयाचे हीच एक अभिलाषा ठेवून प्रयाण करतो. परमपवित्र हिमालयावर (कैलासावर) आता कायमचे विचरण स्थळ करावे ह्या दृष्टीने मधला टप्पा म्हणून हरिद्वाराकडे जाणारे अनेक लोक असतात. परंतु परमपुरुषांसाठी हे विधान लागू होत नसते. हरिद्वारात प्रवेश करताच परमपुरुषांना इथे भेटते ती पवित्रमाता-गंगा. आपल्या उगमस्थानाच्या कितीतरी गूढ कथा ती कलरव करीत आजपर्यंत सांगत आलेली आहे. तिचा तो अखंड निनादणारा प्रवाह आजही चालूच आहे. खरे तर भगवान शंकराच्या मस्तकावर तिचे वास्तव्य, त्या मस्तकातील ग्रहण केलेले असंख्य संदेश घेऊन, इच्छुकांना प्रदान करण्याच्या तळमळीने तिचे या धरतीवर झालेले आगमन. हे सारेच विलक्षण ! तिच्या या भूमिकेमुळेच या स्थानाला आलेले तीर्थस्थानाचे महत्त्व. या स्थानाचे आणि (जवळपासच्या

अन्य तीर्थस्थानाचे) दर्शन घेण्याची संधी श्री. देवरणकर यांनी सहजे उपलब्ध करुन दिली होती. महाराजांनीही सहकुटुंब जाण्याचा निर्णय घेतला होता.

प्रत्यक्ष प्रयाणाच्या वेळी महाराजांचे समवेत त्यांची पत्नी (सौ. कृष्णाबाई), एक चिरंजीव (श्री. भानुदास), एक कन्या (आशाताई), चुलती (श्रीमती कोंडाबाई -वै. महिपती महाराजांचे कुटुंब), श्री. सदाशिवराव बुवा (ब्राह्मण) आणि देगलूरातील प्रतिष्ठितांपैकी श्री गोपाळराव देशपांडे, राजराजेश्वर देशपांडे आणि अन्य काही लोक यांनी प्रथम श्री. देवरणकर यांचे गावी म्हणजे उमरावती जावयाचे व तेथून श्री. देवरणकरांचे समवेत हरिद्वारच्या दिशने प्रयाण करायचे असे निश्चित झाले होते. त्याप्रमाणे महाराजांनी आपले सर्व कुटुंबीय व स्नेहीसमवेत देगलूर सोडले आणि उमरावतीला आले. तेथे एक दिवसांचा मुक्काम, मुक्कामात परस्परांच्या गाठीभेटी आणि मुख्य म्हणजे पुढील प्रवासाच्या मार्गाचे-मुक्कामाचे आणि उपनयन संस्कार कार्यक्रमाबद्दल माहिती देणे या गोष्टी घडल्या. उपनयन संस्कार चैत्र शके १८७६ (एप्रिल १९५४) ला संपन्न होणार होता.

**भजनरत्न हरपले (श्री बंडा महाराजांचे निधन)–**

श्री बंडा महाराज हे महाराजांचे केवळ कनिष्ठ बंधू नव्हते तर त्यांचा उजवा हातच होते. घरची जबाबदारी असो, येणाऱ्याजाणाऱ्यांची सरबराई असो वा सांप्रदायिक मंडळीचे स्वागत असो श्री बंडा महाराज या सर्व गोष्टीत आनंदाने, आवडीने लक्ष घालीत. म्हणूनच पंढरपुरातील देगलूरकर मठ सदैव माणसांनी भरलेला असे.

खरेतर या दोघांच्या पित्याचे निधन अगदीच बाल्यावस्थेत तर मातेचे निधन कुमारावस्थेत झाले होते. परंतु चुलते श्री. महिपती महाराजांनी या दोन्ही भावांना पोरकेपणाचा वासही लागू दिला नव्हता. श्री. बंडा महाराजांना संगीताची आवड, जाण व ज्ञान चांगलेच होते. मृदुंग (पखवाज) हे त्यांचे अत्यंत आवडते वाद्य होते. या वाद्यावर त्यांनी केवळ हुकमतच मिळवली होती असे नव्हे तर, वारकरी संगीत भजनाचे एक आगळे तंत्र त्यांनी विकसित केले होते. त्यांच्या संगीत भजनाचा विशेष असा की, भक्तिप्रवणतेमुळे हृदयाचे माधुर्य, संगीतातील स्वरमाधुर्य आणि गाण्यासाठी संतांच्या मधुर रचना असा समसमा संयोग जमून येत असे. त्यामुळे श्रोतृवर्ग तर तृप्त

होत असे, त्यांचा किमान एक दिवस आनंदाचा प्रत्यय देणारा ठरे. श्री बंडा महाराज म्हणजे वारकरी संप्रदायातील भजन क्षेत्रातील अद्वितीय रत्नच होते. अनेक लहान-मोठ्या गायकांची साथ करण्याचे भाग्य त्यांना मिळालेले होते. भजन प्रसंगी तर त्यांचा मृदुंग (पखवाज) वाजत नसे, तर त्यातून बोलच बाहेर पडत असत. पखवाजातून शब्द बाहेर काढण्याची जादूच जणू त्यांनी संपादन केली होती. एकदा का पखवाजावर त्यांचा हात पडू लागला की, पखवाजही आपोआप घुमू लागे. महाराजांच्या कीर्तनाला त्यांची केवळ साथच नसे, तर कीर्तनाची प्रारंभीची चाल श्री बंडा महाराजांपासून सुरु होई. तसा जणू रिवाजच होता. श्री बंडा महाराजांच्या बहारदार साथीने मुळातच दुग्धशर्करायुक्त असणारे महाराजांचे कीर्तन बासुंदीप्रमाणे गोड व घट्टही बनत जाई.

शके १८८३ च्या आषाढवारीसाठी देगलूरहून पंढरपुरास पालखी आणण्याची जबाबदारी श्री. बंडा महाराजांवर होती. तशी त्यांची तब्येतही डळमळीतच होती. तरीही वारीची उमेद काही वेगळीच होती, त्याच उमेदीने ते देगलूरहून पालखी-समवेत मार्गस्थ झाले होते. आषाढ वद्य अष्टमीला (६ जुलै, १९६१ ला) पालखी पंढरपुरात आली आणि देगलूरकर कुटुंबीयांवर एक मोठा आघात झाला. श्री बंडा महाराजांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने अकस्मात आणि अकाली निधन झाले. पाठच्या भावाच्या निधनाने महाराज तर अस्वस्थ झाले होते. त्यांना तो प्रसंग असह्य होत होता. उंचीला काहीसे बुटके पण रंगाने गोरेपान असणारे श्री बंडा महाराज निपचित पडलेले पाहून महाराजांच्या डोळ्यातील पाणी थांबत नव्हते.

**'वियोग जेणे दु:खे । विपत्ति शोक पोरखे । तो स्नेह ।' --ज्ञानदेव**

पुढे चातुर्मास सुरु झाला. महाराजांचीही कीर्तने सुरु झाली, पण कीर्तनात चाल म्हणायचीच नाही हा महाराजांनी निर्णय घेतला होता.

**'निवृत्तिदेव म्हणे करिता समाधान । काही केल्या मन रहात नाही ।**
**बांधल्या तळ्याचा फुटलासे पाट । ओघ बारावाट मुरडताती ।'**

महाराजांची अशी केविलवाणी अवस्था झाली होती.

## पुत्र वियोग–

महाराजांना एकूण सहा अपत्ये होती (चार मुलगे व दोन मुली) पैकी महाराजांचे ज्येष्ठ चिरंजीव श्री. वसंता हे पुण्यास स. प. महाविद्यालयात शिकत होते. 'तत्त्वज्ञान' विषय घेऊन त्यांनी पदवी (बी.ए.) प्राप्त केली होती व त्याच विषयातील पदव्युत्तर शिक्षण (एम.ए.) चालू होते. अर्थातच ह. भ. प. श्री मामासाहेब दांडेकर यांच्या मार्गदर्शनाखालीच अभ्यास चालू होता.

महाविद्यालयास दिपावलीची दीर्घ सुटी लागल्याने श्री. वसंताने पंढरपूर गाठले होते. तिथे काही दिवस मुक्काम करुन हैद्राबाद येथील मामास भेटण्यासाठी ते हैद्राबादला गेले खरे, पण तिसऱ्याच दिवशी त्यांच्या अपघाती निधनाची तार पंढरपुरच्या मठात येऊन धडकली. एक हुषार, सुस्वभावी, मनमिळाऊ व्यक्तिमत्त्व देगलूरकरांचे घर आणि मठ सोडून गेले होते. परतीचा प्रवास न करण्यासाठी, सारे कुटुंब तर दु:खी झालेच, त्यातही सौ. अम्मा (महाराजांच्या पत्नी) अधिक दु:खी झाल्या होत्या. हाताशी आलेला, तरणाताठा मुलगा अचानक गेल्याने मठातही तसे वातावरण गंभीरच होते. वसंताचा देगलूरकर घराण्याशी असलेला ऋणानुबंध संपला होता. अनेक मंडळी महाराजांच्या सांत्वनासाठी येवून गेली. पण महाराज मात्र शांत होते. आपले धैर्य ढळू न देता ते स्वस्थ होते. अभिमन्यु गेला तेव्हा देवाने काय केले ? देव असो वा मानव, प्रत्येकाला शोक आवरावाच लागतो. रेल्वे, विमान वा बस असो, तिकीट संपले की, उतरावेच लागते. श्री. बंडा महाराजांच्या निधनाचे दु:ख पूर्णपणे पचेपर्यंत हा आणखी एक आघात देगलूरकर घरावर झाला होता. अशावेळी सारा वेदान्त फिका पडतो. तरीपण त्याकाळातील महाराजांची स्थिती ज्ञानदेवांनी समचित्तावस्थेसंबंधी जे वर्णन केले आहे, तशी झाली होती. कारण महाराज केवळ वेदान्ती नव्हते, तर ते वेदान्त जगतही होते. समचित्तावस्थेसंबंधी श्री ज्ञानदेव लिहितात --

**तरि जो या देहावरी । उदासु ऐसिया परी ।**
**उखिता जैसा बिढारी । बैसविला आहे ।।**
**कां झाडाची साऊली । वाटे जाता मीनली ।**
**घरावरी तेतुली । आस्था नाही ।।**

**साऊली सरिसीच असे । परी असे हे नेणिजे जैसे ।**
**स्त्रियेचे तैसे लोलुप्य नाही ।**
**आणि प्रजा जे जाली । तिये वस्ती कीर आली ।**
**कां गोरुवे बैसली । रुख्रातळी ।।** *ज्ञाने. १३/५९३-९६*

**पुनःश्च श्री विठ्ठल दर्शनारंभ–**

सन १९४६-४७ च्यादरम्यान पंढरपूरचे श्री विठ्ठल मंदिर बहुजन समाजासाठी खुले करण्यात आले होते. बहुजनांच्या स्पर्शाने स्पर्तींत झालेल्या मंदिरात व मंदिरातील श्री विठ्ठल-रखमाईच्या मूर्तींना स्पर्श न करण्याचा निर्णय पंढरपुरातील सनातनी मंडळींनी घेतला होता. विटाळलेल्या देवाच्या दर्शनाने आपल्या पुण्याचा क्षय होतो असे सनातनी विचारवंतांचे मत होते. म्हणूनच त्यांनी मंदिर प्रवेशावर व देवदर्शनावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला होता. या सनातनी मंडळीत महाराजांचे गुरुजन, परिचित, नित्य भेटणारे मित्र, स्नेही आदी मंडळी सहभागी झालेली असल्याने महाराजही प्रथम त्यात सामील झाले होते. परंतु पंढरपुरात राहून श्री विठ्ठलाच्या दर्शनाशिवाय दिवस काढणे महाराजांना अवघड जाऊ लागले होते. अखेरीस महाराजांनी स्वकीयांच्या रोषांचा विचार न करता विठ्ठल मंदिरात प्रवेश करण्याचा स्वतःच निर्णय घेतला आणि कार्तिक शुद्ध।। ११ शके १८८४ (सन १९६२) रोजी प्रवेश करण्याचे निश्चित केले. सुमारे १५-१६ वर्षांनी महाराज मंदिरात श्री विठ्ठलाच्या दर्शनाला जाणार होते. मनातील हुरहुर वाढलेली होती. अखेर कार्तिकी एकादशीच्या मुहूर्तावर महाराजांनी पहाटेच स्नान करुन, शुचिर्भूत होऊन विठ्ठल मंदिराकडे वाटचाल सुरु केली. महाराजांचा मठ ते श्री विठ्ठल मंदिर हे पायी पाच-सात मिनिटांचे अंतर, पण तेही त्यांना दीर्घ वाटू लागले होते. महाराज मंदिरापाशी आले तेव्हा पहाटेचे दोन वाजले होते. महाराजांनी पांडुरंगाच्या चरणावर आपला माथा टेकवला आणि श्री विठ्ठलाचे ते दोन्ही पाय आपल्या अश्रूंनी भिजवून काढले होते. १५-१६ वर्षांचा दुरावा संपुष्टात आला होता आणि त्याचे समाधान महाराजांच्या चेहऱ्यावर जाणवले गेले. भक्ताशिवाय देवाला आणि देवाशिवाय भक्ताला तुटकपणे राहणे अशक्य असते याचा अनुभव मंदिरातील बडवे मंडळींनी घेतला होता. त्यानंतर मात्र पंढरपूरच्या वास्तव्यात महाराज देवदर्शनाला गेले नाहीत असे कधीच झाले नाही.

## सत्कार सोहळे -

### (अ) षष्ट्यब्दी समारंभ

१५ मे १९६५ रोजी महाराजांच्या वयाला एकसष्ट वर्षे पूर्ण होणार होती. यानिमित्ताने महाराजांचा एखादा जाहीर सत्काराचा कार्यक्रम करावा असा विचार महाराजांचे काही प्रेमीचाहते यांच्या मनात आला. यात अध्वर्यू होते ते श्री. बळवंतराव घाटे (निवृत्त सेशन जज्ज-औरंगाबाद). त्यांनी ही कल्पना पुण्यातील श्री. स. के. नेऊरगावकर (सरपंच आळंदी-ज्ञानेश्वर महाराज देवस्थान) यांचे कानावर घातली. परंतु अशा सत्कारास खुद्द महाराजांकडूनच विरोध होईल याची कल्पना या मंडळींना होती आणि झालेही तसेच. तरीही सत्कार करायचाच या निग्रहाने या मंडळींनी कार्यक्रमाचे स्वरूप बदलले. महाराजांनी ज्ञानेश्वरी सेवेला प्रारंभ करून पन्नास वर्षे झाली होती. त्या ज्ञानेश्वरी सेवेचा सुवर्ण महोत्सव साजरा करण्याचा निर्णय घेऊन, यासाठी मन वळविण्याची जबाबदारी ह. भ. प. आणि स. प. महाविद्यालयाचे निवृत्त प्राचार्य श्री. शं. वा. तथा मामासाहेब दांडेकर यांचेवर सोपविली. श्री. मामांच्या शब्दाला नकार देणे महाराजांना अवघड जात होते. दरम्यान 'श्री ज्ञानेश्वरी सुवर्ण महोत्सव' समिती स्थापन करण्यात आली होती. समितीचे अध्वर्यू होते श्री. स. के. नेऊरगावकर (पुणे) आणि श्री. बळवंतराव घाटे (औरंगाबाद) आणि अध्यक्ष अर्थातच श्री. मामासाहेब दांडेकर होते. याशिवाय या समितीमध्ये अडतीस सदस्य होते. त्यात श्री. त्र्यं. शि. तथा बाळासाहेब भारदे (अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य विधानसभा, मुंबई), श्री. वि. स. पागे (अध्यक्ष-महाराष्ट्र राज्य विधान परिषद, मुंबई) श्री. वि. रं. देशपांडे (निवृत्त न्यायाधीश, औरंगाबाद हायकोर्ट), डॉ. भा. पं. बहिरट (अध्यक्ष, संत वाङ्मय मंडळ, पंढरपूर), श्री. देविदास सारडा (उद्योगपती, सिन्नर), श्री. रामदयाळ धूत (उद्योगपती, औरंगाबाद) इ. प्रमुख व्यक्तींचा समावेश होता. सदरचा कार्यक्रम दिनांक २८ ऑक्टोबर ते ३ नोव्हेंबर १९६५ या कालावधीत संपन्न झाला. या कार्यक्रमात श्री ज्ञानेश्वरीची अखंड पारायणे, ज्ञानेश्वरीवर अधिकारी व्यक्तींची प्रवचने, सांप्रदायिक भजन आणि नामवंतांची कीर्तने आयोजित केली होती. यातील प्रवचनासाठी सर्वश्री. मामासाहेब दांडेकर, एकनाथ महाराज देगलूरकर, शं. गो. तुळपुळे, बाबा महाराज आर्वीकर, पांडुरंगशास्त्री आठवले, विठ्ठलराव जालनापूरकर, शांतारामबुवा पुजारी

आदी श्रेष्ठींना निमंत्रित केले होते. तर कीर्तनासाठी ह.भ.प. मामासाहेब दांडेकर, रामचंद्रबुवा नागपूरकर, अनंतबुवा आठवले आदींना पाचारण करण्यात आले होते. या सात दिवसात महाराजांचीही दोन कीर्तने झाली होती. महाराजांच्या सत्काराचा समारंभ दिनांक २ नोव्हेंबर १९६५ रोजी सायंकाळी ४ ते ६ यावेळेत संपन्न झाला होता. या कार्यक्रमाचे अध्यक्ष होते श्री. बाळासाहेब देवरस (सरसंघचालक). यानिमित्ताने महाराजांच्या जीवनकार्याचा आणि श्री ज्ञानेश्वरी सेवेचा गौरव करणारा 'श्री ज्ञानेश्वरी सेवा गौरव ग्रंथ' देखील प्रकाशित करण्यात आला होता. या कार्यक्रमास महाराष्ट्राच्या सर्व भागातून विविध क्षेत्रातील नामवंत मंडळी आवर्जून उपस्थित होती.

**(आ) अमृत महोत्सव–**

१५ मे १९८० रोजी महाराज आपल्या आयुष्याची पंचाहत्तरी पूर्ण करणार होते. यानिमित्ताने महाराजांचा पुन्हा एक सत्कार करावा अशी भावना काही प्रेमी मंडळींच्या मनात बळावली आणि सुवर्ण महोत्सव समितीप्रमाणे महाराजांच्या 'अमृत महोत्सव' समितीचे गठण करण्यात आले होते. या समितीत श्री. बळवंतराव घाटे (अध्यक्ष, औरंगाबाद) तर प्रमुख कार्यवाह होते श्री. गोविंदराव शेटे. अमृत महोत्सवाचा कार्यक्रम दिनांक ८ नोव्हेंबर ते १५ नोव्हेंबर १९८० यादरम्यान पंढरपुरातील श्री गजानन महाराज (शेगावकर) यांच्या मंदिराच्या भव्य प्रांगणात संपन्न झाला.

याही प्रसंगाने आयोजित कार्यक्रमात प्रवचने, कीर्तने, व्याख्याने यांच्या माध्यमातून 'ज्ञानदान याग' संपन्न झाला होता. यातील प्रवचनासाठी प्रामुख्याने वे.शा.सं. गोपाळशास्त्री गोरे, दत्तात्रयशास्त्री कवीश्वर, भालचंद्रशास्त्री मुळे आदी प्रतिष्ठित विद्वानांना निमंत्रित केले होते, तर कीर्तनाच्या कार्यक्रमात ह.भ.प. बाबामहाराज सातारकर, विठ्ठलबुवा घुले या श्रेष्ठ कीर्तनकारांचा समावेश होता. दिनांक १४ नोव्हेंबर, १९८० रोजी सत्काराचा मुख्य कार्यक्रम सद्भाव समर्पण सोहळा संपन्न झाला होता. यानिमित्त झालेल्या सत्कारास उत्तर देतांना महाराज म्हणाले होते की, 'आज संपन्न होणारा हा सत्कार माझा नसून तो महाराज माउलीचा आणि माझ्या श्रोत्यांचा आहे. मला वैभवाची लालसा नाही, परंतु सर्वांच्या सद्भावनांचा आदरही

करावा लागतो. ज्या ज्ञानराजाने मला घडविले, त्या माउलीची सेवा करण्यातच मला खरे समाधान आहे. आम्ही ज्यावेळी ज्ञानेश्वरीचा अभ्यास सुरु केला तो काळ वेगळा होता. ज्ञानेश्वरीची केवळ पूजा केली तरी त्यावेळी लोकांना आदर वाटायचा. आता परिस्थिती बदलली आहे. आता वारकरी संप्रदायाच्या महाराजांनी नव्या जगाच्या समस्यांचा विचार केला पाहिजे आणि त्या समस्यांची उत्तरे गीता व ज्ञानेश्वरीत शोधून हे ग्रंथ काय सांगताहेत हे लोकांना समजावून सांगितले पाहिजे.'

या प्रसंगाने महाराजांना 'सद्‌भावना निधी' म्हणून एक लाख रुपयांचा निधी अर्पण करण्यात आला होता. मात्र महाराजांनी हा सर्व निधी वारकरी संप्रदायातील संत- वाङ्मय प्रचार कार्यासाठी विश्वस्त मंडळाकडे सुपूर्द केला. शिवाय त्यात रुपये पंचवीस हजारांची आपण भर घालू असेही जाहीर केले होते.

**(इ) सहस्रचंद्रदर्शन समारंभ–**

१५ मे, १९८५ रोजी महाराज आपल्या आयुष्याची एक्याऐंशी वर्षे पूर्ण करणार होते. यानिमित्ताने त्यांचा ८१ वा वर्धिष्णुदिन अर्थात सहस्त्रचंद्र दर्शन सोहळा करण्याचे ठरले. यावेळी हा सोहळा महाराजांचे व्याही श्री. माजलगावकर यांचेकडे २५ एप्रिल रोजी संपन्न झाला. हा समारंभ म्हणजे सुनेने श्वशुरांचा केलेला सन्मान तर होताच, शिवाय स्नुषा सौ. सुमती या महाराजांच्या अनुग्रहित असल्याने एका शिष्योत्तमाने आपल्या गुरुची केलेली सेवा होती. या कौटुंबिक कार्यक्रमाने व (सप्ताह आयोजनाने) सारे वातावरण भक्तिमय झाले होते.

**(फ) पुणे विद्यापीठातर्फे सत्कार–**

प्रकृती अस्वास्थ्यामुळे महाराजांनी पंढरपुरातील चातुर्मासातील आपली प्रवचन सेवा ह.भ.प. श्री भानुदास महाराज यांचेकडे सन १९८९ पासून सोपविली होती व श्री ज्ञानेश्वरी संपादनाकडे अधिक लक्ष देण्यास प्रारंभ केला होता. तरीही फारसे काम होत नव्हते.

३० जुलै, १९९० रोजी पुणे विद्यापीठातर्फे तत्कालीन उपकुलगुरु डॉ. श्रीधर गुप्ते यांनी पंढरपुरास महाराजांचे मठात जाऊन त्यांचा सत्कार केला होता.

सत्कारामागील विद्यापीठाची भूमिका स्पष्ट करताना डॉ. गुप्ते म्हणाले होते की, 'आम्ही ह. भ. प. धुंडा महाराजांचा सत्कार करण्यासाठी आलो नसून त्यांना वंदन करण्यासाठी आलो आहोत. वारकरी संप्रदाय हे संस्कारपीठ आहे. अशा संस्कारपीठाचे आधुनिक शिक्षण देणाऱ्या विद्यापीठांना वावडे असू नये. या पीठाने गेली सातशे वर्षे उत्तमोत्तम संस्कार करुन समाजाच्या अनेक पिढ्या घडविल्या आहेत. शिक्षणाचा जो मूळ हेतू आहे तो वारकरी पीठाने खऱ्या अर्थाने सार्थ केला आहे. आपण प्रथम आईच्या संस्कारातून शिकतो, त्यामुळेच आपल्या संस्कृतीने सर्वात प्रथम 'मातृदेवो भव।' म्हणत मातेला वंदन करण्यास शिकविले. नंतर पित्याला व त्यानंतर 'आचार्य देवो भव।' सांगितले. श्री. धुंडा महाराजांच्या सत्कार समारंभामागे 'आचार्य देवो भव।' हाच भाव आहे. या प्रसंगाने डॉ. गुप्ते यांनी आजच्या शिक्षणातील उणिवांचे दिग्दर्शन करुन, आजच्या काळातही संस्काराचे माहात्म्य कसे मोठे आहे हेही विशद केले आणि वारकऱ्यांचे संस्कारपीठ आणि आधुनिक शिक्षण देणारी विद्यापीठे यांच्यात ऐक्याची व सलोख्याची गरजही असल्याचे सांगितले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी पुणे विद्यापीठातील श्री ज्ञानदेव अध्यासनाचे प्रमुख डॉ. वि. रा. करंदीकरांनी सर्वांचे स्वागत केले होते.

महाराज सत्काराला उत्तर देऊ शकत नव्हते, त्यांच्या वतीने त्यांचे चिरंजीव ह.भ.प. श्री. भानुदास महाराजांनी महाराजांचे मनोगत वाचावयास प्रारंभ केला होता, परंतु खुद्द महाराजांनीच हस्तक्षेप करुन, बोलायला सुरुवात केली. ते म्हणाले 'हा माझा सत्कार नाही. मी त्यास योग्य नाही असे वाटते. हा संतवाङ्मयाचा सत्कार आहे. अध्यात्मविद्या या विषयावर श्री ज्ञानदेवांनी ज्ञानेश्वरीच्या दहाव्या अध्यायात सविस्तर लिहिले आहे. आज त्या अध्यात्मविद्येचा पुणे विद्यापीठात प्रवेश झाला आहे. आता हे खरे विद्यापीठ झाले आहे. तुमचे विद्यापीठ आहे, तर आमचे पंढरपूर 'महायोगपीठ' आहे. मी साठ-सत्तर वर्षे ज्ञानेश्वरी सांगितली, पण कळते म्हणून नाही तर कळावी म्हणून. संत ज्ञानदेव व संत नामदेव या दोघांच्या नावे दोन अध्यासने स्थापन करुन पुणे विद्यापीठाने जी क्रांती केली आहे ती अवर्णनीय आहे.'

या समारंभात पुणे विद्यापीठाचे कुलसचिव सुभाषचंद्र भोसले, डॉ. अशोक कामत यांनीही आपले मनोगत व्यक्त केले होते.

**(ब) 'मोघा' प्रकरण : निष्ठेची कसोटी–**

देगलूरकरांकडे 'मोघा' गावची जहागिरी होती. महाराजांचे चुलते श्री. नारायण महाराज या जहागिरीची देखभाल/व्यवस्था बघत होते. मात्र त्यांच्या निर्वाणानंतर ती जबाबदारी महाराजांकडे आली होती तरी त्यासाठी हैद्राबादेस जाऊन वारसदार म्हणून नोंद करुन घेणेही गरजेचे व आवश्यक होते. यास्तव महाराज हैद्राबादेस गेले. तेथे योग्य वकील नेमून, मालगुजरी खात्यात आवश्यक ते अर्ज देऊन व अन्य सारी व्यवस्था करून महाराज पंढरपुरातील चातुर्मासाकरिता परतले. पंढरपुरात चातुर्मास सुरु झाला आणि महिन्याभरानंतर महाराजांना देगलूरहून तातडीने पत्र आले होते. त्या पत्रानुसार 'मोघा'च्या जहागिरीवर एक महिन्यात नोंद न झाल्यास जहागीर जप्त होईल असा निरोप होता. महाराजांनी पत्र वाचले. कोणतीही कारवाई न करता ते चातुर्मास कार्यक्रमात मग्न झाले होते. घरच्या मंडळींनी पुन्हापुन्हा आठवण करून दिल्यावरही महाराज शांतच राहिले होते. प्रत्यक्ष धर्मपिता असणाऱ्या श्री. महिपती महाराजांनीही 'मोठे नुकसान होईल, यास्तव आपण जाऊन यावे' असे सुचविले, त्यावर मात्र महाराजांनी अत्यंत आदराने उत्तर दिले होते की, 'आपण मला वडील आहात. मी अधिक बोलणे योग्य नाही, तथापि आपल्या पूर्वजांनी जहागीर सांभाळणे हे ध्येय ठेवले नव्हते. आपण जहागिरीच्या मागे लागण्याचे कारण नाही. श्री ज्ञानदेवांनी म्हटल्याप्रमाणे जर ते खरेच आपले असेल तर ते कोणीही नेणार नाही. (आपुले ते साचे। ते कल्पांतीही न वचे।') आणि जर ते आपले नसेल तर आपण कितीही प्रयत्न केले तरी ते निरुपयोगीच ठरतील. शिवाय ज्या कारणासाठी ते जप्त होणार आहे ते कारण माझ्या लक्षात आहे. सध्या तरी मी जावे असे मला वाटत नाही. मात्र चातुर्मास संपताच मी जाऊन येईन.' महाराजांच्या उत्तराने श्री. महिपती महाराज शांत झाले होते, तरी देगलूर येथील मंडळी अस्वस्थच झाली होती.

पुढे यथावकाशात चातुर्मासाची समाप्ती झाली. त्यानंतर महाराजांनी प्रथम आळंदीस प्रयाण केले, तेथे माउलींच्या समाधीचे दर्शन घेऊन देगलूरास प्रस्थान केले होते.

देगलूरास त्यावेळी पौष मासाचा उत्सव होता. त्या उत्सवाचा कार्यक्रम आटोपल्यानंतर महाराजांनी हैद्राबादेकडे कूच केले होते. तेथे बराच अट्टाहास, प्रयत्न, चर्चा आदी गोष्टीनंतर ' मोघा' गावची जप्ती उठविण्यात महाराजांना यश आले होते. 'मोघा' गाव व (तेथील जहागीर) पुन्हा आपल्या ताब्यात आल्याने देगलूरकरांच्या घरातील सर्वांना समाधान प्राप्त झाले होते. या सर्व प्रकारात महाराजांची निष्ठा पणास लागली होती. चातुर्मासात पंढरपूर सोडायचे नाही. या व्रताला ते घट्ट चिकटून राहिले होते. परंपरेत कुठेही बाधा येऊ दिली नव्हती. लौकिक धनसंपत्तीपेक्षा महाराजांनी परंपरेलाच अधिक महत्त्व दिले होते. सामान्य माणूस लौकिक धनसंपत्तीच्या मागे धावत गेला असता.

**महाराजांच्या पत्नी : सौ. कृष्णाबाई (सौ. अम्मा)–**

आपल्या धर्मात सतीचे स्थान उच्च मानले आहे. सतीचे भूमंडळावरील अस्तित्व हे या भूमीच्या स्थितीचे कारण मानले गेले आहे. या संदर्भात शास्त्रकार लिहितात-

**'गोभिविप्रैश्च वेदैश्च सतीभिः सत्यवादिभिः।**
**अलुब्धैर्दान वीरैश्च सप्तमिधीर्यते मही।'**

(गाय, ब्राह्मण, वेद, सती स्त्रिया, सत्यवचनी, निर्लोभी व दानशूर या सातजणांकडून पृथ्वीचे धारण होते.) एकूण काय तर, जगताच्या स्थितीस कारणीभूत असलेल्या सात तत्त्वात सतीला स्थान आहे. श्री ज्ञानदेवांनी भगवंताच्या मुखाने त्याची जी 'निजाची धामे' सांगितली आहेत, त्यात पहिले स्थान 'सती' हे सांगितले आहे. श्री ज्ञानदेव म्हणतात—

**सती आणि सत्पुरुष। दानशील याज्ञिक ।**
**तपस्वी अलौकिक। संन्यासी जे।।**
**कां भक्त हन महात्मे। इये माझी निजाची धामें।**
**निर्वाळ्ली होमधर्मे। श्रौतादिकी।।**

पतिव्रता सती स्त्रिया केवळ पतीच्या मतांचा आदर करुन त्याप्रमाणे आपले वर्तन करतात त्यामुळेच त्यांचे आत्महित होते. या संदर्भात श्री ज्ञानेश्वरांनीही म्हटले आहे की---

**पतिचिया मता। अनुसरोनि पतिव्रता। अनायासे आत्महिता। भेटेचि ते।।**

अशा स्त्रियांचे दाखले पुराणवाङ्मयात मोठ्या प्रमाणात आढळून येतात.

सती शांडिली, सावित्री, द्रौपदी, रुक्मिणी, माद्री, रुद्रभार्या सती इ. या शिवाय जयदेव पत्नी पद्मा, महाराणी पिंगला इ. इतिहासाने वर्णिलेल्या सती स्त्रिया होत. आपल्या पातिव्रत्याच्या प्रभावाने या सतींनी अग्नीस शांत करणे, सूर्यनारायणाची गती रोखणे, यमाच्या हातून पतीस परत आणणे असे अनेक चमत्कार घडविल्याची उदाहरणे आहेत. पतिव्रतेच्या भयाने प्रदीप्त अग्नी चंदनाप्रमाणे शीतल बनला हे बघून भोजराजाने 'हुताशनश्चंदनपंकशीतल: ।' असे श्लोकरचण लिहून समस्यापूर्तीसाठी विद्वत्त सभेसमोर ठेवला होता. त्यावर कालिदासाने सांगितलेली कथा अशी. एका पतिव्रतेच्या मांडीवर तिचा पती झोपला होता. पतिदेव निद्रिस्त असतानाच त्या सतीचे मूल झोपेतून उठले व रांगू लागले. परंतु ते ज्या दिशेने रांगत निघाले होते, त्या दिशेस एक प्रदीप्त अग्निकुंड होते. सती हे पाहत होती. पतिदेवाच्या निद्रेत व्यत्यय येऊ नये म्हणून ती शांत राहिली. मूल रांगत जाऊन त्या अग्निकुंडातही पडले. पण पतिव्रतेच्या भयाने तो प्रदीप्त अग्नी चंदनाप्रमाणे शांत झाला होता. अग्निकुंडातील ते मूल सुखरूप होते. वर उल्लेखलेल्या सर्व स्त्रियांनी पतिदेवाला जीवनाधार, प्राणाधार मानले होते.

**'पतिव्रतेचे हृदय जैसे। पतीवाचूनि न स्पर्शे।'** किंवा
**'पतिव्रते जैसा भ्रतार प्रमाण।'** अथवा **'पतिव्रते ना हो सर्वभावे।'**
इ. वचनांतून पतिव्रतेच्या एकनिष्ठतेचे, सामर्थ्याचे वर्णन आले आहे.

पतिव्रतेची काही लक्षणे सांगितली गेली आहेत. त्यात स्त्रीसाठी पती हाच गुरु, पती हाच देव, पती हाच सर्वस्व हे जी स्त्री ओळखते, मानते व त्याप्रमाणे आपले वर्तन करते ती पतिव्रता होय. स्त्रीने पतीची सेवा करणे हीच तिच्यासाठी विष्णूची महापूजा आहे असे तुकोबांनीही म्हटले आहे.

**'स्वामीकाज गुरुभक्ती। पितृवचन सेवापती। हेचि विष्णूची। महापूजा।'.** यात पतिदेवाच्या मृत्यूनंतर लगेचच स्वत:चाही प्राणत्याग करणे हेही पतिव्रतेचे एक लक्षण सांगितलेले आहे.

मौजे अग्रहार (बिदर) येथील नामवंत वकील श्री. मल्हारराव देवळणकर यांची कन्या कृष्णाबाई आणि महाराज यांचा विवाह सन १९१८ मध्ये झाला. महाराजांचे चुलते श्री. महिपती महाराज यांनीच तो घडवून आणला होता. विवाहसमयी महाराज

चौदा वर्षांचे तर त्यांच्या पत्नी आठ वर्षांच्या होत्या. महाराजांच्या सौभाग्यवतींना (सौ. कृष्णाबाईना) उत्तर कालावधीत सारे कुटुंबीय 'अम्मा' या नावाने संबोधू लागले होते. त्यांचे शालेय शिक्षण बेताचेच होते आणि जे झाले होते ते शाळेत न जाता. त्यांच्या घरीच शिक्षणाची व्यवस्था करण्यात आली होती.

सौ. अम्मांचा स्वभाव अबोल वा मितभाषी स्वरुपाचा. अगदी लहान वयात देगलूरकरांच्या घरी आल्यापासून त्यांचेवर मोठी जबाबदारी आली होती आणि त्यांनीही ती आनंदाने स्वीकारली होती. देगलूरच्या घरात अनेक लहानमोठी मंडळी होती. मोठ्यांचा आदर आणि लहानांशी खेळीमेळी, या पद्धतीत त्या देगलूरकरांच्या घरात वाढत गेल्या. मुळात मृदू आणि सौम्य प्रकृती असल्यामुळे त्यांना कधी धाक दाखवणे, आज्ञा करणे, रागावणे इ. गोष्टी जमल्याच नाहीत. महाराजांनी सांगितलेली प्रत्येक गोष्ट विनातक्रार करणे हाच त्यांचा जणू धर्म होता. कारण तिथे दुमत नसायचेच.

सौ. अम्मा महाराजांच्या धर्मपत्नी तर होत्याच, शिवाय त्या महाराजांच्या अनुग्रहीतही होत्या. महाराजांची अबोलपणे अखंड सेवा करतांना त्यांना गुरुसेवेचाही आनंद व समाधान मिळत असे. विशेषत: श्री. महिपती महाराजांच्या वैकुंठगमनानंतर तर मठाची आणि जहागिरीची देखरेखव्यवस्था पाहणे या जबाबदाऱ्या वाढल्या होत्या. परिणामी पंढरपूर-देगलूर अशा त्यांच्या फेऱ्या वाढत राहिल्या. शिवाय चातुर्मासाव्यतिरिक्त आठ महिने महाराज सतत फिरतीवर असायचे. तेव्हा तर कामाची जबाबदारी अधिक वाढत असायची. त्यांचा विशेष म्हणजे, महाराजांच्या सार्वजनिक कार्यक्रमात वा पारमार्थिक कार्यात जरी त्या सहभागी होत होत्या तरी एक प्रेक्षक वा श्रोता म्हणून. त्यांना व्यासपीठावर बसणे कधीही रुचले नाही. 'मी एका विद्वानाची, श्रेष्ठतम प्रवचन-कीर्तनकाराची पत्नी आहे' असा अहंभाव त्यांना कधीही शिवला नव्हता.

सौ. अम्मानी आपला सारा धर्म महाराजांचे चरणी अर्पण केला होता. देवपूजा करीत असतांना म्हटली जाणारी स्तोत्रे, एवढाच त्यांचा व्यक्तिगत धर्म होता. महाराजांचे

मोठेपण त्या जाणून होत्या. म्हणून त्या 'मोठेपणाची' जपणूक त्या अत्यंत श्रद्धेने व जाणीवपूर्वक करीत होत्या. म्हणूनच महाराज 'महाराज' होते आणि सौ. अम्मा या 'अम्मा' होत्या. महाराजांचे पारमार्थिक जीवन पूर्णत्वास जाण्यासाठी सौ. अम्मांनी सांसारिक जीवनाची सारी जबाबदारी स्वत:कडे घेतली होती. म्हणूनच महाराज सदैव महाराष्ट्राच्या वा त्याबाहेरही दौरे करीत राहिले होते.

दुसऱ्या महायुद्धानंतरचा काळ. प्लेगच्या भीतीने ब्रिटिश सरकारने पंढरीच्या आषाढी-कार्तिकी वारीवर बंदी घातली होती. तरीही असंख्य भाविक-वारकरी पंढरपूर येथे आलेले होते. या सर्वांच्या निवास भोजनाची व्यवस्था सौ. अम्मांकडे आली होती. त्यातून ते 'रेशन'चे दिवस असल्याने, धान्यही अत्यंत प्रमाणात मिळत होते. अशाही स्थितीत महाराज आणि ह.भ.प. (प्रा.) मामासाहेब दांडेकर यांनी वारकऱ्यांसाठी पंढरपुरात सुमारे पंचवीस केंद्रे उघडली होती. अन्नधान्याचा पुरवठा महाराज आणि मामासाहेब करीत आणि या पंचवीस केंद्रांवर अन्न शिजवण्याच्या व वाटपाच्या कामावर सौ. अम्मा देखरेख करीत. एकावेळेला केवळ पंचवीसच लोकांना जेवण देण्याचा सरकारी हुकूम असतांनाही त्या वारीत दहा हजार वारकरी मंडळींना भोजन उपलब्ध करुन दिले गेले. या कार्यात श्री. मामासाहेब व महाराजांच्या बरोबरीने सौ. अम्मानीही काम केले होते.

सन १९४८ मध्ये खाजगी संस्थानांच्या विलीनीकरणाची लाट सुरु झाली पण त्याला विरोध करणाऱ्या हैद्राबाद संस्थानच्या निजामाने आपल्या स्वतंत्र राज्याच्या दृष्टीने रचना करण्यास प्रारंभ केलेला होता. याचाच एक घटक म्हणजे हिंदूसमाजावर विविध प्रकारे तीव्र अन्याय. त्याकाळात असंख्य लोकांनी पंढरपुरातील महाराजांच्या मठाकडे आश्रयासाठी धाव घेतली होती. आश्रितांनी आपली धन-दौलत, दान-दागिने महाराजांच्या हवाली केले होते, जे महाराजांनी बँकेत सुरक्षित ठेवले होते. परंतु निजाम सरकारला ही गोष्ट कळताच त्यांनी आपल्या चलनाची सर्व खाती गोठवून टाकली. आश्रयार्थी हवालदिल झाले होते. त्यावेळी महाराजांनी आपल्या काही वस्तू 'तारण' ठेवून गरजूंना धन उपलब्ध करुन दिले होते. यात सौ. अम्मांच्या

दागिन्याचांही समावेश होता. या सर्व निर्णयात सौ. अम्मांनी कुठेही नाखुशी न दर्शविता उलट महाराजांच्या कृतीला पाठिंबा दिला होता.

सन १९५६ मध्ये चंद्रभागेला मोठा पूर आला होता, जवळपास अर्धे पंढरपूर पाण्याखाली होते. त्याही वेळी शेकडो मध्यमवर्गीयांची सोय देगलूरकर मठात करण्यात आली होती. त्यांच्यासाठी शंभरपोती धान्याचे वाटप करण्यात आले होते. या काळात आश्रयार्थीसाठीची सारी ऊठबस, व्यवस्था सौ. अम्मांनी जातीने केली. थोडक्यात व्यक्तिगत कुटुंब असो वा महाराजांचे पारमार्थिक जीवन असो अथवा उभयतांचे सामाजिक कार्य असो सौ. अम्मा आपल्यापरीने सदैव सिद्ध असत. मुळात दातृत्व असलेली आणि औदार्याची वृत्ती, त्यात महाराजांचे मिळणारे सततचे मार्गदर्शन व प्रेरणा यामुळे त्यांच्या जीवनाला, कार्याला सोनेरी कडच प्राप्त होत गेली.

अखेरच्या पर्वात त्यांना दम्याचा त्रास होऊ लागला होता. महाराजांच्या समवेत लौकिक जीवनाची सुमारे पंचाहत्तर वर्षे त्यांना साथ देत राहिल्या. सौ. अम्मा म्हणजे 'पतिचिया मता। अनुसरोनी माता।' अशा होत्या.

पौष वद्य पंचमी (शके १९१३) रोजी सायंकाळी पाचच्या सुमारास महाराजांनी अखेर श्वास घेतला. महाराजांनी आपले जीवन प्रभुचरणी अर्पण केले अन् ब्रह्मांडात विलीन झाले. सौ. अम्मांना हा धक्का सहन करणे अवघड जाईल म्हणून हेतुत: औषधांच्या साहाय्याने काहीसे निद्रावस्थेतच ठेवले होते. पण पहाटेच्यावेळी जेव्हा त्यांच्या झोपेचा अंमल काहीसा कमी झाला आणि साधारण बऱ्यापैकी जाग (शुद्धी) आली तेव्हा महाराजांचे बैठकीत नसणे तसेच चातुर्मास नसतानाही मठात टाळमृदुंगाच्या निनादात भजन चालू असणे यावरून त्यांना झाल्याप्रकाराची जाणीव झाली असावी. 'भर्तारावीण वनिता। उपहती पावे सर्वथा।' या श्री ज्ञानदेवांच्या वचनाची आठवण झाली असावी. माणसाचे धर्महीन जीवन नेहमीच अपमानास पात्र ठरते. अगदी अखेरच्या क्षणी (सकाळी आठच्या सुमारास) न राहून सौ. अम्मांना महाराजांच्या अंत्यदर्शनासाठी महाराजांचे समीप आणण्यात आले. बहुधा त्यांनी केलेला कयास

योग्य होता. महाराजांचे ते अखेरचे दर्शन डोळे भरुन घेतले. डोळ्यातून अश्रू वाहतच होते. पण तोंडातून शब्द फुटत नव्हता आणि हंबरडा फोडण्यास त्राणही उरले नव्हते. तशाही स्थितीत सुनबाईंकडून त्यांनी कुंकवाचा करंडा मागविला. महाराजांच्या चरणावर हळद-कुंकवाचे सिंचन केले. तीच दोन बोटे आपल्या कपाळी लावून घेतली आणि महाराजांचे चरणावर आपले मस्तक ठेवले. 'पतीहूनी काय न वानिजे पतिव्रता।' हे ज्ञानराजांचे बोल इथे थबकले होते. साऱ्यांच्या समोर साक्षात सतीधर्म उभा ठाकला होता. महाराजांच्या चरणावरच त्यांनी अखेरचा श्वास घेऊन आपल्या जीवनाची सांगता केली होती.

सौ. अम्मांचा अहेव अंतकाळ त्यांच्या सतीत्वाची परिसीमा होती. 'नमरणे निर्विवाद। जगा पढिये।' असा तो अंतसमयीचा प्रसंग होता. अशा पद्धतीत (अहेवपणे) मरण यावे अशी प्रत्येक भारतीय हिंदू स्त्रीची इच्छा असते. सौ. अम्मांच्या निधनाला 'दु:खद निधन' हे विशेषण लावणे अयोग्यच ठरते. कारण त्यांनी ते सुखाने स्वीकारले होते. तो एका महासाध्वीचा आणि शतकाशतकातून क्वचितच पहावयास मिळणारा अभूतपूर्व अलौकिक मृत्युसोहळा होता. पतिदेवाच्या मृत्यूनंतर लगेच प्राणत्याग करणे हे सतीत्वाचे एक लक्षण मानले गेले आहे.–

**आर्तार्ते मोदिता दृष्टे प्रोषिते मलिना कृशा।**
**प्रियते चं मृते पत्यौ सा स्त्री शेया पतिव्रता।।**

(पति दु:खी असता जी दु:खी, आनंदी असता आनंदी, पती गावास गेला असता जी मलीन व कृश असते आणि पती मृत होताच जी मरते ती स्त्री पतिव्रता होय.) पतिव्रतेचे हे लक्षण आपल्या जीवनाच्या आदर्शाने जगासमोर ठेवणाऱ्या सौ. अम्मा खऱ्याच पतिव्रता ठरल्या होत्या. 'प्रियते चं मृते पत्यौ।' हे लक्षण त्यांनी आपल्या सहगमनाने सिद्ध केले होते. महाराजांचा पंचभौतिक देह अग्निनारायणाच्या स्वाधीन करण्यापूर्वीच सौ. अम्मांनी देहत्याग करुन महाराजांच्या मृतदेहावरीलही आपला अधिकार सिद्ध केला होता. त्यामुळे त्यांचे सौभाग्यपण अबाधित राहिले होते. पती-समवेत सहगमन करणारी स्त्री पतिदेवासहित वर्तमान साडेतीन कोटी वर्षेपर्यंत

स्वर्गसुखाचा भोग घेत राहते. या संदर्भात पराशर संहिता आणि स्कंदपुराणात उल्लेख आलेले आहेत.

सौ. अम्मांच्या महानिर्याणाने गौरवाचे शिखर त्यांनी गाठले होते.

**महावैष्णवाचे महानिर्याण–**

आयुष्याच्या अंतिम चरणात महाराज अर्धांगवायूच्या विकाराने त्रस्त झाले होते. आहार, बोलणे वा एकूणच शारीरिक हालचालीवर प्रचंड मर्यादा आल्या होत्या, तरीही त्यांची बुद्धिमत्ता आणि स्मरणशक्ती तीव्र होती. त्यांच्याच बाजूला त्यांच्या धर्मपत्नी (सौ. अम्मा) याही दम्याच्या विकाराने जर्जर झालेल्या होत्या.

महाराजांनी देह ठेवण्यापूर्वी साधारण तीन वर्षे अगोदर आपले ज्ञानेश्वरी सेवाकार्य थांबवले होते. पंढरपूरच्या प्रवचनकाळात त्यांना बोलण्याचा प्रचंड त्रास होऊ लागल्याने त्यांनी थांबण्याचा निर्णय घेतला होता. तत्पूर्वी आपली आजवरची सर्व सेवा श्री ज्ञानदेवांच्या चरणी समर्पित करुन महाराज श्रोत्यांना म्हणाले होते की, 'श्रोतृदेवांनो ! आजपर्यंत तुमच्या पुण्याईने ज्ञानेश्वरी सांगितली. आता माझ्याच्याने बोलवत नाही. तुम्ही माझ्यावर किती प्रेम केले याचे मोजमाप करता येत नाही. देवांनी सत्तरवर्षे बोलविले. आणखी किती बोलवावे ? मी उद्यापासून प्रवचन करणार नाही. उद्यापासून भानुदास महाराज प्रवचन करतील. ही परंपरा सांभाळतील. माझ्यावर जसे प्रेम केलेत तसे त्यांच्यावरही करा.' बोलताना महाराजांचा कंठ दाटून आला होता. डोळ्यातून अश्रू वाहत होते. आपल्या उत्तरीयाने (उपरण्याने) डोळे पुसत होते. ज्ञानेश्वरी प्रवचनाच्या बंदीचे त्यांना प्रचंड दु:ख होत होते.

महाराजांनी देह ठेवण्यापूर्वी तीन महिने अगोदरची घटना. सौ. अम्मांना महाराजांच्या जवळ आणले गेले. दोघेही एकमेकांशी खोल आवाजात बोलत होते. त्या बोलण्यानेही त्यांना त्रास होत होता. तशाच अवस्थेत सौ. अम्मा महाराजांना म्हणाल्या, 'अलीकडे तुमची तब्येत अधिकच कष्टी होत चालली आहे. तुमच्याआधी मी अहेवपणी गेले तर माझ्या जीवनाचे सार्थक होईल. गेल्या चार-पाच वर्षात मी तुम्हाला पेलाभार पाणीदेखील देऊ शकले नाही.' यावर महाराजांनी सौ. अम्मांना

धीर देत म्हटले, 'काळजी करु नकोस. मी जातांना तुला बरोबर घेऊन जाईन.' पुढे तीन महिन्यांनी दोघेही एकाचवेळी गेले. केवढा योगायोग !

वीस जानेवारी १९९२ ला सायंकाळी महाराजांची प्रकृती अधिकच बिघडली. स्थानिक डॉक्टर श्री. उत्पात आणि डॉ. कोडोलीकर हे उपचार करीत होते, पण प्रकृती स्थिर राहिना. अखेर त्या मध्यरात्री सोलापूरहून डॉ. गोडबोले यांना बोलावले. त्यांनी परिस्थितीचा अंदाज घेत औषधोपचारात योग्य असा बदल केला. पण तो तात्कालिक उपचार आहे याची जाणीव खुद्द डॉक्टरांनाच होती. दरम्यान महाराजांच्या अत्यवस्थेची बातमी पंढरपुरात पसरली. त्या मध्यरात्रीदेखील अनेक चाहत्यांनी मठात गर्दी केली. मधले दोन दिवस महाराजांची तब्येत स्थिर ठेवण्यात डॉक्टरांना यश आले, पण त्यांचे ते समाधान वा यश क्षणिकच ठरले. पौष वद्य पंचमी, शके १९१४ (२३ जानेवारी १९९२) ची सकाळ. पुन्हा चिंतेची लाट घेऊन आलेला दिवस. आधीच खालावलेली महाराजांची प्रकृती, त्या दिवशी अधिकच बिघडली. त्यांच्या शेजारी असलेल्या सौ. अम्मांना एका स्वतंत्र खोलीत हलविण्यात आले. महाराजांचा ताप आणि खोकला वाढत गेला. कुटुंबीय आणि सभोवतालचे सारे स्नेही चिंताग्रस्त झाले. औषधाच्या ग्लानीने महाराजांना शारीरिक स्वस्थता मिळत होती. परंतु औषधानाही मर्यादा असतातच ! औषधाचा अंमल उतरला की पुन्हा उबळ येत होती. काहीशी शारीरिक स्वस्थता लाभताच महाराजांनी सभोवतालच्या मंडळीवर नजर फिरविली. सारे आप्तेष्ट, स्नेही उभे होते. त्यात उणीव होती ती त्यांच्या एका गुरुबंधूची. वेदमूर्ती गोपाळशास्त्री गोरे यांची. तेही त्याच दिवशी परगावाहून आले. निरोप मिळताच शास्त्रीबुवांनी मठ गाठला. महाराजांची आणि गोरेशास्त्रींची दृष्टादृष्ट झाली. दोघांच्याही डोळ्यातून अश्रुधारा वाहू लागल्या. त्या प्रसंगाने इतरही मंडळी गंभीर झाली, गहिवरली. त्या दोघात मौनाद्वारे संभाषण झाले. महाराजांनी डोळे मिटले. सायंकाळची पाच वाजण्याची वेळ. महाराज अधिकच अस्वस्थ झाले. उपचार करणारांची पुन्हा घाई झाली. पण मुळातच उपचाराला प्रतिसाद न देणारे शरीर, याही क्षणी औषधोपचारांना जुमानत नव्हते. अखेर सायंकाळी साडेपाचच्या सुमारास महाराजांनी श्वास सोडला.

शरीर निमाले. एक युगपुरुष परमशांतीकडे निघून गेला, वारकरी संप्रदायाचा प्राण दूरवर गेला.

**गेले दिगंबर ईश्वर विभूती। राहिल्या त्या कीर्ती जगामाजीं।**
**वैराग्याच्या गोष्टी ऐकल्या त्या कानीं। आता ऐसे कोणी होणे नाही।।**

महाराज जन्म-मृत्यूच्या फेरीतून मुक्त झाले. त्यांच्यापरीने त्यांच्या आत्म्याचे (शरीराचेही) सोने झाले. परंतु पुन्हा एकदा वारकरी संप्रदाय पोरका झाल्याची जाणीव झाली. वै. जोग महाराज, वै. बंकटस्वामी, वै. लक्ष्मणबुवा इगतपुरीकर आणि महाराजांचे परमस्नेही वै. मामासाहेब दांडेकर या अध्वर्यूंच्या वैकुंठगमनाने अगोदरच अबल बनलेला वारकरी संप्रदाय, महाराजांच्या निधनाने अधिकच दुर्बल, अपंग झाल्याची जाणीव झाली.

**आणि स्वधर्माचे फळ। ईश्वरी अर्पूनी सकळ।**
**घेवूनी केले अढळ। वैराग्य पद ।।** ज्ञा. १८.९९५.

महाराज वैकुंठवासी झाले. वेदांताच्या गहन तत्त्वांना संतवचनाची जोड देणारी अमोघ व रसाळवाणी थंड झाली. कीर्तनाच्या रंगी नाचून ज्ञानदीप लावणारा देवाघरचा हा नंदादीप शांत झाला होता. ज्ञानेश्वरीची वाक्गंगा थंडावली होती. संस्कृतभाषा अन् संतवाङ्मय यांच्यातील परस्पर समतोल साधणारा प्रकांड पंडित आता उरला नव्हता. केवळ महाराष्ट्राचेच नव्हे तर अखिल भारताचे भूषण ठरलेल्या भागवतधर्मीय मेरूमणीचे दर्शन यापुढे कधीही होणार नव्हते.

महाराजांच्या निधनाची बातमी पंढरपुरात वाऱ्यासारखी पसरली अन् अवघे पंढरपूर मठाकडे धावू लागले. तासाभरात इतकी गर्दी झाली की, या गर्दीला आवर घालणे पोलीस यंत्रणेसही अवघड झाले होते. त्यातच आकाशवाणीवरुन प्रसारित होणाऱ्या प्रादेशिक बातम्यात ही बातमी प्रसारित झाली आणि महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून महाराजांचा चाहता वर्ग पंढरीची वाट चालू लागला. मध्यरात्रीला तर पंढरपुरास यात्रेचे स्वरूप प्राप्त झाले होते.

दुसरे दिवशी (दि. २४ जानेवारी) सकाळीच महाराजांच्या अंत्ययात्रेस प्रारंभ होणार होता. त्या दृष्टीने महाराजांच्या देहावर सर्व संस्कार केले गेले. अखेरीस (इतका वेळ दूर ठेवण्यात आलेल्या) त्यांच्या धर्मपत्नींना (सौ. अम्मांना) अखेरच्या दर्शनासाठी महाराजांच्या जवळ आणले. त्या माउलीनेही क्षणात सारे ओळखले. आपल्या स्नुषेकडून कुंकवाचा करंडा व तुळशीपत्र मागवले. महाराजांच्या चरणाशी हळद-कुंकू वाहिले. तुळशीपत्राने पूजा केली आणि तिथेच आपले मस्तक ठेवले. काही क्षणातच सौ. अम्मांनी आपला देह महाराजांच्या चरणी अर्पण केला होता.

**झांकलिये घटींचा दिवा। नेणिजे काय जाहला केव्हा।**

सौ. अम्मांच्या निधनाने कुटुंबीय आणि उपस्थित मंडळींना आणखी एक धक्का बसला. सारे काही अनपेक्षित आणि अघटित असेच होते. 'पतिव्रते जिणे। भ्रताराच्या वर्तमाने।' हे श्री तुकोबारायांचे वचन साच झाल्याचेच ते दृष्य होते. दोघांच्या महानिर्याणाच्या वेळा जरी भिन्न होत्या तरी तिथी मात्र एकच होती. म्हणून एकाच वाहनावरुन अंत्ययात्रा सुरु केली गेली. मठापासून सुरु झालेल्या या अंत्ययात्रेने विठ्ठल मंदिराला प्रदक्षिणा घातली आणि अखेरीस नामदेवरायांच्या पायरीजवळ क्षणकाल विसावली. तिथे उपस्थितात ह.भ.प. किसनमहाराज साखरे, प्रा. वि. दा. कराड, ह.भ.प. ज्ञानेश्वरमहाराज औसेकर, विठ्ठल मंदिर समितीचे श्री. बडवे, भागवताचार्य श्री. वा. ना. उत्पात आदी मान्यवर होते.

सायंकाळी साडेपाचच्या सुमारास अंत्ययात्रा चंद्रभागेकाठी आली. चंद्रभागेचा सारा काठ गर्दीने भरुन गेला होता. वाळवंटभर हरिनामाचा गजर चालूच होता. मावळत्या सूर्याच्या साक्षीने दोघांचे देह एकाच चितेवर ठेवले गेले. तत्पूर्वी दोघांनाही चंद्रभागेचे स्नान घडविले होते. महाराजांचे ज्येष्ठ चिरंजीव श्री भागवत महाराज यांनी चितेस अग्नी दिला आणि एका पर्वाचा अंत झाला. महाराजांच्या महानिर्याणाने एक ज्ञानसूर्य अस्ताला गेला होता. एक ज्ञानकुंड थंडावले गेले होते. एक अभूतपूर्व जनजागरण पर्व संपले होते. शेवटी उरल्या होत्या त्या त्यांच्या आठवणी.

**'तुका म्हणे तुम्हा आम्हा याची भेटी। उरल्या त्या गोष्टी बोलावया।'**

## ह. भ. प. (वै.) धुंडा महाराज देगलूरकर :
## व्यक्ती व कार्य

## ।। ३ ।।

## व्यक्तिमत्त्वाचे विशेष

१. प्रास्ताविक

२. दुजानाथ

३. जनवादी, पांथस्थांचे दीपस्तंभ

४. सांप्रदायिक भेद अमान्य

५. महावैष्णवाच्या लोकप्रियतेचे गमक

६. संस्कृती, पंथ, राष्ट्र, धर्म यांचे संरक्षक

७. वारकरी संप्रदायातील स्थान

८. विनयशील, ईशप्रेरित पंथनेता

९. चालते-बोलते धर्मज्ञानपीठ

## प्रास्ताविक

महाराजांचे व्यक्तिमत्त्व एखाद्या रत्नजडित सुवर्णालंकारासारखे होते. त्यात तत्त्वज्ञानी, तत्त्ववेत्ते, वेदांती, धर्मग्रंथांचे अभ्यासक, प्राचीन ग्रंथांचे संरक्षण या गुणांचा हिरा होता, तर संतवाङ्मयाचे गाढे अभ्यासक अध्यापक या कार्याचा एक मोतीही होता. वारकरी संप्रदायाचे प्रचारक-प्रसारक तथा ज्येष्ठ प्रवक्तेपणाचा एक पाचूही लखलखत होता आणि मान्यवर तथा अभ्यागतांचे आदरातिथ्य करणाऱ्या गृहस्थीपणाचे एक माणिकही शोभून होते आणि या साऱ्यांचे एकत्रित दिग्दर्शन त्यांच्या साहित्यातून होत असल्याने महाराजांच्या व्यक्तिमत्त्वाचा मागोवा घेण्याचा मुख्य आधार म्हणजे त्यांचे साहित्य होय. अर्थात असे निखालस विधान करणेही थोडे धाडसासेच ठरेल. कारण वरील उल्लेखातून अनुल्लेखित झालेले आणखी काही गुण महाराजांच्या व्यक्तिमत्त्वात होतेच. त्यांच्या व्यक्तिगत जीवनाचा आणि साहित्याचा अभ्यास करताना महाराजांच्या संदर्भात जाणवलेली गोष्ट म्हणजे त्यांचे पूर्ण जीवन हे विठ्ठल भक्तीने, संतांबद्दलच्या आदराने, विशेषतः ज्ञानेश्वर व ज्ञानेश्वरी यांनी पूर्णपणे भरलेले होते.

**'मुख्यत्वें ग्रंथींचे राखावे प्रेम। प्रतिपदीं प्रतिपादावे परब्रह्म।'**

संतश्रेष्ठींच्या या शिकवणीप्रमाणे त्यांचे सारे जीवन घडत गेले आणि त्यांनीही आपले सारे जीवन वेदशास्त्रादी ग्रंथासह, संतवाङ्मयासवे परब्रह्म याचे स्वरूप विशद करण्यात व्यतीत केले होते. संतकुळाची समर्थ परंपरा आणि संप्रदायातील समर्थ गुरुजन तथा सहकारींचा लाभलेला सहवास यामुळे मुळातील कसदार असलेल्या या कनकावर अनेक संस्कारांनी चकाकी येत गेली. शिवाय संतबोधानी तर त्यांचे जीवन पार बदलूनच गेले.

मानवी जीवनात संतबोध, संतसमागम, संतसंगती तथा संतानुग्रह या गोष्टींचे स्थान अनन्य प्रतीचे आहे. म. नारदांनी म्हटले की, 'सत्संगो दुर्लभोऽगम्योऽमोधश्च।' तर शंकराचार्यांनी लिहिले की, 'क्षणमपि सज्जन सांगतिरेका। भवति भवार्णवत्तरणे नौका।' थोडक्यात, संतसंगती जशी दुर्लभ आहे तशीच ती भवसागरातील आपली

नौका पैलतीरास नेण्यास समर्थही आहे. मानवी जीवन ज्ञानसंपन्नतेशिवाय प्रसन्न, कृतार्थ, शांतिमय आणि परिपूर्ण होत नाही आणि हा ज्ञाननिधी संतांच्या संगतीनेच प्राप्त होतो. असेही म्हणतात की, चारित्र्यसंपन्नता ही यशस्वी जीवनाची प्रथम पायरी होय. त्यासाठी अर्थातच सत्त्वगुणांचा विकास आणि रज-तम गुणांचा निरास होणे गरजेचे असते. त्यासाठी आपल्या वाट्यास आलेली कर्तव्यकर्मे निरलस आणि निष्काम बुद्धीने करीत दयाघन अशा प्रभूशी अखंड अनुसंधानाची गरज असते. ईश्वराला शरण गेल्याने प्रत्येकाच्या जीवनाला एका अनोख्या शांतिसुखाचाही लाभ होतो असा संतांचा अनुभव आहे. व्यावहारिक गृहस्थ तात्त्विक दृष्ट्याही अगदी तटस्थ राहून आपल्या विकारी मनावर नियंत्रण ठेवू शकतो आणि याचे उत्तम उदाहरण म्हणजे संत एकनाथ महाराज ! 'ज्यांची बुद्धी व कृती अखेरपर्यंत स्थिर, शुद्ध व सत्य असते अशा व्यक्तींच्या ठायी संतवृत्ती असते, असे एक संतवचन आहे.

संतांच्या कार्याची व कृतीची दिशा वेगळीच असते. प्रत्येक जीवात नांदणाऱ्या एका आत्मत्वाच्या नात्याने हे संत आपला स्नेह लक्षावधी लोकांपर्यंत जोडत असतात व त्याचवेळी ते आपले जीवन अधिक विशाल, व्यापक व समृद्ध बनवीत जातात. मोक्षमार्गीयांपासून ते सामान्य जीवन जगणाऱ्या प्रत्येक जीवाचे ते सांगाती बनतात. अलिकडील काळात अनेकांचे सांगाती बनलेले एक व्यक्तिमत्त्व म्हणजे महाराज ह.भ.प. धुंडा महाराज देगलूरकर होय ! त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा वेध घेणे म्हणजे आकाशाला गवसणी घालण्यासारखे वा समुद्राची खोली शोधण्यासारखे अत्यंत अवघड कार्य होय.

महाराजाच्यांत देश-धर्म-पंथ संतजन याविषयीचा निखालस प्रखर अभिमान एकवटलेला होता तर त्याचवेळी वारकरी संतांबद्दलचा कनवाळूपणाही भरलेला होता आणि या सर्वात अग्रणी असणारे वेगळेपण म्हणजे त्यांचा विरक्ती गृहस्थीपणा. प्रखर व्यासंगी, बहुभाषिक, ज्ञानेश्वरीचे उपासक, ज्ञानोपजीवी, ग्रंथोपजीवी अशी कितीतरी विशेषणे लावली तरी त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर पूर्णांशाने उजेड पडेल असे सांगता येणार नाही.

**प्रेम करिती उदार। देता नाही सान-थोर।।**

या सिद्धांताप्रमाणे महाराजांनी आपले जीवनकार्य, ज्ञानदानकार्य समत्व आणि समर्पित भावनेने व्यतीत केले होते, त्यामुळेच ते खरे जनवादी झाले होते.

### १. सार्वमताचा आदर करणारे

महाराज स्वमताभिमानी होते, तरीही त्यांनी इतरांच्या मतांचा कधी अनादर केला नाही. उलट जमिनीत हळूहळू मुरत जाणाऱ्या पाण्याप्रमाणे महाराज आपले विचार इतरांच्या मनोभूमीत मुरवत असत. सध्याचे युग हे विज्ञानवाद्यांचे आहे याची त्यांना पूर्ण जाणीव असल्यानेच त्यांनी भौतिक प्रगतीला कधी विरोध केला नव्हता, तरीपण भौतिक सुधारणा किंवा प्रगतीला जर अधिभौतिकतेची अध्यात्मिकतेची जोड दिली गेली नाहीतर मानवी जीवनात शांती, मन:स्वास्थ्य, मांगल्य, समाधान आदी गोष्टी नांदणार नाहीत हे त्यांचे मत ठाम होते. समाजात ईश्वरनिष्ठा रुजली नाही तर समाज केवळ उदरपरायण व कामपरायण बनेल यांची त्यांना सतत भीती वाटत असे. समाजात अर्थ आणि काम हे केवळ दोनच पुरुषार्थ उरले तर समाज निरंकुश होईल. समाजाला यातून वाचववायचे झाल्यास समाजाला चित्तशुद्धी व चारित्र्यशुद्धीचे महत्त्व समजावून दिले पाहिजे आणि महाराजांनी याच हेतूने समाजोद्धराच्या, समाजसुधारणेच्या दृष्टीने आणि समाज स्वैर, निरंकुश होऊ नये, त्यास भक्तिप्रवण करण्यासाठी कीर्तन प्रवचनाचा अवलंब केला, त्याचबरोबर समाजाला संबोधित करणाऱ्या संतवाङ्मयावर निरुपण स्वरूपाचे प्रचंड लेखनही केले. त्यांच्या व्यक्तिगत व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव त्यांच्या साहित्यात प्रकर्षाने जाणवतो. 'अध्यात्म' म्हणजे कालबाह्य झालेल्या जड विचारांचा साठा हा समाजातील समज (गैरसमज) दूर करण्यासाठी त्यांनी आपला प्रत्येक ग्रंथ विस्तृत विवरणासह संपन्न तर केलाच शिवाय विवरणादरम्यान अनेक प्राचीन संस्कृत धर्मग्रंथ, शास्त्रे, पुराणे आदींचे संदर्भ देत, त्याही ग्रंथाचे दर्शन वाचकांना घडविले आहे. अत्यंत तर्कशुद्ध पद्धतीने केलेली मांडणी, विचारातील स्वच्छ व स्पष्टपणा, स्व-मताबद्दल पूर्णाभिमान आणि प्रमाणयुक्तता या सर्वांनी त्यांचे लेखन संपन्न असल्याने, त्यांच्यातील तत्त्वज्ञ वा तत्त्ववेत्ता सहज लक्षात येतो. शिवाय 'तत्त्वज्ञानात नवे काहीच नसते, असते ती

केवळ नवी अनुभूती. अशी अनुभूती त्यांच्या साहित्यात अनेक ठिकाणी आढळून येत असल्याने, एकाच विषयावर आधारीत लेखन असले तरी त्यात पुनरावृत्तीचा दोष अभावानेच आढळतो. शहरातील सुशिक्षित वर्गात संत साहित्यातील विचार रुजवण्याचे कार्य, महाराजांच्या याच लेखनशैलीने यशस्वीपणे केले आहे.

**'माझे श्वासोच्छ्वास हि नवे। नित्य प्रबंध होआवे।'**

ही ज्ञानदेवांची भूमिका महाराजांनीही स्वीकारली होती. म्हणूनच त्यांच्या कीर्तन, प्रवचन, व्याख्यान या ठिकाणी ज्ञानाचा एकसारखा पाऊस पडत राही. अशा मुसळधार पावसाने श्रोते व वाचकांच्या मनातील ज्ञानभक्तीचा अंकुर खुटून जाईल याची त्यांना कधीच भीती वाटत नव्हती. उलट आपल्या निरुपण, विवरण वा स्पष्टीकरण या गोष्टींवर त्यांचा इतका विश्वास होता की, श्रोते भक्तांच्या मनातील ज्ञानभक्तीचा अंकुर जोमाने वाढता राहील.

**विषयी विसर पडिला निःशेष। अंगी ब्रह्मरस ठसावला।**
**माझी मज झाली अनावर वाचा। छंद ह्या नामाचा लागलासे।।**

तुकाराम गाथा

समाजोद्धाविषयीची त्यांची तळमळ, त्यासाठी सततचे दौरे कार्यक्रम या गोष्टी लक्षात घेता तुकाराम महाराजांचे वरील वचन महाराजांचे बाबतीत यथार्थ वाटते.

## २. दुजानाथ

ज्ञानेश्वरीचे आधुनिक भाष्यकार म्हणून महाराजांचा सर्वत्र लौकिक झाला होता, तरी वारकरी संप्रदायातील लाखो माळकरी मंडळींच्या लेखी मात्र 'श्री धुंडा महाराज नाथांचा दुजा अवतार' होते. सहाजिकच या दोन व्यक्तिमत्त्वातील साधर्म्याचा विचार समोर येतो. महाराजांना श्री एकनाथ महाराजांचा अवतार मानणे (वा समजणे) ही महाराजांच्या दृष्टीने बहुमानाची गोष्ट होती. त्यासाठी (कदाचित) त्यांची व्यक्तिगत, कौटुंबिक, सामाजिक आणि पारमार्थिक जीवनाची तपश्चर्या कारणीभूत ठरली असावी. तरीही या बहुचर्चित आणि बहुसन्मानीत पदवीमागील कारणांचा वेध घेणे अधिक उचित ठरते. हा वेध परिपूर्ण नाही आणि असा वेध घेणे योग्यही नाही याची

या ग्रंथलेखकाला पूर्ण जाणीव आहे. तथापि यानिमित्ताने महाराजांच्या व्यक्तिमत्त्वातील काही पैलूंचे दर्शन वाचकांना होऊ शकेल.

(अ) नाथांच्या प्रमाणेच महाराजांनी प्रपंच आणि परमार्थ यातील समतोल आणि समन्वय साधला होता. किंबहुना याबाबतीत महाराजांसमोर नाथांचाच आदर्श असावा याची प्रचिती त्यांच्या विचारसरणीवरुन येते. परमार्थ करीत संसार करावा, नुसता संसार करुन परमार्थ होत नाही ही दोघांच्याही विचारांची मूळ बैठक होती. संसारातील समस्या ह्या दलदलीत चिखलाप्रमाणे होत. एक पाय बाहेर काढावा तर दुसरा अधिक रुततो. संसारात एका समस्येतून बाहेर पडावे तो दुसरी समस्या 'दत्त' म्हणून उभी असतेच. अशा समस्यांच्या विवंचनेत अडकून राहिल्यास परमार्थ अशक्य होय. यासाठी नेटका प्रपंच करीत असतांना त्यात मन गुंतवून न ठेवता, विवेक ठेवून परमार्थ करणे हे महत्त्वाचे होय. हा विचार दोघांनीही मांडला.

(आ) दोघांनी प्रवृत्ती प्रधान धर्म विचारांचा पुरस्कार केलेला आहे. निवृत्तीच्या वैराण, उजाड वाळवंटातील 'बिकटवाट' त्यांनी कटाक्षाने टाळली आणि अध्यात्म व भक्तिप्रधान धर्मयोगाचे वस्तुपाठ समाजाला दिले.

(इ) व्यक्तिगत प्रपंच धर्मातही जास्त न गुरफटता कर्तव्यकर्माचे यथासांग पालन करीत महाराजांनी आपल्या जीवनाचा आदर्श इतरांसमोर ठेवला. संतप्रवृत्तीला पूरक ठरणारी आचारप्रणाली धारण केली. संसारातील मोह, माया, क्रोध आदी मनोविकारांना त्यांनी दूर ठेवले आणि हरिप्राप्तीचा मार्ग स्वीकारला होता. पण त्यांचा हा मार्ग केवळ 'आत्मोद्धारासाठी' नव्हता. तसे असते तर एखाद्याच तपाचे आचरण त्यांना पुरेसे पडले असते. पण महाराजांनी आपली भूमिका स्वयंकेंद्री न ठेवता, लोकोद्धारासाठी, समाजोद्धारासाठी परमेश्वर शोधाचे कार्य हाती घेतले होते. त्यासाठी सुमारे ५ ½ - ६ तपे ज्ञानेश्वरीवर सतत चिंतन मनन करीत ती सामान्य जनांना उलगडून सांगण्याचे कार्य केले. स्वत: संसारी राहूनही संसार पीडितांना हरीची ओळख करुन देणे, पटवून देणे शिवाय त्यांना हरी सुखाचा आनंद आणि समाधान

प्राप्त करुन देणे ते सुद्धा अत्यंत तळमळीने, सोप्या आकलनीय भाषेत करणे ही सर्व कार्ये प्रथम संत एकनाथांनी केली, पुढे तेच कार्य अलीकडील काळात महाराजांनी केले. त्यासाठी नाथांप्रमाणे अहोरात्र मेहनतही घेतली. महाराजांनी गृहस्थाश्रम सांभाळीत असतानाच भक्तीचा प्रसार केला. **'विश्व मोहरे लावावे। अलौकिक न होआवे। लोकाप्रती।'** या श्री ज्ञानदेवांच्या आदेशाचे पालन करीत राहिले.

(ई) नाथ संसारी होते. त्यांचे पणजोबा (श्री भानुदास महाराज) आणि गुरु (श्री जनार्दन स्वामी) यांनी प्रपंचात राहून परमार्थ केला होता. देहाहंकार सोडून लौकिकात वाढले. त्यांचा प्रपंच लौकिकदृष्ट्या यशस्वीही झाला होता. नेमकी हीच गोष्ट महाराजांचे बाबतीत दिसून येते. महाराजांच्या घराण्यात अगोदर पाच-सहा पिढ्यांपासून हा भक्तिपरंपरेचा, परमार्थाचा वारसा चालत आलेला होता. त्यातील बहुतेकजण गृहस्थाश्रमी होते. महाराजांचे पारमार्थिक गुरू श्री महिपती महाराज आणि अध्ययन क्षेत्रातील श्री. दामोदरशास्त्री व भगवानशास्त्री धारुरकर ही सारी संसारीच होती. संसारात राहून आपले पारमार्थिक जीवन यशस्वी करण्यात महाराजांच्या कुलाची परंपराच (नाथाच्या कुलपरंपरेप्रमाणे) दिसते.

(उ) भागवत धर्माचे मूळपीठ असलेल्या पंढरपुरात महाराजांनी त्याच धर्माची पताका आपल्या खांद्यावर घेऊन ती समर्थपणे फडकवत ठेवली. जो प्रवाह चालत आला होता, तो ज्ञान, बुद्धी, विवेक, वैराग्य यांनी अधिक प्रवाही केला. नाथांच्याप्रमाणे तो चैतन्यमयी बनविला. नाथांनी पंथाच्या उतरणीच्या आणि अडचणीच्या काळात आपल्या आचार, विचार व कृतीने पंथाला खंबीरपणा दिला. (खांब दिला भागवत।). तर परकीय धर्माच्या आक्रमणाविरुद्ध समाजात जागृती करण्याचे कार्य महाराजांनी आपल्या कीर्तने, प्रवचने व व्याख्याने याद्वारा सातत्याने केले.

(ऊ) संत एकनाथांनी भागवत, रामायणसारख्या अलौकिक साहित्यकृती मराठीत आणल्या. श्री ज्ञानदेवांच्यानंतर सुमारे अडीच-तीनशे वर्षांनी ज्ञानेश्वरी शुद्धिकरणाचे कार्य नाथांनी केले. महाराजांनीही तीच पायवाट चोखाळली.

आपल्या कीर्तन, प्रवचनांद्वारा खेड्यापाड्यातील वाडीवस्तीवरील भाविक श्रद्धाळू लोकांपासून तो शहरातील बुद्धिनिष्ठ, डोळसांपर्यंत, सुशिक्षित व चोखंदळ, चिकित्सकांपर्यंत या ज्ञानेश्वरीच्या ज्ञानदानाच्या यज्ञकुंड सतत चेतवत ठेवला. आयुष्याच्या अखेरच्या तीन वर्षात तर त्यांनी आपले सारे सार्वजनिक कार्य थांबविले आणि ज्ञानेश्वरीवरील भाष्य लेखन सुरु केले. तीन वर्षांच्या या कालावधीत महाराजांनी ज्ञानेश्वरी शुद्धीचे कार्य केलेले नसले तरी सर्व सामान्यांना त्यातील सर्व संदर्भ समजतील अशा पद्धतीत अर्थाचे विवरण करीत सुमारे पाच हजार पृष्ठांचा ग्रंथ होईल एवढे लेखन केले. त्यांनी संपादित केलेला 'ज्ञानेश्वरी' ग्रंथ म्हणजे भाविकांसाठी ज्ञानाकलनाची पर्वणीच होय.

(ए) संत एकनाथांच्या शांत, संयमी, विवेकी प्रकृती (प्रवृत्ती) बद्दल अनेक कथा त्यांच्या चरित्रातून आपल्यासमोर आलेल्या आहेत. तीच शांतवृत्ती, विवेकी संयमी प्रवृत्ती महाराजांचीही होती. त्यांच्या जीवनातील काही प्रसंग वा घटना वरील विधानाला पुष्टी देणाऱ्या आहेत. तसे महाराज कधी कोणावर संतापत नसत किंवा त्यांचा संयमही कधी सुटत नसे. सुचिता, सभ्यता, सहिष्णुता, सेवा आणि साधुत्व या बहुगुणांची ती गंगा सर्वांना पवित्र करीत होती. खेड्यापाड्यापासून तो नगर-शहरातील घराघरातून बोधामृतांचे आणि मांगल्याचे धडे देण्याचे कार्य आणि तेही मातेच्या वात्सल्याप्रमाणे करण्याचा वसाच महाराजांनी जणू घेतलेला होता. संप्रदायातील अनेकांना महाराज हे 'आधारवड'च वाटत असत.

मनाची (चित्ताची) पराकोटीची स्थिरता हा संतांचा गुण नाथांमध्ये पुरेपूर भरलेला होता. नाथांचे हे व्यक्तित्व महाराजांनी आदर्श मानले होते. 'सुख-दु:खे समेकृत्वा।' या गीतावचनाप्रमाणे कोणत्याही प्रकारच्या भावनेच्या आहारी न जाता चित्ताचा विचारांचा समतोल ढळू न देण्यात जसे नाथ यशस्वी झाले होते, तसेच महाराजही ! या संदर्भातील काही प्रसंग असे- तत्त्वज्ञान हा विषय घेऊन पुण्याच्या स.प. महाविद्यालयात शिकणाऱ्या मोठ्या मुलाचे (वसंताचे) अकाली व अकस्मात झालेले निधन हा महाराजांना मोठा धक्का होता. परंतु भावनेच्या आहारी जाऊन, चित्त विचलित करण्याऐवजी ते चातुर्मासाच्या कार्यात मग्न झाले. दुसरी एक घटना,

महाराजांची कन्या (आशा) विहिरीत पडल्याची बातमी समजली तेव्हा महाराजांचे ज्ञानेश्वरीचे वाचन चालू होते. एका ब्राह्मणाने त्या मुलीचे प्राण वाचविले. कन्या शुद्धीवर आल्यानंतर ते तिला विनोदानेच म्हणाले, 'काय आशाबाई, आज पोहायला शिकलात वाटते ?' या सर्व प्रसंगात कुठेही भय, चिंता, चिडचिड, आरडाओरडा किंवा अकांडतांडव याचा लवलेशही नव्हता. बंडा महाराज हे महाराजांचे कनिष्ठ बंधू. महाराजांच्या घराला त्यांचा मोठा आधार होता. पण दुर्दैवाने त्यांचेही अकाली निधन झाले. एक भरभक्कम आधारस्तंभच उन्मळून पडला. अशा वेळी सामान्य माणूस भ्रमिष्ट झाला असता. घरात महिपती महाराजांचे कुटुंब, स्वत:ची मंडळी आणि त्यात भर पडली ती बंडा महाराजांच्या कुटुंबाची. नैतिक कर्तव्याच्या भूमिकेतून महाराजांनी कोणत्याही अभिनिवेशाशिवाय सर्वांची जबाबदारी स्वीकारली. शांतचित्तवृत्तीच्या नाथांचा आदर्श व शिकवण त्यांच्यासमोर होती. त्याच वृत्तीने कुठेही न डगमगता महाराज यातील प्रत्येक प्रसंगाला सामोरे गेले होते. कुठेही नैराश्य नाही, नाराजी नाही, नव्या जबाबदाऱ्यांच्या ओझ्यांचा त्रागा नाही, अगतिकता तर मुळीच नव्हती. होता तो फक्त विवेक अन् संयम !

देगलूरजवळ देगलूरकरांची जहागिरी होती, ती जाण्याचा असाच एक दुर्घट प्रसंग. त्यावेळी चातुर्मास चालू असल्याने महाराजांना पंढरपूर सोडता येत नव्हते. (त्यांचा तसा नेमच होता) देगलूरला न जावे तर मोठे उत्पन्न बुडणार होते आणि जावे तर नेम मोडला जाणार होता. अशा द्विधा परिस्थितीत सापडलेल्या महाराजांच्या निरिच्छ भूमिकेने निर्णय घेतला. धन-दौलतीच्यामागे अविचाराने धावत न सुटता ते पंढरपुरातच थांबले. नाथांप्रमाणे असणारे हे 'शांतिब्रह्म' अजिबात विचलित झाले नव्हते. बाह्यात्कारी प्रपंची असणारे महाराज, अंतर्यामातून मात्र या साऱ्यातून अलिप्त, विरक्त होते.

दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी प्लेगचे कारण सांगून ब्रिटीश सरकारने वारीवर बंदी आणली होती. त्यातच ते 'रेशन'चे दिवस. या पार्श्वभूमीवर पंढरपूरात वारीस आलेल्या हजारोंपैकी शेकडोजणांची व्यवस्था करण्यात महाराज मग्न झालेले होते. कुठेही बोलबाला नव्हता, आरडाओरडा नव्हता, कसलीही वाच्यताही नव्हती. सन १९४८ साली हैदराबादच्या निजाम सरकारने अन्याय, अत्याचाराचे सत्र सुरु केले.

त्यावेळी अनेकांनी पंढरपुरातील महाराजांच्या मठात आश्रय घेतलेला. आपली धन-दौलत (सोने, चांदी, रोकड इ.) महाराजांच्या स्वाधीन केलेली. महाराजांनीही ते सारे धन एका बँकेत सुरक्षित ठेवले होते. ही गोष्ट निजामला समजताच निजामाने त्या बँकेची सारी खाती गोठवून टाकली. सारी मंडळी हवालदील झाली होती. तरी पण महाराजांनी सर्वांना दिलासा दिला होता. आपल्या पत्नीच्या सल्ल्याने स्वत:ची संपत्ती व धन देण्याचा धाडसी निर्णय त्यांनी घेतला होता. स्वत:चा आणि समाजाचा तोल सांभाळण्याची परकाष्ठा महाराज नेहमीच करीत, सदरचा प्रसंग त्याचेच प्रतीक होय.

सन १९५६ चा प्रसंग चंद्रभागेला आलेला प्रचंड मोठा पूर. निम्मे पंढरपूर पाण्यात बुडलेले. पूर ओसरताच महाराजांनी काही मदत केंद्रे स्थापन केली. सुमारे शंभर पोती धान्य जमा करुन त्याचे गरजूंना वाटप केले. अनेकांनी धन्यवाद दिलेही. पण याची वाच्यता कुठेही केली नाही. पानशेत धरण फुटल्याने पुण्यात हाहाकार उडालेला होता आणि त्याच दरम्यान महाराजांच्या जेष्ठ चिरंजीवांचे (वसंत) निधन झालेले. तरीही आपद्‌धर्म, सामाजिक बांधिलकी आणि मानवता या जाणीवेने महाराजांनी पुणेकरांसाठी आर्थिक मदत पाठविली होती. अशा कितीतरी घटना आहेत की, ज्यातून महाराजांच्या लोकधर्मी, उदार, सहिष्णुवृत्तीचे दर्शन घडले गेले.

महाराजांना केवळ संप्रदायातच नव्हे तर एकूण समाजजीवनात मानाचे, गौरवाचे स्थान प्राप्त झालेले होते. आपण करीत असलेल्या कार्याचा त्यांना कधी अहंकार नव्हता. उलट जे कार्य केले वा झाले ते कर्तव्यभावनेने आणि तटस्थवृत्तीने. परिणामी सर्व समाजाची त्यांना मान्यता लाभली होती. स्वत:चे व्यक्तित्व वाढविण्याची किंवा (त्यासाठी) बुवाबाजीची त्यांना कधी गरज भासली नव्हती. संप्रदायातील आणि संप्रदायाबाहेरील दिग्गज लोकांच्या मते **'श्री एकनाथ महाराजानंतर एवढे प्रचंड काम उभे करणारा महाराजांएवढा दुसरा सत्पुरुष झाला नाही.'** महाराज सांप्रदायिक परंपरेनुसारच आपले जीवन जगले. पण समाज व संप्रदाय अशा द्वंद्व प्रसंगी मात्र महाराज समाजाच्याच बाजूने उभे राहिले. म्हणूनच ते 'दुजानाथ' झाले !

## ३. जनवादी अन् पांथस्थांचे दीपस्तंभ

ह.भ.प. सोनोपंत तथा मामासाहेब दांडेकर यांच्या वैकुंठगमनानंतर वारकरी संप्रदायावर एक काळसर दाट छाया पडल्यासारखे झाले होते. जनमानसात एकरुप झालेले, अशिक्षितांपासून तो सुशिक्षितांपर्यंत सर्वांचे आदरणीय ठरलेले असे एक खंबीर नेतृत्व काळाआड झालेले होते. पू. मामांच्या 'सॉक्रेटिस, प्लेटो, ॲरिस्टॉटल, कान्ट आणि श्री ज्ञानेश्वर' यांच्या तत्त्वज्ञानावरील व्याख्यानाने विशेषत: शहरी सुशिक्षित वर्ग भारावून गेलेला होता. 'अध्यात्मवादाची मूलतत्त्वे' या नावाची एक लेखमाला प्रसिद्ध करुन पू. मामांनी उभ्या महाराष्ट्राला, आध्यात्माच्या अभ्यासकांना नवी दालने खुली करुन दिली होती. इतकेच नव्हेतर 'ईश्वरवाद' नावाच्या छोट्याशा ग्रंथानेही सांप्रदायिक क्षेत्रात महत्त्वपूर्ण कार्य केले होते. पू. मामासाहेब दांडेकर हे 'तत्त्वज्ञानाचा कोश' मानले जायचे. पू. मामांच्या आयुष्याच्या अखेरीस त्यांची प्रकृती त्यांना नीट साथ देत नव्हती. अविश्रांत परिश्रम, प्रवास, दगदग यांची पर्वा न करता ते कीर्तन, प्रवचने, व्याख्याने यांचे दौरे करीतच होते. परिणामी त्यांच्या कार्याला मर्यादा येऊ लागल्या होत्या. ही गोष्ट महाराजांच्या लक्षात येताच संप्रदायाची धुरा त्यांनी आपल्याकडे घेतली. विशेषत: प.पू. मामांच्या वैकुंठगमनानंतर त्यांची उणीव संप्रदायाला भासू नये अशा जोमाने महाराजांनी आपले कार्य सुरु केले होते. आपले दौरे, कार्यक्रम याद्वारे ते महाराष्ट्रभर फिरत राहिले होते.

वारकरी संप्रदायाची मूलभूत भूमिका, त्यांचे तात्त्विक विचार, आचारसंहिता इ. समाजाभिमुख करुन संप्रदायाचे अधिष्ठान बळकट करणे हे त्यांच्या समोरील मुख्य ध्येय होते. त्याचबरोबर संत चरित्रांचे गुणगायन करीत समाज सुपंथाकडे नेणे आणि पूर्ण समाजात देश-धर्म-पंथ याबद्दलचा अभिमान निर्माण करीत, समाजात समत्वाचीही भावना निर्माण करणे अशा विचारांनी प्रेरित झालेले महाराज, आपल्या प्रत्येक कीर्तन प्रवचनाच्याद्वारे आपला वाग्यज्ञ तेजाळून ठेवीत होते. परिणामी त्यांनी चालविलेल्या वाग्यज्ञाच्या गंगेत सुस्नात होण्याचे भाग्य पंढरपूरकरांबरोबर अन्य असंख्य भाविक, श्रद्धाळू, उपासक, अभ्यासक आणि मुमुक्षू यांनाही मिळत असे. त्यांची ही जनवादी वृत्तीच त्यांचे प्रेरणास्थान होते. प्रसंगी श्रोतेभक्तांच्या प्रेमात

अडकून पडणारा हा भ्रमर, आपल्या ज्ञानदेवीवरील प्रवचनाच्या गुंजारवाने सर्वांना आपलेसे करुन घेत असे. अज्ञजनांना मार्गदर्शन, साधकांना उपदेश, अभ्यासकांना नवीन पाठ वा संथा, विचारवंतांच्या शंकांचे निरसन, सांप्रदायिक स्वरुपाचे लेखन करणारांना प्रोत्साहन अशा विविध भूमिका एकाचवेळी वठविणारे महाराज खऱ्या अर्थाने 'जनवादी' राहिले होते. भागवत धर्म मंदिराचे आधारस्तंभ बनल्या गेलेल्या महाराजांना जनसामान्यांनीही भागवत धर्माच्या देव्हाऱ्यात स्थान दिले होते. अज्ञात तिमिरात भटकणाऱ्या पांथस्थांचे ते सर्वार्थाने दीपस्तंभ बनले होते.

## ४. सांप्रदायिक भेद अमान्य

समाजात वारकरी कीर्तन प्रथेप्रमाणे नारदीय (हरिदासी), समर्थ संप्रदायी अशा अन्य कीर्तन परंपरा प्रचलित होत्या. (आजही आहेत.) यात नारदीय संप्रदायी कीर्तनकार विवेचनासाठी वारकरी संतांचे अभंग घेतात. तर समर्थ संप्रदायी रामदासी कीर्तनकार विवेचनाचा (मूळ) अभंग म्हणून समर्थांचा अभंग घेत असले तरी विवेचनात वारकरी संतांच्या काव्याच्या सहारा घेतात. मात्र वारकरी संप्रदायाचे कीर्तनकार अन्यसंप्रदायी संतांच्या वाङ्मयाचा उपयोग कटाक्षाने टाळतात. या गोष्टीवर अनेकदा उजेड टाकण्याचा प्रयत्न झाला होता. महाराजांनीही व्यक्तिश: नारदीय कीर्तन सम्मेलने परिषदांचे अध्यक्षस्थान भूषविले होते, त्यावेळी त्यांनी सर्वपंथसमन्वयाची भूमिका मांडली होती. परंतु ते घडले नाही, आजही हा पंथीय दुराग्रह शिल्लक आहे. या विषयाची चर्चा करणारा व महाराजांची भूमिका स्पष्ट करणारा प्रसंग अनायासे घडून आला.

एकदा महाराजांनी आपल्या मठात ह.भ.प. ल. रा. पांगारकर यांचे प्रवचन आयोजित केले होते. या प्रवचनास ह.भ.प. केशव महाराज देशमुख, गोजीवन चौंडे महाराज यासारख्या ज्येष्ठ प्रभृतींनाही आमंत्रित केले होते व ते उपस्थितही झाले होते. श्री. पांगारकर हे नेहमीच आपल्या प्रवचनात प्रमाणांना प्राधान्य देण्यात आणि अनेक संतवचने प्रमाण मानण्यात माहीर होते. पंढरपुरातील त्या प्रवचनादिवशी त्यांनी श्री संत नामदेवरायांचा 'कुतऱ्या थंबालले थंबाल आपुल्या गाई।' हा लोकप्रिय अभंग निवडला होता. या अभंगातील श्री. पांगारकरांचे कीर्तन तर रंगलेच, पण

प्रवचनानंतर खरा रंगला तो देगलूरकर मठ ! प्रवचनानंतर श्री. पांगारकर (उभयपक्षी) श्री केशव महाराज देशमुख (वारकरी संप्रदायी) आणि गोजीवन श्री चौंडे महाराज (समर्थ संप्रदायी) गप्पा मारण्यासाठी एकत्रित आले असता, कोणी तरी प्रश्न उपस्थित केला की, 'श्री. पांगारकरांच्या प्रवचनात ज्याप्रमाणे स्वामी समर्थ, वामन पंडित, मोरोपंत आदींची वचने वा अभंग वारकरी संताप्रमाणे सहजपणे येतात मात्र वारकरी प्रवचनकार समर्थांच्या वचनांचा (वा अन्य कोणत्याही संप्रदायी वाङ्मयाचा) वापर, उल्लेख करीत नाहीत. याचा अर्थ वारकरी कीर्तन-प्रवचनकार यांना समर्थ संत म्हणून मान्य नाहीत ? असे का ? मोरोपंत, वामन पंडित हे भगवत भक्त वा भक्तिमार्गी कवी नव्हते का ?' विचारणाऱ्यांनी या तिघांना अडचणीत टाकले होते. आता उत्तर देण्याची जबाबदारी वारकरी प्रवक्त्यांवर होती. अशावेळी ह.भ.प. केशवराव देशमुख व श्री चौंडे महाराज यांनी केवळ आपल्या संप्रदायाचीच बाजू मांडली तर अनर्थ निर्माण होईल हे ओळखून महाराजांनी समयसूचकता राखून हस्तक्षेप केला व म्हणाले, 'आपण म्हणता तसे मला तरी वाटत नाही. सांप्रदायिक दुराग्रह किंवा द्वेषमत्सराचा इथे संबंधच येत नाही. कारण श्री समर्थ रामदासांचे कुलदैवत श्रीराम होय आणि वारकरी त्या देवतेची पूजा-अर्चा करतात, रामनवमी उत्सव साजरा करतात. शिवाय संत एकनाथकृत भावार्थ रामायणही वाचतात, त्याचे सप्ताह (सामूहिक पारायण) केले जातात. विशेष म्हणजे वारकरी संप्रदायाच्या बीजमंत्रारंभीच राम येतात. (रामकृष्णहरी). भागवत धर्माप्रमाणेच समर्थही अद्वैत तत्त्वज्ञानाचे पुरस्कर्ते होते. एवढ्या सर्व गोष्टी भागवतधर्मीयांकडून घडत असताना सांप्रदायिक द्वेषमत्सर वा दुराग्रहाचा प्रश्न येतोच कुठे ?' महाराजांचा हा खुलासा व भूमिका समन्वयवादीच होती. महाराज असा दुराग्रह धरीत नसत.

### ५. महावैष्णवाच्या लोकप्रियतेचे गमक

वारकरी संप्रदायातील महाराजांच्या लोकप्रियतेचे वर्णन करताना, 'तयाचा वेलू गेला गगनावरी।' असे म्हटल्यास अजिबात अतिशयोक्ती होणार नाही. मात्र अशा लोकप्रियतेसाठी त्यांनी कुठलेही अकृत्रिम प्रयत्न केले नाही वा ना कधी सवंग

लोकप्रियतेच्या मागे धावले. त्यांच्या अंगभूत गुणांबरोबर त्यांची विद्वत्ता, सांप्रदायिक कार्य, वाणी-लेखणी या साऱ्या गोष्टींनीच त्यांना लोकप्रियतेच्या शिखरावर नेले होते. शुद्ध पक्षातील चंद्राप्रमाणे त्यांची लोकप्रियता सतत वाढतच राहिली होती, तिला कृष्णपक्षाचे ग्रहण कधीच लागले नव्हते.

ह.भ.प. श्री निवृत्ती महाराज वक्ते (पंढरपूर) यांनी महाराजांच्या अंगभूत गुणांची चर्चा एका लेखात केली आहे. यात महाराज हे अयाचितवृत्ती, आर्जवता, वाङ्माधुर्य, समयसूचकता, कुशाग्र बुद्धिमत्ता, अलौकिक धारणाशक्ती, ग्रंथ व्यासंगी, विद्वान, सव्यासाची अध्यापक, नम्रता, अनाग्रहता, निर्वैरता, आतिथ्यशीलता, भक्तिप्रेमी, ज्ञाननिष्ठ, ग्रंथोपजीवी आदी गुणांनी मंडित असल्याचे म्हटले आहे. याव्यतिरिक्त पारंपारिक मतांचे आग्रही असूनही, महाराज सर्वपंथीयासंबंधी समन्वयाची भूमिका घेणारे होते. त्यांच्याजवळ सर्व समभाववृत्ती आणि इतरांच्या मतांचा आदर करणारी उदारताही होती. विनोदी स्वभाव आणि संबंधितांप्रती आपलेपणा या त्यांच्या वैशिष्ट्यामुळे त्यांच्याभोवती अफाट लोकसंग्रह निर्माण झाला होता. हेच सारे गुण त्यांच्या लोकप्रियतेस कारणीभूत झाले असावेत.

अतिशय विनम्रता, वाणीतील ऋजुता, विचारातील स्पष्टता, ज्ञानातील निष्णानता, भक्तीतील श्रद्धाभाव आणि मुख्य म्हणजे वारकरी संप्रदायाचा अभिनिवेश ठेवून सर्व पंथ, संप्रदाय, त्यांच्या परंपरेतील सत्पुरुष, त्यांची श्रद्धास्थाने, त्यांची तत्त्वविचार प्रणाली या सर्वांविषयी समन्वयी महादृष्टी महाराजांचे ठायी होती. नुसत्या ज्ञानाने अहंकारीपणा येतो, पण तेच ज्ञान भक्ति उपासनेशी निगडित राहिले की वृत्ती व्यापक होते. व्यक्तिगत उपासना एकमार्गी, एकपंथी अशी असली तरी कार्यरूपाने प्रकट होताना व्यक्ती जर व्यापक दृष्टीने वागत नसेल तर काय उपयोग ? महाराजांचे तसे नव्हते. पंथ, परंपरा, सत्पुरुष या सर्वांविषयी व्यापक व समन्वयी भाव राखल्यानेच त्यांचे व्यक्तित्व सौहार्दजनक ठरले होते. ईश्वरानिष्ठांची मांदियाळी गावोगावी निर्माण करण्यात त्यांना यश आले होते ते त्यांच्या याच व्यापक दृष्टीने. समन्वयी दृष्टीचा कार्यकर्ता, मग तो कोणत्याही क्षेत्रातील असो, तो लोकसंग्रहीवृत्तीचा असावा लागतो. महाराज या वृत्तीचे होते, म्हणूनच त्यांचा लोकसंग्रहदेखील अफाट होता.

वारकरी पंथातील वाङ्मयीन भेद किंवा संतचरित्रातील चमत्कार अथवा वादग्रस्त प्रश्नांची चर्चा करताना महाराजांनी नेहमीच पारंपरिक मतांशी इमान राखले होते. संतांच्या चरित्रावर हल्ला केल्यास त्यांना दु:ख होत असे. संतचरित्रात दोष शोधायचे नसतात असे त्यांचे व्यक्तिगत मत होते. महाराजांच्या अशा समन्वयी भूमिकेमुळेच त्यांची अनेक थोर महात्मे, पंडितांशी, महाराजांशी सलगी होती. प. पू. करपात्रजी महाराज, श्री दामना प्रभुदत्त ब्रह्मचारी, अद्वैत वेदांताचे अधिकारी श्री विनायक महाराज साखरे, श्री तुकडोजी महाराज इ. महंत महाराजांच्या प्रेमातीत झाले होते ते यामुळेच !

## ६. संस्कृती, पंथ, धर्म, राष्ट्र यांचे संरक्षक

महाराज हे उभ्या महाराष्ट्राला वारकरी संप्रदायाचे थोर प्रचारक, मीमांसक, अध्वर्यू कीर्तनकार आणि ज्ञानेश्वरीचे पट्टीचे भाष्यकार म्हणून परिचित होते. त्यांचे समाजकार्य हेदेखील संप्रदायाच्या चौकटीत बसणारेच असायचे, तर धर्मकार्य विशेषत: या संप्रदायाला बळकटी देणारे. त्यांची ही विशिष्ट प्रतिमा जनमानसात तयार झाली होती. 'धर्मपंडित हा केवळ धर्मविचारातच बुडलेला असावा असे नाही. त्याला सभोवतालच्या स्थानिक, राज्यीय, देशीय, आंतरदेशीय स्थिती परिस्थितीचे भान असावयास हवे.' असे आवाहन कीर्तन सम्मेलनाच्या अध्यक्षपदावरुन महाराजांनीच केले होते. महाराज याबाबतीत सतत सतर्क असत.

महाराजांची राष्ट्रनिष्ठा, धर्मनिष्ठा संस्कृतिनिष्ठा व संप्रदायनिष्ठा या साऱ्या त्यांच्या स्फुट लेखनातून तसेस त्यांनी दिलेल्या मुलाखतीतून स्पष्ट होतातच, परंतु त्यांचे विशेष दर्शन त्यांनी विविध ठिकाणी केलेल्या अध्यक्षीय भाषणातूनही होते. कीर्तने-प्रवचने या त्यांच्या सिद्धहस्त माध्यमातूनही या निष्ठांची प्रचिती यायची. महाराजांचे हिंदू धर्मग्रंथांचे अध्ययन, संत साहित्याचा सखोल अभ्यास, हिंदुधर्माभिमानी तत्त्वज्ञ ज्ञानी, पंडित, शास्त्री, संत-महंत यांच्याशी आलेला संबंध, त्यांच्याशी केलेल्या चर्चा वा संवाद या सर्वांमुळे हिंदू धर्म संस्कृतीविषयक विचार अधिक पुष्ट झालेले होते. महाराजांनी आयुष्यभर जरी वारकरी संप्रदाय, त्यातील तत्त्वज्ञान यांचे विचार

जनसामान्यांसमोर मांडलेले होते, तरी वारकरी संप्रदाय व हिंदु धर्म यात भिन्नत्त्व त्यांनी कधीच मानले नव्हते. इतकेच नव्हेतर 'वारकरी संप्रदाय म्हणजे हिंदुधर्माची छोटी प्रतिकृती'च मानत होते. यातूनच या दोन्हीतील अभेद्यत्व दर्शवते. त्यामुळे त्यांचे संप्रदायकार्य हे एका अर्थाने हिंदुधर्मकार्यच असायचे. त्यांच्या निष्ठेत हिंदू धर्मनिष्ठा अधिक प्रबळ की राष्ट्रनिष्ठा अधिक प्रबळ याचे मोजमापही करणे कठीण होते. कारण त्यांचा धर्माभिमान जितका प्रखर होता, तितकीच राष्ट्रनिष्ठाही उत्कृष्ट-जाज्वल्य होती, म्हणूनच त्यांच्या व्यक्तिमत्त्वामधून राष्ट्र-धर्म-संप्रदाय व संस्कृतिनिष्ठा या वेगवेगळ्या काढताच येत नाहीत.

महाराजांच्या एकूण आयुष्यापैकी निम्मा कालावधी (सन १९०४ ते १९४७) इंग्रजी राजवटीचा म्हणजे ख्रिश्चन धर्मीयांच्या प्रभावाचा तर उत्तर कालखंड (सन १९४७ ते १९९२) भारतीय स्वातंत्र्याचा, पण सरकारने स्वीकारलेल्या निधर्मी विचारांचा, यामुळे त्यांच्या राष्ट्रधर्मनिष्ठेत जरी यत्किंचितही बदल झालेला नव्हता, तरीही हिंदू-धर्म-राष्ट्र विरोधी कारवाई करणारे भिन्न झाल्याने त्यांचे टीकेचे लक्ष मात्र बदलले होते.

या देशात व या समाजात राहत असतांना येथील हिंदुधर्म विरोधी कारवाया करणारे हिंदुधर्म विरोधक आणि या देशाच्या अखंडतेचे व अस्मितेचे वैभव ज्यांच्या नजरेत खुपायचे म्हणून धर्मभावनेच्या माध्यमातून या धर्माबद्दल द्वेष निर्माण करुन या देशाचे तुकडे पाडणारे व लचके तोडणारे यांच्या कृतीवर महाराजांनी जे प्रखर हल्ले चढविले होते, त्यातून त्यांची हिंदुधर्म व राष्ट्रावरची निष्ठा दिसून येते. विशेषत: स्वातंत्र्योत्तर काळात राज्यकर्त्यांनी धर्मविषयक स्वीकारलेले धोरण त्यामुळे हिंदुधर्माबरोबरच अन्य धर्मांना प्राप्त झालेले स्थान, हिंदुधर्माबाबत राज्य कर्त्यांची उदासीनता, पक्षीय राजकारणासाठी अन्य धर्मीयांकडे पाहण्याचा बदललेला दृष्टीकोन, हिंदुधर्माबद्दल स्वकीयांचीही वाढत चाललेली उदासीनता, विज्ञाननिष्ठ निकषावर सुरू केलेला धर्म-संस्कृती विचार, स्वकीयातील धर्म विरोधकांची वाढती संख्या, परकीय संस्कृतीचे अंधानुकरण आणि परधर्मीयांची होत असलेली विविध स्वरुपातील

आक्रमणे या सर्वांचे चिंतन करुन मगच त्यांनी आपल्या विचारांना स्वधर्म रक्षणाची प्रचाराची दिलेली जोड म्हणजेच महाराजांचा राष्ट्रधर्म, हिंदुधर्म व संस्कृती निष्ठेविषयीचा विचार होय.

आपल्या धर्मकार्याच्या कालावधीत महाराजांचा अनेक स्व-धर्मीय परंतु अन्यपंथीय तत्त्वज्ञ, साधू, योगी पुरुषांशी संबंध जसा आला होता, तसाच परधर्मीय साधू पुरुषांशीही आला होता. महाराजांनी अशा सर्वांच्या विद्वतेचा, कार्याचा आदरही केला होता. कोणत्याही धर्माचे रक्षक साधुसंत किंवा त्यांची धर्मतत्त्वे यांच्याबद्दल महाराजांच्या मनात कधीही आकस नव्हता, तर आपल्या धर्माच्या मूळ तत्त्वांना तिलांजली देत, आपल्या धर्म विचारांशी फारकत घेत अतिरेकी धर्मांधवृत्तीने हिंदुधर्मावर शाब्दिक वा राक्षसी कृतीयुक्त आक्रमणे करणाऱ्या धर्मांध व्यक्तींवर रोष होता. त्याचबरोबर अशा गोष्टींना प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे पाठिंबा देणाऱ्या व्यक्ती तथा समाजाबद्दल मात्र त्यांच्या मनात राग होता. महाराजांची राष्ट्र व धर्मनिष्ठा विरोधकांनी केलेल्या कृतीवरील टीकेतून स्पष्ट होते. महाराजांच्या दृष्टीने या देशाचे व धर्माचे विरोधक दोन प्रकारचे. पैकी पहिले म्हणजे जे हिंदुधर्मात जन्मास येऊन स्व-धर्माबद्दल उदासीन राहणारे, धर्मकार्यास व विचारास विरोध करणारे, हिंदुधर्मावर टीका करणारे, धर्म न मानणारे आणि स्वत:च्या स्वार्थाकरिता अन्यधर्मीयांचे लाड करणारे तर दुसऱ्या प्रकारात या देशात राहून येथील हिंदू धर्म व संस्कृतीवर टीका करणारे, हिंदुधर्माबद्दलच्या भावना बोथट करणारे, स्व-धर्माचा प्रचार धर्मांतर करणारे आणि धर्म, भावना उद्युक्त करुन देशाचे तुकडे करु पाहणारे राष्ट्रविध्वंसक यांचा समावेश करतात. या दोन्ही गटातील लोकांच्या विचारसणीने, कृतीने या देशाचे व धर्माचे भवितव्य धोक्यात असल्याची जाणीव महाराजांना झाली होती. हा त्यांच्या चिंतनाचा परमोच्च बिंदूच मानावा लागतो. याची जाणीव समाजालाही व्हावी आणि त्यांच्याही धर्म, राष्ट्र व संस्कृती निष्ठा जागृत राहाव्यात यासाठी महाराज कार्यरत झाले होते. या संदर्भात सन १९८२ च्या डिसेंबर महिन्यात संपन्न झालेल्या विश्व हिंदू परिषदेच्या सम्मेलनातील अध्यक्षपदावरुन त्यांनी केलेले अध्यक्षीय भाषण बोलके आहे. त्यांच्या या भाषणाचे दोन भागात विभाजन केल्यास त्यांच्या विचारातील कर्तव्यनिष्ठा आणि कठोरपणा

यांना आलेली धार जाणवते. यातील पहिला भाग म्हणजे हिंदुधर्म, त्याची उदारमतप्रणाली आणि हिंदुधर्मावर आधारित संतांची शिकवण यांचा होता. तर दुसऱ्या भागात सहिष्णुतावादी असलेल्या हिंदुधर्मावर अतिरेकी स्वरुपाच्या कारवाया करणाऱ्या स्वकीय आणि परकीय लोकांच्या कृती यांचा घेतलेला आढावा होता. या सर्वांतून सर्व हिंदुधर्मीयांनी घ्यावयाचा बोध व वेळीच जागृत होण्याची दक्षता याबाबतचे दिलेले इशारे म्हणजे त्यांचे त्या सम्मेलनातील भाषण होय.

हिंदुधर्मीयांनी वेळीच जागृती दर्शविली नाही तर या देशाचे अस्तित्व तरी नजिकच्या भविष्यकाळात शिल्लक राहणार का ? अशी भयानक व्यथाही त्यांनी बोलून दाखविताना स्वत:च्या अस्तित्वाच्या धोक्याची घंटाच त्यांनी वाजविली होती. यातून सर्व हिंदुसमाजाने आपसातील जात, पंथ, वर्ण भेद विसरुन एकत्र येण्याचे आणि हिंदुसमाज संघटित करण्याचे आवाहनही केले होते. 'हिंदू म्हणजे संकुचित, हिंदू म्हणजे केवळ उच्चवर्णीय, हिंदू म्हणजे इतर धर्मांचा द्वेष करणारे असे गैरसमज लोकात अहिंदू करतात. अल्पसंख्या म्हणवणारे पण बहुसंख्य होण्यासाठी वेगाने प्रयत्नशील आहेत आणि या लोकांचा आमचे राजकीय नेते स्वार्थासाठी उपयोग करुन घेत आहेत. त्यामुळे अशा लोकांची शक्ती वाढून हळूहळू या देशाचे लचके तोडले जातील', असा धोक्याचा कंदिलही महाराजांनी दाखविला होता.

महाराजांच्या मनात अशा राजकारणी व्यक्तींबद्दल कटुता होती जे स्वार्थासाठी स्व-धर्माची नालस्ती करतात व परकीयांकडे दुर्लक्ष करतात. हिंदू समाजात जात-पात, भाषा-प्रांत, उपासना-दैवते, आचार-विचार यामुळे असलेल्या भेदांचे स्वरुप उग्र करु पाहणारांबद्दलही त्यांच्या मनात राग होता. 'या सर्वात भेदाभिमान निर्माण करुन, परस्पर द्वेषांची बीजे पेरुन, स्व-धर्माविषयी तुच्छता निर्माण करुन, इतकेच नव्हे तर येथील तरुणांमध्ये शक्तिक्षय करणाऱ्या व्यसनांचा प्रचार करुन, इथल्या राजकीय नेत्यांना सत्तेची आमिषे दाखवून हे ऐक्य कसे नष्ट होईल याचे कारस्थान चालू आहे, पण ही गोष्ट हिंदू असलेल्या पण हिंदुत्व विसरलेल्या राज्यकर्त्यांच्या लक्षात येत नाही हे आमच्या दृष्टीने दुर्दैव आहे.' अशी खंत व्यक्त करीत आपली धर्म

व राष्ट्रनिष्ठा या एकत्रितपणे आमच्या शरीरात कार्यरत असल्याचेही म्हटले होते. 'हिंदुस्थानचे स्वातंत्र्य हिंदू या शब्दात, वृत्तीत, स्वाभिमानात व देश-धर्म निष्ठेत असल्याचा दावाही त्यांनी केला होता.

हिंदुत्वतेर आधारित असलेले राजकीय, देशस्वातंत्र्य महाराजांना अभिप्रेत होते आणि त्या दृष्टीने स्वदेश स्वातंत्र्याचे रक्षण म्हणजे राष्ट्रीय देवतेचे रक्षण त्यानी मानले होते. हिंदुधर्मनिष्ठा केंद्रस्थानी ठेवून त्यांनी आपले धर्म प्रबोधन कार्य केले. 'हिंदू धर्म हा राष्ट्राचा पाया आहे' या तत्त्वाचा व विचाराचा प्रचार व प्रसार आपल्या कीर्तन प्रवचनाच्या माध्यमातून केला होता. मूळात हिंदुधर्म अत्यंत सहिष्णुधर्म असतानाही आणि सर्व वारकरी संतांनी ही भूमिका व्यापकपणे प्रतिपादन केलेली असतानाही परधर्मीयांकडून होणारी आक्रमणे महाराजांना अस्वस्थ करीत होती. हिंदुधर्म व वारकरी संप्रदायी संतांच्या शिकवणीतील उदारता व उदात्तता दाखवून देतांना महाराजांनी सर्वच संतांच्या पसायदानाचे दाखले दिले. **'भूतां परस्परें जडो। मैत्र जीवाचे।'** या श्री ज्ञानदेवांच्या भूमिकेचे स्मरणही करुन दिले होते. विविधतेमध्ये एकता, समन्वय पाहण्याची दृष्टी आमच्या ऋषी मुनींनी दिल्याचे सांगून, महाराजांनी पुढे म्हटले की, 'या तत्त्वावर आमची संस्कृती उभारलेली आहे. अशा सहिष्णुवृत्तीच्या धर्मावर वा संस्कृतीवर केलेले आक्रमण हिंदू समाज कदापिही सहन करणार नाही. कारण सहिष्णुतेची शिकवण देणाऱ्या संतांनीच वेळ आल्यास 'समर्थाचिया सेवका वक्र पाहे। असा सर्व भूमंडळी कोण आहे' ? असे आपले सामर्थ्य दाखवून दिले आहे. 'दया तिचे नाव, भूतांचे पालण। आणि निर्दाळण कंटकांचे।' अशा संतवचनाचा दाखला देत महाराजांनी आक्रमकांना इशारे तर दिलेच पण स्वकीयांमधील निद्रिस्त होऊ पाहणारांना, त्यांच्यातील हिंदुत्वनिष्ठेला फुंकरही घातली होती.

देशातील हिंदू धर्माच्या दुर्दशेला समाजापेक्षा राज्यकर्तेच अधिक जबाबदार असल्याचे त्यांचे मत होते. त्यांनी म्हटले की, 'या पुरातन देशात हिंदूची जी दुर्दशा झाली... त्याची कारणे अपरिपक्व बुद्धीचे व देशहितापेक्षा स्वार्थाला प्राधान्य देणारे राज्यकर्तेच होते. शासनकर्त्यांचा धार्मिक प्रश्न हाताळण्यातील दुबळेपणा आणि

परधर्मी प्रचारकांचे होणारे लाड या देशाला घातक ठरताहेत. या सर्वांपासून या देशाला होणारा धोका, या सर्व गोष्टी झाकून ठेवण्याचे शासनाचे कार्य यामुळे देश, धर्म, समाज दुबळे होत चालले आहेत.' या सारख्या मतांमधूनही महाराजांची देश, धर्म, संस्कृतीबद्दलची निष्ठा किती उच्च व कडवी होती हे जाणवते.

श्री ज्ञानदेव, नाथ, तुकाराम महाराज यांच्यासारख्या विवेकी विचारी संतांच्या वाणी/लेखणीतून व्यक्त होणाऱ्या क्रोधाचे जे स्वरुप, तेच महाराजांच्या लेखणी/वाणीतून व्यक्त होणाऱ्या क्रोधाचे स्वरुप होते. 'राष्ट्रधर्माच्या निष्ठेला धक्का लागतो म्हणजे सर्वस्व गमावल्यासारखेच आहे', या त्यांच्या विचारधारेतून महाराजांची देश व धर्माबद्दलची प्रखर आत्मीयता दिसून येते. ते जरी वारकरी संप्रदायाचे अध्वर्यू, प्रचारक, प्रसारक होते तरी धर्माइतकीच त्यांची राष्ट्रनिष्ठा त्यांच्या नसानसात भरलेली होती.

## ७. वारकरी संप्रदायातील स्थान

महाराष्ट्रात त्यातही महाराष्ट्राच्या पूर्वभागात संतवाङ्मयाच्या उपासकांची जी बोटावर मोजता येण्यासारखी नावे बहुजन समाजाने आदरणीय मानली आहेत त्यामध्ये महाराजांचे स्थान अग्रणी उपासकांमध्ये आहे. हरिभक्तीचा वंशपरंपरेचा वारसा लाभलेले, आपल्या रसाळ सुमधुर व प्रसादपूर्ण वाणीने सहा दशकांपेक्षाही अधिक काळ आध्यात्मिक विषयाचे मार्गदर्शन करतांना समाजाला मंत्रमुग्ध करणारे, वारकरी संप्रदायाचे अनभिषिक्त अध्वर्यूपद लाभलेले ह.भ.प. (वै.) धुंडा महाराज देगलूरकर यांचे वारकरी संप्रदायातील स्थान नेमके कोणते व कसे होते याचा विचारही करणे अव्यवहार्य ठरावे. संतांच्या पारंपरिक कार्याला स्वत:ला वाहून घेतलेल्या महाराजांनी, महाराष्ट्रात आणि महाराष्ट्राबाहेरही विठ्ठलनामाचा गजर दुमदुमत ठेवण्याचे कार्य केले. संतांनी घालून दिलेल्या मार्गानेच जाताना त्यांनी सारा महाराष्ट्र पालथा घातला. शहरवस्तीतून, खेड्यापाड्यातून, वाड्या-वस्तींवरुन आपल्या कीर्तन-प्रवचनाने, व्याख्यानाने, प्रसंगी सप्ताहांचे आयोजन करीत समाज प्रबोधनाचे कार्य केले. चातुर्मासाचा पंढरपुरातील कालावधी वगळता उरलेले आठ महिने प्रबोधन कार्यासाठी

त्यांना अपुरेच पडत असत. प्रत्येकाच्या हृदयस्थ असलेल्या सात्त्विक प्रवृत्तीला जागृत करण्याचे कार्य महाराजांनी केले. प्रत्येकाच्या मनातील भक्तीची ज्योत जागृत करण्याचे, प्रज्वलित करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य त्यांनी केले. संतांप्रमाणे धार्मिक, सामाजिक, आध्यात्मिक, नैतिक असे सर्वांगीण उन्नतीचे कार्य करीत संप्रदायाची ध्वजा अधिक उंचीवर नेत असताना महाराजांनी समाजमनात राष्ट्रप्रेम (राष्ट्राभिमान) आणि धर्माभिमानही धगधगता ठेवला. वारकरी संप्रदायाचे ते केवळ अध्वर्यूच नव्हते, तर एक प्रज्ञावंत वक्ता म्हणूनही त्यांना सन्मानित केले होते. 'ग्रंथोपजीवी ज्ञानसूर्य, संत परंपरेचा एकनाथी दुवा, भक्तिसूर्य, वारकऱ्यांचा महामेरू, प्रज्ञावंत प्रवक्ता, भक्तिवैभवी, प्रज्ञासूर्य, ज्ञानतपस्वी, ज्ञानपीठाचे कुलगुरू, अध्यात्म विद्येचे चालते-बोलते ज्ञानपीठ, ज्ञानेश्वरीचा नंदादीप, धर्मात्मा, ज्ञानभंडारी, प्रेमभक्तीचा पुतळा, महावैष्णव, रसाळवाणीचे भाष्यकार इ.' असंख्य बहुमानांनी सन्मानीतही केले. वारकरी संप्रदायातील त्यांचे स्थान निश्चित करण्यासाठी त्यांना समर्पित केलेले हे सारे बहुसन्मानित शब्दच पुरेसे ठरावेत.

महाराजांच्या प्रथम स्मृतिदिनानिमित्त प्रकाशित झालेल्या 'स्मृतिसौरभ' या विशेषाकांत वेदान्त वाचस्पती आचार्य ह.भ.प. जगन्नाथबुवा पवार यांनी अत्यंत मोजक्या पण बोलक्या स्वरूपात आपली प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. त्यांनी लिहिले की, 'त्यांच्या (महाराजांच्या) महानिर्वाणाने महाराष्ट्राची कीर्तन परंपरा पोरकी झाली. वारकरी संप्रदायाचे वैभव तेजोहीन झाले. शाळा व संतवाङ्मय व्यासंग उदासीन झाला आहे. सौजन्य लोपले गेले. शांतीचा सागर आटून गेला आहे. देशाचे देशिकार लेणे हरपले आहे. साधकाच्या भ्रमरवृंदाचे सुगंधी कमळ कोमेजून गेले आहे. भक्तिसंप्रदायाचा आधारच निखळला गेला आहे. निगर्वी, निःस्वार्थी, निराभिमानी व्यक्तिमत्त्व पंचतत्त्वात विलीन झाले आहे. विसाव्या शतकातील फुलविलेल्या भक्तिरूप मळ्याचा माळीच दृष्टिआड झाला आहे. पंढरीतील दर्शन दैवत दुरावले आहे. पंढरीनगरी आपल्या बोधपुत्रास मुकली आहे. ज्ञानेश्वरी प्रवचन सम्राटाचे सिंहासन रिक्त झाले आहे. महाराष्ट्रातील ज्ञानपिपासू समाज वियोगदुःखात मग्न झाला आहे. शिणल्या भागल्याची पुसतास करणारी माउलीच आता राहिली नाही. प्रयत्नवादी

साधकांना प्रेरणा देणारी प्रेरक शक्तीच नाहीशी झाली आहे. साधकांचा साधक, विद्वानांना विद्वान, अज्ञजनांचा जिव्हाळा, विनोद व वेदांताचा संगम, प्रपंच आणि परमार्थाचा समन्वय, कर्म-भक्ती व ज्ञान यांची त्रिवेणी, अवघ्या महाराष्ट्रातील लहान-थोरांचा चव्हाटा आज काळाच्या पडद्याआड गेला आहे. जवळपास पासष्टवर्षे भरभरुन वाहणारी ज्ञानगंगा आटली आहे, लुप्त झाली आहे.' ही प्रतिक्रिया ह. भ. प. श्री पवारबुवांची व्यक्तिगत स्वरूपाची असली तरी महाराष्ट्रातील अंत्यदर्शनासाठी लोटलेल्या, पंचवीस हजाराहून अधिक भक्तांच्या मनातूनही तीच भावना व्यक्त होत होती. अशा या प्रातिनिधिक भावनेनंतर महाराजांचे 'वारकरी संप्रदायातील स्थान' शोधण्याचे वा निश्‍चित करण्याचे गरजेचे आहे असे वाटत नाही.

जन्मत:च प्राप्त झालेला संतकुळीचा वारसा, अंगभूत असलेली अभ्यासू वृत्ती, त्यास दिलेला प्रखर चौफेर व्यासंगीपणा, बहुभाषिकत्व, जनजागरणाची मनापासूनची तळमळ आणि विशेषत: श्री ज्ञानेश्‍वरीबद्दलचे असलेले अत्यंतिक प्रेम व सखोल अभ्यास या काही निसर्गदत्त व काही प्रयत्नसाध्य गुणांमुळे महाराजांना समाजात विशिष्ट स्थान प्राप्त झाले होते. पूर्वसूरीतील श्री ज्ञानदेव आणि श्री एकनाथ महाराज या संतांची जणू पूर्ण कृपाच महाराजांवर झाली असावी. पंथप्रचार, अध्यात्मनिरुपण, समाजोद्धार, सांप्रदायिक क्षेत्रातील नवीन पिढीची जडण-घडण अशा अनेक आघाड्यांवर कार्य करणार्‍या महाराजांचे व्यक्तिमत्त्व एखाद्या कुशल सेनापतीप्रमाणे होते. परिणामी संप्रदायात फूट, घट निर्माण न होता तो संघटितच राहिला.

महाराजांच्या कार्यकाळातच भारताला १९४७ साली राजकीय स्वातंत्र्य प्राप्त झाले. त्यामुळे विशेषत: स्वातंत्र्यपूर्व काळातील प्रचाराचे स्वरुप स्वातंत्र्योत्तर काळात बदलावे लागले. केंद्रसरकारने स्वीकारलेल्या काही धोरणांमुळे समाजात काही नव्या समस्या मूळ धरुन उभ्या राहू लागल्या होत्या, ज्या विशेषत: धर्म, संप्रदाय यांना त्रासदायक ठरु पाहणार्‍या होत्या. त्यामुळे महाराजांनी पंथकार्याला वेगळी दिशा व स्वरूप देण्याचे धोरण एका 'दृष्ट्याचे' कार्य होते. आपले अध्ययन, वाणी, स्वच्छ आणि स्पष्ट विचारसरणी व समाजहिताची अत्यंतिक ओढ यामुळे समकालीन अनेक संत, महंतांच्या समोरही महाराजांचे कार्य कधी झाकोळले गेले नव्हते.

## ८. विनयशील, ईशप्रेरित - पंथनेता

एखाद्या व्यक्तीच्या कार्याचा, विचाराचा किती विशेषणांनी सन्मान केला जातो, याचे प्रत्यंतर महाराजांच्या माध्यमातून प्रतीत होते. श्री ज्ञानेश्वरीचे अभ्यासक, समीक्षक, भाष्यकार व प्रवचनकार हे त्यांचे कार्यक्षेत्र. पण याच कार्यक्षेत्राने आणि वारकरी संप्रदायाच्या प्रसारार्थ व प्रचारार्थ घेतलेल्या भूमिकेने समस्त वारकरी संप्रदायी मंडळींनी आणि अन्यपंथीय संतमहंतांनीही महाराजांचे मोठेपण व्यक्त केले आहे. त्यांच्यातील प्रत्येक गुण हा त्यांचा बहुमान वृद्धिंगत करणारा होता. अपरंपार पाठांतर, अमाप वाचन, अफाट स्मरणशक्ती, दिव्य प्रज्ञा, असामान्य प्रतिभा, समयसूचकतेचे पूर्ण भान आणि विषय मांडण्याची धारदार मेधाशक्ती या सर्व त्यांच्या व्यक्तिगत गुणांच्या बळावरच समाजाने, ज्ञानी-प्रज्ञावंती त्यांना प्रज्ञावंत प्रवक्ता, ज्ञानेश्वरीचे श्रेष्ठभाष्यकार, प्रवचन योगी, कीर्तन साम्राज्य चक्रवर्ती, भक्तिवैभवी, महावैष्णव इ. अशा अनेक बहुसन्मानांनी सन्मानित केले होते. वेदविद्या, शास्त्रपुराणे यांच्या अभ्यासाने तर त्यांना ज्ञानाचे एक वलयच प्राप्त झाले होते. वास्तविक इतके सारे गुणांचे भांडवल जवळ असल्यास कोणासही अहंकार वा दंभाचा स्पर्श होणे स्वाभाविक घडते. परंतु महाराज मात्र या सर्वांपासून कोसो मैल दूर राहिले होते. ते जनवादी होते.

महाराज म्हणजे नम्रता, विनयशीलतेचा मेरुच म्हणावे लागते. त्यांचे प्रवचन, कीर्तन वा व्याख्यान असो अथवा नातेसंबंधी, सगेसोयरे, स्नेही परिचित मंडळी, नवशिका एखाद्या साधक, भक्त, अभ्यासू असो, यापैकी कोणाशीही सुसंवाद साधतांना महाराज नेहमीच अत्यंत मोकळेपणाने बोलत असत. समोरील व्यक्ती अथवा कार्यक्रमातील श्रोत्यांनाही उद्देशून कधीच कठोर शब्द बाहेर पडत नसत. उलट प्रसंगाच्या अनुरोधात ते म्हणत, 'मी जे काही बोलतो ते माझ्या ताकदीवर नाहीच. ती केव्हाच संपून गेलेली आहे. ही शक्ती तुम्हा श्रोत्यांची आहे. तुम्ही जेव्हा प्रेमाने माझ्याकडे पाहता, त्यावेळी मला वाटते की, माझी ज्ञानेश्वर माउलीच डोळेभरुन स्नेहदृष्टीने माझ्याकडे बघत आहे. तुम्ही श्रोते आणि मी वक्ता असा भाव कधीच उरत नाही.' त्यांची नम्रता एवढी होती की, 'मी जाणूनबुजून धोंडा आहे' असे ते

म्हणत, पण खरे तर ते परीसच होते. माहेश्वरी धर्मधाळेच्या पायाभरणीच्या कार्यक्रमाला खरे तर ह. भ. प. (प्रा) सोनोपंत (मामा) दांडेकरांना बोलावले होते. ते काही कारणाने उपस्थित राहू शकत नसल्याने आयत्या वेळी महाराजांना निमंत्रित करण्यात आले होते. तेव्हा ते म्हणाले होती की, 'आज सोनोपंत (मामा दांडेकर) आले नाहीत, यातही एक योग आहे. कारण पायाला धोंडाच लागतो. म्हणून माझी नियुक्ती. आता कळसाच्या समयी मामा येतील कारण कळसाला सोने लागले' (मामासाहेबांना 'सोनोपंत' असेही नाव असल्याने). महाराजांनी आपल्या विद्वतेचा टेंभा मिरवला नव्हता, उलट ते इतरांचा मोठा आदर, सन्मान करीत. प्रसंगाने सत्कारही करीत. महाराजांचे जीवन एका ईश प्रेषिताचे होते. 'तुका म्हणे मज धाडीले निरोप', या वचनाप्रमाणे महाराज कार्य करीत होते. आपले लौकिक व पारलौकिक जीवन सार्थकी लावले होते. श्री तुकाराम महाराजांच्या शब्दात सांगायचे झाल्यास म्हणता येईल की-

**'पावलो पंढरी क्षेम आलिंगनी ।**
**संत या सज्जनी निवविलो' ।।**

## ९. चालते बोलते धर्म-ज्ञानपीठ

महाराजांच्या निधनानंतर अवघ्या महाराष्ट्राने त्यांच्याप्रती आपली आदरांजली समर्पित केली होती. शोकसभा, शोकप्रस्ताव झाले, अनेक नियतकालिकातून स्मृतिलेख प्रकाशित झाले. काहींनी तर त्यांच्या आयुष्यभराच्या कार्याचा त्रोटक आढावाही घेतला होता. तर कुणी स्मृती-विशेषांकही प्रकाशित केले होते. या सर्वातून 'महाराष्ट्र व वारकरी संप्रदाय एका विद्वान आणि खंबीर नेतृत्वाला मुकला आहे' हीच भावना व्यक्त झालेली होती. महाराज म्हणजे 'वारकरी संप्रदायाचे चालते बोलते ज्ञानपीठ-धर्मपीठ होते' आणि ते सत्यही होते. चातुर्मासातील पंढरपुरातील वास्तव्य असो, अथवा उर्वरित आठ महिन्यातील त्यांची दौऱ्यातील भ्रमंती असो, महाराज जिथे म्हणून मुक्कामाला असत, तिथे त्यांचे पाठ सुरु होत. विशेषत: साधक, अभ्यासकांच्या शंकांचे समाधान, संदर्भ ग्रंथांची माहिती यावर अधिक भर असे.

महाराजांनी आपल्या पूर्वायुष्यात वारकरी संप्रदायाच्या प्रस्थानत्रयीचा तसेच वेद-वेदांतांचा, पुराणे-शास्त्रांचा सखोल अभ्यास तर केलेला होताच, शिवाय असंख्य

संस्कृत-प्राकृतातील ग्रंथांचे वाचनही केलेले होते. त्याचबरोबर काशीचे पंडित श्री राजेश्वरशास्त्री द्रवीड, कांची कामकोटीपीठाचे शंकराचार्य, स्वाध्याय परिवाराचे श्री. पांडुरंगशास्त्री आठवले, संत श्री दासगणु महाराजांचे मानसपुत्र ह. भ. प. अनंत शास्त्री आठवले, रामकृष्ण मिशनची दीक्षा घेतलेले राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक श्री. गोळवळकर गुरुजी - अशा अनेक अभ्यासकांशी शास्त्रांचे कूट अर्थ, सिद्धांत व आधार शोधण्यात महाराज तल्लीन व्हायचे. यात वारकरी संप्रदायातील जाणत्या, विद्धतजनांचा, अभ्यासकांचा तथा समीक्षकांचाही सहभाग असायचा या कार्याबरोबर महाराजांना कधी कधी गादीच्या, फडांच्या वा दिडींच्यामधून निर्माण झालेले वादही सोडवावे लागत असत.

चातुर्मासाव्यतिरिक्तचा आठ महिन्यांचा कालावधी हा त्यांच्या अनेक कार्यक्रमांनी भरगच्च भरलेला असे. प्रवास, कीर्तन, प्रवचने, व्याख्याने, सप्ताहांचे कार्यक्रम, उद्‌घाटने, सभांचे अध्यक्षपद यातून तर ते अडकलेले असत. परंतु गावोगावी भेटावयास येणाऱ्या मान्यवरांच्या गाठीभेटीत व जुन्या आठवणींना उजळा देण्यातही त्यांचा वेळ जायचा. चातुर्मासात मात्र दगदग नसल्याने त्यांच्या मनाला स्वस्थता देणारा, चिंतन-मनन-लेखनाला पूरक ठरणारा कालावधी असायचा. या काळातील कीर्तन-प्रवचनाद्धाने त्यांनी अनेक विषय उलगडून सांगितले. दिवसभरात महाराजांचा आवाज पंढरपूरात कुठे ना कुठे घुमतच असायचा. त्यांचे लेखनकार्य रात्री चाले. महाराजांनी एकूण नऊ ग्रंथ लिहिले ही संख्या जरी कमी असली तरी त्यात आलेल्या विषयांची संख्या मात्र असंख्य आहे. परिश्रमपूर्वक केलेला विद्याभ्यास आणि प्राप्तज्ञान सदैव इतरांना देण्याची त्यांची वृत्ती यामुळे त्यांच्याबद्दल समाजात सदैव आदर वाढतच राहिला होता. त्यांच्या ज्ञानदानाला वेळेचे बंधन नसायचे. काही प्राध्यापक तर चंद्रभागेच्या तीरावरही महाराजांकडून मार्गदर्शन घेत असत. म्हणूनच आज महाराष्ट्रातील कोन्याकोपऱ्यातून वारकरी कीर्तन-प्रवचनकारांचा आवाज येतो. त्यात वारकरी विद्यार्थी (साधक/भक्त) घडविण्यात महाराजांचा मोठा वाटा आहे.

चातुर्मासाव्यतिरिक्तच्या आठ महिन्यात महारांजांचे स्वत:वर स्वत:चे असे नियंत्रण नसे. लोकांच्या आग्रहाला, निमंत्रणांना विनंत्यांना बळी पडणारे महाराज,

या काळात स्वत:चे न राहता जनवादी बनलेले असायचे. या काळात प्रसंगपरत्वे द्यावयाचे लेखांचे लेखन, अभिप्रायासाठी वा प्रस्तावनांसाठी आलेल्या ग्रंथांचे वाचन व त्या संदर्भातील लेखन, शिवाय अन्य दैनंदिन कार्यक्रम यात ते अडकलेले असत. मात्र या सर्वांतून त्यांचा ज्ञानकुंड सदैव चालू असे. कुशाग्रबुद्धी, अलौकिक धारणा आणि प्रचंड विद्वता ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची वैशिष्ट्ये होती. या त्रिगुणांच्या साहाय्यानेच वेदांत, शास्त्र, न्याय, मीमांसा त्यातील गहन विचार त्यांनी आकलन पातळीवर आणले होते. महाराजांच्या कीर्तन-प्रवचनाचा श्रोता हा अधिकारी आहे की, विद्यार्थी आहे, अधिकारी आहे की, अनाधिकारी आहे, पापयोनी आहे की, श्रृताधीत आहे, ते हौसे-गवसे की नवसे आहेत, यांचा विचार न करता सर्वांना बरोबर घेऊन जाण्यातच महाराजांना समाधान वाटत असे. त्या दृष्टीने ते आपल्या कीर्तन, प्रवचनाची रचना मांडणी करीत. 'शतेषु जायते शूर: सहस्रेषुच पंडित: वक्ता दशसहस्रेषु।' त्यांचे बाबतीत ही उक्ती प्रचिती देणारी आहे.

महाराज कीर्तन-प्रवचने करीत ते व्यवसाय म्हणून, नाहीतर लोकांना काही सांगायचे या हेतूने. समाजापुढे जाण्यापूर्वी त्यांची स्वत:ची ज्ञानसाधना चालू असायची श्रोत्यांना नित्य नव्या ग्रंथाची ओळख करुन देण्याचाही त्यांचा अट्टाहास असायचा. एका विद्वानाला, चिकित्सक, मीमांसकाला अपेक्षित अशीच गोष्ट त्यांचेकडून सतत घडे. कीर्तन-प्रवचन हे परमार्थाचे साध्य नसून ते साधन आहे, हे श्रोत्यांना समजावून सांगत. त्यांनी कीर्तन, प्रवचनाद्वारा ना केवळ सदाचारी संस्कार करण्याची कार्य केले, तर नीतिमूल्यांचे, प्रबोधनाचे, ज्ञानभक्ती जोपासण्याचे, हरिभक्ती महिमा वाढविण्याचे विचार मांडले. ज्यांना आपले स्वत:चे स्वरुप कळत नाही आणि जे अविद्यारूपी निद्रेमुळे विश्वरुपी स्वप्ने पाहत होते, अशांना महाराजांनी उपदेशाने पण प्रेमाने जागृत केले. सर्वांना आत्मज्ञानाचा अधिकार आहे, असा त्यांचा दावा होता. म्हणून महाराजांनी जात, वर्ण, कूळ, परंपरा, संप्रदाय इ. चा भेद न पाहता सर्वांना सारखाच आत्मोपदेश केला होता. 'आत्मसाक्षात्कार करवून घेणे हाच जीवनाचा मुख्य उद्देश असावा' हेच त्यांचे सांगणे असे. याबरोबरच

समाजात धर्म-पंथ-देशाभिमान वाढीसाठीचे, लोकशिक्षणाबरोबर लोक जागृतीचेही कार्य करीत राहिले होते. परमार्थाची, अध्यात्माची, हरिभक्तीची गंगा घराघरात पोहोचविण्याचे कार्य अखेरपर्यंत करतांना महाराजांनी दारी आलेल्या प्रत्येक साधक ज्ञानभक्ताला आपल्या ज्ञानाची पुंजी देण्यात आपला हात कधीच आखडता घेतला नव्हता. 'महाराज म्हणजे वारकरी संप्रदायातील चालते बोलते ज्ञानपीठ होते, ते धर्मपीठ होते', असे जे म्हटले जायचे, ते या अर्थाने सत्यच होते.

**बिनविरोधी नेता–**

आषाढी-कार्तिकी वारीच्या निमित्ताने येणारे भाविक श्री विठ्ठलाच्या दर्शनानंतर नगर प्रदक्षिणा करुन देगलूरकरांच्या मठास भेट देत असत. त्याशिवाय पंढरपूर सोडत नसत. महाराजांच्या निधनाने वारकरी समाजातील चैतन्य कमी झाले. त्यांच्या निधनानंतर त्यांना आदरांजली वाहणाऱ्यांची संख्या तर लक्षणीय होती. या प्रत्येकाच्या प्रतिक्रियेतून त्यांची महाराजांसंबंधीची निष्ठा, आदर, भक्ती तथा आस्था व्यक्त झालेली होती. शिवाय महाराजांचे संप्रदायातील स्थानही स्पष्ट होत गेले होते. आदरांजलीतील मोजक्या प्रतिक्रिया अशा -

१. श्री ज्ञानेश्वरीचा सर्वांगीण अभ्यासक, व्यासंगी आणि अपूर्व प्रतिभेचा हा उपासक म्हणजे ज्ञानेश्वरीचा चालताबोलता ज्ञानकोशच होय.

- भागवताचार्य वा. ता. उत्पात, पंढरपूर

२. वारकरी संप्रदायाचा मेरुमणी.

- ना. सुशिलकुमार शिंदे, नगरविकास मंत्री

३. पंढरपुरातील चातुर्मासाचे वैभव.

- डॉ. गोपाळ बेणारे, पंढरपूर

४. आपल्य विद्वत्तेचा अहंकार न बाळगणारे ते एक सत्पुरुष तर होतेच, शिवाय सर्व फडकरी, दिंडीवाले यांच्यात मिळून-मिसळून राहत असल्याने ते खऱ्या अर्थाने जनवादी होते.

- सोपानकाका देहूकर-देहूफड

५. वै. मामासाहेब दांडेकर यांच्याबरोबर उभ्या महाराष्ट्राला भक्तिमहिमा ज्ञान करुन देणारा, वेदांत सोपा करणारा आणि भक्तिभावनेचा हस्त जनमानसावर उमटविणारा थोर उपासक.

- डॉ. नरेन्द्र कुंटे, सोलापूर

संप्रदायातील महाराजांचे स्थान निश्चित करण्यात वरील विधाने पुरेशी आहेत. कोणतीही निवडणूक न लढविता लाखो वारकऱ्यांचे आणि वारकरी संप्रदायाचे नेतृत्व करणारे ते एक बिनविरोधी नेता होते.

-----------

ह. भ. प. (वै.) धुंडा महाराज देगलूरकर :
व्यक्ती व कार्य

॥ ४ ॥

# सांप्रदायिक व सामाजिक कार्यातील योगदान

१. प्रास्ताविक
२. श्री ज्ञानेश्वरी निष्ठा
३. चातुर्मासातील प्रवचने
४. सांप्रदायिक कीर्तन सेवा
५. सांप्रदायिक शिक्षणाचे अध्यापक
६. ब्रह्मविद्येचा सुकाळ
७. अभ्यासकेंद्राची उभारणी
८. ज्ञानेश्वरीचा तेलगू अवतार
९. सांप्रदायिक आक्षेपांचे खंडन
१०. प्राचीन ग्रंथविचारांचे संवर्धन
११. अनेक संस्थांशी संबंध
१२. वारकरी कीर्तन संस्थेत अध्यापन
१३. त्रिविध साधनेची उपासना
१४. लोकजागरण
१५. ज्ञानोत्तर भक्ती व अद्वैताचा विचार
१६. अध्यापन कार्य
१७. संशोधनास प्रेरणा
१८. ज्ञानेश्वरी संपादन
१९. का दिक् ? सन्तो दिक् !
२०. वारकऱ्यांना आधार
२१. पानशेत पूरग्रस्तांना मदत
२२. संतसाहित्य संशोधन-प्रकाशनास शासनास मदत
२३. सांप्रदायिक लेखनामागील प्रयोजने

## १. प्रास्ताविक–

महाराजांच्या रुपाने वारकरी संप्रदायाला एक सुजाण नेतृत्व लाभलेले होते. सुजाण म्हणण्याचे कारण एवढेच की, ते ना केवळ संस्कृत वेदविद्यांचे पंडित होते, वा संतवाङ्मयाचे भावनिक भक्त होते. वेद वाङ्मय ते संतवाङ्मय यांचे ते चिकित्सक अभ्यासकही होते. यामुळे त्यांच्या भक्तीला डोळसपणा प्राप्त झाला होता, तोच दृष्टिकोन आयुष्यभर जपत त्यांनी समाजालाही डोळस भक्तिमार्गी बनविण्याचा प्रयत्न केला होता. परिणामी वारकरी समाजही सांप्रदायिक जाणिवेच्या उच्च पातळीवर गेला. वारकरी सांप्रदायिकांची ही वैचारिक प्रगती घडवून आणण्यात महाराजांनी आपले अवघे आयुष्य खर्ची घातले होते. एका विशिष्ट ध्येयाने व विचाराने भारावलेले त्यांचे मन, त्यांना कधी स्वस्थ बसू देत नव्हते. वयाच्या १७/१८ व्या वर्षी कीर्तनाच्या माध्यमातून हाती घेतलेली वीणा, पुढे सात दशके संप्रदाय सुधारण्यात वाजत होती. सत्तर वर्षेपर्यंत त्यांच्या वाणीला आणि लेखणीला विश्रांती म्हणून माहीत नव्हती. घरी असो वा घराबाहेर असो, त्यांचा ज्ञानयज्ञ सतत प्रज्वलितच असायचा, कीर्तनकार, प्रवचनकार वा व्याख्याते या भूमिकामधून त्यांनी सतत धर्म, पंथ, संस्कृती व समाज जागृतीचे कार्य केले. त्यांनी देशनिष्ठा, पंथनिष्ठा व धर्मनिष्ठा वाढीस लावली होती.

महाराजांचे वारकरी संप्रदायातील योगदान काय ? असा कुणी प्रश्न विचारतीलही, त्याचे उत्तर एकच, महाराजांचे पूर्ण आयुष्य वजा सांप्रदायिक कार्य बरोबर शून्य. याचा अर्थ महाराज जणू संप्रदायासाठीच जन्माला आले, शिकले, वाढले, कार्यरत झाले आणि संप्रदायाची सेवा करता करताच वैकुंठवासी झाले. अगदी अखेरच्या दिवसात त्यांचे श्री ज्ञानेश्वरी संपादनाचे कार्य चालूच होते. त्यामुळे त्यांच्या सांप्रदायिक निष्ठेला वा योगदानाला वेगळे परिमाण लावण्याचे कारणच पडत नाही. त्यांची संप्रदायनिष्ठा अतुलनीय होती. सांप्रदायिक साधनेशिवाय माणूस प्राप्तव्यापर्यंत जाऊच शकत नाही. श्री ज्ञानदेवांनीदेखील तेच म्हटले आहे -

**तैसा श्रीगुरु प्रसन्न होय । शिष्य विद्याही कीर लाहे ।**
**तरी ते फळे संप्रदाये । उपासिलिया ।।**

## २. ज्ञानेश्वरी निष्ठा

श्री ज्ञानेश्वरीची सेवा ही देगलूरकर घराण्याचा जणू कुळाचार होय. त्यांच्या मूळ पुरुषापासून (श्री गुंडानाथ महाराज-पहिले) चालत आलेला तो उपासना मार्ग होय. चातुर्मासातील पंढरपूरचे वास्तव्य, नित्य चक्रीभजन, अयाचित वृत्ती, ज्ञानेश्वरीचे पठण-अध्ययन, अखंड नामसप्ताह, दैनंदिन स्वरुपाची प्रवचने आणि प्रसंगाने कीर्तन सेवा इ. अनेक गोष्टी कुलपरंपरेने चालत आलेल्या होत्या  या सर्वांना दीर्घकालीन परंपरेचे पाठबळ लाभलेले असल्याने, या सर्वांशी आणि यातील ज्ञानेश्वरीशी समरुप होणे ही महाराजांच्या बाबतीतील सहजरुप गोष्ट होती.

ज्ञानेश्वरीने मराठी मनावर सातशे वर्षांपेक्षाही अधिक काळ आपले साम्राज्य केले आहे. ज्ञान आणि भक्ती, विचार आणि भावना, अध्यात्म आणि रसवत्ता, पांडित्य आणि कवित्व यासारख्या अनेक गुणांचा संगम ज्ञानेश्वरीच्या ठायी झालेला आहे. 'ती जणू महाराष्ट्र शारदेच्या तनूवरील एक देखणा अतुलनीय असा अलंकार आहे', असा ज्ञानेश्वरीचा गौरव केला जातो. तिच्या भाविकांनी जसा आदर केला तसा सारस्वतांनीही तिचा स्वीकार केला आहे.

**'तदितं गीता शास्त्रं समस्त वेदार्थ सार संग्रह भूतम्।'**

असे श्रीमत् भगवत् गीतेचे स्वरुप विशद केले जाते. (गीता एक शास्त्र असून तिच्यात सर्व शास्त्रांचे सार आहे. अशा या गीतेवरील मराठी भाषेतील अलंकार म्हणजे श्री ज्ञानदेवांची ज्ञानेश्वरी होय. (गीता अलंकरो नाम ज्ञानेश्वरी।) अशा या ज्ञानेश्वरीशी महाराजांचे प्राणपरौते व जिव्हाळ्याचे नाते जोडले गेले होते.

वयाच्या पंधराव्या वर्षी महाराजांनी श्री ज्ञानेश्वरी हातात घेतली होती आणि तिच्यावरील भाष्याला प्रारंभ करण्यापूर्वी तिची १०८ पारायणे करुन ती पूर्ण मुखोद्गतही केली होती. या अध्ययनातून प्राप्त झालेले ज्ञान समाजाला देण्यासाठी महाराजांनी आपल्या कीर्तन-प्रवचन सेवेस प्रारंभ केला होता. त्यांचे ज्ञानेश्वरीवरील प्रवचन म्हणजे अमृतप्राशनाचा आनंद असायचा. इथे संस्कृत भाषेच्या ग्रंथांच्या आणि

ग्रंथकारांच्या अध्ययनाने भक्तीला डोळसपणा प्राप्त झालेला होता. 'ज्ञानाविण भक्ती फोल' हे सूत्र अभ्यासलेल्या महाराजांनी वेद, शास्त्रे, पुराणे, भागवत, गीता इत्यादी ग्रंथांच्या अध्ययनाने आपल्या ज्ञानाचा पाया भक्कम केलेला होता व नंतरच त्यास भक्तीची जोड दिली होती. परिणामी ज्ञानेश्वरीचे सार, महात्म्य आणि तत्त्वज्ञान समाजातील सामान्य लोकांपर्यंत सहज सोप्या भाषेत नेऊन पोहोचविणे महाराजांना शक्य झाले होते. आपल्या अमोघ वाणीतून - वाग्विलासातून ज्ञानेश्वरीतील प्रत्येक ओवीचा अर्थ, प्रमेय व भावस्पर्श श्रोत्यांच्या मन:पटलावर उमटविण्याची त्यांची हातोटी अलौकिकच होती. एका बाजूस श्रोत्यांची अंत:करणे हलवून सोडतांना दुसऱ्या बाजूस त्यांना भगवत् भक्तीकडे आकृष्ट करण्याची जादू त्यांच्या वाणीत होती. ज्ञानेश्वरी कशी सोडवावी याचे पूर्ण ज्ञान त्यांना ज्ञात होते. म्हणूनच ज्ञानेश्वरीवर भाष्य करणारा आणि भागवत धर्माची पताका फडकत ठेवणारा एक सिद्धहस्त व श्रेष्ठ प्रवचनकार म्हणून वारकरी संप्रदायातील त्यांचे स्थान उच्चश्रेणीतले होते.

ज्ञानेश्वरीतील 'साहित्य सोनियाच्या' खाणीतून आजपर्यंत अनेक भाष्यकारांनी आपल्या कुवतीनुसार ज्ञानरत्ने शोधून काढली असली, तरी त्या सर्वांपेक्षा वेगळ्या मार्गाने जाणाऱ्या महाराजांनी ज्ञानेश्वरीचा सूक्ष्म अभ्यास करुन ज्ञानेश्वरीचे एक श्रेष्ठ प्रवचनकार व टीकाकार म्हणून नावलौकिक मिळविला होता. पंढरपूरच्या देगलूरकर मठाला आपल्या अधिकाराने भागवत धर्माच्या ज्ञानपीठाची प्रतिष्ठा प्राप्त करून दिली, एवढेच नव्हेतर या ज्ञानपीठाचे कुलगुरुपदही त्यांनी सांभाळले होते.

महाराजांनी सुमारे सात दशके हा वाग्यज्ञ सतत तेजाळत ठेवला होता. त्यासाठी सारा महाराष्ट्र, विठ्ठल प्रेमी कर्नाटक आणि आंध्र या प्रदेशात दौरे केले. अशा दौऱ्यातून ज्ञानेश्वरीबरोबर अन्य संतवाङ्मय, संस्कृती संवर्धन, धर्मरक्षण आणि राष्ट्रप्रेम यासारख्या त्यांच्या जिव्हाळ्याच्या विषयावर ते बोलत असत. त्यामुळे त्यांचे कार्य 'चालत्या-बोलत्या विद्यापीठा' सारखे झाले होते. भक्तिरसाची अमृतगंगा महाराष्ट्राबरोबर लगतच्या प्रदेशातही सतत दुधडी प्रवाहित ठेवली होती.

**तैसा वाग्विलास विस्तारू । गीतार्थेसी विश्वभरू ।**
**आनंदाचे आवारू। मांडू जगा ।।**

या श्री ज्ञानदेवांच्या भूमिकेशी एकरूप झालेल्या महाराजांनी आपल्या जीवनाचे तेच ध्येय व कार्यसिद्धी ठेवली होती. 'ज्ञानोक्ति' त्यांच्या जीवनात सार्थ झाल्यानेच ते जणू सर्वत्र ब्रह्मविद्येचा आनंदाने वर्षाव करु शकले. आयुष्याच्या अखेरच्या काळात प्रकृती अस्वास्थ्याने त्यांच्या ज्ञानेश्वरी सेवेत खंड आला होता. तरीही त्यांचे ज्ञानेश्वरी संपादनाचे कार्य चालूच होते. डॉक्टरांनी बोलण्यास मनाई करताच महाराज म्हणाले, 'ज्ञानेश्वरीवर बोलणे हे माझे जीवनव्रत आहे, नव्हे ते माझे जीवन आहे, ज्ञानेश्वरीवर बोलायचे नसेल तर मी जगायचे कशासाठी ? माझ्या जीवनातून ज्ञानेश्वरी वजा केली तर माझे जीवन शून्य आहे' त्यांची ही भूमिका त्यांच्या जीवननिष्ठेची द्योतक होय. त्यांची ज्ञानेश्वरी निष्ठा म्हणजे ज्ञानेश्वरीशी समर्पित झालेल्या भावजीवनाचे सारूप दर्शन होय.

आयुष्याच्या अंतिम टप्प्याच्या (अखेरच्या) तीन-चार वर्षात त्यांनी ज्ञानेश्वरी विवरणात्मक ग्रंथ लिहिण्यास प्रारंभ केला होता. दिवसभर लिहिणे, सांगणे, टिपण-टाचणे काढणे हे कार्य चाले. कधी चर्चाही चाले, चिंतन मात्र रात्रीचे. पुन्हा पहाटे उठून दिवसभरातील झालेल्या लिखाणाचे परत वाचन करायचे. पहाटे तीन ते रात्री दहा असे दिवसाचे १६-१८ तास काम चालायचे. त्यांच्या या कार्यात त्यांना प्रामुख्याने साथ मिळाली ती सोलापूरचे ज्ञानेश्वरी भक्त ह. भ. प. दा. का. तथा भाऊ थावरे यांची. महाराजांनी सांगावे व श्री. भाऊंनी लिहावे असा दिनक्रम चाले. सुमारे चार हजार पानांचा हा हस्तलिखित स्वरुपातील ग्रंथ तयार झाला असून तो आता प्रकाशनाच्या मार्गावर आहे. तीन-चार खंडात प्रकाशित होणारी महाराजांनी संपादित केलेली ज्ञानेश्वरी वाचक, अभ्यासक, साधक इ. साऱ्यांना पूर्ण समाधान, आनंद देणारी ठरेल यात शंका नाही.

पुणे विद्यापीठाच्या वतीने झालेल्या सत्कार समारंभात बोलतांना महाराज म्हणाले होते की, मी 'पंढरपुरी आणि महाराष्ट्रभर सत्तर वर्षे ज्ञानेश्वरी कळावी म्हणून सांगितली. पण ती मलाही कळावी यासाठीही सांगत राहिलो, 'मी तुम्हा सर्वांचा ऋणी आहे.'

ज्ञानेश्वरीवर प्रचंड प्रभुत्व मिळविलेल्या महाराजांचे हे उद्‍गार त्यांच्यातील विनयशीलताच दर्शवते.

### ३. चातुर्मासातील प्रवचने

आषाढी एकादशी निमित्ताने देगलूरकरांचीही एक दिंडी पंढरपूरच्या दिशेने प्रवास करीत 'वाखरी'स यायची आणि तिथे आळंदी-देहूहून येणाऱ्या मुख्य पालखी सोहळ्यात सामावली जायची. ती त्या वारीचा घटक बनायची. श्री महिपती महाराजांच्या प्रकृती अस्वास्थ्यामुळे या दिंडीची जबाबदारी महाराजांकडे आली होती. वयाच्या केवळ सतराव्या वर्षापासून महाराजांनी या दिंडीचे नेतृत्व स्वीकारले होते. वारी पाठोपाठ सुरु होणारा चातुर्मास देगलूरकरांसाठी विशेष असायचा. म्हणजे या चार महिन्यांच्या कालावधीत देगलूरकरमठात नित्य आणि नैमित्तिक अशी कीर्तन प्रवचन सेवा सुरू व्हायची आणि अशी सेवा करणाराने हे चार महिने पंढरपुरात वास्तव्यास राहयचे, पंढरपुरातून बाहेर जायचे नाही असाही दंडक होता. (तो आजही आहे) श्री महिपती महाराजांच्या आजारपणाने महाराजांवर दुहेरी जबाबदारी आली होती. एकतर मठात नित्य-नैमित्तिक कीर्तन, प्रवचन, भजनाचे कार्यक्रम करायचे आणि दुसरे म्हणजे चार महिने पंढरपूर सोडायचे नाही. या दोन्ही जबाबदाऱ्या महाराजांनी आनंदाने स्वीकारल्या व पुढे सुमारे सात दशके त्याचे पालन केले.

चातुर्मासातील महाराजांचे पंढरपुरातील वास्तव्य म्हणजे अभ्यासक, साधक आणि मुमुक्षू यांच्या आनंदाचा पर्वकाळ असायचा. या काळात मठामध्ये सूर्योदयापासून तो अगदी मध्यरात्रीपर्यंत ज्ञानयज्ञ धगधगत असायचा. सकाळ-संध्याकाळची महाराजांची प्रवचने हे मठाचे विशेष आकर्षण असायचे.

या काळातील द्वादशी व्यतिरिक्त रोजची सकाळी आठची वेळ ही महाराजांच्या प्रवचनाची. बरोबर आठ वाजता 'पुंडलिक वरदा हरि विठ्ठल' चा जयघोष व्हायचा व प्रवचनाला प्रारंभ व्हायचा आणि पुन्हा बरोबर नऊ वाजता 'पुंडलिक वरदे' चा जयघोष होऊन प्रवचनाची समाप्ती व्हायची. श्रोत्यांनी आपली घड्याळे या वेळेत लावून घ्यावीत इतका वक्तशीरपणा असायचा. रोज ज्ञानेश्वरीतील एखादी ओवी (किंवा क्वचित तुकोबांचा एखादा अभंग) हा प्रवचनाचा विषय असायचा. त्यावर

एक तास भाष्य वा टीका चालायची. असा हा विहित स्वधर्मानुष्ठानाचा कार्यक्रम ईश्वरार्पण बुद्धीने अव्याहत चार महिने वक्तशीर व बिनतक्रार चाले. या काळात 'ज्ञानेश्वरी' वर प्रवचन चालत असले तरी विशेषत: अभ्यासक, साधक, समीक्षक चिकित्सक यांच्यासाठी ही प्रवचने अनेकदा विशेष ठरत. कारण न्यायशास्त्र, दर्शनशास्त्र, साहित्य, काव्यमीमांसा इ. दृष्टीने अभ्यासकांना ओव्यांचे विशेष दर्शन होत असे. म्हणून महाराजांच्या मुखातून बाहेर पडणारा प्रत्येक शब्द टिपून घेण्यासाठी अभ्यासक, साधक धडपड करीत असत. महाराजांची प्रवचने-कीर्तने ही समाज परिवर्तनाला पूरक असेही कार्य करणारी असल्याने, ही महाराजांची एक प्रकारे समाजसेवाच असे.

महाराजांच्या प्रवचनाची एक विशिष्ट धाटणी वा शैली होती. नित्यप्रवचनात ते आपण स्वत:च असंख्य प्रश्न उपस्थित करुन, त्यांची साधार व सोपपत्तिक उत्तरे देत असत. (इथे श्रोत्यांना प्रश्न पडोत वा ना पडोत, महाराज प्रश्न निर्माण करायचे व उत्तरे द्यायचे) परिणामी त्या विषयासंबंधी शंकास्थाने शिल्लकच नसायची.

महाराजांच्या प्रवचनातून (वा कीर्तनातून) त्यांच्या चौफेर व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडून यायचे. एरव्ही एखादा तत्त्वज्ञानाचा गाढा अभ्यासू निरनिराळ्या विचारप्रवाहाच्या छाननीतून इप्सित साध्य शोधता शोधता स्वत:च जडमूढ होताना दिसतात. परंतु महाराजांचे बाबतीत सारेच वेगळे होते. इथे आत्मभान व्यवस्थेचा मनोनिश्चय होऊन निरनिराळ्या तत्त्वप्रणालींचे वहाळ-ओहोळ एका गीतागंगेत जिथे मिळतात मिसळतात तिथेच डुंबून वर काठावर येऊन तुर्येच्या एका टेकडीवरुन त्या सर्व रुपमिलापिनी गंगेकडे व त्या मागल वहाळ ओहोळाकडे एकसमयावच्छदेकरुन पाहणाऱ्या महाराजांना त्यात लीलया अवगाहन करण्याची ताकद परमेश्वराने दिलेली असल्याने, तिथे भेदाभेदाला स्थानच नसायचे. देवदत्त ओघवतीवाणी आणि तिला कोणतीही बंधने घालू न शकणारे त्यांच्या स्मृतीतील प्रचंड पाठांतर इतक्या जलद गतीने मुखावाटे बाहेर पडत असत की, तिथे ऐकणाऱ्या श्रोत्यांचीच तारांबळ उडत असे. प्रवचनादरम्यान उद्धृत होणाऱ्या संतांच्या वाक्यरचनेतील विचारांची शास्त्रोक्त बैठकीच्या जाणिवेची

अढळ बैठक महाराजांचे ठायी होती. त्यामुळे कोणत्याही मतमतांतरातील विचारांशी वृत्तीतादात्म्य इतके निकटचे की, तो विचार तसाच घेणे सयुक्तिक वाटावे आणि ते सिद्ध करुन दाखविण्यासाठी लागणाऱ्या ज्ञानेश्वरी भागवतातील तद्र्थ ओव्या अथवा संतांच्या अभंगांची चरणे इतकी भरभरुन यायची की, जणू पंचपक्वान्नाचे ताटच घेऊन त्यांची स्मृतिदेवता समोर उभी ठाकल्यासारखे वाटावे.

प्रवचन ही ज्ञानदेवीची (ज्ञानेश्वरी व ज्ञानदेव यांची) सेवा असली तरी तो नित्य अभ्यासविषय मानणारे महाराज, प्रवचनातील प्रतिपाद्य विषयाचा अभ्यास करीत. त्यामुळेच त्यांच्या निरुपणाला सामर्थ्य यायचे. या संदर्भात ह. भ. प. श्री किसन महाराज साखरे यांनी लिहिले की, 'ते प्रवचनापूर्वी जो विषय प्रवचनाचा असेल त्याची पूर्वतयारी बारकाव्यानिशी करीत असत. इतर समर्पक अशी प्रमाणे शोधीत असत. संस्कृत व प्राकृत टीकांची तुलनात्मक सूक्ष्म पाहणी करुन त्यातील वैशिष्ट्ये चपलखपणे प्रवचनात सांगत असत. दृष्टांत कुशलताही त्यांचे ठायी होती. त्यांच्या प्रवचनात कठीण वेदांत व सुलभ भक्ती यांचा अपूर्व संगम झाला होता', तर भागवताचार्य वा. ना. उत्पातांनी म्हटले की, 'आपल्या रसाळ प्रवचनातून महाराजांनी वेदांताची गहन तत्त्वे, ईश संमित महावाक्याने, तर कधी संतांच्या कळवळ्याने, कधी मातेच्या वात्सल्याने तर कधी शास्त्रसंमत काटेकोरपणे विशद केली. साहित्याला संस्कृत टीकाकार 'कान्ता संमित उपदेश' म्हणतात. पण महाराजांनी साहित्य म्हणजे माता संमित उपदेश आहे हे माउलीच्या ज्ञानेश्वरीच्या उपदेशाने कथन केले.'

## ४. सांप्रदायिक कीर्तनसेवा

महाराष्ट्राच्या पारमार्थिक जीवनात भक्तियोगाचा विशुद्ध प्रवाह वैदिक काळापासून अखंडपणे, अव्याहतपणे आणि प्रभावितपणे प्रवाहित होत आलेला आहे. या अनन्यभक्तीनेच अध्यात्माचे बळ वाढविले आहे. परमेश्वर प्राप्तीसाठी (पर्यायाने मोक्षप्राप्तीसाठी) अन्य अनेक मार्ग उपलब्ध असले तरी त्यात नवविधा भक्ती श्रेष्ठ मानली गेली. त्या नवविधा भक्तीत कीर्तन भक्ती दुसऱ्या क्रमांकाची भक्ती. यातून निर्माण झालेल्या कीर्तनसंस्थेचीही परंपरा जुनी अगदी वैदिक

काळापासूनची आहे. 'ये वीणया उपगायन्ति ते धनसनयो भवन्ति।' असे वेदवचन आहे. तर ऋग्वेदात

**'यथविद ऋतस्य, गमैजनुषा पिपर्तत। आस्य जानन्तो नाम विवक्तन महस्ते सुमति भजामहे ।।२.२.२६।।**

असे वर्णन आले आहे. या संस्थेत महर्षी नारद व शुक या मुनिवर्यांचे मोठे योगदान आहे. म. नारदांना तर श्रीहरिकीर्तनाचे आद्य प्रवर्तक मानले गेले. त्यांच्या प्रमाणेच असित, देवल, व्यास आदी ऋषींनीही भगवत्कथा सांगितल्या. समाजातील दु:खाचा नाश आणि प्रत्येकाच्या प्रकृतीतील षड्विकारांचा अन्त होण्यासाठी प्रभावी उपाय म्हणजे भगवत्भक्ती होय असे ऋषी व संतांनी स्वानुभवाची जोड देत सांगितले. स्वत:चे जीवन सुखात परिवर्तित करतानाच इतरांच्याही सुखी-समाधानी जीवनाचा विचार करण्याचा मंत्र याच कीर्तनभक्तीच्या माध्यमातून ऋषी, मुनी, संत यांनी समाजाला दिला. यासाठी प्रामुख्याने ईश्वरभान, धर्मश्रद्धा, सत्यप्रियता, सदाचरण, त्याग, सेवा, बंधुभाव, सहकार्य व नैतिकता यांची गरज व या गुणांची सतत वृद्धी, आणि या सर्वाचे सतत स्मरण करून देण्याचे कार्य कीर्तन संस्था अविरतपणे करीत आलेली आहे.

**'कीर्तने स्वधर्म वाढे। कीर्तने चित्तशुद्धी जोडे।**
**कीर्तने परब्रह्म आतुडे। मुक्ती कीर्तनापुढे लाजुनि जाय।'**

असे संत एकनाथांनी कीर्तन भक्तीचे महात्म्य सांगितले आहे. एकीकडे भगवत भक्तीचा उपदेश करणाऱ्या संतांनी धर्मरक्षणाबरोबर धर्मबुद्धी, राष्ट्रनिष्ठा, सदाचरण, बंधुभाव, परस्पर सहकार्य आणि नैतिकता यांचे अनुष्ठान समाजात निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

ज्या काळात प्रचार-प्रसाराची साधने उपलब्ध नव्हती, त्या वेळी धार्मिक विचार जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचे कार्य कीर्तनकारांनी व कीर्तनसंस्थांनी केले व आजही करीत आहेत. अगदी स्वातंत्र्योत्तर काळातही (१९४७ नंतर) शासनाने कीर्तन प्रवचनाद्वारे काही सामाजिक संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला होता. त्यात कुटुंबनियोजन, प्रौढ साक्षरता, स्त्रियांचे शिक्षण, हुंडाबंदी, दारूबंदी, सर्वधर्म समभाव, आरोग्यासाठी स्वच्छतेची निकड इ. अनेक विषयांचा समावेश होता. वास्तविक सामाजिक प्रश्नांच्या प्रसारासाठी कीर्तन-प्रवचनाचे माध्यम योग्य की अयोग्य ?

याचा विचार अगदी वेगळा. हे विषय कीर्तनाच्या गादीवरुन संबोधित केले गेले तरी कीर्तन संस्था आपल्या मूळ उद्दिष्टापासून कधी दूर गेली नाही. अलीकडच्या काळात नारदीय, समर्थ, वारकरी अशा संप्रदायातून अनेक नामवंत कीर्तनकारांची फळीच निर्माण झालेली होती. यात वारकरी संप्रदायात सर्वश्री ह. भ. प. भाऊसाहेब काटकर, गुलाबराव महाराज, नाना महाराज साखरे, विष्णुबुवा जोग यांचा समावेश आहे.

सामान्यत: वारकरी संप्रदायी कीर्तनकार आपल्या कीर्तनात निरुपणादरम्यान अन्य संप्रदायी संतांच्या रचना, प्राचीन संस्कृत आणि मध्ययुगीन पंडिती काव्य यांचा आधार अभावाने घेतात. मात्र रामायण, महाभारत यातील कथा आणि भागवत, गीता अशा प्राचीन ग्रंथातील श्लोकांचा समावेश आवर्जून करतात. शिवाय ज्ञानेश्वर ते निळोबा यांचे अभंग, ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, नाथ भागवत या वारकरी संप्रदायाच्या अर्वाचीन गीतेचा समावेश अटळ असतो. मात्र याला महाराजांचे कीर्तन अपवाद ठरायचे. त्यांच्या निरुपणात पांडित्याचा प्रभाव जाणवायचा त्यांच्या निरुपणात वारकरी संतांच्या रचना शिवाय हिंदी संतांच्या रचना, समर्थ रामदासांच्या मनाचे श्लोक इ. प्राकृतवाङ्मय यायचेच पण त्याचबरोबर गीता, पंचदशी, योगमार्ग, हठयोग प्रदीपिका, योग वासिष्ठ, न्यायशास्त्र, विष्णुसहस्त्रनाम, भागवत, ब्रह्मसूत्र, विष्णुपुराण, स्कंदपुराण, गरुडपुराण, वेदांत, मुण्डक, भावार्थ रामायण इत्यादी प्राचीन ग्रंथातील दाखले सहजपणे अवतरत असत. प्राचीन ग्रंथातील वाङ्मय संस्कृतनिष्ठ आणि वेदांतनिष्ठ काठिण्याने भरलेले असले तरी महाराजांच्या मुखातून बाहेर पडतांना त्यातील अनाकलनीयत्व दूर होऊन ते सारे सामान्यांच्या आकलनाच्या पातळीवर यायचे. त्यामुळे त्यांचे कीर्तन पांडित्यपूर्ण जडत्वाकडे कधी झुकले नव्हते. महाराजांनी शहरांपेक्षा ग्रामीण भागात अधिक संचार केला होता. तेथील जनतेचा पारमार्थिक ज्ञानाचा, अभ्यासाचा आवाका लक्षात घेऊनच ते आपली कीर्तनशैली बदलत असत. त्यांचे कीर्तन म्हणजे भक्ती व ज्ञान यांचा अनुपम संगम असायचा. श्री नामदेव महाराज जन्मसप्तशताब्दिनिमित्त, पंढरपुरातील नगरपालिकेजवळील वाळवंटात झालेल्या महाराजांच्या कीर्तनास अक्षरश: लाखांपेक्षा अधिक लोक उपस्थित होते. उपस्थितात तत्कालीन महाराष्ट्र राज्याचे शिक्षण मंत्री ना. मधुकरराव चौधरी होते. ते तर भारावून गेले होते. महाराजांच्या कीर्तनाचे वैशिष्ट्य भागवताचार्य

वा. ना. उत्पात ( पंढरपूर ) यांनी म्हटले की, 'महाराजांना संगीताची उत्तम जाण होती, स्वरज्ञान होते. त्यामुळे ते कीर्तन श्रवणीय होत असे, रुक्ष व गद्य विवेचन त्यांच्या कीर्तनात कधी नसायचे. संगीत, विद्धत्ता व वक्तृत्व यांचा मनोहरी संगम म्हणजे महाराजांचे कीर्तन. श्री ज्ञानदेवांनी पाया रचलेले, नामदेवांनी कीर्तनरंगी रंगवलेले, नाथांनी खांब उभा केलेले आणि तुका कळस झालेले भागवत धर्माचे मंदिर धुंडा महाराजांनी आपल्या कीर्तनाने अखंड जागविले. 'कलौतत् हरिकीर्तनात्' (कलियुगात हरिकीर्तनानेच मोक्ष मिळतो) हे श्रीमद् भागवताचे वचन शिरसावंद्य मानून ते कीर्तनाचे रंगी नाचले. जगी ज्ञानदीप लावले. नाथांच्या म्हणण्यानुसार त्यांनी आपल्या कीर्तनात 'भक्ति ज्ञानाविण इतर गोष्टी' कधी केल्या नाहीत. श्रवणं कीर्तन विष्णोः स्मरणं - या नवविधा भक्तिपैकी कीर्तनभक्ती मनोभावे आचरली. त्यांच्या कीर्तनात श्रोते रंगून जात. महाराज तर दंग होत, देहभान हरपत. वक्ता व श्रोता यांचे द्वैत सुटून अद्वैत निर्माण होई. मुमुक्षू चातकावर ज्ञानचंद्राचे चांदणे बरसून त्यांच्या उपवासाचे पारणे फिटत असे. नादब्रह्मात सारेच रंगून जात, लीन होत.' विनायक बुवा साखरे, केशव महाराज देशमुख, दादा महाराज सातारकर, मारुती बुवा गुरव, बंकट स्वामी, श्रीकृष्णदास लोहिया, गुंडा महाराज देगलूरकर (२), बाबाजी महाराज पंडित, शं. वा. तथा मामासाहेब दांडेकर, गोपाळ बुवा रिसबुड, स. के. तथा रावसाहेब नेऊरगांवकर, खंदारकर महाराज अशा अनेक नामवंत, समर्थ मंडळींचा यात समावेश आहे. यातील आणखी एक महत्त्वपूर्णा नाव म्हणजे ह. भ. प. धुंडा महाराज देगलूरकर, वै. विष्णुबुवा जोग महाराजांची परंपरा चालविणारे ह. भ. प. बंकट स्वामी आणि मामासाहेब दांडेकर यांनी कीर्तनद्वारे जी संप्रदायाची सेवा केली होती, त्यात महाराजांनी कमीपणा तर आणू दिला नाहीच उलट अधिक सेवा करुन श्रोतृसमाजाचा आदर संपादन केला होता.

हरिकथा म्हणजे समोर असलेल्या सगुण साकार परमेश्वराचे वर्णन करणे. उपासकाने आपल्या प्रिय परमेश्वर रुपाचे अनन्य भक्त होऊन त्याचे केलेले गुणगान. (अर्थात 'सर्व देव नमस्कार : केशवं प्रति गच्छति' - या भूमिकेतून) कर्मकांडाच्या आहारी जाण्यापेक्षा अंतर्गत शुद्धतेला (आत्मशुद्धीला) महत्त्व देवून शुद्ध चारित्र्याचा माणूस घडविणे हेदेखील कीर्तन संस्थेचे एक ध्येय होते, आजही आहे.

शील संवर्धनाने समाज भरीव कार्य करु शकतो हे जरी खरे असले तरी, शुद्ध चारित्र्याचा व शीलसंपन्न व्यक्तिमत्त्वाचा माणूस घडविण्याचे कार्य मात्र कीर्तनाद्धारे अत्यंत प्रभावीपणे होऊ शकते ही गोष्ट निर्विवाद होय.

वरील सर्व उद्दिष्टांना धरुनच महाराजांची कीर्तनासंबंधीची विचारसरणी होती. त्यांचे कीर्तन म्हणजे विचारांचा आणि गुणांचा अनेक पदरी सौंदर्य पद्धतीत विणला गेलेला गोफच असायचा. तिथे ज्ञान व भक्ती यांचे मूळ अधिष्ठान असायचेच, शिवाय समाजकारणातील डोळसपणा, राजकारणातील दांभिकपणा वा. (भोंदूगिरी) आणि धर्माबद्दलचा जाज्वल्य अभिमान यांचे प्रसंग रुपाने दर्शनही घडायचे. सर्व मराठी संतांनी लौकिक आणि पारलौकिक यांचा विचार समग्रतेने आणि साकल्याने केलेला आहे. श्री ज्ञानदेवांनी तो ज्ञानाच्या पातळीवर नेला, तर नामदेवांनी तो भक्तीच्या पातळीवरुन अत्यंत प्रभावी केला. महाराष्ट्रात असे अनेक संत होऊन गेले. प्रत्येकाची जातकुळी वेगवेगळी होती, तरीही त्या सर्वांची विठ्ठलापाशीची भक्तीची कुळी मात्र एकच होती. प्रत्येक संताची कविप्रवृत्ती, वृत्तीभेद, जीवनविषयक दृष्टिकोन आणि जीवनदृष्टीची स्पष्टता यामुळे; महाराष्ट्रातील कर्मयोगात्मक विचारदर्शनातील सामावली गेलेली, अनेकतेतील एकता या साऱ्यांचे दर्शन महाराजांच्या कीर्तनातून यथेच्छपणे होत असे. सर्वच सांप्रदायिक संतांनी केलेला कर्म, ज्ञान, भक्तिपर विचार हे शेवटी एका ईश्वरमीमांसेत एकरुप होत असतात. फरक असतो तो प्रत्येकाच्या स्वतंत्र अशा धाटणीचा. मग तिथे ज्ञानदेवांचा ज्ञाननिष्ठ स्वरुपी अध्यात्म मार्ग असो, वा तुकाराम महाराजांचा भावनिष्ठ अध्यात्म मार्ग असो. हे सारे प्रवाह एका ईश्वरभक्तीशी कसे एकनिष्ठ होत याचे परिपूर्ण ज्ञान महाराजांच्या कीर्तनातून होत असे. 'कीर्तन चांग, कीर्तन चांग। होय अंग हरिरुप।' या तुकाराम महाराजांच्या उक्तिप्रमाणे महाराज कीर्तनात हरिरुप होत असत.

महाराजांच्या कीर्तनात कधी कधी चालू परिस्थिती वा विशेषत: आपल्या सरकारने स्वीकारलेल्या निधर्मीपणाच्या राजकीय भूमिकेवर टीकेचा अंतर्भाव असायचा तरीही महाराजांचे कीर्तन कधी 'राष्ट्रीय कीर्तन' या संज्ञेत मोडणारे नव्हते. त्यांच्या

कीर्तनातील समाजकारण वा राजकारण यांचा उल्लेख केवळ सामाजिकतेचे भान स्पष्ट करणारा असायचा तिथे मूळ विषय असायचा तो केवळ भगवत् भक्तीचाच ! त्यांची ध्येयात्मकता, समाजाविषयींची तळमळ, आवेश, कीर्तनाची ओढ हे सर्व पाहता 'नाचूं कीर्तनाचे रंगीं । ज्ञानदीप लावू जगीं ।' यासाठीच त्यांनी जणू जन्म घेतला होता  की काय असे वाटायचे.

शुचिता, सभ्यता, संयम, सहिष्णुता, सेवा व साधुपणा या बहुगुणांनी वाहणारी ही गंगा आपल्या आयुष्यभर सर्वांना पवित्र करीत राहिली होती. त्यांनी स्वत:ही जीवनाचा आनंद घेतला आणि इतरांनाही तो उपभोगण्यास समर्थ केले होते. बुद्धीची गंभीरता, भक्तीची अनन्य कोमलता, स्वभावातील ऋजुता, वागणुकीतील सभ्यता यांनी युक्त असलेले महाराजांचे व्यक्तिमत्त्व, संतत्वाच्या मांगल्याने आणि मातेच्या वात्सल्याने खेड्यापाड्यातून, नगर-शहरातून, वाडी-वस्त्यांतून, घराघरातून सतत फिरत राहिलेले आणि प्रत्येकाला सद्‌गुणांचे, बोधामृताचे आणि मांगल्यवर्धनाचे धडे देणारे ते एक चालतेबोलते ज्ञानपीठच होते. त्यांच्या कीर्तनास (विशेषत: परगावी-दौऱ्यावर) चांगले साथीदार, टाळकरी असले तर त्यांचे कीर्तन म्हणजे, 'अंतरीचें धावें स्वभावें बाहेरी।' याचाच अनुभव यायचा.

वयाच्या केवळ १७-१८ व्या वर्षीच महाराजांच्या गळ्यात कीर्तनाची वीणा आली होती अन् महाराज कीर्तनकार झाले होते. आषाढ शुद्ध एकादशी या शुभ मुहूर्तावर त्यांनी पहिले कीर्तन केले व पुढे सुमारे सात दशकेपर्यंत आपल्या अमृतवाणीने सारा महाराष्ट्र भक्तिचिंतनात चिंब भिजवून टाकला होता. भक्तीबरोबरच धर्म-रक्षणावरही त्यांचा भर असे. विशेषत: स्वातंत्र्योत्तर काळात पुरोगामीत्वाकडे आणि पाश्चात्त्य विचार सुधारणांकडे झुकलेला हिंदुसमाज 'हिंदुत्त्वा' बद्दल दुर्बळ बनत होतांना त्यांनी पाहिले, तेव्हा आपल्या कीर्तनातून (विशेषत: शहरी भागातून) धर्मरक्षणास प्राधान्य देण्याचे कार्य महाराजांनी केले होते. या सर्व गोष्टी पाहता महाराजांचा अंतरहेतु स्पष्ट होत होता.

**'दिसो परतत्त्व डोळा। पाहो सुखाचा सोहळा।**
**रिघो महाबोध सुकळा। माजी विश्व।।'**

सभोवतालचे जग असे व्हावे ही त्यांची अपेक्षा, इच्छा होती आणि त्यासाठीच त्यांनी आपला देह समाजकार्यासाठीही, समाजजागृतीसाठीही कारणी लावला.

**'सहजचि वडिला होती सेवा। म्हणोनि पूजितो या देवा।'**

कीर्तन हे समाज सेवेचेही माध्यम मानत त्यांनी कीर्तन हा आपला धर्म मानला होता, आणि अखेरपर्यंत या धर्माचे पालनही केले होते.

### ५. सांप्रदायिक शिक्षणाचे अध्यापक

महाराष्ट्रात सुमारे चार दशके आदरणीय श्री मामासाहेब दांडेकर आणि ह.भ.प. धुंडा महाराज देगलूरकर या वारकरी संप्रदायातील राम-लक्ष्मणाच्या जोडीने आपल्या संप्रदायाची पताका सतत फडकत ठेवली. यादरम्यान दोघांनीही कीर्तने, प्रवचने, व्याख्याने आणि श्री ज्ञानेश्वरी पारायण सप्ताहाच्या निमित्ताने सारा महाराष्ट्र ढवळून काढला होता. वारकरी संप्रदायाची ओळख नव्याने करून देणे हे त्यांचे उद्दिष्ट नव्हते, तर वारकरी संत आणि संप्रदाय यांच्या संदर्भातील समाजमनातील गैरसमज दूर करणे, सुशिक्षित वर्गाला संप्रदायाकडे आकर्षित करणे ही प्रमुख उद्दिष्टे होती. त्याशिवाय संतांच्या जीवनातील चमत्कारांचे समर्थन करणे, भक्तिमार्गा संदर्भात समाज मनात यथार्थ ज्ञानाचे रोपण करून ते वृद्धिंगत करणे आदी गोष्टींनाही चालना द्यावयाची होती. यात आणखी एक महत्त्वाचा उद्देश म्हणजे अहिंदु धर्मीयांकडून हिंदुधर्मावर, समाजावर वा व्यक्तींवर धर्माच्या माध्यमातून आणि धार्मिक स्वरूपाची होत असलेली आक्रमणे थांबवणे, धर्मांतरासाठी विविध प्रकारची आमिषे दाखवून हिंदू व्यक्ती धर्मांतरित केल्या जात होत्या. याचबरोबर समाजात धर्मनिष्ठता आणि धर्माभिमान निर्माण करण्याच्याही उद्देशाने या दोघांनी महाराष्ट्र आणि प्रसंगी महाराष्ट्राबाहेर अनेकदा दौरे केले. तत्पूर्वी वारकरी संप्रदायातील प्रस्थानत्रयीतील (श्री ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत व तुकाराम गाथा) अविनाशी आणि मोक्षदायी विचार समाजासमोर मांडण्याचे कार्य सुरूच केले होते. यात आणखी भर घातली ती नीतिविचारावर अधिष्ठित असणाऱ्या समाज उभारणीची. समाजमनाचे शुध्दीकरण !

समाजमनाचे शुध्दीकरण. शब्द दोनच असले तरी कार्य मात्र प्रचंड अवघड होते. समाजातील, विशेषत: सुशिक्षित, शहरी समाज परकीयांच्या सहवासाने, अंधानुकरणाने. शिक्षणाने स्वसंस्कृतीपासून, स्वधर्मापासून दुरावल्याचे दृश्य जाणवत होते. महाराजांनी आपल्या सांप्रदायिक कार्याची दिशा निश्चित करतांना समाजाच्या विशुद्धतेला महत्त्व दिले. त्यासाठी स्वजनांसमोर (विशेषत: शहरी अन् सुशिक्षितांसमोर) संतचरित्रे, त्यांची शिकवण व विचार आणि धर्म-विचाराधिष्ठित समाज संघटन विस्तृतपणे मांडावयास प्रारंभ केला. जो समाज अविवेकाप्रत झुकल्याचे जाणवत होते त्याला अविवेकी विचारांपासून परावृत्त करण्याचे आव्हान त्यांनी जणू स्वीकारले होते. विशुद्ध चारित्र्य, नैष्ठिक ब्रह्मचर्य, निरहंकार वृत्ती, नि:स्वार्थ, औदार्य, लीनता आणि समानता यासारख्या गुणांनी युक्त असणाऱ्या समाजाचे चित्र महाराजांनी आपल्यासमोर उभे केले होते. त्यासाठी अर्थातच समाजातील अविचार, दुराचार, द्वेष, वैरत्व आणि मुख्यत: व्यसनाधीनता यासारख्या दुष्ट प्रवृत्ती नष्ट होण्याची गरज होती. यासाठी महाराजांनी वारकरी संप्रदायाच्या अनुययाचा मार्ग निवडला. हजारो लोकांना या संप्रदायाची दीक्षा देत हरिनामाचा मंत्र आणि गळ्यात तुळशीमाळ घालून त्यांचे शुध्दीकरण सुरु केले होते. कित्येकदा या परिघाबाहेरील मंडळीनांही त्यांनी या संप्रदायात सामावून घेताना चित्तशुध्दीला प्राधान्य दिले होते. यातून हजारो लोक व्यसनमुक्त झाले. त्यांचे जीवन सुधारले गेले. ज्ञानेश्वरादी संतांनी प्रतिपादन केलेली सांप्रदायिक आचारसंहिता समाजासमोर ठेवीत, जीवनाच्या यथार्थतेसाठी ती कशी आवश्यक आहे हे समाजाला समजावून सांगितले. यासाठी प्रसंगी अनेक नियतकालिकातून प्रबोधनपर लेखन करून समाजाला जीवनसंपन्नतेची दिशा दाखविली होती. अशा अथक कार्यानेच ते सांप्रदायिक शिक्षणाचे 'अध्यापक' बनले होते.

### ६. ब्रह्मविद्येचा सुकाळ

**शास्त्रेषु निष्ठा सहजश्च बोध:। प्रागल्भ्यमभ्यस्त गुणाच वाणी।**
**कालाव बोध: प्रतिमा नवत्वम्। एते गुणा: कामदुधा: क्रियासु।।** भवभूती

या कविवचनाप्रमाणे महाराजांची सद्‌गुण समष्टी तपोमय बनली होती. आयुष्यभर परमार्थ विषयाच्या प्रतिपादनेचा वेच करणाऱ्या महाराजांनी आपल्या

लेखणी, वाणीद्वारे महाराष्ट्रभर ब्रह्मविद्येचा सुकाळ केला. त्यांच्या कार्याचे वर्णन श्री. भा. वि. मुळेशास्त्री यांनी करतांना म्हटले की, ह. भ. प. धुंडा महाराजांनी संत वाङ्मयाचा कल्याण कलश हाती घेऊन महाराष्ट्राच्या अभ्युदयाचे पुण्याहवाचन केले आहे. वारकरी संप्रदायाच्या परंपरेचे दीपस्तंभ बनून त्यांनी या संप्रदायाची शास्त्रपूर्तता समाजाला पटविली आहे. केव्हा प्रभुसंमित उपदेशाने तर कधी मित्रसंमित वाक्चातुर्याने आणि केव्हातर कांतासंमित रसमय वाक्पाटवाने त्यांनी वेदांताची गहनतत्त्वे समाजात बिंबविली', साधकांची तहान-भूक शमविण्याचे कार्य करीत असताना धर्मतत्त्वाचे महत्त्व व गांभीर्य पटवून दिले. अनेकांच्या अंत:करणात देवभक्ती व धर्मश्रद्धा निर्माण करण्याचे व्रत सतत चालविले होते.

महाराजांचा धर्म-परमार्थविषयक ग्रंथांचा व्यासंग दांडगा होता. संस्कृतातील वेदसाहित्य, उपनिषदे, मनुस्मृती, भारत, श्रीमद्भागवत, रामायण, आदि, विष्णू, नारद, पद्म, गरूड, गणेश, ब्रह्मवैवर्त इ. पुराणे, योगसूत्रे, योगशास्त्र, नारद आणि शांडिल्य यांची भक्तिसूत्रे, गर्ग संहिता, सनत्कुमार संहिता, सूत्रभाष्ये, पंचदशी, भक्तिरसामृत, गीता, उज्ज्वल नीलमणि, हस्तामल इ. अनेक ग्रंथ त्यांनी अभ्यासिले होते. तर प्राकृतातील श्री ज्ञानेश्वरी, नाथ भागवत, भावार्थ रामायण, रुक्मिणी स्वयंवर, संतांचे अभंग व स्फूटकाव्य आदी ग्रंथ/गाथांचा अभ्यास केलेला होता. या सर्व अभ्यासावर आधारित त्यांचे ग्रंथलेखन असल्याने, विषय विवरणात वरील ग्रंथांतील वचनांचा मुक्तपणे वापर केलेला आढळतो. वारकरी संप्रदायाचा साधक हा प्राय: प्रापंचिक असतो. त्यास आध्यात्मिक विषयाच्या अध्ययनासाठी पुरेसा अवधी, ग्रंथांची उपलब्धी, मार्गदर्शक यांचा तुटवडाच असतो. शिवाय संस्कृत भाषेचे सखोल ज्ञान अनेकांना नसते. अशा सर्व साधकांची अध्ययन इच्छा पूर्ण होण्याच्या दृष्टीने महाराजांनी विशेषत: संस्कृत वाङ्मयातील उतारे, वचने, सूत्रे यांच्या आधारे आपले लेखन समृद्ध तर केले आहेच, शिवाय ते वेदवाङ्मयाच्या उल्लेखाने ब्रह्मविद्येचा सुकाळ करणारेही केले आहे. महाराजांच्या पारमार्थिक जीवनाचा प्रवास लौकिक जीवनाच्या माध्यामातून गेला असल्याने, त्यांना प्रापंचिक साधकांच्या समस्यांची चांगली जाण होती. यासाठी स्वतंत्र लेखन करण्याऐवजी विवरणात्मक ग्रंथलेखनाचा व त्यातून धर्म,

परमार्थ, संप्रदायपर विचारांचा विस्तृत विस्तार करण्याचा निर्णय घेतला होता. नारदभक्तिसूत्रावरील विवरणात्मक ग्रंथाच्या पूर्वसूत्रात ह. भ. प. भानुदास महाराजांनी महाराजांच्या विवरण पद्धतीचे विशेष सांगितले आहेत. त्यांनी लिहिले की, 'ग्रंथातील प्रमेयांचा गोळाबेरीज अर्थ न सांगता, त्यातील प्रत्येक पदाचा अनेक अंगांनी सप्रमाण विचार करावयाचा. तो करीत असता श्रीमद्भागवत, गीता, पुराणे, भाष्य, पंचदशी, ज्ञानेश्वरी, नाथभागवत, गाथा व इतर अनेक ग्रंथातील प्रमाणे सहजपणे त्यांच्यापुढे येतात. विवेचनाचा विषय त्यामुळे निरखून प्रकट होतोच, पण त्याचबरोबर इतर आनुषंगिक विषयांची माहिती श्रोते/वाचकांना होते. यामुळे यास प्रमाणचातुर्य आहेच पण त्यामुळे या विषयाच्या अभ्यासूंची, विशेषत: कीर्तन, प्रवचनकारांची चांगली सोय झाली आहे.' महाराजांच्या लेखनाचा हा व्यापक दृष्टिकोन त्यांच्या सर्वच विवरणात्मक ग्रंथातून अनुभवास येतो. महाराजांचे लेखन श्री ज्ञानदेव, नाथ व तुकाराम महाराज या संतांच्या काव्याचे विवरण करणारे आहे. यातील श्री ज्ञानदेव हे समाधी अवस्थेपर्यंत पोहोचलेले पुरुष होते तर, नाथ, तुकाराम हे संसारी 'योगीजन' होते. यांच्या लेखनातील त्यांचे धर्मविचार, जटिल तत्त्वज्ञान हे जनस्वधारणांच्या आकलन कक्षेत आणण्याचे महान कार्य महाराजांनी केले. 'अलौकिक नोहावे लोकांप्रती' हे विचार प्रतिपादनाचे मुख्यसूत्र त्यांनी आपल्यासमोर ठेवून, मराठी भाषेत ब्रह्मविद्येचा मळा पिकविला आहे. जग, जीव, जीवात्मा यांची स्वरुपें, जीवात्मा आणि परमात्मा यातील अभेद्यत्व (अद्वैत विचार), विश्व म्हणजे परमात्माच्याच चित्ताचा आविष्कार, ब्रह्म-माया स्वरुप, ध्यान-आत्मा यासारख्या अनेक विषयांबरोबर अवतारमीमांसा, प्रेम-भक्तिमीमांसा, भागवत धर्ममीमांसा, अध्यात्ममीमांसा, चित्तशुद्धीमीमांसा, जीवनमीमांसा, कर्ममीमांसा त्याचबरोबर संत चरित्रे यावरही प्रचंड लेखन करीत अनेक विषय पिंजून काढले आहेत. या सर्वांच्या विवरणातही वेदवाङ्मयादी ग्रंथवचनांचा, सूत्रांचा आधार घेत प्राचीन धर्मशास्त्रकार, दर्शनकार यांच्या विचारांची महाराजांनी ओळख करुन दिली आहे. यामुळे विविध विषयावरील मीमांसेतून साधकांच्या वैचारिकतेला मोठी चालना मिळाली, हीच त्यांनी केलेल्या ब्रह्मविद्येच्या सुकाळाची फलश्रुती होय.

### ७. अभ्यास केंद्रे उभारली

महाराजांमधील विद्वत्ता आणि अकृत्रिम विनयशीलता माननीय मामासाहेब दांडेकर यांनी ओळखली होती. विशेषत: १९५२ नंतर म्हणजे श्री. मामासाहेब प्राचार्य पदावरुन निवृत्त झाल्यावर या दोघांनी मिळून उत्तर-पश्चिम महाराष्ट्रात नामसप्ताह गाजविले होते. अनेक शास्त्रीय चर्चा, अभंगातील सिद्धांतांची निवड, त्यासाठी पूरकांचा शोध आणि या साऱ्यांवर बारीकसारीक चर्चा असे अनेक उद्योग केले होते. महाराजांजवळील संस्कृत, वेदविद्यांचे ज्ञान आणि श्री. मामासाहेबांजवळील पाश्चात्त्य तत्त्ववेत्त्यांच्या भूमिका व आंग्लभाषेचे ज्ञान या दोन्हीचा सुरेख संगम झाला होता. यामुळे संप्रदायाला नवे नेतृत्व व नवी विचारसरणीही प्राप्त झाली होती. परिणामी नामसप्ताह हे अभ्यास सप्ताह बनले गेले. संतवाङ्मयाकडे बघण्याचा समाजाचा दृष्टिकोन बदलू लागला. संतग्रंथांची पाठचिकित्सा होऊ लागली. ज्ञानोबा ते निळोबा हा वारकरी परंपरेचा वाङ्मयीन प्रवास पक्का केला.

महाराजांनी वारीचा लोकशिक्षणासाठी पुरेपूर उपयोग करुन घेण्यास प्रारंभ केला, सुमारे महिनाभराच्या कालावधीत एकत्रित येणाऱ्या वारकरी भक्त, साधक यांना पंथाचे तत्त्वज्ञान, संत चरित्राकडे पाहण्याचा दृष्टिकोन, संतसाहित्याचा उलगडा करुन देत, या समाजाला डोळस दृष्टी देण्याचे कार्यही महाराजांनी केले याचा परिणाम म्हणजे वारकरी सांप्रदायिक लोक केवळ भाविक व श्रद्धाळू न राहता पंथीय सुशिक्षित झाले. महाराजांनी वारीला अभ्यासाचे रुप दिले होते. वारी अभ्यासकेंद्र बनविली.

### ८. ज्ञानेश्वरीचा तेलगू अवतार

श्री भक्त नरसिंह हे कै. श्री महिपती महाराजांचे आंध्रप्रांतीय (आणि तेलगू भाषिक) शिष्य. श्री विठ्ठलाचे भक्तीत सतत रमणारे. त्यांनी आपल्या गावी (चिळकळ-पुडी, जि. मछलीपट्टणम्) श्री विठ्ठल मंदिराची उभारणी करुन, त्यात श्री विठ्ठलाच्या मूर्तीची यथासांग, शास्त्रोक्त पद्धतीने स्थापनाही केली होती. यानिमित्ताने श्री भक्त नरसिंह आणि त्यांचे चिरंजीव श्री सत्यनारायण यांनी जवळपासच्या भाविकांकडून एकसहस्त्र कोटी विठ्ठलनाम लिहून घेतले होते. या विठ्ठलनामाचा समर्पण सोहळाही

करण्याचे निश्चित झाले होते. हा सर्व कार्यक्रम १०८ दिवसांचा होता. या दीर्घ कार्यक्रमास महाराजांनी पूर्णकाळपर्यंत उपस्थित राहावे अशी या कार्यक्रमाच्या संयोजक पिता-पुत्रांची इच्छा होती. त्यांनी तसे रीतसर निमंत्रणही महाराजांना दिले. तथापि महाराजांना आपल्या पूर्वनियोजित कार्यक्रमांमुळे १०८ दिवस उपस्थित राहता येणे शक्य नव्हते. तरीही बऱ्याच आग्रहानंतर महाराजांनी प्रारंभकाळी व समाप्तीचेवेळी काही दिवस उपस्थित राहण्याचे वचन दिले होते. त्याप्रमाणे महाराज प्रारंभी तीन दिवस उपस्थित राहिले. पुढे आपल्या पूर्वनियोजित कार्यक्रमात गुंतून गेले होते तरी महाराजांना समाप्तीचे वेळी अधिक दिवस उपस्थित राहण्याचे भान सतत होते. त्याप्रमाणे वैशाख महिन्याच्या अखेरीस आपल्या सुमारे पन्नास वारकऱ्यांसह मु. चिळकळ (जि. मछलीपट्टणम्) येथील श्री भक्त नरसिंहाच्या कार्यक्रमास हजेरी लावली. या कालावधीत तेथे महाराजांची कीर्तने-प्रवचनेही होत होती. समोरचा सर्व श्रोतृवर्ग तेलगू भाषिक होता, तरीही महाराजांना ती अडचण वाटली नाही. कारण प्राथमिक व माध्यमिक शालेय शिक्षणात निजामशाहीतील तेलगू-उर्दूभाषेच्या सक्तीमुळे तेलगू भाषेचे ज्ञान होतेच. एका बाजूस कीर्तन-प्रवचनाचे कार्यक्रम चालू असतानाच, महाराजांनी तेलगू भाषेच्या जाणकारांच्या मदतीने श्री ज्ञानेश्वरीचे तेलगू भाषेत भाषांतर करण्याचे ठरविले. या उपक्रमासाठी श्री विठ्ठल मंदिराच्या कार्यक्रमाचे संयोजक श्री भक्त नरसिंह व श्री सत्यनारायण या पितापुत्रांची मदत घेतली. काही तेलगू भाषातज्ज्ञांना सन्मानाने आमंत्रित करुन श्री ज्ञानेश्वरीच्या तेलगू भाषेतील भाषांतराला महाराजांनी प्रारंभ केला. अर्थात अठरा अध्यायी आणि सुमारे नऊ हजार ओव्या असलेल्या श्री ज्ञानेश्वरीचे भाषांतर करणे ही सोपी गोष्ट तर नव्हतीच, शिवाय ती अल्पावधीत संपणारी नव्हती. शिवाय भाषांतर करणे म्हणजे ज्ञानेश्वरीतील प्रत्येक मराठी शब्दाला तेलगूतील प्रतिशब्द योजणे हेही नव्हते. कारण श्री ज्ञानेश्वरीतील श्री ज्ञानदेवांची भावना, त्यांचे विचार व तत्त्वज्ञान या साऱ्या गोष्टी यथोचितपणे नव्या भाषांतरित ज्ञानेश्वरीत उतरणे नितांत गरजेचे होते. श्री ज्ञानेश्वरी हा महाराजांचा आवडता विषय (जीव की प्राण) त्यात त्यांना तेलगू भाषेचे असलेले ज्ञान, या उपक्रमासाठी तेलगू भाषातज्ज्ञांनी व श्री भक्तनरसिंह यांनी दिलेली मोलाची साथ

आणि श्री ज्ञानदेवांच्या तत्त्वज्ञानाचा प्रसार व्हावा अशी खुद्द महाराजांची असलेली प्रबळ इच्छा, या साऱ्यातून मराठी ज्ञानेश्वरीचा तेलगू अवतार संपन्न झाला. मराठी ज्ञानेश्वरी तेलगूत अवतरली. यामुळे आंध्रवासीयांमधे भागवत धर्माचे प्रेम अधिक वाढीस लागले. प्रतिवर्षी पंढरपूरास येणारांची संख्या वाढत गेली. काही तेलगू मंडळी चातुर्मासात पंढरपूरात वास करुन राहू लागली. हा उपक्रम भागवत धर्मासाठी खूपच उपयुक्त ठरला गेला.

## ९. संप्रदायावरील आक्षेपांचे खंडन

श्रद्धा ही अशी एक नैसर्गिक अदृश्य गोष्ट आहे की, जी प्रत्येक संवेदनशील व्यक्तीच्या मनात कित्येकदा पराकोटीचे स्थान ग्रहण करुन बसते. 'वारकरी संप्रदाय व त्यातील संत' हा महाराजांच्या अत्यंत जिव्हाळ्याचा अन् श्रध्देचा विषय असल्याने त्याविरुद्ध कोणी कुरापती सुरु केल्या की महाराज अस्वस्थ होत आणि अशा कुरापतकारांचे आणि आक्षेपांचे खंडन करीत असत. पंढरपूरची वारी ही या संप्रदायातील 'आदर्श भक्ती'चे मूर्तिमंत रुप होय. या वारीने व्यक्तिगत आणि व्यक्तिनिष्ठ भक्तीला सामाजिक अधिष्ठान प्राप्त करुन दिले आहे. समुहानिष्ठ बनविले आहे. द्वैतातही अद्वैताचे दर्शन वारीतूनच होते. वारी हे या संप्रदायाचे वैभव आहे. वारकऱ्यांसाठी 'वारी' हा सांप्रदायिक आचारधर्म असला तरी त्यामागे बलिष्ठ तत्त्वज्ञान आहे. समाजातील सर्व थरातील मानवांच्या संघटनेची मोठी ताकद वारीत आहे. 'वारी' समाजप्रबोधनाचे विशाल व्यासपीठ होय. या वारीवर आजवर अनेकांनी विविध प्रकारे टीका केली, आरोपही केले. त्यात 'वारकरी संप्रदायाने समाजाला नेभळट बनविले. या संप्रदायात देवापेक्षा संतांचेच श्रेष्ठत्व अधिक आहे, पायी वारी म्हणजे मानवी क्रयशक्तीचा, वेळेचा अपव्यय होय. वारी म्हणजे अनुत्पादक श्रमांची परंपरा होय, अनेक वाहनांची सुविधा असतांना पायी वारीचाच अट्टाहास कां ?' यासारख्या आक्षेपांचा समावेश आहे. त्याशिवाय वारीचा वारकऱ्यांना जीवनात कितपत लाभ होतो किंवा या लाखो लोकांच्या महानशक्तीचा अन्य विधायक कार्यासाठी उपयोग का केला जात नाही ? अशीही टीका केली जाते केलीही आहे. या टीकेला वा

आक्षेपांना उत्तर न देता 'वारी' मागील आपली भूमिका स्पष्ट करतांना महाराजांनी म्हटले होते की, 'वारी म्हणजे अभिगमन. एक उपासना मार्ग. अभिगमन म्हणजे उपास्य देवतेकडे चालत जाणे, असे चालणे जेव्हा वारंवार होते, त्यास वारी म्हणतात. वारीच्या वेळी प्रपंचाचा विसर होत असल्याने सहाजिकच सतत नामस्मरण केले जाते. प्रापंचिक चिंता नसल्याने नामस्मरणात मन गुंतवता येते. ध्यान करता येते शिवाय वारीत संताची संगती लाभते. अध्यात्मतेची आणि एकात्मतेची मोठी शिदोरी प्राप्त होते. वारी म्हणजे उर्वरित अकरा महिन्यांसाठी मनाला समर्थ आणि बळकट बनविणारी शक्तिवर्धक संजीवनी होय.'

वारी पायी केल्याने वारकऱ्यांचे श्रम अनुत्पादक ठरतात, या आक्षेपाचे खंडन करतांना महाराज म्हणाले होते, 'सरकारी कर्मचारी आपल्या नोकरीत अकरा महिने काम करतो व उरलेला एक महिना सुट्टी घेऊन कुठेतरी दूर सहलीला जातो. त्यामुळे त्याचा उत्साह, उमेद वाढते. या महिनाभराच्या सुट्टीच्या कालावधीतील कोणते श्रम कारणी लागतात ? शिवाय महिन्याभराचा (अनुत्पादित सुट्टीच्या काळाचा) त्यास पगारही दिला जातो आणि प्रवासखर्चाची रक्कमही दिली जाते. आमचा वारकरी अकरा महिने शेतात राबणारा आहे. वारीत आल्याने त्याला होणाऱ्या आनंदाचे मोजमाप कोणत्याच मापाने मोजता येत नाही.'

'ठायीच बैसोनि करा एक चित्त', असे म्हणणाऱ्या संतांनी वारीचा आग्रह धरणे म्हणजे संतवचन व कृती यामध्ये एकवाक्यता नसणे होय.' या आरोपांचेही खंडन महाराजांनी संतांच्याच भूमिकेतून केले आहे. ते म्हणतात 'संतांची वचने प्रथमदर्शनी विसंगत वाटत असली तरी त्यात विसंगती नाही, किंबहुना संतांच्या कृतीत व वचनात विसंगती नसतेच. त्यांच्या वचनांची व कृतींची सुसंगती न लावता आल्याने ती विसंगती वाटते. शाळेत विद्यार्थ्यांना त्यांची बुद्धीमत्ता, हुशारी व आकलनशक्ती या नुसार त्यांना जसे अ-ब-क-ड-इ. तुकड्यात वर्गीकृत केले जाते व त्यांना विविध पद्धतीने शिकविले जाते, तद्वत सारे भक्त हे जरी साधक असले तरी त्यांच्यातही वर्गवारी करण्यासारखी स्थिती असते. कुणी घरी बसून चित्त एकाग्र करु शकतो,

कुणी सगुण मूर्तीपुढे जाऊन एकाग्र होतो. भक्तियोगातील साधनेवर हा फरक आहे. यामुळे कोणास वारीसाठी आग्रह केला जातो तर कोणास 'ठायीच बैसोनि करा एक चित्त' असा उपदेश केला जातो. अर्धवट ज्ञानावर आधारित टीका करणारांना महाराजांची उत्तरे वा स्पष्टीकरणे म्हणजे आदर्श ज्ञानपाठच होय.

'वारीने वारकऱ्यांचे जीवन आमूलाग्र बदलून जाते' असे विधान महाराज अनुभवावर आधारीत करतात. वारकरी होणाऱ्या व्यक्तीने आपल्या गळ्यात तुळशीमाळ परिधान करावयाची असते. ती धारण करताच वारकरी अंतर्बाह्य स्वरुपात शुद्ध होऊ लागतो. व्यसनापासून मुक्तता, मांसाहार वर्ज्य-आहारातील सात्त्विकता, असत्य वचन-अपशब्दांचा उच्चार व्यर्थ या गोष्टी आपोआप येतात. ईश्वरभक्तीचा, पांडुरंग भक्तीचा परीस त्या व्यक्तीच्या लोहरुपी जीवनाचे सोने करुन सोडतो. यामुळे विस्कटावयास आलेले संसार पुन्हा सुमार्गी लागतात, 'वारी' हा आचार धर्मातील एक महत्त्वाचा घटक आहे, म्हणूनच वारीमुळे वारकऱ्यांना काय लाभ होतो हा प्रश्नही निरर्थक ठरतो.'

वारीकडे बघण्याचा महाराजांचा दृष्टिकोन केवळ श्राद्धिक वा भावनिक स्वरुपाचा नव्हता, तर त्यांच्या ठायी निष्ठेबरोबरच समीक्षकाचीही दृष्टी होती. 'वारी'चा सम्यक दृष्टिकोनातून विचार करताना 'वारी'चा समाजोन्नतीसाठी मोठा उपयोग होतो ही गोष्ट त्यांनी प्रकर्षाने दर्शविली. वारीमुळे वारकऱ्यांच्या ठायी सत्संगवृत्ती, धर्माचरण, नीतिआचरण, सर्वसमभाववृत्ती, विश्वात्मक दृष्टी, आणि मात्रांबद्दल सहिष्णुता आणि गोरगरिबांबद्दल कळवळा या गोष्टी वाढीस लागतात. यासाठी संत शिकवणीचा फायदा होतो व ही शिकवण वारीतून, संत सहवासातून मिळते.'

'वारी' निमित्ताने लाखोंच्या संख्येने चंद्रभागेकाठी एकत्रित येणाऱ्या भाविकांना श्रद्धेतून काही भव्य-दिव्य गवसले कां ? यासारख्या काहीशा आडवळणी आरोपाला महाराजांनी दिलेले उत्तर विचारच करावयास लावते. ते म्हणाले, 'वर्षानुवर्षे कोणाचेही व कोणतेही निमंत्रण नसतांना, कोणतेही आमिष समोर नसतांना एवढा मोठा समाज एकत्रित येतो, स्वयंशिस्तबद्ध होतो, आपल्यातून प्रचारक निर्माण करतो आणि हा मार्ग सतत प्रवाही ठेवतो. हा समाजजीवनातील चमत्कारच होय. वारीच्या निमित्ताने गवसला जाणारा हाच मोठा ठेवा होय'.

## १०. प्राचीन ग्रंथ-विचारांचे संवर्धन

आज अनेक परदेशी अभ्यासू लोक भारतात येतात, येथील संस्कृतीचा आणि संस्कृत भाषेचा अभ्यास करतात. संस्कृतातील प्राचीन ग्रंथ तर त्यांना आकर्षित करतात, शिवाय अशा ग्रंथातील तत्त्वज्ञानाने हरकून जाणारे पाश्चिमात्य अभ्यासू यात (जर्मनी, इंग्लड, अमेरिका) येथील ऋषीमुनींचे, त्यांच्या ग्रंथांचे आणि त्यातील तत्त्वज्ञानाचे कौतुक करतात. इतकेच नव्हेतर हे ज्ञान स्वकीयांना देण्याचा ईर्षेने ते येथील (भारतीय-प्राचीन संस्कृत ग्रंथांची) आपल्या भाषेत भाषांतरेही करतात. परंतु दुर्दैवाची गोष्ट अशी की, या संस्कृतीत जन्मास आलेले या संस्कृतीचे वारसदार मात्र या अलौकिक ग्रंथांकडे पाठ फिरवून आहेत. ही खंत महाराजांनी व्यक्तही केली आहे. ते लिहितात, 'भारत वर्षात आज असा एक विपरीत काल प्राप्त झाला आहे की जातिभेद, वंशभेद, आश्रमभेद, विवाह, मूर्तिपूजा, तीर्थयात्रा, श्राद्ध, अवतार - अशा परमपूज्य व जगप्रसिद्ध विषयांसंबंधी पंडितमन्य म्हणविणाऱ्या आर्यपुत्रांच्या अंत:करणात अनेक शंकाकुशंकाचा प्रादुर्भाव होऊ लागला आहे (तर) पाश्चात्यांना या संस्कृतीतील गूढ तत्त्वांचे कोडे उलगडल्यामुळे त्यांना त्यांची स्वत:ची संस्कृती क्षुद्र वाटू लागली आहे. 'आम्ही या विषयात मागासलेले आहोत म्हणून हतभागी आहोत' ही त्यांची प्रतिक्रिया आहे. परंतु त्याच आर्य संस्कृतीमध्ये उत्पन्न झालेल्या आर्यपुत्रांनी आपल्या उच्चतम पवित्र संस्कृतीची विटंबना करावी यापेक्षा आणखी कोणती अवनती असेल असे मला वाटत नाही'.

प्राचीन ग्रंथ व त्यातील तत्त्वज्ञान याबद्दल सद्य:स्थितीतील समाजास काही शंका असणे व त्यामुळे ग्रंथप्रामाण्य नाकारणे हे घडत असले तरी शंकानिरसनाचा मार्ग असतांना ग्रंथप्रामाण्य नाकारणे महाराजांना अयोग्य वाटे. यासाठी स्व-चिंतनातून त्यांनी काही आक्षेप, शंका अपेक्षित धरल्या आणि त्यांचे निरसनही केले होते. शंकानिरसनाबरोबर प्राचीन ग्रंथ आणि त्यातील तत्त्वविचारांचे समर्थन करण्याचे कार्य आपल्या लेखणीद्वारे केले किंबहुना तेच त्यांच्या लेखनाचे प्रयोजन होते असे म्हणता येईल.

## ११. अनेक संस्थांशी संबंध

महाराजांच्या सामाजिक कार्याचाही व्याप विशाल होता. लहानमोठ्या अनेक खाजगी वा नोंदणीकृत संस्थांशी त्यांचा संबंध होता. काही संस्थाचे संस्थापक, काहींचे विश्वस्त सल्लागार तर काही संस्थांचे पाठिराखे या नात्याने ते संबंधित होते. यात मंदिरे, कीर्तनसंस्था, धार्मिक-संशोधन संस्था तर काही सामाजिक कार्याशी थेट संबंध असणाऱ्या संस्था होत्या.

महाराजांचा कीर्तन परिषदांशी जवळचा संबंध होता. नाशिक, पणजी (गोवा) आणि पुणे या ठिकाणी झालेल्या कीर्तन-कीर्तनकारांच्या सम्मेलनांचे महाराज अध्यक्ष होते. पुण्यातील कौशिक व्याख्यानमाला, वसंत व्याख्यानमाला यासारख्या त्यावेळी प्रतिष्ठित समजल्या गेलेल्या व्याख्यानमालेचे ते वक्ते होते तर पुण्यातील प्रसाद मासिक (सं. य. गो. जोशी) आणि पंढरपूरचे पंढरी संदेश हे साप्ताहिक (सं. श्री. गजान बीडकर) या नियतकालिकांचे प्रारंभापासून नियमित लेखक होते. श्री क्षेत्र आळंदीतील ह. भ. प. पू. जोग महाराजांनी स्थापन केलेली वारकरी कीर्तन शिक्षणसंस्थेशी ते स्थापनेपासून निगडित होते तर औरंगाबाद येथील श्री एकनाथ संशोधन केंद्राचे महाराज विश्वस्त होते. महाराजांच्या प्रेरणेतून निर्माण झालेली अहमदनगर येथील मूकबधिर शाळा, मागासवर्गीयांसाठी सुरु झालेले वसतिगृह, देगलूर येथील प्राथमिक विद्यालय यासारख्या शिक्षणसंस्थांच्या उभारणीत महाराजांचा सहभाग होता. पंढरपुरातील काही धर्मशाळाही महाराजांच्या प्रेरणेतून उभ्या राहिलेल्या आहेत. पुणे विद्यापीठात अस्तित्वात आलेल्या ज्ञानदेव अध्यासनाच्या निर्मितीत ह.भ.प. किसन महाराज साखरे, ह. भ. प. डॉ. अनंतबुवा आठवले यांच्याबरोबर महाराजही होते. श्री ज्ञानदेवांच्या साहित्याचे संशोधन, समीक्षा, चिकित्सा तसेच या वाङ्मयाचे विद्यापीठीयस्तरावर अध्यापन व्हावे आणि ज्ञानदेवांच्या साहित्याची ओळख नव्या पिढीला सातत्याने होत राहावी ही त्यामागील भूमिका होती. महाराजांना अनेक संस्थांकडून मानपत्रेही मिळालेली आहेत. त्या प्रत्येक संस्थेशी महाराज संपर्कात होते. भिडस्तपणामुळे त्यांना त्यांच्या कार्याला व व्यापाला मर्यादा घालणे, शक्य न झाल्याने त्यांचे सामाजिक क्षेत्रातील संबंध वाढत गेलेले होते.

## १२. वारकरी शिक्षण संस्थेत अध्यापन

समाज किंवा देशाच्या विकासासाठी व्यावहारिक शिक्षणाची-ज्ञानाची नितांत गरज असते हे जितके महत्त्वाचे तितकेच या शिक्षण प्रक्रियेत आपले मूलधन असणारे धार्मिक-नैतिक शिक्षण यालाही महत्त्वाचे स्थान असते. नैतिक व धार्मिक शिक्षणही बुद्धीला शुद्ध आचरणाची जोड देत असते. अशा शिक्षणाने शुद्ध आचार, सुसंस्कारित मने निर्माण होऊन समाजाचा नैतिक विकास होतो. माणसाच्या जीवनातील शिक्षणाचे हे महत्त्व स्वानंद सुखनिवासी प. पू. श्री विष्णुबुवा जोग यांनी ओळखले होते. आणि एक उदात्त दृष्टिकोन नजरेसमोर ठेवून त्यांनी श्रीक्षेत्र आळंदी (पुणे) येथे २४ मार्च १९१७ रोजी वारकरी शिक्षण संस्थेची स्थापना केली. या संस्थेतून समाजमन घडविण्यास प्रयत्नशील असणारे असे वारकरी पंथाचे प्रचारक निर्माण व्हावेत, तसेच वारकरी संतवाङ्मयाचा अभ्यास सुरू राहून, या पंथास चालना मिळत राहावी ही त्यामागील अधिक भूमिका होती. या संस्थेतून पुढे वारकरी कीर्तनकारही तयार करण्याच्या दृष्टीने शिक्षण देण्यास प्रारंभ झाला. प. पू. जोग महाराजांनी या संस्थेची धुरा ह. भ. प. सोनोपंत तथा मामासाहेब दांडेकर यांचेकडे दिली. या संस्थेच्या कार्यात श्री मामांनी ज्या अनेक मान्यवरांचा अध्यापनासाठी सहभाग घेतला होता, त्यात महाराजही होते. महाराजांनी तिथे वेदांत, शास्त्रे, भागवत, गीता इ. ग्रंथांचे अध्यापन केले, शिवाय कीर्तनाचेही पाठ दिले.

## १३. त्रिविध साधनेची उपासना

'प्रसन्न वाणी आणि प्रभावी लेखणी यांनी महाराष्ट्राला मंत्रमुग्ध करणारे संप्रदायाचे प्रवक्ते', असा महाराजांचा लौकिक होता. ग्रंथलेखन, विपुल स्फुट लेखन, अभ्यासकांसाठी तसेच चिकित्सकांसाठीचे अभ्यासपूर्ण लेख, मीमांसा, अनेक ग्रथांच्या प्रस्तावना याचबरोबर धर्मसभांमधून त्यांनी मांडलेले, चर्चिलेले अनेक विषय या सर्वांतून त्यांच्या ज्ञानाचे, विद्धत्तेचे, दर्शन घडत असे. तथापि आपल्या विद्वतेचा दंभ, अहंकार त्यांच्या वाणी वा लेखणीतून कधीच उतरला नव्हता. महाराजांनी प्रचंड प्रमाणात साहित्यनिर्मिती केलेली असली तरी त्यामागे 'सर्वऽत्र सुखिनः सन्तु' हा

संतप्रवृत्तीचाच दृष्टिकोन होता. मध्ययुगीन काळातील संतांनी ज्या प्रेरणेने वा प्रयोजनांनी साहित्यनिर्मिती केली होती, त्यास समांतर स्वरुपी भूमिका महाराजांच्या लेखनामागे असल्याचे जाणवते. संत एकनाथांनी एका अभंगात आपल्या अवताराची भूमिका स्पष्ट करताना म्हटले की,

**'आम्हां कां संसारा येणें, हरिभक्ती नाम स्मरणें।**
**जडजीवा उद्धरणें, नामस्मरणें करुनी।**
**सर्वकर्म ब्रम्हस्थिती प्रतिपादाव्या वेदोक्ती।**
**हेचि एक निश्चिती, करण (करणे) आम्हा।।** **(ए.गा. १८९०)**

महाराजांचे संप्रदायविषयक आणि लोकोद्धारविषयक सामाजिक कार्य यामागील भूमिका याच होत्या. वेदोक्तींचे प्रतिपादन, संतविचारांच्या ताल गहन-प्रमेये-स्फूर्तिझरा यांचे स्पष्टीकरण करीत महाराजांनी वेदांत तर सहजसोपा केलाच, त्याचबरोबर संतविचारांचीही उकल केली. त्यांनी केलेले संप्रदायाचे नेतृत्वकार्य, ब्रह्मविद्येच्या प्रसारार्थ केलेली विवरणे, परमार्थाच्या सुलभतेसाठी केलेला वाणी-लेखणीचा वापर या सर्वांमागे समाज प्रबोधन ही एक मोठी प्रेरणा होती.

**'भक्तिज्ञान विरहित गोष्टी इतरा न कराव्या। प्रेमभरे वैराग्याच्या युक्ती विवराव्या।'** या कानमंत्राने समाज भारावून टाकण्यासाठी त्यांनी अखंड केलेली भ्रमंती हीदेखील लोकोद्धारासाठीच मानवी समाजातील दु:ख वा दुरी दूर व्हाव्यात, जनमानसात स्व-धर्माची, स्व-राष्ट्राची आणि मुख्यत्त्वे स्वत्वाची जागृती व्हावी, समाजात मांगल्य निर्माण व्हावे या दृढ भावनांनी महाराज कार्यरत झाले होते. महाराजांचे साहित्य समाज सुधारक, तत्त्वचिंतक, मुमुक्षू तथा साधक अशा सर्वांनाच 'सांस्कृतिक पाथेय' आहे.

ग्रंथ निर्मिती हे महाराजांनी स्वीकारलेले एक माध्यम होते. खरेतर आपल्या लेखन प्रक्रियेद्वारे त्यांनी जनता जनार्दनाची एक प्रकारे सेवाच आरंभिली होती. त्यांच्या लेखन प्रेरणे संदर्भात ह. भ. प. बाळासाहेब भारदे यांनी म्हटले आहे की, आज अनेक ज्ञानमार्गी लोक जगाकडे न पाहता डोळे मिटून साधना करतांना दिसतात, तर अनेक भक्तिमार्गी लोक आपल्या उपास्य देवमूर्तीपलीकडील बाहेरील जगात पाहत नाहीत. त्यामुळे अशा लोकांचा जगास फारसा उपयोग होत नाही. सारांश, केवळ बुद्धिवादी लोक पाखंडी बनलेले तर केवळ सत्यवादी लोक अंधश्रध्देने भरलेले

आणि वैयक्तिक नीतीबाबत विचार करणारे समाजाविषयी उदासीन असलेले दिसून येतात. हे चित्र बदलावे, ज्ञानशील माणसाला दयाशील बनवावे, भावनाशील बनवावे, प्राप्त बनवावे अशा त्रिविध प्रक्रिया म्हणजेच खरी शुद्ध धर्मसाधना होय. श्री धुंडा महाराज त्रिविध साधनेचे उपासक होते.' महाराजांचे लोकोद्धराचे कार्य याच मार्गाने जाणारे होते.

### १४. लोक जागरण

'ज्ञानेश्वरीचा नंदादीप' किंवा 'ज्ञानेश्वरीचे प्रकांड पंडित' म्हणून समाजाकडून गौरविलेल्या महाराजांच्या व्यक्तित्वावर जसा श्री ज्ञानदेव वा ज्ञानदेवीचा प्रभाव होता, तसाच 'संत परंपरेचा नाथीदुवा (वा दुजानाथ)' म्हणूनही गौरविलेल्या महाराजांच्या व्यक्तिमत्त्वावर नाथांच्या कार्याचा प्रभाव होता. ज्ञानेश्वरांच्या भक्तिपंथ परंपरेतील एक तेजस्वी दीपस्तंभ म्हणून नाथ जरी शोभत होते तरीही ज्ञानदेव आणि एकनाथ या दोघांच्या व्यक्तित्वात व जीवनदृष्टीत फरक आहे. 'लोकजागृती व लोकोद्धार हे समान ध्येय दोघांपुढे असले तरी त्या ध्येयाच्या पूर्ततेसाठी त्यांनी केलेल्या प्रयत्नात व्यक्तिसापेक्ष वेगळेपणा आहे. श्री ज्ञानदेव हे प्रेषित, कलावंत व कवी आहेत, तर नाथ हे प्रवक्ते, पुराणिक व पंडित आहेत. मात्र विस्कळीत झालेला बहुजन समाज या दोघांनीही भक्तिमार्गाच्या माध्यमातून आध्यात्मिकदृष्ट्या एकरूप करण्यात आपली आयुष्ये वेचिली हे निर्विवाद सत्य होय. महाराजांच्या समोर या उभय संतांच्या जीवनदृष्टीचा आदर्श होता. एकाचे कलावंतपण तर दुसऱ्याचे प्रवक्तेपण-पुराणिक वा पंडितीपण त्यांच्यात सामावलेले होते. यातून संप्रदायाच्या कार्याची लोकप्रियता आणि विश्वासार्हता जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचे कार्य महाराजांनी केले. विशेषत: ह. भ. प. मामासाहेब दांडेकर यांच्या वैकुंठगमनानंतर 'संप्रदायाचे समर्थ नेतृत्व' महाराजांकडे आले होते. महाराजांनीही ती जबाबदारी स्वीकारुन लोकोद्धाराचे, लोकजागृतीचे कार्य केले. आपल्या कार्याला बळकटी यावी आणि संत वचनांचा प्रसारही व्हावा यासाठी महाराजांनी साहित्यनिर्मिती केली. त्यांचे साहित्य म्हणजे समकालीन व उत्तरकालीन अभ्यासकांसाठी उपलब्ध झालेला खजिनाच होय. विशेषत: वेदोपनिषदात अडकलेले ब्रह्मज्ञान आणि त्यातील विचारांचे संत विचारांशी असलेले

साधर्म्य यांचे दर्शन घडविण्याच्या दृष्टीने त्यांनी साहित्यनिर्मिती केली. 'शहाणे करुनि सोडावे-अवघे जन।' ही त्यांच्या साहित्यनिर्मितीमागील प्रेरणा होती.

## १५. ज्ञानोत्तर भक्ती / अद्वैताचा विचार

महाराजांनी आयुष्यभर प्रवचन-कीर्तनाचा वेच केला. प्रवचन - कीर्तन हा व्यवसाय न मानता तो धर्म मानला होता. परमार्थ जीवनातील 'कीर्तन' या भक्तिसाधनेचे महत्त्व समाजाला पटवून दिले. 'हरिकीर्तनाने जीव हरिरूप होतो' या सूत्राचा प्रसार करण्यासाठी त्यांनी कीर्तनाची गादी, प्रवचनाचे व्यासपीठ वा व्याख्यानाचा मंच यांचा पुरेपूर उपयोग केला होता. भक्तिशास्त्रात अनेक प्रकारची भक्ती सांगितलेली आहे. नारदभक्तिसूत्रात नवविधा भक्ती आली आहे, तर श्री मधुसुदन सरस्वती यांनी अकरा प्रकार सांगितले आहे. शांडिल्यांनीही आपल्या भक्तिसूत्रावरील ग्रंथात भक्तिप्रकाराची चर्चा केली आहे. या सर्वांनी भक्तीला ज्ञानाची जोड महत्त्वाची मानली आहे. 'जीव हा अंश आहे, तो सत्ताशून्य आहे. अंश हा अंशीच्या सत्तेवर सर्वकाही करीत असतो. तो परमात्मा अंशी जीवाला सत्ता, आनंद देणारा आहे. मात्र अज्ञ जीव 'सर्व कर्मे करणारा मीच आहे'. असे मानून संसारात अडकत असतो. जीवाचे हे अडकणे त्याच्या अज्ञानाचे कारण होय. मात्र ज्ञानप्राप्तीनंतर जीवाच्या जीवनाची दिशाच बदलते. ज्ञानप्राप्तीसाठी ज्ञानमार्गाने जाणे जरी उचित असले तरी तो मार्ग कठीण तर आहेच, शिवाय त्यामार्गाने जाणे सर्वसामान्यांना सहजपणे संभवनीयही नाही. याकरिता सामान्य जीवांसाठी प्रेममय भक्ती हा मार्ग असला तरी विना ज्ञान मोक्षप्राप्ती संभवनीय नाही.' ही ऋषी-महर्षींची, तत्त्ववेत्यांची भूमिका सांगत महाराजांनी सर्वसामान्यांना भक्तिबरोबरच ज्ञानाची कास धरण्यास प्रवृत्त केले होते.

ज्ञान हे मोक्षाचे साधन होय. मोक्ष (साध्य) प्राप्तीनंतर साधन (ज्ञान) संपुष्टात येते. हा सामान्य नियम. वेदान्तशास्त्रातही 'ज्ञान' ही अंतिम स्थिती सांगितलेली आहे. पण गीता, भागवत इ. भक्तिशास्त्राचे प्रतिपादन करणाऱ्या ग्रंथात मात्र 'भक्ती' अव्वल स्थानी आहे. भक्तिभावनेने जीव ना केवळ भगवंतावर प्रेम करतो, तर सर्व

भूतांठायी त्याच्या मनात समत्वाची भावना निर्माण होते. ब्रह्मरूप झालेला प्रत्येक जीव कोणाबद्दल शोक व्यक्त करीत नाही वा हर्षही व्यक्त करीत नाही. तर कोणतीही भावना किंवा ज्ञान अमूर्तच असते. मूर्तात प्रविष्ट झाल्यावाचून अमूर्त प्रकट होत नसते. त्यासाठी त्याच्या अभिव्यक्तीची आवश्यकता असते.

भक्तिसाठी प्रथम ज्ञानाची गरज आहे हे महाराजांनी वाणीबरोबरच लेखणीद्वारेही सांगितले आहे. 'यावन्मानवमात्राला तत्त्वज्ञानाची आवश्यकता आहे. तत्त्वज्ञानाविना जीवनात सफलता नाही आणि ज्ञानाशिवाय तत्त्वज्ञानाचे ज्ञान होऊ शकत नाही. देहेंद्रिय संबंधामुळे जीव कर्मकर्ता बनला जातो. चित्त, मनन संबंधामुळे चिंतन, मनन, ध्यान वा उपासना होणारच, तर बुद्धीच्या संबंधाने ज्ञान होत राहणारच. पण संसारात हे भिन्नकेंद्री असतात, आणि यांची केंद्रे म्हणजे 'साध्य' ते एका योग्यकेंद्रात आणल्याशिवाय जीवनात सफलता येत नाही. याचाच सोपा मथितार्थ म्हणजे भक्तीला ज्ञानाची (बुद्धीची) जोड अत्यंत आवश्यक होय. नारदभक्तिसूत्रातील हाच विचार महाराजांनी स्पष्ट करतांना म्हटले आहे की, 'आत्म्याला स्वरुप सुखाचे (त्याच्या अज्ञानामुळे) भान नसते. म्हणजे तो खरे सुख विसरतो. अनादी संस्काराने अथवा अज्ञानाने विक्षेप शक्तीमुळे विषयासच सुख समजून जीव त्याच्या मागे धावतो. विषयसुख भोगणे हाच पुरुषार्थ वाटू लागतो. त्याचे चित्तद्रव्य स्वभावत: लाखेप्रमाणे कठीण असून चित्त काम, क्रोध, भय, स्नेह, हर्ष, शोक या तत्त्वक विकाराने द्रव भावास प्राप्त होते. म्हणून भजन, हृदयात भक्ती गरजेची होय' इथेही महाराजांनी ज्ञानाला महत्त्व दिले आहे.

'ज्ञानदेवांचा ज्ञानमार्तंड' या लेखात महाराजांनी लिहिले आहे की, 'जीवाचे सर्व व्यवहार अज्ञानमूलक द्वैताचा आंगीकार केल्यानेच होतात. हे द्वैत म्हणजे बंध होय, या द्वैत स्थितीतही वास्तव अद्वैताचा बाध होत नाही. केवळ ती द्वैतावस्था मुकुलित असते....... वृत्तिज्ञानात द्वैतमूलक सर्व व्यवहार होत असतात पण अज्ञान अंधकार

दूर होत नाही. तर ज्ञानी सूर्य विवेकी पुरुषांना आत्मज्ञानाच्या चांगल्या निरभ्र दिवसाची जोड करून देतो.... आत्मज्ञानाची दृष्टी प्राप्त होऊन जीवनरूपी पक्षी 'मी देह आहे' या भावनेची घरटी टाकून देतात. तेव्हा जीवाने प्रकाशरुप जो ज्ञानसूर्य आहे, त्या ज्ञानी सूर्याचेच दर्शन घ्यावे' यातूनही भक्तिक्षेत्रातील ज्ञानाच्या अत्यंतिकतेवर भर दिलेला दिसतो. अज्ञानरूपी अंधकार दूर केल्याशिवाय ज्ञानरूपी प्रकाश दृष्टोत्पत्तीस येणे असंभव होय. त्यासाठी भक्तिसाधना गरजेची ठरते.

ज्ञानोत्तर भक्ती संदर्भात महाराजांनी नारदभक्तिसूत्र, ज्ञानदेवांच्या हरिपाठावरील भक्तिशास्त्र, नाथांच्या हरिपाठावरील ग्रंथ अशा विविध ग्रंथातून चर्चा केलेली आहे, शिवाय अन्य स्फुटलेखातूनही भक्तिमार्गातील ज्ञानाची गरज स्पष्ट केली आहे. जीवाची उपाधी अनादि अविद्या आहे. जीव व ईश्वर यांच्यात या मायाभासामुळे भेद संभवतो. विद्या ही जीवनात ज्ञान देऊन जीवन शांतीमय, सुखपूर्ण करते. पण अलीकडे विद्येचा उपयोग वेगळ्याच कारणांसाठी केला जातो. 'जगात कित्येक लोक अनेक शास्त्रांचे ज्ञान संपादन करतात व आपल्या बुद्धिचातुर्याने इतरांना चकित करून टाकतात. पण याने चित्तशुद्धी वा ईशकृपा होत नाही. यास्तव 'ज्या ज्ञानाने अज्ञान नाहीसे होऊन, जीव व ब्रह्म यांचे ऐक्य साधले जाते, जे ज्ञान बहिर्मुख वृत्तीचे पाय मोडते, मनाचे दारिद्र्य दूर करते, द्वैतरुपी दुष्काळ नाहीसे करते आणि सर्वत्र समबुद्धिरूपी सुबत्तेचे दिवस येतात. अशा ज्ञानाचा अनुग्रह करावा असे आवाहन महाराजांनी ठिकठिकाणच्या लेखनातून केले. भाविक भक्तांनी भक्तीच्या आहारी जातांना प्रथम ज्ञानाच्या काठीचा आधार घेतल्यास मोक्षापर्यंतची वाटचाल यशस्वीपणे चालता येईल हाच इत्यार्थ होय. तेव्हा जीवन सफलतेसाठी, मोक्ष प्राप्तीसाठी ज्ञानोत्तरभक्ती हीच श्रेष्ठ भक्ती होय.

'धर्मनिष्ठा' ही आपल्या भारतीय समाजपुरुषाची प्रकृती आहे. त्याला अनुसरुनच प्रत्येक भाविक भारतीय धर्मशास्त्राच्या विचारांवर अधिष्ठित आपली जीवनशैली निश्चित करतो. जीवा-शिवाच्या ऐक्यातून मोक्षप्राप्ती होते. यावर त्याचा विश्वास

असल्यानेच प्रत्येकजण मोक्षप्राप्तीची अपेक्षाही करीत असतो. जीवा-शिवाचे ऐक्य कसे होते याचे विवेचन महाराजांनी अनेकदा आपल्या कीर्तन प्रवचनांच्या माध्यमातून केले होते. वेदांतात स्थूल शरीराचे आणि परमात्म्याचे ऐक्य सांगितलेले नसून, ते जीवाचे व परमेश्वराचे सांगितलेले आहे. परंतु केवळ अज्ञानाने प्रत्येक व्यक्ती आपल्या जडस्वरूपी व नाशिवंत शरीरालाच 'मी' समजतो. खरे तर 'मी' म्हणजे जीव हा स्थूल शरीरापेक्षा भिन्न असून या जीवाचेच परमेश्वराशी ऐक्य होते याचे ज्ञान मायेने भरलेल्या 'मी'ला नसते. नेमके याचेच ज्ञान देण्याचा आटापिटा महाराजांनी आपल्या कीर्तन प्रवचनातून, ग्रंथांतून, अमाप लिहिलेल्या स्फुटलेखांमधून आणि विविध ग्रंथांना लिहिलेल्या विवेचक प्रास्ताविकातून केला आहे. त्यांची शास्त्रीय प्रवचनेदेखील भक्तीचा ओलावा घेऊनच प्रकट होत असत. त्यामुळेच त्यांच्या वाणीला आणि लेखणीला आत्मप्रत्ययाची जणू धार प्राप्त झाल्याचे जाणवावयाचे. महाराजांनी आयुष्यभर ज्ञानेश्वरीवरील प्रवचनाचा वेच केला. त्यातून ज्ञानदेवांची शिकवण, त्यांचे तत्त्वज्ञान स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला होता. कारण एकच की कोणीही अंधश्रध्देने भक्ती करु नये, प्रत्येकाची भक्ती डोळस असावी आणि मुख्य म्हणजे ती ज्ञानोत्तर असावी.

महाराष्ट्रातील संतपरंपरेने केवळ भक्तीवर कधीच भर दिला नव्हता. मराठी संतांची भक्ती ही डोळस म्हणजेच ज्ञानपूर्वक आहे. भक्तीला ज्ञानाचे डोळे नसतील वा ज्ञान आणि भक्ती यांना कर्माचे अधिष्ठान नसेल तर सारीच साधना व्यर्थ ठरते. हे महाराष्ट्रातील भागवत धर्माच्या प्रतिपादनाचे सार आहे. ज्ञानोत्तर कर्माची आवश्यकता नसते. मायावाद, जीवनमुक्ती, भक्तिज्ञान अशा अनेक प्रश्नांची चर्चा अनेक विद्वानांनी वेळोवेळी प्रस्तुत केली आहे. अनेकांनी विरोधही दर्शविला, परंतु महाराजांनी मात्र या बाबतीत यथार्थ विवेचन केल्याचे आढळते, 'तेथे कोणताही वाद किंवा विरोध प्रत्ययात येत नाही. आचार्यांच्या ठायी दुर्लभ पराभक्ती होती. तिच्या स्पर्शाने आचार्यांचे जीवन आकर्षक बनले

होते. त्यांनी दिलेल्या जीवनविषयक आदर्शामुळेच आपला हिंदुधर्म अभिनव आणि उज्ज्वल बनला आहे. त्यांच्यामुळेच सनातन वैदिक धर्माला कालविजयी रुप आले आहे.' या गोष्टी स्वामी विवेकानंदांप्रमाणे महाराजांनादेखील वाटत होत्या, आणि याचा प्रत्यय त्यांच्या कीर्तन-प्रवचनातून येत होता.

ज्ञानेश्वरांचा कल अद्धैतापेक्षा द्वैताकडे अधिक होता असे सांगण्यात समाधान मानणारे अभ्यासक आढळतात. पण अशा वादापासून अलिप्त राहून यथार्थ तेच जनमानसास सांगण्याचा अव्याहत प्रयत्न महाराजांनी केला. या दृष्टीने त्यांनी केलेले विविध स्वरुपी लेखन (ग्रंथ, विवरण, प्रस्तावना, स्फुट लेख इ.) पाहिल्यास वरील विधानाची सत्यता लक्षात येते. उदाहरणार्थ-

१. कीर्तनाचा विषय श्रोत्यांना समजावून सांगतांना व त्यांना पटावा यासाठी महाराज प्रतिपादन करीत असत. 'कीर्तन चांग' म्हणजे चांगले, पण ते कोणास ? तर भक्त, साधक, अभ्यासक आणि मुमुक्षू - अशा सर्वांनाच चांगले. याच-बरोबर सिद्धांनादेखील चांगले. कारण 'मुक्तापि लिलया विग्रहं कृत्वा भजते' असे आचार्यांनी सांगितले आहे. अज्ञानी व्यक्तीला जसे चांगले तसेच ज्ञानी व्यक्तीलाही चांगले आणि यासाठीच म. व्यास, नारद, सनत्कुमार यासारख्यांनी कीर्तनाचा मार्ग स्वीकारला 'ब्रह्मभूताय कल्पने' ही गीता, उपनिषदातून सांगितलेली. जीवनाची पूर्णता आहे. प्रवाहित जीवन परमात्मस्वरुपास प्राप्त होऊन पूर्ण होते. 'अथं आत्मा ब्रह्म' जो हरिरुप होतो तो जीव होय. जीव खरा तर अंगी असतो परंतु तो (अज्ञानाने) आपल्याला अंग समजतो. असा स्वत:ला देह समजणारा जीव या कीर्तनामुळे हरिरुप होतो. अंग याचा लाक्षणिक अर्थ जीव असा आहे. जीव ब्रह्म होतो तो ज्ञानामुळे. कीर्तनाने कसा होतो याचे विवेचन भागवतात आले आहे. भगवान स्वत: कीर्तन करणाऱ्या आपल्या भक्ताला ज्ञान देऊन जीव दशेतून बाहेर आणतो. चित्तशुद्धी, जीव, ब्रह्मैक्य, मोक्षप्राप्ती हे सर्व कीर्तनाने साध्य होते.

देहभाव हरपला जातो आणि कीर्तनामुळे चारी मुक्तीही साध्य होतात. या चार मुक्तीत सरुपाता मुक्ती आहे. या मुक्तीत भगवत देह प्राप्त होतो. 'होय अंग हरिरूप।' कारण एकच, ते म्हणजे 'ब्रह्मभूत काया होतसे कीर्तनी। भाग्य तरी ऋणी देव ऐसा।' एरवी जीवदशा ही एकदेशी असून ती देहाला चिकटलेली आहे, ती संसारापुरती मर्यादित आहे. पण कीर्तनात रंगलेला भक्त, जो सकळ सोयरा असतो, तो सर्वांना प्रिय बनतो. त्याचे प्रेमही व्यापक बनले जाते.

ज्ञानमार्ग हा 'लोहाचे चणे। बोचरिया पडती।' - इतका अवघड असल्याचे खुद्द भगवंतच सांगतात. ज्ञानमार्ग हा तलवारीच्या धारेवरचा नाच आहे. फलाच्या दृष्टीने मात्र अत्यंत दुःख निवृत्ती आणि परमानंद प्राप्ती देणारा आहे. वेदान्त शास्त्रात दोन प्रकारची फळे सांगितलेली आहेत. अवांतर आणि मुख्यआत्मोद्धार. याबरोबरच लोकोद्धार हा हेतू कीर्तनात असतो. आत्मज्ञान करुन घेणे आणि समाजाला ज्ञानी करणे या गोष्टी परंपरेने आपल्या संतांनी केल्या आहेत. पुण्यातील स. प. महाविद्यालयात कौशिक व्याख्यान मालेत अमृतानुभवावर बोलतांना महाराजांनी हा विषय विस्तृतपणे स्पष्ट केला होता.

'नारदभक्तिसूत्र' या ग्रंथात महाराजांनी मधुसुदन सरस्वतींचा उल्लेख केला आहे. मधुसुदन सरस्वती हे मोठे अद्वैत तत्त्वज्ञानी व भक्तिशास्त्रकार होते. त्यांचा 'भक्तिरसायन शास्त्र' हा ग्रंथ प्रसिद्ध आहे. त्यांत त्यांनी भक्तीच्या अकरा भूमिका दिलेल्या आहेत. त्यात ते म्हणतात, जीव हा अंश आहे. तो सत्ताशून्य आहे. अंश हा अंशीच्या सत्तेवर सर्वकाही करीत असतो. तो परमात्मा अंशी जीवाला सत्ता, आनंद, ज्ञान देणारा आहे. अज्ञ जीव मात्र सर्व कर्मे मीच करतो वा करणारा आहे. असे समजून तो संसारात अडकत असतो. ज्ञानमार्ग हा श्रेष्ठ अशा वेद-उपनिषदे, सूत्रे इ. ग्रंथातून आलेला आहे. 'विनाज्ञान मोक्षप्राप्ती होतच नाही' असा उपनिषदांचा सिद्धांत आहे. हा मार्ग कठीण आहे म्हणून प्रेमभक्ती योग्य, ज्ञानमार्गापेक्षा श्रेष्ठ शिवावतार जगद्गुरु शंकराचार्य यांच्या निधनानंतर अनेक द्वैती शास्त्रकारांनी त्यांच्यावर टीका

केली होती, त्यांच्या अद्वैताचे खंडनही केले होते. त्या सर्वांचे (द्वैती शास्त्रकारांच्या मतांचे) खंडन मधुसुदन सरस्वती यांनी 'अद्वैत सिद्धांत' या आपल्या ग्रंथात केले आहे. या ग्रंथाचा प्रभाव महाराजांवर होताच. ज्ञानी भक्त श्रेष्ठ असे श्रीकृष्णाने म्हटले, ज्ञान नसेल तर भक्ती होत नाही हे श्री ज्ञानदेवांनीही नमूद केले आहे.

'ज्ञानदेवांचा ज्ञानमार्तंड' या आपल्या एका लेखात महाराजांनी म्हटले आहे की, 'जीवनाचे सर्व व्यवहार अज्ञानमूलक द्वैताचा अंगीकार केल्यानेच होतात. हे द्वैत म्हणजे बंध. या द्वैतास्थितीतही वास्तव अद्वैताचा बोध होत नाही. तो रात्र व दिवस या सापेक्ष भावापलीकडला आहे. ज्ञानसूर्य हाच केवळ प्रकाशरूप आहे व जो प्रकाश म्हणजे प्रकाशित होणारा स्वयंप्रकाशरूप आहे. तो ज्ञानीरूपी सूर्य पाहावा' म्हणून ज्ञानदेवांनीही म्हटले आहे की,

**'तो अहोरात्राचा पैलकडु। कोण देखत्वा ज्ञान मार्तंडु।**
**जो प्रकाशे विण सुखाडु। प्रकाशाचा।'**

आत्मानात्म विवेकात तत्त्वविचार व ब्रह्मविचार यांचा अंतर्भाव होतो असे महाराजांनी एकनाथी हरिपाठ विवरण ग्रंथात म्हटले आहे. वास्तविक जीव ज्या देहात वास्तव्य करुन असतो, तो देह किती तत्त्वांचा आहे, त्याचे मूळ कोण आहे याची जाणीव सामान्यांना नसते. या देहात जी जी तत्त्वे म्हणून आहेत तीच सर्व सूक्ष्म ब्रह्मांडात व्यापून आहेत. एकनाथांनी याचे मार्मिक वर्णन भागवताच्या बावीसाव्या अध्यायात केले आहे. 'एकमेवाद्वितीय ब्रह्म' म्हणजे सजातीय-विजातीय भेदरहित ब्रह्म हे एकच आहे. संतांनीदेखील हेच सांगितले आहे. 'एक चैतन्य खरे आहे पण अविद्येमुळे, कल्पनेमुळे जीव-ईश्वर भेद निर्माण होतो. आकाश एक असतानाही मठ इ. उपाधीमुळे घटाकाश, मठाकाश इ. भिन्न नावे प्राप्त होतात. माया मानली तर परमात्म्याचे एकत्व कसे सिद्ध होणार ? याचे उत्तर हेच की, वेदशास्त्र, पुराणे, गीता, संतग्रंथ यामध्ये मायेचा विचार केला आहे. जीवाची उपाधी अनादि विद्या आहे. या अविद्येमुळे, मायेच्या प्रभावामुळेच जीव-ईश्वर यातील भेद निर्माण होतो. हे सारे नाथांनी केलेले विवेचन महाराजांच्या (नाथांचा हरिपाठ) ग्रंथात आलेले आहे.

भावार्थ रामायणातील हनुमंताचे महाराजांनी यथार्थ वर्णन केले आहे. ते म्हणतात, 'चित्त चैतन्य स्वरूप बनले की सर्व विकार मावळतात. कारण सूर्योदय झाला की सर्व नक्षत्रे जशी मावळतात. तद्वतच विकारांचे आहे.' 'तू मन व बुद्धी माझ्यात ठिकाणी ठेव म्हणजे तू मद्रूप होऊन जाशील यात शंका नाही' असे प्रत्यक्ष भगवंत अर्जुनास सांगतात. हे अद्वैताचे अनुकरणच होय. आत्मवस्तूचे चिंतन, कथन, परस्पर त्याच वस्तूंचा विचार करणे हा एक प्रकारचा ब्रह्माभ्यासच होय असे सुज्ञ म्हणतात. ज्ञानदेवांनीही तेच सांगितले आहे. याकरिता ब्रह्मज्ञानसंपन्न गुरूची सेवा व त्याची कृपा हवी हे मात्र निश्चित !

विषयवासनेने ज्यांची अंत:करणे दूषित झालेली आहेत, अशा पुरुषांना वेदान्त-ज्ञान, ग्रंथश्रवण, अध्ययन, दान, तप, व्रत, वैकल्य इ. उपाय उपयोगी पडत नाहीत. मात्र तेथे प्रसंगी भक्तीची मात्रा लागू पडू शकते. 'कथादिकात अनुराग ठेवणे म्हणजे भक्ती' असे गर्गमुनींनी म्हटले आहे. याला पुष्टी देत शांडिल्यांनी म्हटले की, 'विषयवासनांच्या निवारणार्थ भक्ती हाच उत्तम मार्ग (उपाय) होय.' पंचदशीकार विद्यारण्यस्वामींनी आपल्या या ग्रंथात नमूद केले आहे की, 'संवित आत्मा आहे, तसेच परमानंदरूप परमप्रेमास्पद आहे म्हणून तेथे 'मी' नसावा असे कुणालाही वाटत नाही. ('मी' असावा असेच वाटणे स्वाभाविक आहे.) कारण प्रत्येकाच्या ठायी आत्मा हा त्याचा निरतिशय प्रेमाचा विषय असतो. आणि म्हणूनच जीवाला भोग्य पदार्थ आवडतात. ते 'या' आत्म्याकरिता पण आत्मा मात्र अन्य कुणाच्या प्रेमाचा विषय होत नसतो, नाही.

'आत्मनस्तु कामाय सर्वं प्रियं भवति।' असे बृहदारण्यकोपनिषदात याज्ञवल्क्य ऋषींनी म्हटले आहे. ज्ञानेश्वरही तेच सांगतात. 'आत्मा निरतिशय प्रेम विषय वाटत असला तरी त्या भावनेत अज्ञान मिसळलेले असते. तिथे शुद्ध आत्मबोध नसतो. यास्तव ती अवस्था - आत्मरती अवस्था म्हटली जात नाही. सर्वांना आपला आत्मा म्हणून देह प्रिय असतो. पण खरा ज्ञानी भक्त आत्मा म्हणजे देह मानीत नाही. कारण आत्मा हा परमात्मस्वरूप आहे, तो वेगळा नाही. देह हा जड असून तो नाशिवंत आहे, याचे त्याला ज्ञान झालेले असते. म्हणूनच तो आत्मरती, आत्मतृप्त,

आत्मसंतुष्ट असतो. अज्ञानी पुरुषाचा यावर अनुराग असतो. पण तो (अनुराग) घात करणारा असतो. खरी पूजा हृदयस्थानाचीच असून तोच प्रेमस्वरुप आहे' 'मी कथा करतो. लिहितो किंवा मी पूजा करतो' असा द्विधा भाव असेल तर ती परमात्मरती किंवा ते परमात्मप्रेम म्हटले जाणार नाही. कारण तो 'म' च्या भावनेत अहंकारी बनलेला असतो. जे द्वैत आहे ते या आत्मरतीस विरोधी आहे. ह्या आत्मस्वरूपाचे चिंतन, कथन परस्पराने त्याचेच विशेष ज्ञान करून देणे असे जे तदेकपरत्व त्यास ज्ञातेलोक ब्रह्माभ्यास म्हणतात.' या सर्वाचे विवेचन महाराजांनी अगदी सुसूत्रपद्धतीने केले आहे. याद्वारे अद्वैताची आणि ज्ञानोत्तर भक्तीची जाणीव महाराज करून देतात.

संसार हे दु:खाचे आणि त्यातील मोहादी विकार हे शोकाचे मूळ कारण होत. याची निवृत्ती केवळ आत्मज्ञानाच्या ठिकाणी निष्ठा प्राप्त केल्यासच होऊ शकते, अन्य कोणत्याही मार्गाने किंवा कारणाने होऊ शकणार नाही आणि हाच उपदेश खुद्द भगवंतांनीही (अर्जुनाला उद्देशून) मोहग्रस्त विश्वाला गीतेतील उपदेशाच्या माध्यमातून केलेला आहे. ज्या ज्ञानाच्या प्रवेशाने अज्ञान नाहीसे होते, जीव व ब्रह्म यांचे ऐक्य होते, जे ज्ञान इंद्रियाची द्वारे बंद करते आणि बहिर्मुखवृत्ताचे पाय मोडते, जे ज्ञान मनाचे दारिद्र्य नाहीसे करून द्वैतरूपाच्या भ्रमाचा नाश करते, असे ज्ञान सर्वत्र समबुद्धीरुपी सुबत्तेचे दिवस आणते. हेच ज्ञान उन्मतपणाचा समूळ नाश तर करतेच, शिवाय ते मनमोहाचा ग्रास करते, आपपरभाव शिल्लक ठेवीत नाही, संकल्परुपी चिखल साफ धुवून टाकते आणि संसाराला मुळापासून उपटून टाकते. अशा ज्ञानाच्या योगे बुद्धीची दृष्टी उघडली जाते आणि जीव आनंदाच्या वातावरणाचा मनमुराद आस्वाद घेऊ शकतो. ज्या अशा ज्ञानाच्या योगे विषयांनी विटाळलेले मन शुद्धही करता येते आणि आत्म्याला देहरुपी बुद्धीचा क्षयरोग झाल्यास तो या आत्मज्ञानाच्या औषधाने दूर करता येतो अशा स्थितीलाच 'ज्ञानावस्था' म्हटले जाते. ज्ञानेश्वरीत या विषयावरील संपूर्ण वर्णन गांभार्याचे वस्त्र पांघरुन आलेले असले तरी वक्ता, श्रोता, संवादात अथवा लेखक, वाचक सुसंवादात महाराज (वक्ता, व लेखक या नात्याने) मात्र याचे विवेचन सामान्यांच्या आकलन पातळीवर अनेक दृष्टांतासह व उदाहरणांची मदत घेत करीत होते. त्यांनी कीर्तन प्रवचन व लेखन याद्वारे केलेले सर्व विवेचन अद्वैततत्त्वास शिरोधार्थ मानूनच केलेले आहे.

## १६. अध्यापन कार्य

पंढरपुरातील चातुर्मासाचा कलावधी हा सांप्रदायिक, साधक, आभ्यासक, मुमुक्षू , व्रतस्थ आणि मुख्यत्त्वे करुन पंढरपुरानिवासी यांच्यासाठी आध्यात्मिक पर्वणीचाच कालावधी असतो. या कालावधीत पंढरपुरातील विविध मंदिरे, मठ, धर्मशाळा आणि धार्मिक सार्वजनिक संस्था यातून आध्यात्मिक स्वरुपांच्या कार्यक्रमांची (प्रवचने-किर्तने, सप्ताह, व्याख्याने, परिसंवाद इ.) रेलचेलच असते. महाराजही आपल्या मठात अशाच काही पारंपारिक कार्यक्रमाद्वारे चातुर्मास संपन्न करीत असत. मुख्य म्हणजे या कालावधीत पंढरपूर न सोडण्याचे, पूर्वजांपासून चालत आलेले व्रत महाराजांनीही जोपासलेले होते. (एक अपवाद-ह.भ.प. मामासाहेब दांडेकर यांचा वैकुंठगमन दिवस.) चातुर्मास वगळता अन्य आठ महिने सतत फिरती असल्याने महाराजांचा तसा निवांतपणा मिळत नसायचा, दौऱ्यावर असतानाही त्यांचे काही प्रमाणात वाचन-मनन-चिंतन चालत होते, तरी या सर्वांना पूर्ण न्याय देण्याचा कालावधी म्हणजे चातुर्मास.

पंढरपुरातील चातुर्मासात महाराजांची कार्यक्रमाची गर्दी असायची, कीर्तनप्रवचन, व्याख्याने यासारखे सार्वजनिक स्वरुपाचे कार्यक्रम असले तरी व्यक्तिगत कामासाठी त्यांना संधी व सवड उपलब्ध होत असे. या काळात नवीन ग्रंथाचे वाचन, अभिप्राय वा प्रस्तावनेसाठी इतर लेखकांच्या ग्रंथाचे वाचन, त्यावरील (अभिप्राय वा प्रस्तावना) लेखन, सांप्रदायिकांतील थोरा-मोठ्यांच्या गाठीभेटी, संप्रदायासंदर्भात चर्चा इ. अनेक गोष्टी करीत. पण या सर्वात महत्त्वाची गोष्ट असे, ती म्हणजे अध्यापन ! महाराजांच्या पंढरपुरातील चातुर्मासाच्या कालावधीचा संप्रदायाचे विद्यार्थी विशेष फायदा करुन घेत असत. महाराजही प्रतिवर्षी एखादा ग्रंथ घेऊन त्यावर भाष्य (टीका) करीत तो उलगडून सांगत, त्यासाठी ते स्वत: पहाटे तीन-साडेतीन वाजता उठून नोंदी काढत असत. त्यांचा हा अध्यापनाचा वर्ग सकाळी बरोबर आठच्या ठोक्याला सुरु व्हायचा व नऊच्या ठोक्याला थांबायचा. हे कार्य महाराजांनी पन्नास वर्षांपेक्षाही अधिक काळ केले होते. सकाळच्या प्रसन्न वातारणात सुरु झालेला हा पाठ विद्यार्थी,

अभ्यासूंना विशेष उपयोगी पडायचा. आपल्या अध्ययन प्रक्रियेत महाराजांनी पाठांतरापेक्षा जाणून घेणे' या गोष्टीस महत्त्व दिले होते. ते स्वत: समरस होऊन शिकवत असत, मग तो ग्रंथ संस्कृत असो वा प्राकृत ; हिन्दी-मराठी असो वा वेदांतपर असो. त्यांची वाणी सुरु झाली की, तिथे विवेचनाबरोबर, स्पष्टीकरणार्थ अन्य ग्रंथातील उदाहरणांचीही उपस्थिती लागे. त्यामुळे अभ्यासक विद्यार्थी जरी एका ग्रंथाचा अभ्यास करीत असायचे तरी असंख्य ग्रंथांचे संदर्भ ऐकायला मिळाल्यामुळे त्यांचे ज्ञान अधिक समृध्द होत होते. सुमारे पन्नास वर्षांच्या या ज्ञानसभात हजारो विद्यार्थी ज्ञानपूत झाले. "आज जो महाराष्ट्राच्या कोन्या-कोपऱ्यातून वारकी कीर्तन, प्रवचनाचा आवाज येत आहे, त्यात ह.भ.प. (वै.) महाराजांचा सिंहाचा वाटा आहे."- असे आवर्जून म्हटले जाते.

पंढरपुरातील चातुर्मास काळात महाराजांनी ज्या ग्रंथांवर टीका वा भाष्य केले अथवा जे ग्रंथ समजावून सांगितले त्यांची तशी यादी मोठी आहे. त्यातील काही ग्रंथ येणेप्रमाणे-

| | | | |
|---|---|---|---|
| १. | दशोपनिषद्भाष्य | २. | गीता भाष्य |
| ३. | योगवासिष्ठ (काही भाग) | ४. | सिद्धान्त बिंदु |
| ५. | पंचदशी | ६. | वेदस्तुती |
| ७. | सर्वदर्शन संग्रह | ८. | ब्रम्ह्मसूत्रे |
| ९. | ब्रह्मसूत्र भाष्य | १०. | अमृतानुभव |
| ११. | श्री. ज्ञानेश्वरी | १२. | चांगदेवपासष्टी |
| १३. | नारदभक्तिसूत्रे | १४. | हरिपाठ (ज्ञानदेव) |
| १५. | हरिपाठ (एकनाथी) | १६. | वृत्तिप्रभाकर |
| १७. | बाळक्रिडा (तुकाराम) | १८. | नाटाचे अभंग (तुकाराम) |
| १९. | गाथा (तुकोबा) | २०. | गौळणी (निळोबा) |
| २१. | विचार सागर | २२. | शांकरभाष्याचे दोन अध्याय. |
| २३. | भक्ती रसायन (मधुसुदन सरस्वती) | २४. | उपनिषदे (१ ते ८) आणि |

२५. निरनिराळ्या तत्त्वप्रणालींचे व विचारश्रेणींचे ग्रंथ

या अध्यापन प्रक्रियेत सिद्धान्त बिंदु, तुकारामांची गाथा, गीताभाष्य यासारख्या ग्रंथांवर एकापेक्षा जास्त वेळा चर्चा केली, ग्रंथ उलगडून सांगितले होते. त्यांचे हे कार्य धर्मसंस्कृतीच्या आणि संवर्धनाच्या दृष्टीने जितके महत्त्वाचे होते, तिककेच ते वारकरी संप्रदायाच्या पोषणाच्या व प्रसाराच्या दृष्टिनेही महत्त्वाचे होते. समाजोपयोगी कार्याचा तो महत्त्वाचा घटक होता. आपल्या अगाधज्ञानाने आणि अमोघ वाणीने प्रत्येक ग्रंथ स्पष्ट करीत आपल्या विद्यार्थ्यांच्यावर संस्कार करणारे ते नीतिपाठ ठरत होते. यात कोणत्याही प्रकारच्या अर्थार्जनाचा विचार महाराजांच्या मनाला कधीही शिवला-देखील नव्हता. तसेच 'या विद्यापीठातील प्रत्येक प्राध्यापकाची नेमणूक विनावेतनावर केलेली असायची.' संप्रदायाची वाढ व प्रगती, विद्यार्थ्यांच्या सखोल ज्ञानाची पात्रता (क्षमता) आणि निरलस भूमिका या विचारातून महाराजांनी ही एक प्रकारे समाज-सेवाच केली होती. दिवसाकाठी ५-५, ८-८ तास पाठ घेऊन महाराजांनी अक्षरश: शेकडो कीर्तनकार, प्रवचनकार तयार केले, घडविले होते. महाराष्ट्राची सांस्कृतिकता अधिक समृद्ध केली होती. हेच त्यांचे अध्यापन आणि सामाजिक कार्यातील मोठे योगदान होते.

## १७. संशोधनास प्रेरणा

संप्रदायाशी संबंधित अशा अनेक संस्थांशी महाराजांचा अगदी जवळचा संबंध होता. आळंदी येथील वारकरी कीर्तन संस्था, औरंगाबादेतील श्री एकनाथ संशोधन केंद्र, अहमदनगर येथील ऐतिहासिक संग्रहालय अशा काही संस्थांचा उल्लेख करता येईल. ह्या संस्थांमधून प्राचीन मध्ययुगीन संत साहित्याचे संशोधन व्हावे अशी महाराजांची इच्छा असायची. त्यामुळे संत साहित्यावर नवनवीन प्रकाश पडणे शक्य होईल असे त्यांचे मत होते. अशा ग्रंथांच्या पाठभेदाबद्दलही बोलतांना ते म्हणत की, ' कोण चूक, कोण बरोबर याचा खल करण्यापेक्षा व त्यांत वेळ, काळ, शक्ती, अर्थ व्यतीत करण्यापेक्षा त्यात समन्वय साधण्याची वृत्ती संशोधकांनी अंगी बाळगल्यास वाद होणार नाहीत.' संप्रदायातील वाद वेशीवर येऊ नयेत हीच महाराजांची भूमिका होती. अभ्यासकांनी संशोधनास प्रेरित व्हावे यासाठी अध्यासनांच्या निर्मितीचा पाठपुरावा त्यांनी केला होता.

## १८. ज्ञानेश्वरी संपादन

ज्या ज्ञानेश्वरीची वयाच्या केवळ १६-१७ व्या वर्षी सलग एकशे आठ पारायणे करुन जी मुखोद्गत केली होती, जिची आयुष्यभर साथसंगत केली होती, जिला स्वत:च्या जीवनात प्राणापेक्षाही श्रेष्ठ स्थान दिले होते, जिचे आयुष्यभर विवरण करण्यातच आनंद-सुख मानले होते, जिला श्री ज्ञानदेवांचा शब्दरुपप्रसाद मानून आपल्या शिरोस्थानी धरले होते आणि जिच्यासमोर नित्य नतमस्तक होण्यातच जीवनाची कृतार्थता मानली होती, अशा श्री ज्ञानेश्वरीवर विवरण करण्याचे कार्य महाराजांनी आपल्या आयुष्याच्या अंतिम कालावधीत केले. साठ-सत्तर वर्षे वाणीद्धारे जी निरोपिली, त्याच निरुपणाला शब्दबद्ध करण्याचा महाराजांचा निर्णय हा लोकाग्रहास्तवच होता. वास्तविक तोपर्यंत श्री ज्ञानेश्वरीवर काही मान्यवर, श्रेष्ठींची भाष्ये/संपादने प्रकाशित झालेली होती, तरीही महाराजांची विवरणपद्धती समाजाला अधिक भावली गेली होती, परिणामी असंख्य लोकांनी केलेला आग्रह महाराजांना अव्हेरता आला नाही, त्यामुळे ते ज्ञानेश्वरीचा विवरणात्मक स्वरुपाच्या ग्रंथाच्या संपादनास तयार झाले होते.

वास्तविक त्यांच्या आयुष्यातला तो काळ म्हणजे निसर्गाने त्यांच्या बाबतीत भैरवी-पूरिया रागाचे स्वर आळविण्यास प्रारंभ केलेला काळ होता. वृद्धत्व, दम्याचा विकार, आजारपण यामुळे त्यांचा शरीराच्या हालचालींवर मर्यादा आलेल्या होत्या. तरीही ध्येय, जिद्द आणि समाजाची प्रेमयुक्त आग्रही मागणी यांच्या सामर्थ्यावर महाराजांनी निसर्गावर मात करीत अठरा अध्यायी ज्ञानेश्वरी संपादनास (सार्थ) प्रारंभ केला. त्यांचा हाही ज्ञानयज्ञ सुमारे चार-पाच वर्षे चाललेला होता. दिवसभर ज्ञानेश्वरीवर बोलत राहावे, दिवसभरातील लेखन संध्याकाळी तपासावे आणि पहाटे उठून (२।।-३ वा.) पुढील ओव्यांबद्दल चिंतन करणे, संदर्भ पाहणे, टिपणे काढणे यासारखे कार्य करावे-असा त्यांचा नित्य दिनक्रम होता. या कार्यात त्यांना श्री. सच्चितानंद बाबा थावरे (जे श्री ज्ञानदेवांचे ज्ञानेश्वरीच्यावेळी लेखनिक होते) यांचे वंशज ह. भ. प. दा. का. तथा भाऊ थावरे यांनी लेखनास पूर्ण मदत केली.

सुमारे ३५००-४००० पानांचा हा विवरणात्मक ग्रंथ हस्तलिखित स्वरूपात सुमारे ९०% इतका संपन्न झालेला होता. तो पूर्ण होण्यापूर्वीचा महाराजांचे निर्याण झाले. आयुष्याच्या अखेरच्या क्षणापर्यंत वा शेवटच्या श्वासापर्यंत महाराज केवळ ज्ञानेश्वरीचाच विचार करीत होते.

सदरचा ग्रंथ (सार्थ ज्ञानेश्वरी) चार खंडात प्रसिद्ध होणार असून, पैकी एक खंड (अध्याय १ ते ८) प्रकाशित झालेला आहे. उर्वरित खंड प्रकाशित करण्यासाठी त्यांचे नातू ह. भ. प. चैतन्य महाराज देगलूरकर हे प्रयत्नशील आहेत. या ग्रंथाच्या प्रकाशनाने पुन्हा एकदा या महावैष्णवाच्या ज्ञानसूर्याचे दर्शन समाजाला तर होईलच, शिवाय मुमुक्षू अभ्यासक, साधकांना अधिकाधिक अनुभूतीदेखील प्राप्त होईल.

## १९. का दिक् ? सन्तो दिक्

आरण्यकातील तिसऱ्या पर्वातील युधिष्ठिर-यक्ष संवादात यक्षाने युधिष्ठिराला 'का दिक् ? (दिशा कोण आहेत ?) असा प्रश्न केला होता, त्यावर युधिष्ठिराने 'सन्तो दिक्!' (संत हेच दिशा होत) असे उत्तर दिले होते. समाजाला योग्य दिशा देण्यात वारकरी संप्रदायातील सर्वच संतांनी सामाजिक समतेचे विश्व निर्माण केले. सर्वांभूती समभाव-भगवत्भाव ही भूमिका ठेवून भक्तिसेवा आणि प्रेमममता या मूल्यांचा उत्कर्ष केला. त्यांच्या साहित्यात वेद-वेदान्त, भक्तिशास्त्रे यामधील मोक्षविद्येची रहस्ये प्रकट झालेली आहेत. महाराजांनी या सर्वांचे अनुकरण आपल्या कार्य कालावधीत केले होते. किंबहुना संताची ही भूमिकाच महाराजांच्या साहित्यलेखन प्रेरणेचे बलस्थान म्हणावे लागेल. त्यांची साहित्यनिर्मिती म्हणजे संतवाङ्मयाची पूजाच होय. संतांनी कथन केलेल्या, प्रतिपादिलेल्या भक्तिमार्गाचे स्वरुप उलगडून दाखविण्याचे व संतवाङ्मयाचे अंतरंग उकलून दाखविण्याचे कार्य महाराजांनी केले. त्यांचे साहित्य म्हणजे संतविचारांचे दर्शनच होय. संतांनी दिग्दर्शित केलेल्या लौकिकाकडून अलौकिकाकडे जाणाऱ्या, पार्थिवाकडून परतत्त्वाकडे जाणाऱ्या मार्गाचे सामर्थ्य उलगडून सांगण्याचे कार्य महाराजांनी केले.

महाराजांच्या लेखनप्रेरणेसंबंधी ह.भ.प. बाळासाहेब भारदे यांनी म्हटले आहे की, 'आज अनेक ज्ञानमार्गी लोक जगाकडे न पाहता डोळे मिटून साधना करताना दिसतात. त्यामुळे अशा लोकांचा जगास फारसा उपयोग होत नाही. अनेक भक्तिमार्गी लोक आपल्या उपास्य देवतेच्या-देवमूर्तीच्या पलीकडे जात नाहीत. अनेक नीती मानणारे लोकही वैयक्तिक काही सद्‌गुणालाच नीती समजतात आणि सामाजिक नीतीबद्दल काहीही दखल घेत नाहीत. सारांश मनुष्य समाजाविषयी उदासीन बनलेला दिसून येतो. हे चित्र बदलावे, ज्ञानशील माणसाला दयाशील बनवावे, भावनाशील माणसाला प्राप्त बनवावे अशा त्रिविध प्रक्रिया म्हणजेच खरी शुद्ध धर्मसाधना होय. श्री धुंडा महाराजांनी हे कार्य करीत आपली संतकार्याशी जवळीक साधली होती. त्यांचे कार्य संतांनी दाखवून दिलेल्या दिशेनेच जाणारे कार्य होते.

## २०. वारकऱ्यांना आधार

सन १९४३ ची गोष्ट. राज्यात दुष्काळ ग्रस्त परिस्थिती जाणवू लागलेली होती. बाजारात कोणतेही धान्य उघडपणे मिळेनासे झालेले, कोणतेही धान्य विकण्या-संदर्भात इंग्रज सरकारने कडक बंधने घातलेली. वातावरण तसे चिंता करण्या-सारखेच निर्माण झालेले. त्यात पंढरपुरातील आषाढी एकादशी निमित्त येणाऱ्या 'वारीचे दिवस' या लोकांच्या अन्नधान्याची व्यवस्था करणे अशक्य असल्याने, सरकारने पंढरपुरातील गर्दी कमी करण्याच्या दृष्टीने काही निर्णय घेतले. त्यातील एक निर्णय म्हणजे पंढरपूरला जाणाऱ्या सर्व रेल्वे गाड्यांची पंढरपूरची तिकीटे बंद केली. तरीपण जे खरेच भक्त, भाविक, नियमित वारकरी होते ते थोडेच अशा बंधनाला वा सरकारी बंधनांना भीक घालणार होते. यापैकी अनेकांनी सांगलीपर्यंत रेल्वेने प्रवास करणे व तेथून पंढरपूरचा पायी प्रवास करणे पसंत केले. अशा विविध युक्त्यांनी वा पायी येणाऱ्या लोकांची (वारकऱ्यांची) काही तरी सोय करायला हवी, या जाणिवेने पंढरपुरातही हालचाली सुरु झाल्या होत्या. यासाठी ह.भ.प. सोनोपंत तथा मामासाहेब दांडेकर आणि धुंडा महाराज देगलूरकर यांच्या नेतृत्वाखाली एक समिती निर्माण करण्यात आली होती. गावागावातून, घरोघरी जाऊन धान्य जमा

करण्याचा निर्णय या समितीने घेतला होता. प्रत्येकाने किमान पाच लोकांना पुरेल एवढा शिधा द्यावा असे आवाहन या समितीच्या वतीने करण्यात आले होते. धान्य जमा करण्यास स्वयंसेवक ठिकठिकाणी जात होते. जमा होणाऱ्या धान्याचे वाटप योग्य व शिस्तबद्ध पद्धतीने होण्यासाठी पंढरपूरात वीस-पंचवीस केंद्रे उभारण्यात आली होती. अपेक्षेप्रमाणे एकादशीनिमित्त यात्रेकरूंनी पंढरपुरात गर्दी केलेली होती. द्वादशीला अन्नदानाचा कार्यक्रम यथास्थित पद्धतीने पार पडला. एकट्या देगलूरकरांच्या मठामध्ये सुमारे दहा हजार वारकऱ्यांना अन्नाचे वाटप करण्यात आले होते.

## २१. पानशेतग्रस्तांना मदतीचा हात

जुलै १९६१ मध्ये पुण्याजवळील पानशेत धरण फुटल्याने संपूर्ण पुणे शहरात हाहाकार उडाला होता. नदी परिसरातील असंख्य घरे, संस्था, मंदिरे, मशिदी उद्ध्वस्त झालेले. या प्रलयात अनेकांचे जीव गेले, अनेकांची जनावरे वाहून गेलेली. असंख्यांचे संसार उद्ध्वस्त झालेले तर कैक लोकांचे संसार रस्त्यावर आलेले होते. नुकसानीचा कोणताच अंदाज बांधता येत नव्हता. अर्थात असे नुकसान फक्त पुण्याचेच झाले नव्हते, तर नदीकाठावरील ज्या ज्या गावातून हे प्रलयाचे जल गेले होते तिथेही थोड्याफार फरकाने हीच परिस्थिती होती. प्रलयानंतर पुनर्वसन कार्यास प्रारंभ झाला. केंद्र-राज्यशासन मदतीसाठी पुढे सरसावले. देशातील अन्य राज्यातून राजकीय-संस्थात्मक व व्यक्तिगत पातळीवर मदतीचे ओघ निर्माण झाले. यात महाराजांनीही आपला खारीचा वाटा उचलला होता. ह.भ.प. प्रा. मामासाहेब दांडेकरांनी केलेल्या आवाहनास महाजांनी प्रतिसाद दिला होता. वास्तविक त्यावेळी महाराजांचे कनिष्ठ बंधु श्री. बंडा महाराज यांचे नुकतेच निधन झाले होते. तरीही दु:खाला कवटाळून न बसता महाराजांनी कर्तव्यबुद्धीने मदतीसाठी हात ओला केला व सामाजिक कर्तव्य पूर्ण केले होते.

## २२. संतसाहित्य संशोधन प्रकाशनास शासनास मदत :

महाराष्ट्र शासनाच्या वतीने प्रसंगपरत्वे संतसाहित्याचे प्रकाशन करण्याचा निर्णय घेतला गेला होता. त्या अनुषंगाने वेळोवेळी काही समित्याही नियुक्त केल्या गेल्या होत्या.

संतसाहित्याचे गाढे अभ्यासक, चिंतक समीक्षक व संशोधक या नात्याने शासनाने तीन समित्यांवर महाराजांची नियुक्ती केली होती. महाराजांनाही आपल्या ज्ञानाचा व अनुभवाचा लाभ शासनाच्या प्रकाशन कार्यास दिला होता. ती प्रकाशने येणेप्रमाणे-

१. शासनाच्या वतीने संतश्रेष्ठ एकनाथ महाराज यांचा 'भावार्थ रामायण' ग्रंथ प्रकाशित करण्याचे ठरल्यानंतर, त्यासाठी तज्ज्ञ लोकांची एक समिती नियुक्त करण्यात आली होती. या समितीमध्ये महाराजांव्यतिरिक्त सर्वश्री ह.भ.प.शं. वा. (सोनोपंत तथा मामासाहेब) दांडेकर, रंगनाथ कुलकर्णी, बळवंत गिरीराव घाटे (निवृत्त सेशन जज्ज), वि. पां. देऊळगांवकर, न. शे. पोहनेरकर आदी व्यासंगी होते. या समितीच्या कार्यासाठी पैठण, औरंगाबाद, पुणे, आळंदी, नाशिक इ. ठिकाणी सभा झाल्या होत्या. या समितीचे काम चालू असतानाच समितीतील एक ज्येष्ठ सदस्य ह. भ. प. मामासाहेब दांडेकर यांचे निधन (दिनांक ९ जुलै, १९६८) झाले. या ग्रंथास महाराजांनी प्रस्तावनाही लिहिलेली आहे.

२. संत नामदेव महाराजांच्या जन्मशताब्दीनिमित्ताने शासनाने 'श्री नामदेव गाथा' प्रकाशित करण्याचा निर्णय घेतला होता. अर्थात त्यासाठी जी संपादन समिती नियुक्त केली होती त्यात महाराजांचा समावेश होताच, शिवाय अन्य सन्मानीय सभापती होते. या समितीची एक सभा ६ आक्टोबर, १९७० रोजी पंढरपुरात आयोजित करण्यात आली होती. त्यासभेस महाराष्ट्र राज्यातील तत्कालीन मंत्री सर्वश्री. मधुकरराव चौधरी, बाळासाहेब भारदे आणि वि. स. पागे उपस्थित होते. (ही सभा चातुर्मास काळातील होती व महाराज चातुर्मासात पंढरपूर सोडत नसत. म्हणून पंढरपुरात सभा-बैठक आयोजिली होती).

३. संतश्रेष्ठ श्री ज्ञानदेवांच्या 'ज्ञानेश्वरी'ची एक शुद्ध स्वरूपातील संपादित प्रत भाविकांसाठी, अभ्यासू उपासकांसाठी उपलब्ध व्हावी या हेतूने, महाराष्ट्र शासनाच्या वतीने 'ज्ञानेश्वरी संपादन समिती' स्थापन करण्यात आली होती. (शासन निर्णय क्र. ज्ञाजस/१०७४/९७०३१-क्यू/दिनांक १६ नोव्हेंबर, १९७०.) श्री ज्ञानेश्वरीचे अनेक अभ्यासक, उपासक या समितीचे सदस्य होते. समितीत महाराजांव्यतिरिक्त

सर्वश्री. श्री. ना. बनहट्टी, डॉ. वि. भि. कोलते, स. के. नेऊरगांवकर, ह. भ. प. किसन महाराज साखरे, वि. त्र्यं. शेटे हे सन्माननीय सदस्य होते, तर शासनाच्या वतीने प्रतिनिधी व निमंत्रक म्हणून शिक्षण उपसंचालक श्री. सं. गो. टिकम यांचीही नियुक्ती केली होती.

पुढे दिनांक २२ एप्रिल, १९७५ रोजी समितीचे एक सदस्य श्री. श्री. ना. बनहट्टी यांचे निधन झाल्याने, त्या जागेवर श्री. वि. स. पागे यांची नियुक्ती केली होती.

समितीस पुढे ३१ मार्च, १९७६ पर्यंतची मुदत वाढवून दिली होती. हे सर्व प्रकल्प पूर्ण करण्यात महाराजांनी शासनाला पूर्ण साहाय्य केले होते. शासनाच्या वतीने हे तीनही ग्रंथ प्रकाशित झालेले आहेत.

**सांप्रदायिक लेखनामागील प्रयोजने-**

सामान्यत: प्रत्येक मानवी कृतीमागे सहेतुकता असते. नजरेसमोर निर्माण केलेल्या उद्दिष्टांच्या किंवा ध्येयांच्या सफलतेच्या अनुरोधाने प्रत्येकजण प्रयत्नशील असतो. ध्येयात्मकता ही माणसाच्या उत्कर्षास कारणीभूत ठरते, तर अशा ध्येयप्राप्तीसाठी किंवा पूर्ततेसाठी केले जाणारे प्रयत्न मानवास अधिक गतिमान बनवतात. अशा ध्येयांच्या इच्छांच्या पूर्तीसाठी माणूस आपल्या आचार-विचार-कृतींना विशिष्ट वळण देत आपल्या जीवनाची दिशा निश्चित करीत जातो. या दृष्टीने शारीरिक, बौद्धिक, व मानसिकदृष्ट्या केले जाणारे प्रयत्न म्हणजे इच्छापूर्तीसाठी हेतुत: केली जाणारी वाटचाल होय. हेतुपुरस्सर नजरेसमोर ठेवलेले उद्दिष्ट म्हणजेच प्रयोजन, अर्थात अशा प्रयोजनातील काही व्यक्तिगत स्वार्थीपणाची तर काही सामाजिक जाणिवांची व्यापकता लाभलेलीही प्रयोजने असतात. साहित्यनिर्मिती क्षेत्रही अशा प्रयोजनांना अपवाद नाही. भारतीय काव्य (साहित्य) शास्त्रात भरताच्या नाट्यशास्त्रापासून या काव्यप्रयोजनांची चर्चा चालू झाली. कालांतराने त्यात भामह, आनंदवर्धन, अभिनव गुप्त, दण्डी, मम्मट यासारख्या दिग्गज काव्यशास्त्रकारांनी आपली मते मांडून ही प्रयोजन चर्चा अधिक रंगविली. या प्रयोजनात यश, अर्थ, व्यवहारमान, अशुभ-निवारण, तात्काळ

उत्कट आनंद, स्वान्त:सुख तथा कान्तेया उपदेश या काही प्रयोजनांवर शिक्कामोर्तबही झाले. या साहित्यानिर्मितीच्या प्रयोजनांच्या पार्श्वभूमीवर महाराजांच्या लेखनाची प्रयोजने कोणती होती किंवा त्यांच्या लेखनामागील दृष्टिकोन कोणता होता हे लक्षात घेतल्यास महाराजांच्या विचारसरणीवर अधिक प्रकाश पडू शकेल.

मध्ययुगीन काळातील संतांनी (श्री ज्ञानदेव ते निळोबा) ज्या प्रेरणेने आणि प्रयोजनांनी आपली साहित्यनिर्मिती केली होती, त्यास समांतर स्वरुपी भूमिका महाराजांच्या लेखनामागे असल्याचे जाणवते. संत एकनाथांनी एका अभंगात आपल्या अवतारकार्याची भूमिका मांडतांना म्हटले आहे की-

**"आम्हां कां संसारा येणें, हरिभक्ती नाम स्मरणें ।**
**जडजीवां उद्धरणें, नामस्मरणे करूनी ।।**
**सर्व कर्म ब्रम्हस्थिती, प्रतिपादाव्या वेदोक्ती ।**
**हेचि एक निश्चिती, करणे आम्हा ।।** - एकनाथ गाथा १८९०.

आपल्या जीवनकार्यात स्वीकारलेली महाराजांची भूमिका, नाथांच्या भूमिकेशी पूर्ण समरुप, समांतर अशीच दिसून येते. महाराजांच्या कार्याचा आढावा यापूर्वीच्या प्रकरणातून घेतलेला आहे. त्यातून त्यांची जीवनप्रणाली, तत्त्वविचार, जीवनदृष्टी स्पष्ट झालेली आहे. तोच दृष्टिकोन त्यांच्या लेखनात उतरलेला आहे.

१. वारकरी संप्रदायाची भरभराट व त्यातील तत्त्वज्ञानयुक्त साहित्यवाङ्मयाची निर्मिती अलिकडच्या (म्हणजे तेराव्या शतकापासून) काळातील असली तरी त्यातील तत्त्वज्ञानाची मूळ बैठक वेदवाङ्मयावर उभारलेली आहे. महाराजांच्या लेखनाचे स्वरुप लक्षात घेता वेदवाङ्मय आणि संतसाहित्य यांच्यातील एकरुपत्व दाखविणे हे त्यांनी आग्रही मानले. संतसाहित्यातून व्यक्त झालेले विचारधारेचे मूळ वेदवाङ्मयाशी कसे जोडले गेले आहे हे स्पष्ट करणे, शिवाय या दोन्ही प्रकारच्या साहित्याशी समाजाला बांधून घेणे हे महाराजांना महत्त्वाचे वाटले असावे. म्हणूनच वेदोक्तींचे प्रतिपादन, संतवाङ्मयाच्या (विचारांचा) स्फूर्तीचा झरा म्हणजे वेद अशा वेदांचे

स्पष्टीकरण करीत वेदांत सोपा करणे आणि वेदवाङ्मयासहित संतवाङ्मयाकडे पाहण्याचा विशेषत: सुशिक्षितांचा दृष्टीकोन बदलणे महाराजांना आवश्यक वाटले होते.

२. सतत समाजचिंतनाविषयीची मग्नता, सामाजिक नैतिकतेचा विचार आणि भक्तीपासून दुरावणाऱ्यांच्या मनात पुन्हा भक्तिभावाची जागृती करीत तो रुजविणे यातून महाराजांचा समाजचिंतकाचा गुण दिसून येतो. त्यांनी केलेले सांप्रदायिक कार्य, संप्रदायाचे नेतृत्व, ब्रह्मविज्ञेच्या प्रसारार्थ केलेली भाषांतरे (निरूपणे/विवरणे), परमार्थ सुलभ करतांना केलेला वाणीसहित लेखणीचा वापर व समाज प्रबोधनार्थ स्वीकारलेली सततची भटकंती या सर्व कृती मध्ययुगीन संतांच्या कार्यप्रमाणेच दिसून येतात.

**भक्तिज्ञान विरहित गोष्टी, इतरा न कराव्या।**
**प्रेमभरे वैराग्याच्या युक्ती विवराव्या।**

हे संतांचे आदर्श त्यांच्या व्यक्तित्वात ठासून भरले होतेच, पण त्याचबरोबर त्यांनी या कानमंत्राने खरा समाजही भरुन टाकण्याचे आणि समाजाच्या अंतरी श्रीहरीची मूर्ती व संतप्रेम भरविण्याचे / ठसविण्याचे कार्य केले. त्यांचे हे कार्य म्हणजेच साहित्यातील शब्दरुप होय.

३. महाराजांच्या जीवनास पूर्वसूरींच्या सत्प्रवृत्तीचे, परमार्थी जीवनाचे दिव्याधिष्ठान लाभलेले होते. त्यांच्या विचारामागे कार्यामागे, 'भूतां परस्परें जडो मैत्र जीवांचे' अशी सर्वात्मक कल्याणाची दृष्टी होती. समाजात मांगल्य निर्माण व्हावे या त्यांच्या मनात दृढ झालेल्या भावनेच्या पूर्ततेसाठी ते समाजकार्यास प्रवृत्त झाले. त्यांचे साहित्य म्हणजे समाजसुधारक, तत्त्वचिंतक आणि मुमुक्षू तथा साधक अशा सर्वांना 'सांस्कृतिक पाथेय' आहे.

४. सर्वसमत्वाची दृष्टी प्राप्त करुन घेतलेल्या महाराजांनी याच भूमिकेचा उच्चार आपल्या लेखनातून अनेकदा केला. सर्व सृष्टी त्रिगुणात्मक आहे आणि या त्रिगुणांच्या कमी-अधिक प्राधान्याने वस्तुजात निर्माण झालेले आहेत. मानवी समाज व्यवस्था म्हणजे अशाच त्रिगुणांचा परिपोष आहे. हे लक्षात घेतले तर ज्ञातिवर्ण यांचा अभिमान न बाळगता प्रत्येकाने आपल्या वाट्यास येणाऱ्या स्व-धर्माचे शास्त्रविरहित

आचरण करणे म्हणजेच सर्वात्मक ईश्वराची भक्ती करणे होय. 'चहुवर्णी लागी नामाचा अधिकार ।'- या श्री ज्ञानदेवांच्या विचारांचा प्रभाव त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर झालेला होता. संतांच्या या व अशा असंख्य अमूल्य विचारधनाचा प्रसार करण्यासाठी महाराजांनी जशी आपली वाणी खर्च केली, तशीच लेखणीही खर्चून संतवाङ्मयावरील निरुपणे-विवरणे गद्यस्वरुपात लिहून प्रकाशित केली. संतविचार समाजातील अगदी तळागाळातील, खेड्यापाड्यातील लोकांपर्यंत समृद्ध स्वरुपात, सोप्या शब्दात जावे हे त्यांच्या लेखनाचे ध्येय होते. मुळात अशा ग्रंथांची समाजालाही गरज होतीच. साहित्यातून समाजाला जीवनाचा अर्थ व महत्त्व उलगडून सांगणे, भक्तीचा डांगोरा पिटत भक्तिसाधनेचे स्वरुप विशद करणे, समाजाचे होऊ लागलेले नैतिक अध:पतन थांबविण्यासाठी संतविचारांचा प्रसार करणे, धर्म-पंथ या बरोबरच देश-राष्ट्रनिष्ठेची भावना अधिक दृढ करणे, वृद्धिंगत करणे, ज्या कारणांमुळे समाज धर्मभावनेपासून दुरावतो आहे, अशा कारणांचा शोध घेत, समाज मनातील शंकांचे निराकरण करणे, धर्म-पंथ या संदर्भातील आक्षेपांचे निरसन करणे, याबरोबर समाजात परमार्थ विचार व विज्ञानवादी दृष्टी यांचा समन्वय साधणे यासारख्या अनेक जाणिवांनी महाराजांचे व्यक्तिमत्त्व भरलेले होते. त्यातून त्यांना ब्रह्मविद्येचाही सुकाळ करावयाचा होता. या सर्व प्रयोजनाप्रीत्यर्थ महाराजांनी ग्रंथलेखन केलेले आढळते.

५. जीव, जीवाचे स्वरुप, जीव-ईश्वर संबंध, जीवनातील मूल्यांचे स्थान, आत्म्याचे अमरत्त्व, संसाराचे (प्रपंचाचे) स्वरुप, सुखी संसाराची कल्पना, प्रपंचाचे मिथ्यत्व, संसार आणि मोक्ष, सत्यासत्य विचार, प्रारब्धकल्पना, भक्तिप्रेम आणि भक्ती, माया (अविद्या विचार), जीवनातील ज्ञानाचे महत्त्व, धर्म, विवेक, वैराग्य, परमेश्वराचे सगुण-निर्गुणत्व, चराचर सृष्टीचे आभासी स्वरुप, संतांचे अलौकिकत्व इ. गोष्टींची विस्तृत माहिती समाजास उपलब्ध करुन देणे या हेतूने महाराज लिहिते झाले असावेत. 'सर्वे ऽ त्र = सुखिन = सन्तु ।' असा समाज निर्माण व्हावा ही त्यांच्या व्यक्तित्वातील स्थायी भावना होती. पारमार्थिक दृष्टीने पाहिले असता त्यांचे हे विचार म्हणजे त्यांच्याठायी असलेल्या समाजोन्नतीच्या तीव्र तळमळीचे प्रतीक होय. आपल्या सर्व ग्रंथातून त्यांनी केलेला उपदेश म्हणजे 'संता घरचे लेणे होय. हा प्रसाद त्यांच्या ग्रंथाद्वारे केव्हाही सेवन करणे सहज शक्य आहे.

६. महाराजांच्या ग्रंथ लेखनाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी एकही स्वतंत्र ग्रंथ लिहिला नाही, तर श्री ज्ञानदेव, एकनाथ, तुकाराम या संतश्रेष्ठींच्या वाङ्मयावरच आपल्या लेखनाची उभारणी केली. 'नवीन देऊळ बांधण्यापेक्षा प्राचीन मंदिराचा जीर्णोद्धार करणे अधिक पुण्यकारक असते' असे मानले जाते. हीच भूमिका लक्षात घेऊन महाराजांनी संतवाङ्मय सामान्यांच्या आकलन पातळीवर आणीत, त्यातील संतांची शिकवण, त्यांचे विचार, त्यांचे तत्त्वज्ञान आणि संतांची समाजोद्धारक भूमिका स्पष्ट केल्या. संतांचे वाङ्मय नेहमीच अल्पाक्षरी असल्याने ते अनेकदा अनाकलनीय असते, शिवाय त्यांची भाषादेखील ५००-७०० वर्षांपूर्वीची (वास्तविक ती तितकी दुर्बोध नाही.) त्यातील दुर्बोधता दूर करण्याचे व संतांच्या विचारातील भावार्थ स्पष्ट करण्याचे कार्य महाराजांनी आपल्या ग्रंथातून केले. महाराजांनी प्रचंड लेखन केले. नऊ ग्रंथ, सुमारे शंभरहून अधिक ग्रंथाना प्रस्तावना, दीडशेहून अधिक स्फुटलेखन यांचा त्यात समावेश होतो. त्यांच्या सर्व लेखनाची एकूण पृष्ठसंख्या पाहता ती साधारण २००० ते २५०० इतकी भरेल. (अधिक तपशिल सूची क्र. १ पहावा.) लेखन करतांना ते कधी पाठचिकित्सेच्या वादात अडकले नव्हते. उलट 'पाठचिकित्सा करण्यात विनाकारण शक्ती, वेळ, अर्थ यांचा अपव्यय होतो' असे म्हणत. महाराजांचे लेखन हे अळवावरचे पाणी नसून तो अमृत्वाचा प्रवाहच आहे.

७. महाराजांनी नारदभक्तीसूत्रासारखा प्राचीन ग्रंथ आणि ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम आदी संतांच्या ग्रंथावर व गाथ्यातील अभंगांवर निरूपण करणारे ग्रंथ सिद्ध केलेले असले तरी त्यांच्या वाङ्मयोपासनेत केवळ विठ्ठल हे आराध्य होते. कारण 'गीता हे जाण्य वाङ्मयमूर्ती श्री प्रभूची ' या गीतेच्या संदर्भातील माऊलींच्या वचनाप्रमाणे 'संतवाङ्मय हे जाणा वाङ्मयमूर्ती श्री विठ्ठलाची ' हा त्यांचा विश्वास होता. त्यामुळे संतवाङ्मयाची उपासना म्हणजे पर्यायाने श्री विठ्ठलाचीच उपासना असे त्यांनी दर्शविले होते.

८. महाराजांच्या वाङ्मयोपासनेत (लेखन आणि वाणीमध्ये) श्री विठ्ठल व विशेषत: वारकरी संप्रदायी संत यांच्याशी अभेद्यत्व निर्माण झाले होते असे दिसते.

प्राचीन काळातील कवी मुरारी व मधुसुदन सरस्वती यांनी विश्वमोहिनी, वाग्विलासिनी अशा शारदेशी आपल्या वाङ्मयोपासनेद्वारा एकरुपत्व (अभेद्यत्व) जे दर्शविले आहे, त्याचे या ठिकाणी स्मरण होते. मधुसुदन सरस्वतींनी म्हटले आहे की, 'पारं देति सरस्वत्त्या मधुसुदन सरस्वती । मधुसुदन सरस्वत्त्या ; पारं देति सरस्वती ।'- (मधुसुदन सरस्वती हेच सरस्वतीचा पार जाणू शकतात आणि सरस्वती मधुसुदन सरस्वतीचा. इतके हे एकरुपत्व) तर कवी मुरारीने शारदेचे सामर्थ्य व तिची उपासना या संदर्भात लिहिले आहे की, 'वानरांनी स्व-सामर्थ्याच्या बळावर समुद्राचे जरी उल्लंघन केलेले असले तरी त्यांना त्या समुद्राची खोली कळू शकलेली नाही. ती फक्त मंदारपर्वतालाच समजलेली आहे. तसे देवी सरस्वतीची उपासना करणारे भक्त असंख्य असले तरी तिचे सारे हृद्गत केवळ मुरारी या उपासक कवीलाच समजलेले आहे. थोडक्यात देवीच्या उपासनेनेच वाङ्मयोपासना घडू शकते. महाराजांनीही या सरस्वतीदेवीची कठोर अध्ययनाद्वारे मनोमन महापूजा बांधली होती. अन् विशेष म्हणजे ती त्यांना प्रसन्नही झाली होतीच. अर्थात् यासाठी अनेकांचे घेतलेले मार्गदर्शन, ग्रंथांचे पाठांतर त्यावरील चिंतन-मनन, ज्येष्ठांचे आशीर्वाद आणि जनसामान्यांचे प्रेम या सर्वांचा त्यात सहभाग होताच ! आणि या सर्वांचे फलित म्हणजे त्यांची अफाट वाङ्मय-निर्मिती होय.

९. महाराजांनी स्फुट लेखनात अनेक संतांच्या चरित्राचा, त्यांच्या विचारांचा व साहित्याचा परामर्श घेतला आहे. मात्र आपले ग्रंथ श्री ज्ञानदेव, एकनाथ व तुकाराम महाराज या तीन संतांच्या साहित्यावर संपन्न केलेले आहेत. यात श्री ज्ञानदेव आणि एकनाथ यांच्या हरिपाठावरील विवरणात्मक ग्रंथ महत्त्वाचे हरिपाठाचे अभंग म्हणजे वारकऱ्यांची संध्या, भक्तिशास्त्रावर आधारित असलेल्या या दोन्ही हरिपाठावरील ग्रंथातून भक्तीचे सारे स्वरूप अत्यंत बारकाव्यानिशी उलगडून सांगताना भक्तीच्या विराट स्वरूपाचे दर्शन घडविले आहे. तीच गोष्ट नारदभक्तिसूत्र या ग्रंथाची. स्फुट लेखनात महाराजांच्या 'मीमांसा' लेखनाचा एक स्वतंत्र भाग येतो. यात त्यांनी अवतार मीमांसा, प्रेम मीमांसा, अध्यात्म मीमांसा, जीवन मीमांसा, भागवतधर्म मीमांसा, चित्तशुद्धी मीमांसा इ. सुमारे आठ-दहा विषयाची फोड करणारे लेखन करून, अभ्यासू वाचकांना 'मीमांसे'ची ओळख करून दिलेली आहे.

१०. समाज आणि व्यक्ती या दोहोंच्या जीवनाला योग्य वळण लावणाऱ्या मूलभूत तत्त्वांचा विचार म्हणजे संतसाहित्याचा विचार होय. संतसाहित्य हे सर्वप्रकारच्या भेदांच्या (जात, पंथ, उपपंथ, लिंग इ.) सीमारेषा ओलांडून गेलेले आहे. ते एका उदात्त भावनेचे प्रतीक आहे आणि हीच भावना जनमानसात रुजावी, समाज सर्वार्थाने सात्त्विकतेने युक्त-समृद्ध व्हावा यासाठी ते सतत प्रयत्नशील राहिले होते आणि याचे उत्तम प्रत्यंतर म्हणजे महाराजांनी श्री ज्ञानदेवांच्या पसायदानावर (ज्ञानेश्वरीतील केवळ नऊ ओव्यांवर) सुमारे अडीचशे पानांचा लिहिलेला ग्रंथ, (पसायदान-ज्ञानदेवाचे मागणे). खलांच्या रुपाने समाजात वापरत असलेल्या तम प्रवृत्तीचा, आसुरी संपत्तीच्या हव्यासाचा नाश व्हावा आणि सत्त्वगुणांच्या रुपाने समाजातील प्रत्येकास स्व-धर्माद्वारे वांछिलेले फळ प्राप्त व्हावे, समाज सामाजिक, सांस्कृतिक व नीतिदृष्ट्या सुदृढ, संपन्न व्हावा यासाठी कार्यरत राहिले, लिहिते झाले.

महाराज प्रपंची होते तरीही ते पूर्ण परमार्थनिष्ठ होते. प्रपंचात राहून परमार्थ कसा करावयाचा याचे ज्ञान त्यांना होते. कदाचित या संदर्भात त्यांच्यासमोर संत एकनाथांचा आदर्श असावा. तसे महाराजांच्या चरित्रात नाथांच्या चरित्रातील अनेक साम्यस्थळे आढळून येतात. महाराजांची भक्तियोग दृष्टी प्रवृत्तिप्रधान आणि अद्वैतनिष्ठ होती. हरिगुण संकीर्तन, धर्मशास्त्रावरील प्रवचन, ज्ञानेश्वरीचा आस्वाद, संतसाहित्यातील भक्तीचे निरुपण, चिंतनाधिष्ठित ज्ञानप्रसार आणि प्रबोधनाप्रीत्यर्थ सततचे पर्यटन ही त्यांच्या जीवनशैलीची वैशिष्ट्ये होती.

### विश्व मोहरे लावावे

भारतीय आध्यात्मिक तत्त्वज्ञानाचा हाच विशेष आहे की, त्याचा उगम जीवन-विषयक महत्त्वाच्या प्रश्नांच्या जाणिवांतून झालेला आहे. त्याच्या या वैशिष्ट्यामुळे भारतीय तत्त्वज्ञान आध्यात्मिक (Spiritual) म्हणून ओळखले जाते. भारतीय तत्त्वज्ञानाला वेद, शास्त्रे, पुराणे, गीता यासारख्या सार्थ व समृद्ध प्राचीन ग्रंथाची परंपरा व पाया आहे. या साऱ्यातून हिंदू संस्कृतीच्या जीवनप्रणालीचे सारे तत्त्वज्ञान व्यक्त

झालेले आहे. जागतिक पातळीवर भारतीय तत्त्वज्ञानाला व आध्यात्मिक वैचारिकतेला वैश्विक श्रेष्ठत्व लाभलेले असतांना, दुसरीकडे मात्र या अलौकिकतेची दखल न घेणारा आणि केवळ ऐहिक सुखासीनतेला प्राधान्य देणारा, भारतीय तत्त्वज्ञान-संस्कृती-अध्यात्म या सर्व कुचकामी गोष्टी होत असे सांगत त्यावर टीकेची झोड उठविणारा भारतीयांचाच एक (तथाकथित सुधारकांचा) वर्ग. अशी मंडळी आध्यात्मिक पातळीवर जीवनाच्या अर्थ कधीच घेऊ शकत नाहीत.

महाराजांचे कार्य विशिष्ट ध्येयांनी युक्त होते. संतांच्या पठडीतील, समाजप्रबोधनता त्यात होती. एक सुजाण, भक्तिप्रवण, समत्वाची व समतेची बूज राखणारा, प्राणिमात्रांवर प्रेम करीत भूतदयेचे पालन करणारा आणि देश, धर्म, पंथ, संतोपदेश यावर अचल निष्ठा ठेवणारा, स्वाभिमानी असा समाज त्यांच्यासमोर होता आणि असा समाज वास्तवात उभा राहण्याच्या दृष्टीने महाराजांनी आपल्या कार्याला दिशा दिली होती. लोकोद्धाराच्या मुख्य हेतूने प्रेरित झालेल्या महाराजांनी आपल्या लेखनप्रक्रियेतही तोच दृष्टिकोन ठेवला होता, हे त्यांच्या ग्रंथांच्या माध्यमातूनही स्पष्टपणे जाणवते.

एखाद्या धर्माचा वा पंथाचा प्रचारक साधू असला आणि संधिसाधू असला म्हणजे त्याचे समाज मनावर काय, कोणते व कसे परिणाम होतात हे वेगळेपणाने सांगण्याची गरज नाही. मात्र महाराजांच्या ठिकाणी असलेली देव-संप्रदाया-संबंधीची अगाध भक्ती, ज्ञानभक्तीची सखोल साधना आणि समाजोद्धाराची प्रामाणिक कळकळ, शिवाय त्यांच्या ठायी असलेला अध्यात्म-भक्ती-नीती यांचा त्रिवेणी संगम यामुळे समाजासमोर संप्रदायाचा एकनिष्ठ व प्रामाणिक प्रचारक, प्रसारक व प्रवक्ता उभा होता. अनंत वर्षांपासून प्रवाहित असलेली (अर्थात कालानुसार बदललेही) भारतीय संस्कृतीची दिव्य परंपरा त्यांच्याठायी वास करून होती आणि त्याच परंपरेचे महाराज आपल्या विद्यार्थ्यांवर सिंचन करीत होते.

व्यासंगाने बुद्धी बनते, प्रसंगाने मन बनते, सत्संगाने जीवन बनते आणि जनसंगाने कार्य बनते असे म्हणतात. महाराजांजवळ हे चतुरंग बळ होते, ज्या बळाचा

वापर ते समाज घडविण्यासाठी करीत आले होते. महाराज हे अध्यात्म भक्तीचे, ज्ञानाचे चालते बोलते धर्मपीठ होते, विद्यापीठ होते. छात्र शिक्षण, नवविधा भक्ती साधन, प्रवचन-कीर्तनाचे शिक्षण असा त्यांचा ज्ञानप्रदान याग सदैव धगधगत राहिलेला होता.

**उपासनेला दृढ चालवावे । भूदेव संताशी सदा नमावे ।**
**सत्कर्म योग वय घालवावे । सर्वामुखी मंगल बोलवावे ।।**

या समर्थ रामदासांच्या उक्तीप्रमाणे महाराजांचे व्यक्तित्व होते. ते 'ज्ञानशील माणसाला प्रज्ञाशील, प्रज्ञाशीलाला दयाशील, दयाशीलाला प्रज्ञाशील आणि वैयक्तिक सदाचारास धर्मशील बनवण्यासाठी' प्रयत्नशील होते. त्यासाठी ज्या सामाजिक कार्यकर्त्यांचा जनहिताकडे अधिक कल होता, अशा असंख्य कार्यकर्त्यांना जागृत, संस्कारित व उन्नत करण्याचे काम महाराजांनी केले होते.

साधुसंतांचे कार्य नेहमीच लोकोद्धारार्थ असते. त्यांचेठायी जशी भगवंताबद्दलची सच्ची भक्ती असते तशीच लोककल्याणाची सच्चाईही त्यांच्या कार्यात असते. ही मंडळी केवळ उपदेशक नसतात तर 'आधी केले मग सांगितले' या उक्तीप्रमाणे चालत असतात. अशा संतांचा, सत्पुरुषांचा सहवास लाभणे हे पूर्वसंचित मानले जाते. या संतांचा लोकसंग्रह हा केवळ लोकहितासाठीच असतो. कारण मुळातच ही मंडळी इच्छा, वासना, स्वार्थ, क्रोधादी विकारांपासून विभक्त झालेली असतात. त्यांची प्रत्येक कृती व विचार हा निरपेक्षपणे, नि:स्वार्थाने जनकल्याणाचे कार्य करीत असते. 'शरीर परोपकारे लावावे । बहुतांच्या कार्यास यावे ।,' या समर्थ रामदासांच्या उक्तीत संतांचे संतपण दिसून येते. 'जगाच्या कल्याणा' या ध्येयाने प्रेरित झालेली मंडळी आपल्या आचार-विचाराद्वारे 'जग लावावे सत्पथी' हे कार्य करीत असतात. महाराजांच्या एकूण व्यक्तिमत्त्वाचे, कार्याचे आणि विचारांचे अवलोकन केल्यास त्यांच्या प्रत्येक आचार-विचारात 'जगाच्या कल्याणा'...... हीच वृत्ती आढळून येते.

समाजातील साधुसंतांचे कार्य नेहमीच शाश्वत स्वरूपाचे असते. औषधाच्या मात्रेप्रमाणे ते समाजात संथपणे परंतु खात्रीशीर स्वरूपात प्रभावित होत असते. महाराजांच्या कार्यानेही जनमानसात शाश्वत स्वरूपाचा ठसा उमटविला होता. 'शोधुनिया आले संत । हिताहित जग ।' या प्रमाणे ते आले, स्वत:च्या संसाराचा विचार दुसऱ्या पातळीवर ठेवला आणि समाजोद्धाराच्या कार्यास वाहून घेतले. प्रसंगी त्यांनी स्वहिताचा त्यागही केला होता, व्रतस्थी, करारीही बनले होते. व्यक्तिगत सुखासाठी त्यांनी तत्त्वभेद कधीच केला नाही. विवेकाधिष्ठित जीवन नेहमीच आदर्शवादी असते या अर्थाने महाराजांचे व्यक्तित्त्व नेहमीच 'आदर्श' होते.

महाराजांच्या सहवासात राहून ज्यांनी त्यांचे जीवन जवळून अनुभवले आहे अशीच मंडळी महाराजांच्या जीवनाचा अन्वयार्थ लावू शकतील. सहा-सात दशके ज्यांची वाणी सतत कीर्तन, प्रवचने, व्याख्याने यांच्या माध्यमातून ज्ञानेश्वर-ज्ञानेश्वरी, तुकाराम-तुकाराम गाथा आदींचे मोठेपण सांगत, समजावत राहिली होती, त्यामुळे त्या वाणीलाही पावित्र्य लाभलेले होते. ते ज्या मार्गाने चालत राहिले त्या मार्गाने चालत राहणे हा त्यांची स्मृती जागवण्याचा खरा मार्ग ठरेल.

या ग्रंथलेखनाच्या निमित्ताने महाराजांच्या जीवनाच्या जवळ जाण्याची संधी पुन्हा एकदा मिळाली हे मी माझे मोठे भाग्य समजतो. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष, सचिव यांनी माझेबद्दल व्यक्त केलेला विश्वास, सोलापूर येथील भागवत भक्त ह.भ.प. भाऊ थावरे यांनी केलेली मोलाची मदत, तसेच मंडळातील सेवकवर्गानी केलेले सहकार्य-यामुळे माझेकडून संतसेवा घडून आली. या सर्वांना शतश: धन्यवाद !

**देखणी ती पाउलें जी ध्यासपंथें चालती ।**
**वाळवंटातून सुद्धा स्वस्तिपद्मे रेखिती ।'**

**-बा. भ. बोरकर.**

।। इतिश्री ।।

# ह. भ. प. (वै.) धुंडा महाराज देगलूरकर :
# व्यक्ती व कार्य

॥५॥

- परिशिष्टे
- सूची
- संदर्भ

## परिशिष्ट - १

### बोध परंपरा

- भागवत परंपरा
  - श्री ज्ञानदेव
  - श्री सोपानदेव
  - श्री विसोबा खेचर
  - श्री नामदेव
- योग परंपरा
  - श्री ज्ञानदेव
  - श्री सत्यमलनाथ
  - श्री गैबीनाथ
  - श्री उद्बोधनाथ
  - श्री केसरीनाथ
  - श्री शिवदीननाथ
- (आणखी एक) तिसरी पंरपरा (ज्या परंपरेची दखल संतसाहित्य व परिवारात घेणे अपेक्षित आहे.)
  - श्री ज्ञानदेव
  - श्री देवनाथ
  - श्री चुडामणि
  - *श्री गुंडानाथ (श्री. गुंडामहाराज-आद्य वा पहिले) येथून पुढे ही परंपरा शिष्य आणि वंश (कुल) परंपरा अशी सुरु झाली

## परिशिष्ट - २

### *श्री गुंडानाथ महाराज (पहिले)- शिष्य परंपरा

- शिष्यपरंपरा
  - श्री वीरनाथ महाराज
    - वंशपरंपरा
      - श्री मल्लनाथ महाराज
      - श्री गुरुबाबा महाराज
      - श्री ज्ञानेश्वर महाराज (औसेकर)
    - बोध (शिष्य) परंपरा
      - श्री सिद्धेश्वर महाराज
      - श्री जगन्नाथ महाराज
      - श्री बळिराम महाराज
  - श्री रामचंद्र महाराज बुटी (नागपूर)
    - श्री महादेव महाराज (चिंचणी)
    - श्री रामचंद्र महाराज (तिकोटे)
    - श्री विश्वनाथ महाराज (रुकडी)
    - श्री गणेश नारायण बाबा महाराज (रुकडी)
    - श्री स्वामी स्वरुपानंद (पावस)
- वंशपरंपरा
  - श्री लक्ष्मण महाराज (पंढरपूर)
    - श्री नारायण महाराज (१)
    - श्री गुंडा महाराज (२)
    - श्री नारायण महाराज (२)
    - श्री गुंडा महाराज (३)

# परिशिष्ट - ३

## वंशपरंपरा

- श्री. गुंडानाथ महाराज (पहिले/मूळ पुरुष)
  - श्री श्रीहरी महाराज
    - श्री गुंडा महाराज (द्वितीय)
      - श्री नारायण महाराज
        - श्री गुंडा महाराज (तृतीय)
        - श्री मार्तंड महाराज
        - श्री काशिनाथ महाराज
      - श्री रामचंद्र महाराज
        - *श्री धुंडा महाराज
        - श्री बंडा महाराज
      - श्री महिपती महाराज
        - (शिष्य परंपरा)
          - श्री धुंडा महाराज
          - श्री नरासिंव्हदास (मछलीपट्टम्-आंध्र)

- *श्री धुंडा महाराज
  - श्री वसंत महाराज
  - श्री भागवत महाराज
  - श्री भानुदास महाराज
    - श्री चैतन्य महाराज (गादी परंपरा)
  - श्री भारत महाराज
  - श्री भालचंद्र महाराज

**परिशिष्ट - ४**

## महाराजांचा जीवनपट

१९०४ महाराजांचा जन्म, दि. १५ मे, १९०४ (वैशाख शुद्ध तृतीया शके १८२६, अक्षय तृतीया.)

१९०८ पिता श्री. रामचंद्र महाराज यांचे निधन.

१९१७ माता श्रीमती मनुबाई यांचे निधन व भगिनी रंगुबाई हिचे निधन.

१९१८ बिदरचे श्री. मल्हारराव वकील यांची कन्या-कृष्णाबाई यांचेशी विवाह.

१९२० आयुष्यातील पहिले कीर्तन (आषाढ शुद्ध एकादशी शके १८४२ रोजी).

१९२१ पहिली पायी वारी. (देगलूर ते पंढरपूर/वयाच्या सतराव्या वर्षी)

१९२१ राजकीय चळवळीत सहभाग, असहकार, परदेशी वस्तुंवर बहिष्कार, चहा, तपकिरीचा त्याग.

१९३० 'मोघा' गावच्या जहागिरीवर वारसा हक्काच्या नोंदीचे उद्‌भवलेले प्रकरण, तातडीने जाण्याची गरज असतांनाही चातुर्मासात पंढरपूर न सोडण्याच्या व्रताने बांधील असल्यामुळे न जाता, चातुर्मासानंतर जाऊन युक्तिवादाने जहागिरी टिकविण्यात यश.

१९३३ तृतीय पुत्राचा (श्री. भानुदास महाराज) जन्म, ३ एप्रिल, १९३३.

१९३४ चंद्रभागेस आलेला महापूर.
ह. भ. प. श्री महिपती महाराज यांचे निधन. (शके १८५६)

१९३५ चुलत भगिनीचा विवाह
हरिपाठावर विवेचन लिहिण्यास प्रारंभ. (पौष वद्य एकादशी शके १८५८)

१९३८ चतुर्थ पुत्राचा (श्री. भारत महाराज) यांचा जन्म ९ जुलै, १९३८.

१९४० नांदेड येथील संस्कृत महाविद्यालयाच्या स्नेहसंमेलनाचे अध्यक्ष.

१९४७ पंढरपूर येथील श्री विठ्ठल मंदिर अस्पृश्यांना खुले झाल्याने, मंदिरात जाणे बंद केले. कन्येचा (कु. आशा) जन्म. ३ जुलै, १९४७ (विवाहोत्तर सौ. आशा राजे). हरिद्धार, प्रयाग, काशी, गया, अयोध्या, हरिद्धार, बद्रिनाथ (बद्रिकेदार) ही तीर्थयात्रा.

१९५४ कन्येचा (कु. सुनीती) जन्म २ सप्टेंबर, १९५४, (विवाहोत्तर सौ. सुनीती देशमुख).

१९५५ 'हरिपाठ विवरण' ग्रंथ प्रकाशित.

१९५८ हैद्राबाद येथील परिसंवादाचे अध्यक्ष.

१९६० नाशिक येथील अखिल भारतीय कीर्तन महोत्सवाचे अध्यक्ष.

१९६१ कनिष्ठ बंधूचे (श्री बंडा महाराज) हृदयविकाराने निधन. ६ जुलै, १९६१. टाकळी येथे गाडी उलटून अपघात. १० जुलै, १९६१.

१९६२ नागपूर साहित्य संघात विद्वत् व्याख्याता म्हणून प्रवेश.
पंढरपूर येथील श्री विठ्ठल मंदिरात पुनः प्रवेश (कार्तिक वद्य एकादशी).

१९६३ 'श्री संत वचनामृत' हा श्री ज्ञानदेवांच्या विराण्यावर आधारित ग्रंथ प्रकाशित. परमस्नेही ह. भ. प. लोहिया महाराज यांचे निधन.

१९६६ प्रयाग येथील विश्व हिन्दू परिषदेस उपस्थित. २२ जानेवारी, १९६६.
'अध्यात्मिक विचारधारा' हा ग्रंथ प्रकाशित. १३ नोव्हेंबर, १९६६.

१९६६ षष्ट्यब्दीपूर्ती समारंभ संपन्न. दिनांक २० नोव्हेंबर, १९६६.

१९६८ संप्रदायाचे परमस्नेही ह. भ. प. (प्रा.) मामासाहेब दांडेकर यांचे निधन. ९ जुलै, १९६८.

१९६९ पंढरपुरातील साप्ताहिक 'पंढरी संदेश' नियतकालिकाच्या पहिल्या अंकाचे प्रकाशन, ७ नोव्हेंबर, १९६९.
पुणे येथील श्री हरिकीर्तनोत्तेजक सभेत आयोजलेल्या अ. भा. कीर्तन परिषदेचे अध्यक्ष. (२७.११ ते ५-१२-१९६९).

१९७१ वारकरी शिक्षण संस्थेस 'वडवाळे' येथे जागा उपलब्ध करुन दिली.

१९७२ 'एकनाथी हरिपाठ-विवरण' हा ग्रंथ प्रकाशित.

१९७३ पवनार येथील श्री. विनोबा भावे यांच्या आश्रमास भेट. दिनांक १३ मार्च, १९७३.

१९७४ ह. भ. प. दादा महाराज सातारकर जन्मशताब्दी यात सहभाग.
महाराष्ट्र राज्य शासनाच्या वतीने आयोजित 'श्री ज्ञानेश्वरी संपादक समिती'- यात सदस्य म्हणून सहभाग.

१९७५ गंगासागर यात्रा.

१९७६ 'पसायदान-श्री ज्ञानदेवांचे मागणे' हा ग्रंथ प्रकाशित.
अखिल भारतीय कीर्तनकार परिषदेचे (गोवा) अध्यक्ष. डिसेंबर, १९७६.

१९७८ नारद भक्तिसूत्र विवरण- हा ग्रंथ प्रकाशित.
अभंग निरुपण (भाग-१) हा श्री तुकाराम महाराजांचे अभंगावरील ग्रंथ प्रकाशित.

१९८० लातूर येथे मराठवाडा साहित्य सम्मेलनात संतवाङ्मय विभागाचे अध्यक्ष.
पंचाहत्तरीनिमित्त अमृत महोत्सवाचे आयोजन संपन्न. ८ नोव्हेंबर ते १५ नोव्हेंबर, १९८०.

१९८५ काशी-रामेश्वर तीर्थयात्रा. दिनांक १२ मार्च, १९८५ ला रामेश्वरचे दर्शन. सहस्त्रचंद्र दर्शन सोहळा संपन्न. (सौ. सुमती वहिनींचे माहेरी) दिनांक १३ एप्रिल, १९८५. अभंग निरुपण (भाग-२) हा ग्रंथ प्रकाशित.

१९८७ श्री देवदेवेश्वर संस्थान-पर्वती (पुणे) यांचेकडून सन्मानपत्र समर्पित. दिनांक २ फेब्रुवारी, १९८७.

श्री. ज्ञानेश्वरी-निरुपण या ग्रंथलेखनास प्रारंभ. जुलै, १९८७.

श्रीक्षेत्र आळंदी येथील विश्व हिंदू परिषदेच्या अधिवेशनाचे अध्यक्ष. २५ डिसेंबर, १९८७.

१९८८ जिजामाता पुरस्कार प्राप्त.

१९८९ चातुर्मासाची सूत्रे श्री भानुदास महाराजांकडे सुपूर्त.

१९९० पुणे विद्यापीठाद्वारे सन्मान. दिनांक ३० जुलै, १९९०.
श्रीक्षेत्र आळंदी येथे मुख्यमंत्री मान. शरद पवार यांचे हस्ते सत्कार.

१९९१ पंढरपूर नगरपरिषदेद्वारे नागरी सन्मान, सत्कार, मानपत्र अर्पण.
दिनांक ४ फेब्रुवारी, १९९१.
श्रीक्षेत्र आळंदी येथील महर्षी वेदव्यास प्रतिष्ठानद्वारे श्री संत ज्ञानेश्वर पुरस्कार प्राप्त.

१९९२ महानिर्याण. दिनांक २३ जानेवारी, १९९२, सायं. ५.४५ पंढरपूर येथे.
पत्नी सौ. कृष्णाबाई उर्फ अम्मा यांचे निधन, दिनांक २४ जानेवारी, १९९२ सकाळी ८ वा.

देगलूर. सुपुत्र श्री भागवत महाराज यांचे निधन. फेब्रुवारी १९९२.

१९९३ प्रथम पुण्यस्मरण. संयुक्त समाधी मंदिरात पादुकांची स्थापना.

***

**परिशिष्ट - ५**

## हैद्राबाद संस्थानातील निजामाचा कार्यकाल

| | |
|---|---|
| इसवी सन १७२४-४८. | कमरुद्दीन उर्फ पहिला निजामुल्मुल्क. |
| १७४८-६२. | या काळात निजाम कमरुद्दीनच्या चार मुलांची सत्ता होती. |
| १७६२-१८०३. | मीर निजाम अली. |
| १८०३-१८२९. | निजाम सिकंदर जाह. |
| १८२९-१८५७. | निजाम नसरुद्दौला. |
| १८५७-१८६९. | निजाम अफजलुद्दौला. |
| १८६९-१९११. | निजाम मीर महबूब अली. |
| १९११-१९४८. | निजाम मीर उस्मान अली. |

***

**परिशिष्ट - ६**

## महाराजांना प्रदान केलेली काही मानपत्रे

महाराजांच्या कार्याची आणि विद्वतेची दखल समाजातील अनेक खाजगी सामाजिक संस्था आणि शासकीय संस्थांनी घेत, त्यांना मानपत्र तथा गौरवपत्र देऊन सन्मानितही केले होते. त्यापैकी काही मानपत्रे अशी होती--

मानपत्र-१

ग्रामस्थ कवठे, तालुका देगलूर, जिल्हा नांदेड यांनी दिलेले मानपत्र.

श्री ज्ञानेश्वरीचे श्रेष्ठ भाष्यकार, प्रवचन योगी, आदरणीय हरिभक्त सद्‌गुरू श्री धुंडा महाराज देगलूरकर यांचे सेवेशी,

* आम्हा कौठेवासीय व या परिसरातील मंडळींना आपल्यासारख्या सर्वश्रेष्ठ संताना मानपत्र-गौरवपत्र देण्यास अतीव आनंद-परमानंद होत आहे. आपल्या परिशुद्ध तपस्वी जीवनासमोर आम्ही अत्यंत लहान व अजाण आहोत, परंतु भावाची जाती काही आगळीच असते. 'बालक बापाचिया ताटी रिगे। आणि बापातेच जेववू लागे।'- अशी आमची भोळी श्रद्धा आहे.

* देगलूरच्या पवित्र-पावन कुलात आपण जन्म घेतलात. आपले श्रेष्ठ हरिभक्त पूर्वज हे थोर साक्षात्कारी विख्यात संत होते. त्यांनी सहस्त्रवधी भाविकांना वारकरी संप्रदायाचे पाईक बनवून, त्यांचे जीवन चिरकृतार्थ केले. आपण हेच कार्य वर्धिष्णु करीत आहात. आपण लोकमानसाला सद्‌विचाराचे परमदिव्य संत-वचनामृत देऊन बोध प्रवचनाचा सुकाळ करीत आहात. चार तपापेक्षा अधिक काल आपण उभ्या महाराष्ट्रालाच नव्हेतर मराठी भाविकांना संतवाणीचा चिरपरिचय करुन देत आहात.

* एका अर्थाने 'तैसा वाग्विलास विस्तारु । गीतार्थेसी विश्वभरुं । आनंदाचें आवारुं । मांडू जगा ।। '- ही ज्ञानदेवांची प्रतिमा आणि मनीषा पूर्णत्वाला नेत आहात.

* महाराज ! आपली अमृतमयवाणी थोरामोठ्यांना-बालांना सुखावून जाते. 'तैसे साच आणि मवाळ । मितले रसाळ । शब्द जैसे कल्लोळ । अमृतांचे।'- अशी तुमची वाणी श्रद्धावन्तासह अश्रद्धावन्तांनाही डोल आणते. आपल्या प्रवचन कीर्तनाची धाटणीच काही आगळी. आपण विषय पिंजून पिंजून एवढा सोपा करता की त्यामुळे सर्वांना डोल येतात. संतवाङ्मय आणि वेदोपनिषदातील अपार पाठांतर, असामान्य समयसूचकता, विषय पटवून देण्याची धारदार प्रतिभा व आपल्या लेखणी-वाणीतून घडणारे प्रतिमादर्शन सारेच काही असामान्य ! आपल्या वाक्प्रवाहाने सहस्रावधी मंडळी तृप्त होताच, मुग्ध होतात.

* महाराज ! आपल्या वाणी-लेखणीला दिव्यत्वाचा आणि परतत्त्वाचा स्पर्श झालेला आहे. त्यामुळे आपली वाणी नित्यनूतन वाटते. आपण पूर्ववयात केलेला अखंड अभ्यास आणि संतवाङ्मयाचा घेतलेला ध्यास, प्रचंड देहदंड सोसून विरागतेने केलेले तप, यातून प्राप्त झालेल्या चिंतनयोगाचा मधुघट एकदा का वाणीतून स्रवू लागला की श्रोतयांची धणी पुरते.

* महाराज ! आपले जीवन असामान्य परिशुद्ध. 'आंगमन जैसे । कापुराचे।'- निर्मळ, निष्कलंक, निरहंकारी आणि प्रेमप्रदानी. आपल्या शब्दांशब्दांतून जेव्हां कारुण्य ओसंडते, तेव्हा याची प्रचिती येते. महाभारतकारांनी म्हटले आहे की, 'संत ही कारुण्याची काठोकाठ भरलेली मूर्तीच ! सर्वत्रही दयावंत, संत, करुणेची दिनः ।'

* महाराज ! नारदभक्ती सूत्रे, श्री ज्ञानाराजांचे व एकनाथांचे हरिपाठ विवरण ही आपली ग्रंथसंपदा म्हणजे महाराष्ट्र सारस्वताचे वैभव आहे, भूषण आहे. भारतीय भक्तिशास्त्रावरील ते अमोघ व अजोड भाष्य होय. गुरुवर्य ! आपले ज्ञानेवांच्या पसायदानावरील भाष्य तर अमृतामयी आहे. या ग्रंथाचे प्रकाशन माजी थोर उपराष्ट्रपती श्रीमान् बी. डी. जत्ती यांनी आदराने

करुन आपल्या अधिकाराची मुक्त कंठाने स्तुती केली. त्यामुळे आपल्या या संतधर्म संकीर्तनास लोकमान्यतेसमवेत राजमान्यताही प्राप्त झाली आहे.

* महाराज ! आपल्याविषयी आमच्या मनात जो परमादर वसतो, त्याला आणखी एक कारण आहे. आमच्या कवठ्याचे सत्पुरुष वै. बापू महाराज हे आपले आजोबा होते. त्यामुळे आमचा आदर सहस्रगुणित झाला आहे. कां ? तर आपण आमचेच आहात.

* महाराज ! आपले हे अमृतमहोत्सवी वर्ष आहे. आमच्या भाग्याने आपण शतायुषी व्हावे व आम्हा मंडळींना पुन्हा आपणास गौरवपत्र देण्याचा सुयोग प्राप्त व्हावा. ज्ञानराजांनी आमची ही मनोकामाना पूर्ण करावी, अशी त्यांचे चरणी प्रार्थना आहे.

* महाराज ! आम्ही आपले काय गुणवर्णन करणार ? आम्ही आपणांपुढे नम्र-विनम्र आहोत. आपणासारख्या श्रेष्ठ संतवरास हे गौरवपत्र सर्मपित करण्याचा जो योग आला आहे, हे आमचे भाग्यच ! आम्ही कृतज्ञ आहोत.

'चरणी ठेविजे माथा । स्तुती सांडोनी निवांता ।
चरणी ठेविजे माथा । हेचि भले ।।'

।।श्री ज्ञानेश्वर ।।

पुन्हा एकदा आपणास विनम्र प्रमाण !

***

आपले विनम्र

ह. भ. प. रंगनाथ महाराज * श्री. शिवराज देशमुख
ह. भ. प. पांडुरंग महाराज * श्री. भागवत वट्टमवार
श्री. रा. बा. यरमवार * श्री. नागनाथबुवा आरगुलवार

समस्त कवठेकर मंडळी.

*

(गौरवपत्र लेखक - श्री. दा. का. थावरे, सोलापूर)

**मानपत्र - २**

## महर्षी वेदव्यास प्रतिष्ठान (आळंदी) यांनी दिलेले मानपत्र

*

श्री विठ्ठल, वेदा: सर्व हितार्थाय, महर्षी वेदव्यास प्रतिष्ठान (आळंदी)
प्रदत्त प्रथम श्री ज्ञानेश्वर पुरस्कार समर्पण प्रसंगी ह. भ. प.
श्री धुंडा महाराज देगलूरकर यांचे चरणी भाववंदना.

*

भागवतधर्म । जयाच्या प्रहरी । जन्मोनिया घरीं । ऐशा थोर ।।
गुरुवर्य जोगांची । प्रेरणा पावून । ज्ञानेश चरण। उपासिले ।।
आंग्ल विद्या त्याग । करोनि सत्वर । स्वीय कुलाचार । स्वीकारला ।।
कौमारा पासून । शास्त्र सिंधु माजी । हरिभक्ती काजी । बुडी दिली ।।
संत साहित्याच्या । सोनियाच्या खाणी । चातुर्ये उघडोनि । दान केले ।।
श्री ज्ञानदेवीच्या । कल्पतरू तळीं । कैवल्याची थाळी । वाढोनिया ।।
भाविक भक्तांना । प्रेमें भरवून । स्व. परजीवन । धन्य केले ।।
देवर्षि समान । सर्वत्र हिंडोन । जन प्रबोधन । करोनिया ।।
तनु मन प्राण । धर्म सेवेसाठी । करोनि आटाटी । झिजविले ।।
सारोनिया दूर । विषयांचा लढा । भक्तिचाचि मळा । पिकविला ।।
नाचोनिया प्रेमें । कीर्तनाचे रंगीं । ज्ञानदीप जगीं । लावियेला ।।
शास्त्र परिकृत । रसाळ प्रेमळ । बोल कीं कल्लोळ । अमृताचें । ।
दश सहस्रात । ऐसा वक्ता नाहीं । जाणत्यांची ग्वाही । संपादिली ।।
झाले बहुबहु । आहेत .... होतील । परि यासम हा । म्हणविले ।।
हरिपाठ भाष्य । लिहिले सुंदर । नारदभक्ति सूत्र । विवरिले ।।
पसायदानांचे । वाढोनिया मिष्ठान्न । लेखनी भजन । साधियेले । ।
रामजन्मभूमी । निर्भये मागोन । राष्ट्रीय चैतन्य । जागविले । ।
अनुरुप पत्नी । कन्या, पुत्र, प्राप्त । पूर्वेपुण्यें प्राप्त । गृहाश्रम ।।
धन्य या प्रपंची । धर्म आचरोनि । ममत्व सांडोनि । विहरिला । ।

थोर व्यक्तिमत्त्व ।प्रचंड प्रभाव ।तरीही स्वभाव ।अ-गर्वित ।।
लहानांचे गुण । प्रेमें वाखाणोनि । वाढवी जननी । बाळकासी ।।
तैसे जिज्ञासूंचे । अणुमात्र गुण । कौतुकें वर्णून । थोर केले ।।
किती वर्णावें जी । वर्णिता येईना । पाहूनि जीवना । मुग्ध झालो ।।
ठेवूनिया माथा । आपल्या चरणीं । आम्ही सर्व मनीं । सुखावलो ।।
संत वाङमयात । ज्ञानेशांच्या नामें । पुरस्कार देणें । निमित्त हे ।।
धर्म भास्करास । अर्ध्य प्रदान हे । प्राज्ञ पूजन हे । नम्र भावें ।।
वेद प्रतिष्ठान । निमित्त साधोन । पूजा ही बांधोन । धन्य होई ।।
चंद्रभागा माई । सखा पंढरीश । निरोगी आयुष्य । देवो तुम्हां ।।
ज्ञानेशांचा धर्म । जगी नित्य जागो । भक्ति सुख नांदो । वेदनिष्ठ ।।
द्यावे आशीर्वाद । आपण आम्हासं । विठ्ठल सर्वास । सुखी करो ।।

**।। शुभं भवतु ।।**

*

विनयावतन, पंढरपूर, किशोर म. व्यास (अध्यक्ष).
भाद्रपद वद्य ।। ११, १९१३.
ओंकारनाथ दा. मालपाणी
दिनांक ४ ऑक्टोबर, १९९१, शुक्रवार.
महर्षी वेदव्यास प्रतिष्ठानचे न्यासी मंडळ व (मंत्री) सर्व सदस्य.

***

**मानपत्र-३**

पंढरपूर नगरपरिषद व नागरिकांच्या वतीने देण्यात आलेले मानपत्र.

* 'शुचीतां श्रीमतां गेहे योग योगभ्रष्टो ऽ भिजायते ।,- या गीतावचनानुसार भागवत धर्माचा झेंडा फडकविणारा संत गुंडा महाराजांच्या कुळात आपण जन्म घेतलात. आपले पिताजी श्री. रामचंद्र व माता मनुबाई यांची तपश्चर्या आपल्या रुपाने सफल झाली. आपले चुलते श्री. महिपती महाराज यांनी स्वानंद सुख निवासी जोग महाराज यांचे आज्ञेवरुन आपणास श्री ज्ञानेश्वरीच्या मानस सरोवरात सोडले. आपल्याजवळ बहुत सुकृताची जोडी असल्याने आपली विठ्ठल-आवडी सहज होती. आपणास श्री विनायकबुवा गवई, दामोदरशास्त्री, हरिपूरकरशास्त्री, पंडितप्राण धारुरकरशास्त्री यांची गुरुकृपा लाभली. आपण वयाच्या अवघ्या विसाव्या वर्षी ज्ञानेश्वरीच्या प्रवचनास शुभारंभ केला.

* गेली पासष्ट वर्षे आपण साऱ्या महाराष्ट्राला ज्ञानेश्वरीच्या कल्पतरु तळवटी बसवून अमृतातें पैजा जिंकणाऱ्या मराठी भाषेच्या सुवर्णपटात कैवल्य रसाचे भोजन दिलेत. मराठी शारदेच्या कंठातील कौस्तुभ, ज्ञानेश्वरी ग्रंथ आपण जन्मभर पूजला, अभ्यासला, सांगितला व आचरलाही. इथे मराठीचिये नगरी आपण ब्रह्मविद्येचा सुकाळ केलात. व्यासांचा मागोवा घेत, आचार्यांना वाट पुसत, ज्ञानेश्वर माउलींचे बोट धरुन भक्तीच्या राजपथावरुन आपण आपल्या जीवनाची वाटचाल केलीत. ज्ञानेश्वरीतील साहित्य सोनियाच्या खाणी उघडल्या व ते सोने आपण सर्वांना भरभरुन वाटले. संत विचारांच्या वेली लावल्या. संत वचनांच्या अर्थाचे गिरीवर तयार केले. प्रमेयांच्या उद्यानातून सामान्यांना विहार करविला. ज्ञानदेवांच्या नवरस सागरात आपली वाणी भिजवून जनसामान्यांवर त्यांच्या तुषारांचा वर्षाव केलात व त्यांना ज्ञानेश्वरीच्या अमृत कल्लोळात अवगाहन करविले. ईश्वरनिष्ठांच्या मांदियाळीवर भाक्तिरुप अमृताचा वर्षाव केलात. ज्ञानेश्वरीच्या आनंदाचे डोही आपण आनंदतरंग झालात.

* सर्व इंद्रियात सुखसंवेदना निर्माण करणारे ज्ञानदेवांचे शब्द आपण जनसामान्यांच्या हृदयात नेले. शुष्कवेदान्तसुद्धा आपण आपल्या भक्तीने आर्द्र केलात. ज्ञानेश्वरीच्या नित्य वाचनाने / सहवासाने आपली वाणी रसाळ व परिष्कृत झाली आहे. वेदान्त आणि भक्ती यांचा आपण संगम घडविलात. वेदान्ताची गहन तत्त्वे आपण कधी ईशसंमित महावाक्याने तर कधी संतसंमत कळवळ्याने, कधी सुहृतसंमित वाक्लाघवाने, तर कधी कलावंताच्या कौशल्याने, कधी मातासंमित वात्सल्याने, तर कधी शास्त्रसंमित काटेकोरपणे विशद केलीत.

* 'ज्ञानदेवें पाया रचिलेले व तुका कळस ' झालेले भागवत धर्माचे मंदिर आपण आपल्या कीर्तनाने अखंड जागविलेत. 'कलौ तत् हरिकीर्तनात् ।' हे श्रीमद् भागवताचे वचन शिरसावंद्य मानून आपण कीर्तनरंगी नाचला व जगीं ज्ञानदीप लावला. आपले कीर्तन म्हणजे संगीत, विद्वत्ता व कर्तव्य या तिहींचा मनोरम आविष्कार आहे. आपण 'भक्तिज्ञानाविण इतर गोष्टी' कधीही कीर्तनात सांगितल्या नाहीत. आपण नवविधा भक्तिपैकी कीर्तन भक्तीचा आविष्कार केलात. आपल्या कीर्तनात वक्ता-श्रोता-साक्षीदार एकरुप होत. मुमुक्षू चातकावर ज्ञानचंद्राचे अमृत बरसून त्याचे पारणे फिटे व ते नादब्रह्मात लीन होत.

* या लोकी विशेष आसणारे 'ग्रंथोपजीवी' आपण आहात. आपण असंख्य ग्रंथ अभ्यासले व अनेक ग्रंथ रचले. आपण 'हरिपाठ विवरण' मंथन करुन 'संत-वचनामृत' मिळविले. 'नारदभक्तिसूत्र' ज्ञानयज्ञ करुन 'पसायदान' लोकांना वाटले. आपल्या ग्रंथांनी मराठी सारस्वत समृध्द झाले.

* आपला गृहस्थाश्रमही कृतार्थ झाला. आनंदाने भरलेले घर, बुद्धिमान मुले मधुरभाषिणी कांता, आज्ञाधारक सेवक, प्रेमळ मित्र, घरात आतिथ्य व ईशपूजन, साधुसंगती यामुळे आपला गृहस्थाश्रम धन्य झाला आहे.

* आपणासारखे विद्वान भक्त व संत हे या भागवत धर्माच्या मंदिराचे आधारस्तंभ आहेत. अज्ञानतिमिरात भटकणारांना दीपस्तंभ आहात. आपण आमच्या

पंढरीत दीर्घकाळ वास्तव्य करुन ज्ञानेश्वरीचा ज्ञानयज्ञ सिद्धीस नेलात. आपल्या वाक्‌गंगेत सुस्नात होण्याचे भाग्य आम्हा पंढरपूरकरवासीयांना लाभले, म्हणून आम्ही धन्य आहोत.

**आकल्प आयुष्य व्हावें तया कुळा । माझिया सकळा हरीच्या दासा ।**

**कल्पनेची बाधा न होवो कोणे काळीं । ही संत मंडळी सुखी असो ।।**

अशी श्री रुक्मिणी-पांडुरंगाच्या चरणी प्रार्थना करुन हे मानपत्र ज्ञानेश्वरी ग्रंथाच्या सप्तशताब्दी वर्षांत आम्ही आपणास अर्पण करतो.

**(प्रकाश पाटील)**
अध्यक्ष व उपविभागीय अधिकारी-पंढरपूर.
कार्याध्यक्ष व मानपत्र लेखक
उपाध्यक्षा नगरपालिका-पंढरपूर
ग्रंथराज ज्ञानेश्वर सप्तशताब्दी समिती-पंढरपूर
पंढरपूर नगरपरिषद-पंढरपूर.

***

**परिशिष्ट - ७**

## श्रद्धांजली

## प्रातिनिधिक स्वरूपातील काही भावपूर्ण प्रतिक्रिया

महाराजांच्या महानिर्याणाची बातमी प्रथम आकाशवाणीवरुन प्रसारित झाली आणि नंतर वृत्तपत्रातून. ही बातमी ऐकून वा वाचून असंख्यानी पंढरपुराकडे धाव घेतली. महाराजांचे अखेरचे दर्शन घ्यावे ही प्रत्येकाची श्रद्धापूर्ण भावना होती. काही तासातच पंढरपुरात हजारोंची गर्दी लोटली. पुढे ही संख्या (अंत्ययात्रेप्रसंगी) लाखापर्यंत गेली होती. या प्रसंगाने आयोजित शोकसभेत काही मान्यवरांची आपल्या भावना व्यक्त केल्या. इतर अनेकांनी पत्राद्वारे आपल्या भावना पाठवून शोक व्यक्त केला होता. त्यापैकी काही अत्यंत मोजक्याच प्रतिक्रिया येथे देत आहे.

१. 'वै. महाराजांचे निधन हा नियतक्रमाचा एक अनिवार्य भाग असला तरी त्यांच्या जीवनादर्शाचा या समाजावर उमटलेला भव्य ठसा कधीही पुसला जाणार नाही. जिथे जिथे संत मंडळी जमतील, जिथे जिथे संतवाङ्मयाचे विश्लेषण होत असेल, तिथे तिथे वै. महाराजांचे सहजपणे भावपूर्ण अंत:करणाने स्मरण केल्याशिवाय त्या कार्यक्रमाच्या पूर्तीचा निखळ आनंद कोणासही मिळणार नाही'.

*-- वंदनीय पांडुरंगशास्त्री आठवले, तत्त्वज्ञान विद्यापीठ, मुंबई.*

२. वै. धुंडा महाराजांचे संस्कृत, हिंदी, तेलगू, इंग्रजी इ. भाषांवरील प्रभुत्व नेत्रदीपक होते. ते आज शरिराने आमच्यात नसले तरी त्यांचा संतवाङ्मयाचा गाढा अभ्यास, व्यासंग, संतपरंपरेची त्यांच्याठायी असलेली ठाम जाण, वारकरी व नाथ संप्रदायाबद्दल त्यांची अपार श्रद्धा, सर्वांना समजावून घेण्याची संतवृत्ती या त्यांच्या भावी काळातही अमर राहतील.

*-- नाम. मधुकरराव चौधरी, अध्यक्ष-महाराष्ट्र राज्य विधानसभा.*

३. पूज्य महाराजांनी आजन्म ईश्वर भक्तीची कास बाळगली व नवजागृती करुन लोकांना हरि-कीर्तनाची आवड लावली. ईश्वराच्या अस्तित्वाचे महत्त्व पटवून दिले. जनसमुदायाचे ते ज्येष्ठ प्रबोधक होते.

*-- नाम. शंकरराव चव्हाण, गृहमंत्री -भारत सरकार, दिल्ली.*

४. वक्तृत्वाचे सर्वगुण त्यांच्यासमोर हात जोडून उभे असत. आपले सर्व जीवनच त्यांनी भागवत धर्माच्या सेवेत वाहिलेले होते. हिंदुधर्माविरोधी शासनाच्या निर्णयावर मात करुन अम्मांनी सहगमन केले. या थोरवीस तोड नाही. त्या पतिव्रतेस अक्षरश: धन्यवाद !

*-- स्वामी वरदानंदभारती, (डॉ. अनंतराव दामोदर आठवले)*

५. वारकरी संप्रदायातील एका ऋषितुल्य व्यक्तिमत्त्वाचा आज लोप झाला. व्यक्तिगत माझ्या जीवनामध्ये माझ्यावर पुत्रवत प्रेम करणारी जिव्हाळ्याची व्यक्ती नाहीशी झाली. ही उणीव कधीही भरुन न येण्यासारखी आहे.

*-- ह. भ. प. बाबा महाराज सातारकर, पुणे.*

६. वारकरी संप्रदायाचे अध्वर्यू, संतवाङ्मयाचे गाढे अभ्यासक व ज्ञानेश्वरीचे थोर उपासक श्री धुंडा महाराज आणि मातोश्री कृष्णाबाई यांच्या एकाचवेळी वैकुंठगमनाने समाजाचे भरुन न येणारे नुकसान झाले आहे.

*-- डॉ. श्रीधर गुप्ते, कुलगुरू-पुणे विद्यापीठ.*

७. गेली सहा दशके मराठी भाषिकांसाठी सतत ओसंडून वाहणारा ज्ञानेश्वरीचा एक चालताबोलता अमृतकुंभ देहावसाने विराम पावला आहे. तो चैतन्यमय प्रासादिक वाग्विलास आणि मनुष्यमात्रांवर प्रेमाचा अखंड वर्षाव मात्र पिढ्यान्यपिढ्या विसरला जाणार नाही. मराठी माणसाला सुसंस्कारित करणारे सद्‌विचारी व भक्तिप्रधान बनविणारे महाराजांचे विचारधन पुढील कित्येक पिढ्यांना प्रेरणा देत राहील.

*-- श्री देवी किसन सारडा-नाशिक.*

८. एक सात्त्विक, प्रेमळ, सफल जीवन पूर्णत्वात विलीन झाले. महाराष्ट्रात लक्षावधी घरातून त्यांची आठवण पुसली जाणार नाही.

*-- डॉ. वि. रा. करंदीकर, श्री ज्ञानदेव अध्यासन, पुणे विद्यापीठ.*

९. हरिभक्तपरायण धुंडा महाजांचे जाणे हा जणू मजवर वज्राघातच होता.

*-- श्री गो. नी. (तथा अप्पा) दांडेकर, पुणे.*

१०. उत्तरकाळात या व्यतिरिक्त --

गोसेवक श्री चौंडे महाराज, वाई.

ह. भ. प. यशवंत महाराज साधू, उद्गीर

श्री स. कृ. देवधर, पुणे.

पं. श्री. भा. वि. मुळेशास्त्री (नाशिक)

वेदमूर्ती यज्ञेश्वरशास्त्री कस्तुरे, सावरगण

श्री द. पं. जोशी, हैद्राबाद

ह. भ. प. प्रसाद महाराज, अंमळनेर

श्री भैय्यासाहेब घटाटे, औरंगाबाद

श्री वि. म. जोग, पुणे

काव्यतीर्थ, आचार्य, वेदांत वाचस्पती ह. भ. प. जगन्नाथ महाराज पवार

ह. भ. प. सिद्धेश्वर बलराम महाराज आदींनी वै. धुंडा महाराजांप्रती पत्राद्वारे आपली भावपूर्ण श्रद्धांजली अर्पित केली होती. व्यक्तिगत शोकसंदेशाप्रमाणे महाराजांच्या महानिर्याणानंतर महाराष्ट्रातील सर्व भागातील काही सामाजिक संस्थांमधूनही महाराजांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली होती. त्यापैकी केवळ काही संस्थांचा उल्लेख याप्रमाणे--

*श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटी, आळंदी-पुणे*

श्री सेवागिरी देवस्थान ट्रस्ट, पुसेगाव

श्री गोवर्धन संस्था, वाई (सातारा), पुणे
श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती, पंढरपूर
श्री सदगुरु ज्ञानेश्वर सेवा मंडळ, पुणे
श्री विठोबा रखुमादेवी संस्थान पंचकमिटी, देहू
श्री ज्ञानेश्वर माउली सेवा मंडळ, सोलापूर
श्री माणिक प्रभू संस्थान, माणिकनगर
वारकरी शिक्षण संस्था, आळंदी-पुणे
अखिल भारतीय किसान संघ, परभणी
श्री सच्चितानंद संस्कृत पाठशाळा, देगलूर-नांदेड
नगरपालिका, पंढरपूर
सोपानदेव संस्थान, सासवड
राष्ट्रीय सेवक संघ (महाराष्ट्र प्रांत), इ.

***

## संदर्भ सूची -- क्र. १

### (अ) श्री धुंडा महाराजांनी लिहिलेले ग्रंथ :--सूची

| | | |
|---|---|---|
| १. | हरिपाठ विवरण अर्थात् भक्तिशास्त्र | (१९५५) |
| २. | संत वचनामृत | (१९६३) |
| ३. | आध्यात्मिक विचारधारा | (१९६६) |
| ४. | एकनाथी हरिपाठ | (१९७२) |
| ५. | पसायदान-ज्ञानदेवांचे मागणे | (१९७६) |
| ६. | नारद भक्तिसूत्र-विवरण | (१९७८) |
| ७. | अभंग निरुपण (भाग-१) | (१९७८) |
| ८. | सटीप अमृतानुभव (संपा.) | (१९८०) |
| ९. | अभंग निरुपण (भाग-२) | (१९८५) |

### (ब) महाराजांचे स्फुटलेखन :--सूची

- अवतार मीमांसा (मुमुक्षु / जुलै १९२५)
- भक्ति प्रेममय कां ज्ञानमय (मुमुक्षु / १९२६)
- भागवत धर्म मीमांसा (४ लेख / मुमुक्षु - १९३०-३१)
- अध्यात्म मीमांसा (३ लेख / मुमुक्षु - १९३१)
- अहमर्श-विमर्श (३ लेख / तत्त्वज्ञान मंदिर)
- कर्म मीमांसा (२ लेख)
- अवतार मीमांसा इ.

या व्यतिरिक्त अनेक

या ग्रंथ लेखकाला मिळालेल्या स्फुटलेखांची संख्या आहे ८८.

शिवाय पुण्यातील प्रसाद मासिकातून प्रसिध्द झालेली अभंग संकीर्तन-लेखमाला.

### (क) महाराज लिखित प्रस्तावना

अन्य लेखकांच्या ग्रंथांना लिहिलेल्या प्रस्तावना-सुमारे १०० चे वर.

# संदर्भ ग्रंथसूची--२


**ग्रंथ**

**मराठी संताचे सामाजिक कार्य -** ले. डॉ. वि. भि. कोलते व सौ. सु. र. कोलते. प्रका. द. का. कोलते, नरवेल (बुलढाणा) / १९८४.

**वारकरी संप्रदाय : उदय व विकास -** ले. डॉ. भा. पं. बहिरट व प. ज्ञा. भालेराव. प्रका. व्हिनस प्रकाशन, पुणे / १९८८.

**अर्वाचीन संत गाथा -** ले. डॉ. ज. वा. जोशी व डॉ. सुनीता जोशी. प्रका. धार्मिक वाङ्मय प्रकाशन मंडळ, आळंदी / १९९०.

**वारकरी पंथाचा इतिहास -** ले. प्रा. शं. वा. तथा मामासाहेब दांडेकर, प्रका. धार्मिक वाङ्मय प्रकाशन मंडळ, आळंदी / १९६६.

**ह. भ. प. धुंडा महाराज देगलूरकर -** संपादक.......

**ज्ञानेश्वरी सेवा गौरव ग्रंथ -** प्रका. ज्ञानेश्वरी सेवा सुवर्ण महोत्सव समिती, पंढरपूर /१९६६.

**श्री धुंडा महाराज देगलूरकर -** ले. श्री. दा. का. थावरे. प्रका. संतकृपा प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे. /१९९९.

**संतवाणीचे प्रयागतीर्थ -** श्री. दा. का. थावरे, प्रका. श्री ज्ञानेश्वर माउली सेवा मंडळ, सोलापूर /२०००.

**स्वामी रामतीर्थ -** ले. डॉ. प्रकाश मेदककर प्रका. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ /सप्टें. २००३.

**हैद्राबाद स्वातंत्र्य संग्राम -** ले. श्री. शंकरभाई पटेल, प्रका. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई /दु. आ. १९९३.

## विशेषांक

ह. भ. प. धुंडा महाराज देगलूरकर अमृत महोत्सव - स्मरणिका. / नोव्हें. १९८०.
*-- संपा. सर्वश्री. म. वि. देशपांडे , दा. का. थावरे, म. द. जोशी.*

साप्ता. पंढरी संदेश - श्री धुंडा महाराज देगलूरकर - अमृत महोत्सव - विशेषांक / नोव्हेंबर, १९८०.-- *संपा. डॉ. गोपाळ गोविंद बेणारे, पंढरपूर.*

स्मृती सौरभ - वै. धुंडा महाराज देगलूरकर - स्मृती विशेषांक
*-- संपा. सर्वश्री. कुमठेकर , थावरे, नाईक / डिसेंबर १९९२.*

विशाल हिंदू सम्मेलन (विश्व हिंदू परिषद - आळंदी सम्मेलन) स्मरणिका.
*-- संपा. श्री य. ग. गायकवाड / द्वारा.-वि. हिं. प. पुणे / डिसेंबर, १९८७.*

शिवश्री ; संत वै. धुंडा महाराज देगलूरकर-जन्मशताब्दी स्मरण विशेषांक.
*-- संपा. श्री विद्याधर ताठे. / सन २००४.*

नवा गोफण - श्री धुंडा महाराज देगलूरकर-प्रथम पुण्यतिथी विशेषांक.
*-- संपा. श्री. किशोर पांडुरंग उत्पात, पंढरपूर /जाने. १९९३.*

पंचधारा - महाराष्ट्र साहित्य परिषद - हैद्राबाद (आंध्र प्रदेश) श्री. देगलूरकर विशेषांक.
*-- संपा. श्री. द. पं. जोशी / जाने.-मार्च १९९२ व जून २००४.*

* * *

वाय २०३-१,१००*-१.२०१५

शासकीय मुद्रणालय, कोल्हापूर.



**डॉ. अरुण प्रभुणे (पुणे)**
**एम्. ए. बी. एड्. पीएच्. डी.**

**साहित्य सेवा**

**कथासंग्रह**

कृष्णाकाठची माती.
हिकमती.
मनाचिये गुंती.

**कादंबरी**

स्वरमुग्धा.

**संकलन-समीक्षा**

ताम्हनकरांची कविताःएक मागोवा.

**संकलन-संपादन**

आदिवासीसंस्कृती, कला व कथा.
अभिप्रावो ग्रंथींचा.
अभंग निरुपण (भाग तिसरा)
ज्ञानेश्वर व ज्ञानेश्वरी.

**संपादन**

त्वं चत्वारि वाक् पदानि !
कृष्णाय वासुदेवाय.

**चरित्र**

ह. भ. प. प्रा. शं. वा. तथा मामासाहेब
दांडेकर, (अप्रकाशित)

**स्फुट लेखन**

सुमारे १५० लेख